# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांकः– ८/२/२००६

## उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. ८/२/२००६ रोजीच्या विशेष महासभेचे इतिवृत्त.

उल्हासनगर महानगरपालिकेची विशेष महासभा बुधवार दिनांक ८/२/२००६ रोजी दुपारी ३.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभेत मा.महापौर, श्रीमती ज्योती कालानी हया पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्या. व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य/सदस्या उपस्थित होते / होत्या.

१) मा. महापौर :–श्रीमती ज्योती कालानी

२) मा. उपमहापौर :–श्री. विनोद तलरेजा

| | | | |
|---|---|---|---|
| ३. | श्री. टेकचंदानी राजु, | ३६. | श्री. जाधव प्रशांत |
| ४. | श्रीमती रामचंदानी भावना | ३७. | श्री. जाधव सुरेश |
| ५. | श्री. सुर्यकांत (बबन) लिंगे | ३८. | श्री. देवेंद्रसिंग खेमाणी |
| ६. | श्री. वाघे शामु | ३९. | श्रीमती कारीरा रेखा मन्नुमल |
| ७. | श्रीमती मोकल सीमा | ४०. | श्री. पमनानी ईश्वर सतरामदास |
| ८. | श्री. दिलीप गायकवाड | ४१. | श्री. बोडारे धनंजय बाबुराव |
| ९. | श्री. मोकल चंदाराम विठोबा | ४२. | श्री. पाटील विश्वनाथ |
| १०. | श्री. एडके गणपत गोविंद | ४३. | श्रीमती. लक्ष्मीबाई ससाणे |
| ११. | श्रीमती. शर्मा कमला गंगाधर | ४४. | श्री. अंकुश म्हस्के |
| १२. | श्री. वलेचा पृथ्वी व्यापारीलाल | ४५. | श्री. चौधरी राजेंद्र |
| १३ | श्री. उमाप रामदास | ४६. | श्री. पंजाबी नारायण |
| १४. | श्री. यादव लालबिहारी बुझारत | ४७ | श्रीमती पंजाबी दिपा |
| १५. | श्रीमती बामणकर नंदिनी गजानन | ४८. | श्री. साधवानी मनोज |
| १६. | श्री. रोहडा श्यामसुंदर जानीलाल | ४९. | श्री. पुरस्वानी जमनादास |
| १७. | श्री. गुप्ता प्रभुनाथ दुखंती | ५०. | श्रीमती भटिजा कोमल |
| १८. | श्री. पवार नाना | ५१. | श्री. होशियारसिंग हरिसिंग लबाना |
| १९. | श्रीमती आहुजा निता प्रकाश | ५२. | श्री. नरेंद्रकुमार ठाकुर |
| २०. | श्री. जग्यासी राजु | ५३. | डॉ. श्रीमती निना नाथानी |
| २१. | श्रीमती खांडेकर प्रेमा | ५४. | श्रीमती छाब्रिया भारती |
| २२. | श्री. निकम शांताराम | ५५. | श्री. संजय रामचंद्र बठीजा |
| २३. | श्री. टाले प्रमोद | ५६. | श्रीमती. रिझवाणी सुजाता रमेश |
| २४. | श्रीमती. सोनेजी मीना (सोंडे) | ५७. | श्रीमती मिनु दासानी |
| २५. | श्रीमती. मसंद माया घनश्यामदास | ५८. | श्री. पंजाबी लाल देवनदास |
| २६. | श्री. सुरेश नामदेव गायकवाड | ५९. | श्री. लालवानी दिलीप जेठानंद |
| २७. | श्रीमती वनवारी मोना अशोक | ६०. | श्री. हरदास माखिजा |
| २८. | श्री. वनवारी किशोर नारायणदास | ६१. | श्री. राजेश वदारिया |
| २९. | श्री. सतरामदास जेसवानी | ६२. | श्री. रामरख्यानी मोहनदास |
| ३०. | डॉ. श्रीमती साधवानी जया | ६३. | श्री. जयसिंघानी अनिल |
| ३१. | श्री. लुंड गोविंदराम डोलुमल | ६४. | श्रीमती करोतिया मालती |
| ३२. | श्री. राज असरोंडकर | ६५. | श्री. इदनानी राजु चंद्रभान |
| ३३. | श्री. मुलचंदानी महेंद्र | ६६. | श्रीमती भावना खिलनानी, |
| ३४. | श्री. ठाकुर अशोक | ६७. | श्री. भालेराव गौतम |
| ३५. | श्रीमती अनिता गुप्ता | ६८. | श्री. विनोद ठाकुर |

तर,

मा.सदस्य / सदस्या १. श्रीमती संगिता जावळे, २. श्री. सोनवणे नथु, ३. श्री. राजेंद्रसिंह भुल्लर, ४. श्री. बेहराणी ठाकुरदास वर्यलदास, ५. श्री. साधवानी मोहन, ६. श्री. बच्चाराम रुपचंदानी, ७. श्रीमती वसिटा बेबी, ८. श्रीमती

माने किरण, ९. श्री. रमेश चव्हाण, १०. श्रीमती सुर्वे जयश्री, ११. श्रीमती किरण माखिजा, १२. श्री. बेहरानी मोहन वर्यलदास व १३. श्रीमती कृष्णानी रेखा सभेस अनुपस्थित होते / होत्या.

दुपारी ३.३५ वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

मा. महापौर श्रीमती ज्योती कालानी हया अनुपस्थित असल्याने मा. उपमहापौर श्री. विनोद तलरेजा हे पीठासीन अधिकारी म्हणुन आसनस्थ होते.

**मा. सदस्या श्रीमती डॉ. जया साधवानी हया सभागृहातुन बाहेर गेल्या..** 

**मा. सदस्य श्री. अशोक ठाकुर :—**मा. महापौरजी,मा. आयुक्त साहेब, श्रध्दांजलीसाठी एक प्रस्ताव आहे. आपले माजी नगरसेवक व कॉंग्रेसचे एक वरीष्ठ नेते श्री. हिरामण भालेराव यांचे मोठे बंधु श्री. संतु दिपाजी भालेराव यांचे दिनांक दोन फेब्रुवारीला निधन झाले आहे. आपले सदस्य श्री. गौतम भालेराव यांचे ते काका होते. कृपया त्यांना दोन मिनिटांसाठी श्रध्दांजली दयावी.

---

शोक प्रस्ताव

सुचकाचे नाव :— श्री. अशोक ठाकुर

अनुमोदकाचे नाव :— श्री. किशोर वनवारी

उल्हासनगर महापालिकेचे माजी नगरसेवक व कॉंग्रेसचे एक वरीष्ठ नेते श्री. हिरामण भालेराव यांचे मोठे बंधु तसेच महापालिका सदस्य श्री. गौतम भालेराव यांचे काका श्री. संतु दिपाजी भालेराव यांचे दिनांक २.२.२००६ ला निधन झाले आहे.

यांच्या कुटूंबियांचे दु:खात हे सभागृह सहभागी असुन हे दु:ख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो. तसेच मृतात्म्यास चिरशांती लाभावी अशी प्रार्थना करण्यासाठी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पित करण्यासाठी प्रस्तावित.

**महासभा ठराव क्र. ७१ ड**      दिनांक:—८.२.२००६

ही महासभा वरील प्रस्तावने अनुसार श्री. संतु दिपाजी भालेराव यांच्या निधनामुळे दोन मिनिटे मौन पाळून श्रध्दांजली अर्पण करीत आहे. तसेच त्यांच्या कुटूंबियांच्या दु:खात सहभागी होऊन हे दु:ख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो अशी प्रार्थना करीत आहे.

सर्वानुमते

उप महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

मा. सचिव :— विषय क्र. १ वाचुन दाखवितात.

---

➡ <u>विषय क्र. १:—</u> मागील महासभेचे दिनांक १९/१२/२००५ (त्यात दि. १७/१/२००६)) रोजीचे इतिवृत्त कायम करणे.

---

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:—</u> मा. महापौरजी, दिनांक १७/१/२००६ रोजी जी महासभा झाली होती त्यामध्ये माझा प्रश्न क्र. ४५८ होता. २७ जुलै ला उल्हासनगरमध्ये जो पुर आला होता व त्यामध्ये लोकांचे जे नुकसान झाले होते त्यामुळे लोकांना फार त्रास सहन करावा लागला होता. त्यावेळी महाराष्ट्र शासनाने घरांमध्ये राहणा—या लोकांना काही मदत जाहिर केली होती. परंतु उद्योजक, कारखानदार व दुकानदार यांची चेष्टा करण्यात आली होती. अशावेळी माझा प्रश्न हा एक चांगला प्रश्न आहे. मा. महापौरांनी सभागृहात निर्देश दिले होते की, ज्या लोकांचे पुरामुळे नुकसान झाले असेल त्या लोकांची एक वर्षाची घरपट्टी माफ करण्यात येईल. त्याबाबतीतच मी प्रश्न विचारला असता मला प्रशासनाने उत्तर दिले आहे की, असा कोणताही प्रश्न उपस्थित झाला नव्हता व त्यावर कोणताही ठराव पारीत झालेला नाही. त्यामुळे घरपट्टी माफ करण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. परंतु माझी आज महापौरांना विनंती आहे की, आपण त्यांची एक वर्षाची घरपट्टी माफ केल्यास त्यांना थोडाफार दिलासा मिळु शकतो. त्यावेळच्या महापौरांनी तसे आश्वासन देखिल दिले होते त्यामुळे आताच्या महापौरांनी थोडयावेळानंतर जी सभा होणार आहे त्या सभेत ठराव आणुन मंजुर केला तर पिडीतांना थोडाफार दिलासा मिळु शकेल. महाराष्ट्र शासनाने तर त्यांची थट्टाच केली आहे. परंतु जर आपण त्यांना थोडाफार दिलासा दिला तर त्यांना मदत होवु शकते. तसेच या वर्षी मालमत्ता करामध्ये १० टक्के वाढ करुन जी देयके पाठविली आहेत त्याचाही येथे खुलासा झाला तर बरे होईल. कर कसा वाढविला, कोणी वाढविला, याबाबतीत महासभेचा अथवा स्थायी समितीचा ठराव आहे का? तसेच तो ठराव कधी केला आहे? याची माहिती दिले तर बरे होईल.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :—</u> सन्माननिय सदस्य श्री. राजेंद्र चौधरी यांनी जो मुद्दा उपस्थित केला आहे त्याबाबतीत महापौरांनी निर्देश दिले होते की, ज्यांचे पुरामुळे नुकसान झाले असेल त्यांची घरपट्टी एक वर्षासाठी माफ करण्यात येईल. आता स्थायी समितीमध्ये २००६—०७ चे जे अंदाजपत्रक मंजुर झाले त्यावेळी मी देखिल हा मुद्दा उपस्थित केला होता त्यावेळी मला उत्तर मिळाले होते की, महापालिकेतर्फे उल्हासनगरमध्ये कोणालाही मदत दिली नव्हती. त्यावेळी मदतीसाठी महापालिकेतर्फे १७ ते १८ हजार कुपन बनवुन वाटले होते. जेथे आयुक्तांना आवश्यकता भासली होती त्या ठिकाणी कुपनद्वारे मदतीचे वाटप करण्यात आले होते. त्यादिवशी स्थायी समितीत असे ठरले होते की, पुरामुळे बाधित झालेल्या लोकांची यादी तहसिलदारांकडुन मागविण्यात यावी. ती यादी मिळाल्यानंतरच त्यावर निर्णय घेणे शक्य होईल. कोणाचे किती नुकसान झाले आहे याची यादी आपल्याकडे उपलब्ध नाही. त्यामुळे मी आयुक्तांना विनंती करतो की, ज्या लोकांना तहसिलदार कार्यालयाकडुन मदत प्राप्त झाली आहे अशा लोकांची यादी तेथुन मागवुन घ्यावी. त्यानंतर येथे त्यांचा कर माफीचा प्रस्ताव सादर करावा.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—</u>मा. महापौरजी आता या वर्षी जी देयके पाठविली आहेत त्यांचे काय करणार?

<u>मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणी :—</u> मा. महापौरजी, आता येथे पुरग्रस्तांची घरपट्टी माफ करण्याबाबत चर्चा झाली. त्याबद्दल मी सांगु इच्छितो की, बीपीएल योजनेखाली ज्या लोकांनी अर्ज करुन चालु मागणीची देयके भरली होती त्या लोकांना यावर्षी पुन्हा थकबाकीची देयके पाठविली आहेत. त्यामुळे लोकांमध्ये असंतोष आहे. हे योग्य नाही. याबाबतही योग्य निर्णय घेतल्यास बरे होईल.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :—</u> सन्माननिय सदस्य श्री. खेमाणी यांच्या लक्षात असेल काही दिवसांपुर्वी महासभेत याच विषयावर मी लक्षवेधी सुचना दाखल केली होती त्यावेळी श्री. दुसाने उप आयुक्त होते. त्यावेळी मी ३१ मार्च पुर्वी ९६०० प्रलंबित प्रकरणांवर निर्णय घेणेबाबत विनंती केली होती. यावर्षी जी थकबाकी दर्शविली आहे ती मागील वर्षी देखिल दर्शविली होती. त्यावेळी प्रशाासनाने आश्वासन दिले होते की, फक्त चालु मागणीचे देयक भरावे थकबाकी माफ करण्यात येईल. परंतु यावर्षी देखील पुन्हा तसेच झाले आहे. थकबाकी व चालु मागणी दोन्हींचे देयक पाठविले आहे. तर ३१ मार्च पुर्वी कोणत्याही परिस्थितीत ९६०० प्रकरणांबाबतचा प्रस्ताव स्थायी समितीमध्ये यायला हवा. तसेच यापुर्वी आयुक्तांनी ज्यांना कर माफ केला आहे अशा सर्वांना पत्र पाठवुन कळवायला हवे की, आपली थकबाकी माफ करण्यात आली आहे. परंतु मी हे देखिल सांगु इच्छितो की, मागच्या वर्षी आम्ही ज्या लोकांचे कर माफ केले होते त्या लोकांनी मागच्या वर्षीचे व यावर्षीचे कराचे देयक भरलेले नाही. आमचे आमदार श्री. पप्पु कलानी व मा. महापौर श्रीमती ज्योती कालानी यांनी असा निर्णय घेतला होता की,

थकबाकी माफ करावी व चालु मागणीचे देयक स्विकारावे. परंतु तसे झालेले नाही. तसेच ज्यांची थकबाकी आहे त्यांनी मागील वर्षाची व यावर्षीची कराची रक्कम भरायला हवी. तसेच ज्यांच्या प्रकरणात निर्णय झाला नाही अश्यांचे प्रकरण ३१ मार्च पुर्वी स्थायी समितीत आणायला हवे. तसेच श्री. राजेंद्र चौधरी यांनी जे सांगितले त्याच्याशी मी सहमत आहे. आयुक्त साहेबांनी यासाठी तहसिलदार कार्यालयातुन यादी मागावी. जे लोक पुरग्रस्त आहेत, ज्यांना तहसिलदाराने रुपये ४०००, ५००० मदत केली आहे, ज्यांना मदत मिळाली आहे याचा अर्थ त्यांच्या घरात पाणी आले होते. अशी यादी तहसिलदार कार्यालयातुन मागवुन मा. महापौरांनी जसे सांगितले होते की, जे पुरग्रस्त आहेत अशांचे कर माफ करावेत. अशा लोकांना ही सुविधा देण्यात यावी.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—</u> मा. महापौरजी, आता येथे सांगितले की, ज्या लोकांना पैसे मिळाले आहेत अशा लोकांचीच यादी मागवावी. परंतु ज्या लोकांचे छोटे कारखाने आहेत, दुकाने आहेत अशा लोकांना काहीही मदत मिळालेली नाही. परंतु त्यांचे पंचनामे झालेले आहेत. अशा लोकांचीही यादी मागवुन त्यांना फायदा दयावा.

<u>मा. सदस्य श्री. होशियारसिंग लबाना :—</u>मा. महापौरजी, ज्या ज्या लोकांचे पुरामध्ये नुकसान झाले आहे अशा सर्वांचे पंचनामे तहसिलदार कार्यालयामार्फत करण्यात आलेले आहेत. ज्या लोकांच्या दुकानात पुराचे पाणी आले होते अशा लोकांचेच पंचनामे केलेले आहेत. तसेच तुम्ही आता मागील वर्षाची व या वर्षाची घरपट्टी भरण्यासाठी सांगितले. लोक यासाठी तयार आहेत परंतु तुम्ही त्यांच्या प्रलंबित अर्जावर निर्णय घेतलेला नाही. त्यामुळे ते घरपट्टी भरण्यास टाळाटाळ करीत आहेत. तुम्ही त्यावर लवकर निर्णय घेतला तर ते घरपट्टी त्वरीत भरतील. जर यावर्षी निर्णय घेतला नाही तर पुन्हा पुढल्या वर्षी थकबाकी वाढेल. यासाठी यावर लवकरात लवकर निर्णय घ्यावा.

<u>मा. सदस्य श्री. सतरामदास जेसवानी :—</u> मा. महापौरजी, ज्या लोकांनी बीपीएल योजनेअंतर्गत अर्ज भरले होते त्या लोकांकडुन फक्त चालु मागणीचे देयके वसुल केले जावे. तसेच त्यांना पावती देतांना त्यामध्ये तसे लिहावे.

<u>मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाड :—</u> मा. महापौर, आयुक्त साहेब, आपण आता येथे श्री. चौधरी यांच्या महत्वपुर्ण प्रश्नावर उत्तर दिले की, तहसिलदार कार्यालयातुन यादी मागवुन त्यानंतर कर माफी करु. परंतु मी सांगु इच्छितो की, यापुर्वीचे आयुक्त श्री. रामनाथ सोनवणे यांनी यादीप्रमाणे लोकांना पुरग्रस्तांचे दाखले देखिल दिले होते. याचा अर्थ महापालिकेत त्याची पुर्ण माहिती उपलब्ध आहे. शहरात कुठे पुर आला होता, किती नगरसेवकांना कुपन दिले होते याची सर्व माहिती उपलब्ध आहे. आज हा प्रश्न येवुन सहा महिने झाले आहे, त्यामुळे मी आपणांस विनंती करेन की, आपण तहसिलदारकडुन यादी मागविण्यात वेळ घालवु नये. हा एक महत्वपुर्ण मुद्दा आहे. ज्यावेळी आम्ही प्रभागात फिरतो त्यावेळी लोक आम्हांला विचारतात की, मा. महापौरांनी कर माफी केली आहे असे आपण सांगितले होते. तर आज त्या लोकांना पुन्हा देयके आली आहेत. त्यामुळे आपण आयुक्त साहेबांना घरपट्टी रद्द करण्यासाठी निर्देश दयावेत. धन्यवांद।

<u>मा. सदस्य श्री. चंदाराम मोकल :—</u> मा. महापौरजी, आयुक्त साहेब , सचिव साहेब व सन्माननिय सदस्य चौधरी साहेबांनी जो प्रश्न उपस्थित केला आहे, त्याबाबतीत मी सांगु इच्छितो की, आमच्या प्रभागात पुरग्रस्तांना कोणतेही दाखले दिलेले नाहीत. दोन—चार लोकांना मिळाले असतील परंतु आपण आता आयुक्तांना आदेश दिले आहेत की, तहसिलदार कार्यालयातुन यादी मागवावी. माझ्या माहितीप्रमाणे या कामासाठी सीएफसीतुन तहसिलदार कार्यालयाला दोन वेळा पत्र दिले आहे. त्यावर त्यांनी उत्तर दिले आहे की, तुम्ही पुरग्रस्तांची यादी पाठवा त्यानंतर आम्ही त्यांना तसे दाखले देवु. परंतु तहसिलदार कार्यालयाचा हेतु तसा दिसुन येत नाही. कारण त्यामध्ये बराच भ्रष्टाचार झाला आहे. यामुळे तेथुन यादी मिळणे मुश्किल आहे. सीएफसीमध्ये आठ दिवसापुर्वी त्यांचे पत्र आले आहे. सीएफसीतुन यासाठी बरेच प्रयत्न झाले आहे. परवा देखिल मी श्री. अभिजित यांना या कामासाठी भेटलो असता त्यांनी मला सांगितले की ते आपणांस यादी देत नाही. येथे यादी येणे आवश्यक आहे.

<u>मा. सदस्य श्री. रामदास उमाप :—</u> मा. महापौरजी, गरीबांना दिलासा देण्यासाठी बीपीएल हा एक प्रमुख मुद्दा आहे. बीपीएलचा सर्व्हे करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने २००२ मध्ये निर्देश दिले होते. आज २००६ उजाडले आहे तरी प्रशासन हे काम करण्यास अयशस्वी ठरले आहेत. जर त्यांना बीपीएलचा दाखला मिळाला नाही तर पुढील सुविधांपासुन ते वंचित राहतील. सध्या महापालिकेत बरेच लोक यासाठी अर्ज करीत आहेत, नगरसेवकांनी देखील यासाठी पत्र दिले आहे. परंतु सदरची योजना ३० तारखेला संपली आहे असे उत्तर आम्हांला सुवर्ण

जयंती विभागाकडुन मिळत आहे. तर मी विचारु इच्छितो की, सर्व्हेचे काम पुर्ण झाले आहे का? तसेच पुर्ण झाले नसल्यास ते का झाले नाही, तसेच ३० तारखेला याची मुदत संपली आहे काय याची माहिति आम्हांला देण्यात यावी.

<u>**मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :—**</u> मी श्री. उमाप यांना सांगु इच्छितो की, सध्या इतिवृत्त कायम करण्याचा विषय सुरु आहे. श्री. चौधरी यांनी पुरग्रस्तांचा विषय काढला. त्यावर मी आयुक्तांना यादी मागविण्याचे आदेश दिले आहेत. यादी मिळाल्यानंतर त्याप्रमाणे कार्यवाही केली जाईल.

<u>**काही सदस्य :—**</u>पास—पास......

<u>**मा. महापौर :—**</u> मागील सभेचे दिनांक १९/१२/२००५ (त्यात दि. १७/१/२००६) रोजीचे इतिवृत्त जसे आहे तसे सर्वानुमते कायम करण्यात येत आहे. 

<u>**मा. सचिव :—**</u> विषय क्र. २ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. २:—**मा. महापौर व उपमुख्य लेखा अधिकारी यांना दिनांक ११/३/२००६ ते १९/३/२००६ या कालावधीत चीन व थायलंड येथे आयोजित केलेल्या कार्यशाळेत सहभागी होण्यास मान्यता देणे.

---

<u>**मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—**</u>मा. महापौर महोदया, २००५—०६ हे जे वर्ष आहे या वर्षाला कार्यशाळांचे वर्ष असे उल्लेखल्यास ती अतिशयोक्ती होणार नाही. माझ्या नऊ वर्षाच्या नगरसेवक पदाच्या कार्यकाळात नगरसेवकांच्या कार्यशाळांसाठी सगळयात जास्त खर्च झाला असेल तर तो याच वर्षी झाला असेल. प्रत्येक दोन महिन्याला कुठेन कुठे तरी कार्यशाळा असतेच. परंतु या कार्यशाळांचे फलित काय आहे? या शहरातील विकासाची सर्व कामे ठप्प झाली आहेत, हे कार्यशाळांचे फलित आहे. ठेकेदारांना देयके मिळत नाहीत हे कार्यशाळेचे फलित आहे. ठेकेदाराने संप पुकारला हे देखिल कार्यशाळेचेच फलित आहे. या वर्षी महापालिकेत कुठले काम झाले असेल तर ते म्हणजे मुख्यालयातील अधिका—यांच्या दालनांच्या नुतनीकरणाचे काम झाले आहे. यासाठी मी आपणांस निवेदन करेन की, कार्यशाळा बंद करुन शहराच्या विकासाकडे लक्ष दयावे. असे केले तर उचित होईल धन्यवाद।

<u>**मा. सदस्य श्री. होशियारसिंग लबाना :—**</u>मा. महापौरजी, शहरात विकास झाला नाही असे होवुच शकत नाही. माझ्या प्रभागात सुंदर अश्या नाना—नानी उदयानाचे उद्‌घाटन मा. महापौरांच्या उपस्थितीत झालेले आहे. तसेच आता कारंजाचे काम देखिल पुर्णत्वावर आहे. शहरात बरेच पथदिप लागले आहेत, विकासाची कामे झाली आहेत. मी स्वत: देखील एका कार्यशाळेत गेलो होतो त्यावेळी माझ्या सोबत श्री. जमनादास पुरस्वानी हे देखिल होते. मी त्यांना विचारु इच्छितो की, त्यांना तेथे ज्ञान प्राप्त झाले अथवा नाही? आम्ही जेथे कार्यशाळेत जातो तेथे आम्हांला कामकाजाविषयी माहिती प्राप्त होते. आम्ही कोटा येथे गेलो असता तेथे आम्हांला महापालिकेचे कामकाज कसे चालते याची माहिती प्राप्त झाली. सांगण्याचा हेतु हा की, आम्ही जेथे जेथे जातो तेथे तेथे आम्हांला काहीतरी नविन शिकायला मिळते. त्यामुळे कार्यशाळा होणे ही या वर्षाची एक मोठी उपलब्धी आहे. धन्यवाद।

<u>**मा. सदस्य श्री. चंदाराम मोकल :—**</u> मा. महापौर, उपमहापौर, श्री. पुरस्वानी यांनी जो प्रश्न उपस्थित केला त्याबद्‌दल मला असे वाटते की, त्यांना कार्यशाळेचा अर्थच समजलेला नाही. पेमेंट वेगळे आहे व कार्यशाळा वेगळी आहे. महापालिकेचे कार्य कसे चालते याचे आकलन होण्यासाठी कार्यशाळा असते. आधी तुम्ही कार्यशाळेचा अर्थ समजुन घ्या. याचा अर्थ आपण प्रशिक्षण घ्यायचे आहे. जर तुम्ही कार्यशाळेला गेलाच नाही तर तुम्हांला याचा अर्थ कसा कळणार? मालमत्ता करात कशाप्रकारे वाढ होईल, विकास कसा होईल हे नगरसेवकांनी शिकण्यासाठी कार्यशाळा असते.

**<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>** मा. महापौर महोदया, मी आपल्या सोबत कोटा येथे कार्यशाळेत गेलो होतो हे यांनी सांगितले ते बरोबर आहे. तुम्ही स्वत: त्यावेळेस माझ्या बरोबर होत्या. तेथिल अध्यापिकेने आम्हांला सांगितले की, आमच्या कायदयात ब—याच त्रुटी आहेत. त्यावेळी मी त्यांना सांगितले की, तुम्ही बीपीएमसी ॲक्टच्या पुस्तकाचे हिंदी मध्ये भाषांतर का करीत नाहीत. एका नगरसेवकासाठी पाच ते दहा हजार खर्च होतो, महाराष्ट्र व गुजरात येथुन नगरसेवक येतात, कार्यशाळेत भाग घेतात, लाखो रुपये खर्च होतात. यावर तेथिल अध्यापिकेने जे उत्तर दिले त्याचे मी चित्रीकरण करुन ठेवले आहे. ती चित्रफीत देखिल माझ्याकडे आहे. त्या अध्यापिकेने मला सांगितले होते की, जर तुम्ही आम्हांला असे सांगितले तर आमचे दुकान बंद होईल. महापौर महोदया देखिल तेथे होत्या. याचा अर्थ ते तेथे कार्यशाळा चालवुन आम्हांला फसवत आहेत. त्यानंतर त्या अध्यापिकेने माझी माफी देखिल मागितली होती. मी त्यांना बोललो होतो की, कार्यशाळा चालवुन तुम्ही एक प्रकारे दुकान चालवित आहात. यावर त्यांनी आमची चुकी झाली असे सांगुन माझी माफी मागितली होती. आजही माझ्याकडे ती कॅसेट उपलब्ध आहे. अशाप्रकारे कार्यशाळा होत असतील तर तेथे जाण्यात काही एक अर्थ नाही.

**यावेळी मा. महापौर श्रीमती ज्योती कालानी यांनी सभागृहात प्रवेश केला व त्या पीठासीन अधिकारी या पदावर आसनस्थ झाल्या.**

<u>मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी :—</u> महापौर महोदया, या मुद्दयावर भाजपाच्या आमच्या सदस्याने त्यांचा अनुभव येथे सांगितला. महापौर महोदया, सिंधी मध्ये एक म्हण आहे, माणुस जोपर्यंत जिवंत आहे तोपर्यंत त्याने सतत शिकत रहायला हवे. जर एखादा मनुष्य म्हणत असेल की मी परिपुर्ण आहे तर ते चुकीचे होईल. प्रत्येकाने काहीना काही शिकायला हवे. आमचे सदस्य श्री. पुरस्वानी यांनी वाचले नाही की हे तेथे जात आहेत ते खुल्या अर्थव्यवस्थेत निर्णय कसे घ्यायचे हे शिकायला जात आहेत. आपले प्रधानमंत्री श्री. मनमोहन सिंग हे अर्थतज्ञ आहेत, उदारवादी आहेत, सध्या ही महापालिका बिकट परिस्थितीतुन वाटचाल करीत आहे. अशा वेळी महापालिका निधितुन शहराचा विकास करणे असंभव झाले आहे. अशा परिस्थितीत आपल्याला उदार नितीतुन या शहराचा विकास करायचा आहे. आपल्याला तेथे जावुन बघावे लागेल की, त्यांची निती काय आहे? आपण शाळा व कॉलेजांमध्ये जावुन बरेच काही शिकतो. जे पुढे जावुन भविष्यात आपल्याला कामी येते. सर्व विषय काही आपल्या कामात येत नाही. परंतु तरी देखिल आपण शिकण्याचा प्रयत्न करीत असतो. अशावेळी आपल्या महापौर महोदया व हरेश इदनानी जे सुपर कॉम्प्युटर म्हणुन ओळखले जातात, हे दोघे जेव्हा जातील तेव्हा आम्हांला विश्वास आहे की, ते असे काहीतरी शिकुन येतील ज्यामुळे या शहराचा विकास करण्यासाठी नविन मार्ग उपलब्ध होतील. त्यामुळे या सभागृहाला मी येथे विनंती करेन की, या प्रस्तावाला सर्वानुमते मान्यता दिल्यास योग्य होईल. धन्यवाद।

मा. सदस्य श्री. राज असरोंडकर हे सभागृहातुन बाहेर गेले. 

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :—</u> मा. महापौर महोदया, या प्रस्तावावर आमची काय भुमिका आहे, ते आम्ही आयुक्तांच्या दालनात जावुन त्यांच्याशी चर्चा करुन सांगितले आहे. महासभेसमोर प्रस्ताव आणण्यापुर्वी विरोधी पक्षाच्या निदर्शनास सर्व बाबी आणणे हे आयुक्तांचे काम होते. परंतु तसे झाले नाही. एका कंपनीचे प्रतिनिधी आले, त्यांनी बैठक घेतली, त्या बैठकीला महापौर, सभागृह नेता उपस्थित होते. त्यावेळी देखिल भेदभाव केला गेला. इतरांना त्याची माहिती दिली नाही. आता जो प्रस्ताव आला आहे तोही तसाच आहे. महापौर व इतर अधिकारी यांना चीन व थायलंड येथे पाठविण्यासाठी येथे प्रस्ताव आणला आहे. त्याचा विषय मुक्त अर्थव्यवस्था व दारिद्रय निर्मुलन असा आहे. माणुस कधीही अंथरुण पाहुन पाय पसरतो. आपले पाय लांब आहेत आणि अंथरुण छोटे आहे. हे श्री. दिलीप लालवानी यांनी देखिल सांगितले. आधीच अंथरुण छोटे झाले आहे व ते शिवण्यासाठी आपण आता चीन व थायलंड येथे जाणार आहोत. हे भारतात होवु शकत नाही का? आज उल्हासनगरची आर्थिक परिस्थिती अशी आहे की, पुढील दहा वर्ष काढणे कठीण होवुन बसणार आहे. दुसरे म्हणजे दारिद्रय निर्मुलनाचे यासाठी शासनाच्या ज्या योजना आहेत त्याकडे शासन व प्रशासनाचे उल्हासनगरमध्ये अजिबात लक्ष नाही. श्री. उमाप यांनी सांगितले की, बीपीएल योजनेचा सर्व्हे चालु आहे अथवा नाही याची कोणालाही माहिती नाही. जे लाभार्थी आहेत त्यांना त्याचा लाभ मिळत नाही. महाराष्ट्र शासनाचे म्हाडा तर्फे गलिच्छ वस्ती सुधारण्यासाठी जो निधी मिळतो तो गेल्या चार वर्षात येथे आला नाही. तेथे मंजुर झाला आहे परंतु येथे आणण्यासाठी शासन व प्रशासनाला वेळ नाही. संजय गांधी निराधार योजने अंतर्गत लोकांना लाभ देण्यासाठी देखिल या शासन व प्रशासनाला वेळ नाही. दारिद्रय निर्मुलनासाठी केंद्र शासनाच्या व राज्य शासनाच्या ज्या योजना आहेत त्याकडे लक्ष दयायला कोणालाही वेळ नाही आणि अभ्यास करण्यासाठी आपण चीन व थायलंडला जात आहोत. हे काय आहे? आज उल्हासनगरची आर्थिक परिस्थिती अशी आहे की लोकांना तुमच्याकडुन मोठया

मोठया गोष्टी नको तर पाणी हवे आहे, रस्ते हवेत, साफसफाई हवी, दिवे हवेत. पाण्यासाठी ओरड सुरु आहे. आमच्या नगरसेविका श्रीमती जयश्री सुर्वे त्यासाठी उपोषणाला बसल्या आहेत. चार दिवसांपुर्वी श्री. वसिटा व श्री. ठाकुर यांच्या प्रभागात लोक उपोषणाला बसले होते. सकाळी सहा वाजल्यापासुन ते रात्री बारा वाजेपर्यंत सर्व नगरसेवक पाण्यासाठी येथे तेथे भटकत असतात. लोक जागेवर बसु देत नाहीत. अशाप्रकारे पाण्याची व्यवस्था आहे. साफ सफाईचा आपण ठेका दिला त्यावेळीही आम्ही विरोध केला की, २.३० कोटीचा ठेका आपण ४.५० कोटीला देवुन उल्हासनगरला विकले आहे. त्यावेळी आपण कानावर हात ठेवुन दुर्लक्ष केले. त्यावेळीही आम्ही हेच बोललो होतो की, प्रशासन अंध आहे व शासन मुके आहे. दरवेळी तुम्ही चुका करतात व आम्ही तुमच्या निदर्शनास आणतो नंतर तुम्ही पश्चाताप करतात. मागील बैठकीत कच—याच्या ठेक्याबाबत प्रश्न ठेवला होता. आजही आम्ही आपणांस सतर्क करीत आहोत, तुम्ही पैश्याचा जो दुरुपयोग करीत आहात त्याचा फायदा उल्हासनगरला होणार नाही. आपल्याकडे जे उत्पन्नाचे स्त्रोत आहेत, त्याचा विनियोग योग्य प्रकारे व्हायला हवा. काही दिवसांपुर्वी ठेकेदार संपावर गेले होते. त्यावेळी महापालिकेमध्ये खिळा ठोकायचे काम करायलाही कोणी तयार नव्हते. पाणी पुरवठयाची एवढी समस्या असतांना देखील २० फुट पाईप टाकण्यासाठी कोणी तयार नव्हते. कारण महापालिकेकडे पैसे नाहीत. जेव्हा देखील आयुक्तांकडे जातो त्यावेळी पैसे नाहीत आम्ही काय करणार असे सांगतात. आयुक्त साहेब बरोबर आहे का? आर्थिक परिस्थिती काय आहे? असे असतांना महापालिकेचे कार्यालय बनविण्यासाठी आपल्याकडे पैसे आहेत. नविन गाडी घ्यायला पैसे आहेत. चायना आणि थायलंडला जायला पैसे आहेत पण लोकांची कामे करायला तुमच्याकडे पैसे नाहीत? म्हणजे तुमची मजा करायला, हौस पुर्ण करायला आपल्याकडे पैसा आहे. लोकांच्या समस्या कश्या दुर करायच्या हे आपण शिकलो नाही तर चीन व थायलंडला जावून आपण काय शिकणार? जर आपण दैनंदिन गरजा भागवु शकत नसु तर बाहेर जावुन काय देणार? मी जसे सांगितले की, अंथरुण पाहुन पाय पसरायला हवेत. आपली आर्थिक परिस्थिती पाहुन हे शौक व छानछौकी बंद करायला हवी. आमच्या मराठीत एक म्हण आहे की, ''ऋण काढुन सण साजरे करणे.'' जर एखादा सण साजरा करायचा असेल तर त्यासाठी कर्ज काढायचे व ते फेडण्यासाठी पुन्हा दुसरे कर्ज काढायचे. चार वर्षापुर्वी येथिल आयुक्त श्री. पोखरकर साहेब यांनी या महापालिकेला दिवाळखोर म्हणुन घोषित केले होते. त्यांनी महासभेत व वर्तमानपत्रात तसे वक्तव्य केले होते. आजपर्यंत कोणत्याही आयुक्तांनी ते वक्तव्य नाकारले नाही. महापालिका दिवाळखोरीत आहे हे सर्व आयुक्तांनी मानले आहे. अश्या महापालिकेला कर्जातुन वाचविणे हे शासन व प्रशासन या दोघांचे काम आहे. परंतु यांना तसे वाटत नाही. ते चीन व थायलंडला जावुन लोकांना रंगबेरंगी स्वप्ने दाखवु इच्छितात परंतु प्रत्यक्षात आपण विकासासाठी काहीही करु शकत नाही. रिक्षावाल्यांनी रस्ते दुरुस्त करण्यासाठी संप केला होता, महापालिकेवर मोर्चा आणला होता. त्यावेळी आयुक्तांनी व महापौरांनी त्यांना आश्वासन दिले होते. ते आजपर्यंत पुर्ण झाले आहे का? त्यावेळी ठेकेदाराला प्रलोभन दिले होते. तो म्हणाला होता की माझे अडीच ते तीन कोटी रुपये बाकी आहेत मला थोडेफार तरी पैसे दया. परंतु आजपर्यंत रस्त्यांवर खड्डे आहेत. रस्त्यांमध्ये खड्डे आहेत की खड्डयांमध्ये रस्ता आहे हे कळुन येत नाही. व्हीटीसी ते मानेरा हा जो रस्ता आहे तो दुरुस्त करण्यासाठी ब—याच वेळा प्रशासन व मा. महापौरांकडे पाठपुरावा करुनही काहीही होत नाही. उल्हासनगरची अशी परिस्थिती असतांना जी नियमित कामे आहेत, पाणी, रस्ते, साफसफाई व दिवे ही चार कामे आपण करु शकत नसु तर इतर कामांवर विचार करणे चुकीचे आहे. यासाठी आम्ही याचा विरोध करीत आहोत. लोकांच्या पैश्याचा असा दुरुपयोग व्हायला नको. आम्ही याला विरोध करीत आहोत धन्यवाद।

<u>मा. सदस्य श्री. शांताराम निकम :—</u>मा. महापौर व उपमहापौर, महापौर महोदया व अधिकारी जे प्रशिक्षणासाठी जात आहेत त्यासाठी मी समर्थन देत आहे. जेव्हा आपण आगीत हात टाकु तेव्हाच आपणांस त्याची माहिती मिळेल परंतु जर आपण दुरुन तमाशा बघितला तर काहीही करु शकणार नाही. विरोधी पक्षातील सदस्य कधीही प्रशिक्षणाला जात नाहीत. असे नाही की त्यांच्यासाठी प्रशिक्षण नाही. सर्वांना पत्र दिले जाते. सर्वांना प्रशिक्षण दिले जाते. सर्वांनी तेथे जायला हवे. तेथे काय शिकवतात ते बघायला हवे.

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :—</u>माझा हरकतीचा मुद्दा आहे. श्री. निकम हे म्हणाले की विरोधी पक्षातील सदस्य कधीही प्रशिक्षणास जात नाही तर मग आता तुमच्याच नगरसेवकाने सांगितले की, श्री. जमनु पुरस्वानी हे प्रशिक्षणाला होते. तुम्ही गैरसमजुतीतुन काहीही वक्तव्य करु नका. महापौर महोदया, महाबळेश्वर येथे आपल्या सोबत प्रशिक्षणासाठी विरोधी पक्षातील सर्व नगरसेविका उपस्थित होत्या.

<u>मा. महापौर :—</u> हे खरे आहे. तेथे सर्व सदस्या उपस्थित होत्या. परंतु आता त्यांचे म्हणणे पुर्ण करु दया.

मा. सदस्या श्रीमती सिमा मोकल सभागृहातुन बाहेर गेल्या.

<u>मा. सदस्य श्री. शांताराम निकम :—</u> मा. महापौरजी, मी प्रत्येक प्रशिक्षणाला उपस्थित राहिलो आहे. मी पाहिले आहे की, विरोधी पक्षाचे एकही सदस्य तेथे उपस्थित राहत नाही. तेथे नगरसेवक म्हणुन आपले काय कर्तव्य आहे ते शिकविले जाते. आपल्याला फक्त घेता येते देता येत नाही. श्री. बोडारे साहेब यांनी सांगितले की, सुवर्ण जयंतीचे कामे होत नाहीत, म्हाडाची कामे होत नाहीत, निराधार योजनेची कामे होत नाही, बचत गटाची कामे होत नाहीत, परंतु हे कधी होईल? ज्यावेळी विरोधी पक्षातील सदस्य हुशार होतील, ते जेव्हा प्रशिक्षण घेतील तेव्हा होईल. ही कामे करणे हे काही सत्ता पक्षाचे काम नाही. यासाठी विरोधी पक्षाची देखील साथ आवश्यक आहे. परंतु आपणांस असे वाटते की, विरोधी पक्षाचे काम फक्त विरोध करणे हेच आहे. कितीही चांगले काम असले तरी विरोधी पक्ष फक्त विरोधाचेच काम करतो. एकदा पिकासो या जागतिक चित्रकाराने मोठे चित्र बनविले व चौकात लावले. त्याने लोकांकडुन त्यांचे मत मागविले. सर्वांनी त्यावर त्यांचे मत दिले की, पाय मोठे आहेत, केस छोटे आहेत, अशाप्रकारची मते दिलीत. ज्यांना काही कळत नव्हते ते देखिल त्यामध्ये काहीतरी त्रुटी काढत होते. त्यावर तो दु:खी झाला व त्याने त्याच्या गुरुंना विचारले की मी एवढे चांगले मोठे चित्र काढले. परंतु तरी देखिल लोक त्यामध्ये चुका काढत आहेत. तर तो म्हणाला ठिक आहे, तुम्ही चित्र उलटे करुन लावा व लोकांची मते मागवा. त्यानंतर लोकांनी त्यामध्ये काहीही चुकी काढली नाही. याचा अर्थ आपण जसे बघु तसे आपल्याला दिसते. जर आपण प्रशिक्षण घेतले असते तर अशाप्रकारे मधेमधे उठुन बोलला नसता. प्रशिक्षणात सांगितले जाते की, प्रत्येक नगरसेवकाला एकदा बोलण्याची संधी मिळते. परंतु आम्ही येथे बघतो की, विरोधी पक्षातील पाच—दहा सदस्य एकाच वेळी उठुन बोलतात, महापौरांची परवानगी घेत नाहीत. आमचे सदस्य बघितले तर महापौरांच्या परवानगी शिवाय बोलत नाहीत. हा सर्व प्रशिक्षणाचा परिणाम आहे. श्री. जमनु पुरस्वानी हे हुशार नगरसेवक म्हणुन ओळखले जातात असे त्यांचे स्वत:चे मत आहे. ज्यांनी भौतिक शास्त्राचे नियम बनविले असे अल्बर्ट आईनस्टाईन हे एकदा बस स्थानकावर उभे होते. त्यावेळी ते वृध्द होते, त्यांचे केस वाढले होते, दाढी वाढली होती. त्यांच्या शेजारी भौतिक शास्त्राचा एक प्राध्यापक येवुन उभा राहिला. त्याच्या हातात भौतिक शास्त्राचे पुस्तक असल्याने आईनस्टाईन यांनी त्याला तु कोण आहे असे विचारले. त्याने सांगितले की, मी भौतिक शास्त्राचा प्राध्यापक आहे. नंतर त्याने त्यांना विचारले की, तुम्ही कोण आहात? यावर आईनस्टाईन यांनी सांगितले की, मी भौतिक शास्त्राचा विदयार्थी आहे. याचा अर्थ शेवटपर्यंत माणसाने विदयार्थी म्हणुन शिकायला हवे. परंतु आपले सदस्य तसे करत नाहीत. विरोधी पक्षातील एक सदस्य श्री. राज असरोंडकर हे तीन—चार वेळा प्रशिक्षणाला उपस्थित राहिले आहेत. मी असे म्हणेन की, महापौर व अधिकारी यांना प्रशिक्षणाला पाठवायलाच हवे. त्यामुळे काहीच फरक पडणार नाही. प्रेताचे केस उपटल्याने त्याचे वजन कमी होत नाही. यामध्ये जास्त खर्च होणार नाही. तेवढा खर्च सहन करण्याची आपल्याकडे शक्ती असायला हवी. आपण सर्वानुमते याला मान्यता दयायला हवी. यामुळे आपल्या शहराचे भलेच होईल, धन्यवाद।

मा. सदस्य श्री. प्रमोद टाले हे सभागृहातुन बाहेर गेले.


<u>मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:—</u> श्री. धनंजय बोडारे यांनी सांगितले की, विकासाची कामे होत नाहीत. शासनाच्या योजनांवर देखिल कामे होत नाहीत. आता आमचे मित्र श्री. शांताराम निकम यांनी सांगितले की, विरोधी पक्षाचे सदस्य फक्त विरोधच करतात. यावर मी त्यांना एक गोष्ट सांगु इच्छितो की, ते ज्यांचे नाव घेतात व ज्यांना आपले दैवत मानतात असे श्री. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाच्या प्रवेशद्वाराचे काम अर्धवट पडले आहे. त्यासाठी त्यांना सभागृहात लक्षवेधी आणावी लागली. त्यांनी आता सांगितले की, केस काढल्याने प्रेत हलके होत नाही. तर मी सांगु इच्छितो की, ठेकेदाराला साडेतीन लाख रुपये दिले तर प्रवेशद्वाराचे काम सुरु होवु शकेल. अशी माझी सुचना आहे. तसेच बाल शिवाजी महाराजांचे जे जिजामाता उदयान आहे त्यासाठी ठेकेदाराला दोन लाख रुपये दिले तर तो काम सुरु करेल. दुसरे म्हणजे हे जे कार्यशाळेला जातात तर त्याबद्दल आमचे मित्र श्री. राज असरोंडकर यांनी हे लोक तेथे जावुन काय करतात हे आम्हाला सांगितले आहे. ते मी या सभागृहास सांगु इच्छित नाही. मी त्यांना नंतर एकांतात ते तेथे काय करतात ते सांगेन. ते कोणते कोणते गाणे म्हणतात ते मी सांगेन.

**मा. सदस्य श्री. नारायण पंजाबी :–** मा. महापौरजी, मी शहराच्या विकासाबद्दल जे बोलत आहेत तर शहराचा विकास हा बारा महिने सुरु असतो. त्याचा कार्यशाळेशी संबध नाही. एवढे मोठे बजेट आहे आणि तुमचे दोन–तीन लाखाकडेच लक्ष जाते. जर महापौर प्रशिक्षणासाठी गेल्या तर उल्हासनगरच्या इतिहासात त्यांचे नाव होईल. चांगल्या कामालाही तुम्ही विरोध करतात हे योग्य नाही.

**मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :–** मा. महापौरजी, आता येथे चीन व थायलंडला कार्यशाळेत जाण्यासाठी जो मुद्दा उपस्थित केला गेला त्यावर भाऊंनी त्यांचे चांगले मत सादर केले. तसेच आज ते हिंदीत बोलले त्याबद्दल मी त्यांना धन्यवाद देतो. कारण आमच्यापैकी ब–याचश्या सदस्यांना मराठी कमी येते.

**मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :–**महाराष्ट्रात राहुन तुम्हांला मराठी येत नाही ही दु:खाची बाब आहे.

**मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :–** ठिक आहे. आम्ही हळूहळू शिकु. आता येथे यांनी या विषयवार जे मुद्दे सादर केले ते मुद्दे म्हणजे ''जायचे होते जपानला व पोहोचलो चिनला'' अशाप्रकारचे होते. त्यांनी जे मुद्दे उपस्थित केले त्याची कुणालाच माहिती नाही? आर्थिक स्थिती, काम होत नाही, बाबासाहेबांच्या पुतळयाचे काम पुर्ण होत नाही, जिजामाता व शिवाजी महारांचा पुतळा पुर्ण होत नाही. हे सर्व नगरसेवकांना माहिती आहे. हे सर्व सदस्यांनी हजारो वेळा ऐकले आहे. महापालिकेचीच नाहीतर राज्यशासनाची व केंद्रशासनाचीही अवस्था अशीच आहे. त्यांनी तेथेही जावुन हेच सांगावे. मी खुलासा करु इच्छितो की, ही जी कार्यशाळा आहे ही केंद्र शासनाने आयोजित केली आहे. महापालिकेने स्वंयपुर्ण व्हावे यासाठी सरकारतर्फे कार्यशाळा आयोजित केले जाते. नगरसेवकांना कायदयांची माहिती व्हावी यासाठी प्रशिक्षण दिले जाते. सभापतींचे, महापौरांचे, उपमहापौरांचे अधिकार काय आहेत यासाठी प्रशिक्षण दिले जाते. आयुक्त व इतर अधिकारी देखील प्रशिक्षणास जातात. आज यांनी उल्हासनगरमध्ये पाण्याची समस्या असल्याचे सांगितले. परंतु पाण्याची समस्या कुठे नाही? जेव्हा श्री. अटलबिहारी वाजपेयी हे प्रधानमंत्री होते त्यावेळी त्यांनी भाषणात सांगितले होते की, पाण्याची समस्या पुर्ण भारताला आहे. आम्ही तर येथे बघतो की, उल्हासनगरच्या बाहेरचे लोक देखिल येथुन पाणी मागतात. उल्हासनगरच्या हद्दीमध्ये नाही तरीदेखील पाणी मागतात. आम्ही आमच्या लोकांना पाणी देण्याच्या प्रयत्नात आहोत. आम्ही बाहेरच्यांना पाणी कसे देणार? हे जे प्रशिक्षण आहे यासाठी साडेतीन लाख रुपये खर्च असून त्यामुळे महापालिकेस काही फरक पडणार नाही. तसेच ठेकेदारांचे जे पैसे आहेत ते कुठेही जाणार नाही. प्रत्येकाचे पैसे सुरक्षित आहेत. आपली पत एवढी चांगली आहे की, लोक आपल्याकडे करोडो रुपये उधार ठेवतात. नाहीतर आपण बघितले असेल की, लोक एक–दोन लाखासाठी फे–या मारत असतात. याचा अर्थ आपली पत चांगली आहे. महापालिकेची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी आमदारांनी एमआयडीसीचे ३४ कोटी रुपये माफ केले आहेत.आजही आपल्याला ८६ कोटी रुपये देणे होते. परंतु आमदारांनी रुपये ३४ कोटी माफ केले आहेत. तसेच काही दिवसांपुर्वी संजय गांधी निराधार योजनेची बैठक झाली होती. त्यामध्ये आपले सदस्य श्री. राज असरोंडकर यांना सदस्य करुन घेतले आहे. आता ते निघुन गेले आहेत. नाहीतर मी समोरासमोर केले असते. सर्व विधवा महिलांना त्यावेळी चेक मिळाले होते. २५ तारखेला सुवर्ण जयंतीची बैठक झाली. त्याचेही पैसे सर्वांना लवकरच मिळणार आहेत. तुम्ही विरोधी पक्ष नेता म्हणुन जे काम करतात ते फार चांगल्याप्रकारे करता म्हणुन मी तुमची प्रशंसा करतो. तुम्ही जे दोन शब्द बोलला त्याच्याशी मी बिल्कुल सहमत नाही. महापालिकेची परिस्थिती सुधारली आहे व भविष्यात अजुन सुधारेल. मी आपणांस एक उदाहरण देतो भारतात कुठेही बजेट सर्वानुमते पास होत नाही. परंतु त्या दिवशी स्थायी समितीमध्ये शिवसेना भाजपा व कॉग्रेस या सर्वांनी एकमताने बजेट मंजुर केले आहे. आपल्या शिवसेना भाजपाच्या चार सदस्यांनी त्याला समर्थन दिले होते. आपल्या समोर त्याची प्रत येईलच. जर ते आमच्याशी सहमत नसते तर त्यांनी पाठींबा दिला नसता.

मा. सदस्य श्री. अंकुश म्हस्के, श्री. विनोद ठाकुर हे सभागृहातुन बाहेर गेले. 

**मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–** माझा हरकतीचा मुद्दा आहे. आपण म्हणत आहात की, बजेट सर्वानुमते मंजुर झाले आहे परंतु आमच्या शिवसेनेच्या सदस्या सांगत आहेत की, त्यांनी विरोध केला होता परंतु तेथे मतदान घेतले नाही.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :– ते आता काहीही म्हणत असले तरी त्यावेळी तेथे सचिव, आयुक्त व इतर अधिकारी उपस्थित होते. जर तुम्ही विरोध केला असता तर एकमताने ठराव मंजुर झाला नसता.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :– मा. महापौर महोदया, सभागृह नेता हे ज्या गोष्टी घडल्या नाहीत त्या बद्दल बोलत आहेत. येथे स्थायी समितीत झालेल्या विषयावर बोलायची काय गरज आहे? हे सभागृह नेता आहेत यांना आपण काहीतरी शिकवा.

मा. महापौर :–श्री. वनवारीजी, आपण बजेटच्या विषयावर बजेटच्या बैठकित बोलले तर योग्य होईल.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :– जेव्हा स्वत: विषय सोडुन बोलतात तेव्हा चालते?

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :– तुम्ही देखिल प्रशिक्षणाला जा.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :– मी आपले देखिल नाव प्रस्तावित करतो. जर विरोधी पक्षातील काही सदस्य चीन व थायलंड येथे जाण्यास इच्छुक असतील तर आम्ही देखिल तसा ठराव मंजुर करु. चीन व थायलंडचा विषय सुरु असतांना हे स्वत: पाणी, कचरा, ठेकेदार अशा विषयावर बोलतात. स्वत: विषय सोडुन दुस–या विषयावर बोलता तर दुस–याचेही ऐकायला हवे. चीन व थायलंड येथे कार्यशाळेला जाण्याचा मुद्दा हा चांगला मुद्दा आहे. कृपा करुन ही शासनाची योजना असल्याने याला विरोध न करता, एकमताने पास करावे ही विनंती. धन्यवाद.

मा. महापौर:–सचिव साहेब यावर मतदान घ्यावे.

मा. सचिव :– जे सदस्य या प्रस्तावाच्या बाजुने आहेत त्यांनी कृपया आपले हात वर करावेत.

४८ मते

१. श्री. टेकचंदानी राजु मथुरादास
२. श्रीमती. रामचंदानी भावना मनोहर
३. श्री. लिंगे सुर्यकांत (बबन)
४. श्री. मुलचंदानी महेंद्र परसराम
५. श्रीमती. कालानी ज्योती सुरेश
६. श्री. वाघे शामु बाबु
७. श्री. ऐडके गणपत गोविंद
८. श्रीमती. शर्मा कमला गंगाधर
९. श्री. वलेचा पृथ्वी व्यापारीलाल
१०.श्री. रोहडा श्यामसुंदर जानीलाल
११.श्री. गुप्ता प्रभुनाथ दुखंती
१२.श्रीमती. गुप्ता अनिता धर्मेन्द्र
१३.श्री. पवार नाना आनंदा
१४.श्रीमती. आहुजा नीता प्रकाश
१५.श्री. जग्यासी राजु
१६.श्री. निकम शांताराम ओंकार
१७.श्रीमती. सोनेजी मीना (सोंडे)
१८.श्रीमती. मसंद माया घनश्यामदास
१९.श्री. गायकवाड सुरेश नामदेव
२०.श्रीमती. वनवारी मोना अशोक
२१.श्री. वनवारी किशोर नारायणदास
२२.श्री. जेसवानी सतराम पुनमदास
२३.श्री. लुंड गोविंदराम डोलुमल

२४.श्रीमती. खिलनानी भावना रवि
२५.श्री. खेमाणी दर्शनसिंग देवेंद्रसिंग
२६.श्रीमती. कारीरा रेखा मन्नुमल
२७.श्री. पमनानी ईश्वर सतरामदास
२८.श्री. पंजाबी नारायण सन्मुखदास
२९.श्रीमती. पंजाबी दिपा नारायण
३०.श्री. साधवानी मनोज लालचंद
३१.श्रीमती. भठिजा कोमल अमृत
३२.श्री. जयसिंघानी अनिल भगवानदास
३३.श्री. रामरख्यानी मोहनदास नारायण
३४.श्री. मोकल चंदाराम
३५.श्री. लबाना होशियारसिंग हरीसिंग
३६.श्री. ठाकुर नरेंद्रकुमार केवलराम
३७.श्री. तलरेजा विनोद चंदीराम
३८.डॉ. श्रीमती. नाथानी निना प्रकाश
३९.श्रीमती. रिझवानी सुजाता रमेश
४०.श्रीमती. छाब्रिया भारती पहलाज
४१.श्री. भठिजा संजय रामचंद्र
४२.श्रीमती. दासानी मिनु राजकुमार
४३.श्री. लाल बिहारी यादव
४४.श्री. जाधव प्रशांत जगन्नाथ
४५.श्री. जाधव सुरेश मधुकर
४६.श्री. भालेराव गौतम यशवंत
४७.श्री. ठाकुर अशोक भगवानदास
४८.श्रीमती. करोतिया मालती राधाचरण

मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणी :—मा. महापौरजी मी सांगु इच्छितो की, प्रशिक्षणासाठी जो खर्च केला जातो तो खर्च नसुन गुंतवणुक असते.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :— आता चर्चा सुरु असेल तर आम्हांलाही बोलायची संधी दिली जावी. तुम्ही आम्हांला सांगता की सभागृहनेता यांच्या नंतर कोणी बोलु नये. तुम्हांला बैठक व्यवस्थित चालवता येत नाही का? तुम्ही त्यांना बोलण्यासाठी परवानगी का दिली? मला परवानगी का दिली नाही?

मा. महापौर :— मी परवानगी दिली नव्हती ते स्वत:हुनच बोलत होते.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :— जर आपल्या परवानगी शिवाय बोलत असतील तर कार्यशाळेत जातात तरी कशाला?

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :— तुमचे लोक कार्यशाळेतुन काय शिकुन येतात. माझ्या सारख्या वरीष्ठ नगरसेवकांना बोलण्याची संधी का दिली जात नाही? मी आपला आदर ठेवुन गप्प बसलो व त्यानंतर तुम्ही दोघांना बोलण्याची संधी दिली.

मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणी :— तुम्ही दोन शब्द ऐकु शकत नाहीत एवढा राग का करतात?

मा. सचिव :— जे सदस्य या प्रस्तावाच्या विरोधात आहेत त्यांनी कृपया आपले हात वर करावेत.

९ मते

१. श्री. उमाप रामदास राघोजी
२. श्री. पुरस्वानी जमनादास खुपचंद
३. श्री. गायकवाड दिलीप
४. श्रीमती. बामणकर नंदिनी गजानन
५. श्रीमती. खांडेकर प्रेमा भिमा
६. श्री. बोडारे धनंजय बाबुराव
७. श्री. पाटील विश्वनाथ गौतम
८. श्रीमती. ससाणे लक्ष्मी रोहिदास
९. श्री. चौधरी राजेंद्र शांताराम

मा. महापौर :— सदरचा विषय बहुमताने संमत करण्यात येत आहे. 

---

☑

**विषय क्र. २ :—** मा. महापौर व उपमुख्य लेखा अधिकारी यांना दिनांक ११/३/२००६ ते १९/३/२००६ या कालावधीत चीन व थायलंड येथे आयोजित केलेल्या कार्यशाळेत सहभागी होण्यास मान्यता देणे.

प्रस्तावना :

डॉ. बेनहाम ताय, संचालक आयएचएस इंडिया या संस्थेचे पत्र क्रमांक आयएचएसआय आयईडब्ल्यु—सीएचएन—टीएचए/२००६ दिनांक ४ जानेवारी, २००६ चे पत्रान्वये आयएचएस इंडिया आणि एयुएस—एचएस, ऑस्ट्रेलिया हुडको नवि दिल्ली यांचे सहकार्याने भारतामधील लोकप्रतिनिधी शासकिय अधिकारी व इतर यांचेसाठी आंतरराष्ट्रीय स्तरावर विविध प्रशिक्षण व कार्यक्रम आयोजित करीत आहे. ''मुक्त अर्थव्यवस्था आणि दारिद्रय निर्मुलन'' या विषयावर चायना आणि थायलंड येथे ११ मार्च, २००६ ते १९ मार्च, २००६ या दरम्यान एक कार्यकारी कार्यशाळा आयोजित करणेत आलेली आहे. सदरहू कार्यशाळामध्ये महापौर महापालिका सदस्य आणि कर्मचारी यांना सहभाग घेणेबाबत कळविले आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिका, मिरा भाईंदर महानगरपालिका तसेच इतर महानगरपालिकेमधील 'महापौर, इतर पदाधिकारी तथा अधिकारीपण या प्रशिक्षणास उपस्थित राहणार आहेत.

सदरहू कार्यशाळेमध्ये उल्हासनगर महानगरपालिकेच्या मा. महापौर, मुक्त अर्थव्यवस्था या विषयाशी संबंधीत असलेले लेखा विभाग प्रमुख आणि दारिद्रय निर्मुलन या विषयाशी संबंधित असलेले विभाग प्रमुख उप—आयुक्त तसेच उल्हासनगर महानगरपालिका आयुक्त सहभाग घेवु शकतात.

सदरहू कार्य शाळेमध्ये सहभागी होणेस मा. महापौर आणि महानगरपालिका आयुक्त तसेच महापालिका अधिकारी यांच्या परदेश दौ—यासाठी सदरहू परदेश दौ—यास राज्य शासनाची पूर्व मंजूरी आवश्यक आहे. त्यासाठी महापालिका आयुक्त यांचेमार्फत मा. प्रधान सचिव, नगरविकास विभाग, महाराष्ट्र शासन, यांचेकडे विहित नमुन्यामध्ये शासनाच्या मंजुरीसाठी प्रस्ताव सादर करणे आवश्यक आहे. उल्हासनगर शहराच्या प्रथम नागरीक महापौर मा. सौ. ज्योती सुरेश (पप्पु) कालानी आणि उल्हासनगर महानगरपालिकेच्या सेवेमध्ये असलेले महापालिका अधिकारी श्री. हरेश इदनानी, उप—मुख्य लेखा अधिकारी, प्रभारी उप—आयुक्त (शहर) यांना पाठविणे उचित आहे.

सदरहू कार्यशाळेमध्ये सहभागी होणे बाबत नोंदणी शुल्क (Registration Fee), प्रशिक्षण शुल्क, वास्तव शुल्क, विमान प्रवास खर्च, जेवण व इतर प्रति व्यक्ती अंदाजित ३.५० लाख रुपये एवढा आहे. उल्हासनगर महानगरपालिकेच्या अंदाजपत्रकामध्ये या प्रयोजनासाठी आवश्यक ती वित्तीय तरतूद पुरेशा प्रमाणात उपलब्ध आहे.

दिनांक ११ मार्च, २००६ ते १९ मार्च, २००६ या दरम्यान चायना थायलंड येथिल आयोजित आंतरराष्ट्रीय कार्यकारी कार्यशाळेस परराष्ट्रमध्ये मा. महापौर आणि प्रभारी उप—आयुक्त (शहर) तथा उप मुख्य लेखा अधिकारी, सहभागी होणेबाबत तसेच आर्थिक बाबी संबंधी राज्य शासनांच्या मंजूरीच्या अधिन राहून महासभेची मंजूरी मिळणेस प्रस्तावित.

विशेष महासभा ठराव क्र: ७२ दिनांक:–८/२/२००६

सुचकाचे नाव :– श्री. किशोर वनवारी
अनुमोदकाचे नाव :– श्री. नरेंद्रकुमार ठाकुर

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे शासन मंजुरीस अधिन राहुन चीन व थायलंड येथे दिनांक ११/३/२००६ ते १९/३/२००६ या कालावधीत आयोजित केलेल्या ''आंतरराष्ट्रीय कार्यकारी कार्यशाळेत'' मा. महापौर श्रीमती ज्योती कालानी व उपमुख्य लेखा अधिकारी श्री. हरेश इदनानी यांना सहभागी होण्यास मान्यता देत आहे तसेच अंतर्भुत खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.

सदरहु ठराव इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता अंमलात आणण्यात यावा.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

बहुमताने

महापौर / पीठासीन अधिकारी
विशेष महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

मा. सचिव :– विषय क्र. ३ वाचुन दाखवितात

मा. सदस्या श्रीमती सिमा मोकल यांनी सभागृहात प्रवेश केला.

---

⇨ **विषय क्र. ३ :–** कै. वामन काथार, शाखा अभियंता यांच्या वैद्यकिय खर्चाच्या प्रतिपुर्तीपोटी उर्वरित रक्कम त्यांच्या कुटूंबियांना अदा करण्यास मान्यता देणे.

---

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी :– इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता त्यांना ती रक्कम देण्यात यावी.

काही सदस्य :–पास–पास......

मा. महापौर :– सदरचा विषय सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

---

☑ **विषय क्र. ३ :–** कै. वामन काथार, शाखा अभियंता यांच्या वैद्यकिय खर्चाच्या प्रतिपुर्तीपोटी उर्वरित रक्कम त्यांच्या कुटूंबियांना अदा करण्यास मान्यता देणे.

प्रस्तावना

कै. वामन काथार, शाखा अभियंता हे दिनांक २२.७.२००५ पासून उल्हासनगर महानगरपालिकेकडे प्रतिनियुक्तीवर कार्यरत होते.

दि. २६ व २७ जुलै, २००५ रोजी झालेल्या अतिवृष्टीमुळे उद्भवलेल्या आपत्कालीन परिस्थितीत कर्तव्य बजावत असतांना कै. काथार यांना लेप्टोस्पायरोसिस या घातक रोगाचा प्रादुर्भाव झाला. उपचारासाठी त्यांना दि.८.८.२००५ रोजी प्रथम बदलापूर येथिल धन्वंतरी हॉस्पीटल व त्यानंतर ठाणे येथिल क्रिटी केअर व अंतिमत: वॉकहार्ड रुग्णालयात दाखल करण्यात आले होते.

तथापि, उपचारा दरम्यानच लेप्टोस्पायरोसिस या आजारामुळे कै. काजार यांचा दिनांक ११.८.०५ रोजी दुर्देवी अंत झाला. वरील उपचाराचे कालावधीत कै. काथार यांना मा. आयुक्त सो. यांनी रुपये ५००००/— अग्रीम उचल म्हणून अदा केले होते. त्यांच्या वैद्यकिय उपचाराचा एकुण खर्च रुपये ९३७२१/— एवढा झालेला आहे.

कै. काथार यांचे निधन शासकिय कर्तव्य बजावत असतांना झाले आहे व त्यामुळे उल्हासनगर महानगरपालिकेकडुन उपचारासाठी देण्यात आलेली रुपये ५००००/— ही अग्रीम रक्कम त्यांचे वैद्यकिय देयकासाठी समयोजित करण्याकरीता व उर्वरीत रक्कम रुपये ४३७२१/— त्यांचे कुटुंबियांना अदा करणेकरीता महासभेची मंजुरीस्तव सादर करण्यात येत आहे.

विशेष महासभा ठराव क्र: ७३ दिनांक:—८/२/२००६

सुचकाचे नाव :— श्री. किशोर वनवारी

अनुमोदकाचे नाव :— श्री. धनंजय बोडारे

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे कै. वामन काथार, शाखा अभियंता यांना दिनांक २६ व २७ जुलै २००५ रोजी झालेल्या अतिवृष्टीमुळे पुर परिस्थितीत कर्तव्य बजावत असताना लेप्टोस्पायरोसिस या दुर्धर रोगाची लागण झाल्याने त्यासाठी वैद्यकिय उपचारापोटी झालेला एकुण खर्च रुपये ९३७२१/—ची प्रतिपुर्ती करण्यास मान्यता देत आहे.

सदरहु ठराव इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता अंमलात आणण्यात यावा.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
विशेष महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

मा. सचिव :—उल्हासनगर महापालिकेत श्री. नाना रौराळे यांची अतिरिक्त आयुक्त पदावर व श्री. अशोक बागेश्वर यांची उपायुक्त पदावर नव्याने नियुक्ती झाली आहे. ते त्यांची ओळख सर्वांना करुन देतील.

मा. अतिरिक्त आयुक्त (श्री. नाना रौराळे) :—मा. महापौर, मा. उप—महापौर, आयुक्त साहेब व इतर सर्व पदाधिकारी माझे नाव नाना उत्तम रौराळे असुन मी मंत्रालयात गृह विभागामध्ये २३ वर्षे अवर सचिव व उप—सचिव म्हणुन काम केले आहे. मागील सहा महिन्यांपासुन सामान्य प्रशासन विभागात काम केले आहे. २३/१/२००६ पासुन मी उल्हासनगर महापालिकेत अतिरिक्त आयुक्त या पदावर रुजु झालो आहे. मी माझ्यातर्फे उल्हासनगर शहराच्या विकासासाठी पुर्ण मदत करेल यासाठी आपणा सर्वांच्या सहयोगाची अपेक्षा करतो. धन्यवाद ।

मा. सदस्य श्री. अंकुश म्हस्के, श्री. विनोद ठाकुर यांनी सभागृहात प्रवेश केला.

**उप–आयुक्त (श्री. अशोक बागेश्वर) :–**मा. महापौर, उप–महापौर, आयुक्त साहेब व सर्व सदस्य यांची ओळख करुन देणे मी माझे कर्तव्य मानतो. मी कालच येथे उपायुक्त म्हणुन रुजु झालो आहे. यापुर्वी मी जव्हार नगरपालिकेत चार महिने मुख्याधिकारी म्हणुन कार्यरत होतो. यापुर्वी बदलापुर नगरपालिकेत १९९६ ते ९८ पर्यंत काम केले आहे. माझ्या सेवेची सुरुवात ठाणे जिल्हयातील डहाणु येथे झाली होती. मी तुमच्या शहराच्या विकासासाठी सचोटीने काम करेन असे अभिवचन देतो. हा परिचय छोटा परिचय आहे. मराठी मध्ये सांगतो संत चोखामेळा यांनी सांगितले आहे, '' ऊस डोंगा परी रस नाही डोंगा, का रे भुललासी वरलिया रंगा.'' धन्यवाद.

**मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी :–** मा. महापौर महोदया, दोन्ही अधिका–यांचे सभागृहाच्या वतीने मी स्वागत करतो. तसेच श्री. बागेश्वर यांच्या वक्तव्यात दुरुस्ती करतो की, हे शहर आमचे न समजता स्वत:चे समजुन काम करावे.

**मा. सचिव :–** आपणा सर्वांना, आपल्या काही कर्मचा–यांवर व इतर काही कर्मचा–यांवर गर्व वाटायला हवा की, भारताची जनगणना २००१ च्या दरम्यान असाधारण सेवा केल्या बद्दल भारताच्या मा. राष्ट्रपतींकडुन काही कर्मचा–यांना पदक देवुन सन्माननित करण्यात आले आहे. याचे वितरण आज सभागृहात मा. महापौर, उपमहापौर, आयुक्त, सभागृह नेता, विरोधी पक्ष नेता या सर्वांच्या हस्ते केले जाईल.

यावेळी श्रीमती आशा पाटील व श्रीम. सुनिता इसराणी यांना मा. महापौरांच्या हस्ते, श्री. राजकुमार पिंजाणी, व श्री. सुरेश चौधरी यांना मा. उपमहापौरांच्या हस्ते, श्री. गोपाल जेसवानी यांना मा. सभागृहनेता यांच्या हस्ते व श्री. नारायण नागदेव यांना विरोधीपक्ष नेता यांच्या हस्ते सन्मानपत्र व पदक देवुन सन्मानित करण्यात आले. श्रीमती सुरेखा रामटेककर व श्री. एस.पी. जाधव हे कर्मचारी अनुपस्थित असल्याने त्यांना नंतर सन्मानपत्र व पदक देण्याची घोषणा करण्यात आली.

सांयकाळी ४.३५ वाजता मा. महापौर श्रीमती ज्योती कालानी यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर

महानगरपालिका**उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर**

दिनांक:– १८.२.२००६

**उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. १८.२.२००६ रोजीच्या**
**विशेष महासभेचे इतिवृत्त.**

उल्हासनगर महानगरपालिकेची विशेष महासभा शनिवार दिनांक १८.२.२००६ रोजी ४.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभेत मा.उप–महापौर, श्री. विनोद तलरेजा हे पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होते. व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य/सदस्या उपस्थित होते / होत्या.

१) मा. उपमहापौर :–श्री. विनोद तलरेजा

| | | | |
|---|---|---|---|
| २. | श्रीमती संगिता जावळे | ३०. | श्री. रमेश चव्हाण |
| ३. | श्री. सुर्यकांत (बबन) लिंगे | ३१. | श्री. जाधव सुरेश |
| ४. | श्रीमती मोकल सीमा | ३२. | श्री. देवेंद्रसिंग खेमाणी |
| ५. | श्री. दिलीप गायकवाड | ३३. | श्रीमती कारीरा रेखा मन्नुमल |
| ६. | श्री. मोकल चंदाराम विठोबा | ३४. | श्री. पमनानी ईश्वर सतरामदास |
| ७. | श्री. एडके गणपत गोविंद | ३५. | श्रीमती कृष्णानी रेखा |
| ८. | श्रीमती. शर्मा कमला गंगाधर | ३६. | श्री. पाटील विश्वनाथ |
| ९. | श्री. वलेचा पृथ्वी व्यापारीलाल | ३७. | श्रीमती. लक्ष्मीबाई ससाणे |
| १०. | श्री. उमाप रामदास | ३८. | श्री. अंकुश म्हस्के |
| ११. | श्री. यादव लालबिहारी बुझारत | ३९. | श्री. चौधरी राजेंद्र |
| १२. | श्री. रोहडा श्यामसुंदर जानीलाल | ४०. | श्री. पंजाबी नारायण |
| १३ | श्री. गुप्ता प्रभुनाथ दुखंती | ४१. | श्रीमती पंजाबी दिपा |
| १४. | श्री. पवार नाना | ४२. | श्री. साधवानी मनोज |
| १५. | श्री. जग्यासी राजु | ४३. | श्री. पुरस्वानी जमनादास |
| १६. | श्रीमती खांडेकर प्रेमा | ४४. | श्रीमती भटिजा कोमल |
| १७. | श्री. निकम शांताराम | ४५. | श्री. होशियारसिंग हरिसिंग लबाना |
| १८. | श्री. ठाकुर विनोद लालसिंग | ४६. | श्री. नरेंद्रकुमार ठाकुर |
| १९. | श्रीमती. मसंद माया घनश्यामदास | ४७ | डॉ. श्रीमती निना नाथानी |
| २०. | श्रीमती वनवारी मोना अशोक | ४८. | श्री. संजय रामचंद्र बठीजा |
| २१. | श्री. वनवारी किशोर नारायणदास | ४९. | श्री. बेहरानी मोहन वर्यलदास |
| २२. | श्री. सतरामदास जेसवानी | ५०. | श्रीमती मिनु दासानी |
| २३. | श्री. लुंड गोविंदराम डोलुमल | ५१. | श्री. पंजाबी लाल देवनदास |
| २४. | श्री. बच्चाराम रुपचंदानी | ५२. | श्री. लालवानी दिलीप जेठानंद |
| २५. | श्री. राज असरोंडकर | ५३. | श्रीमती करोतिया मालती |
| २६. | श्री. राजेंद्रसिंह भुल्लर, | ५४. | श्री. इदनानी राजु चंद्रभान |
| २७. | श्री. टेकचंदानी राजु, | ५५. | श्रीमती भावना खिलनानी, |
| २८. | श्रीमती रामचंदानी भावना | ५६. | श्री. भालेराव गौतम |
| २९. | श्री. ठाकुर अशोक | | |

तर,

१. मा. महापौर श्रीमती ज्योती कालानी, मा.सदस्य / सदस्या २. श्री. सोनवणे नथु, ३. श्री. वाघे शामु, ४. श्री. मुलचंदानी महेंद्र, ५. श्रीमती बामणकर नंदिनी गजानन, ६. श्रीमती अनिता गुप्ता, ७. श्रीमती आहुजा निता प्रकाश, ८. श्री. टाले प्रमोद, ९. श्रीमती. सोनेजी मीना (सोंडे), १०. श्री. सुरेश नामदेव गायकवाड, ११. श्री. साधवानी मोहन, १२. डॉ. साधवानी जया, १३. श्रीमती माने किरण, १४. श्री. जाधव प्रशांत, १५. श्रीमती सुर्वे जयश्री, १६. श्री. बोडारे धनंजय बाबुराव, १७. श्रीमती वसिटा बेबी, १८. श्री. जयसिंघानी अनिल, १९. श्री. रामरख्यानी मोहनदास, २०. श्रीमती किरण माखिजा, २१. श्रीमती छाब्रिया भारती, २२. श्रीमती. रिझवाणी सुजाता रमेश, २३. श्री. बेहराणी ठाकुरदास वर्यलदास, २४. श्री. हरदास माखिजा, २५. श्री. राजेश वदारिया हे सभेस अनुपस्थित होते / होत्या.

सायंकाळी ४.३० वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

मा. महापौर श्रीमती ज्योती कालानी हया अनुपस्थित असल्याने मा. उपमहापौर श्री. विनोद तलरेजा हे पीठासीन अधिकारी म्हणुन आसनस्थ होते.

<u>मा. सचिव :—</u> विषय क्र. १ वाचुन दाखवितात.

---

**विषय क्र. १:—** निवड समितीच्या शिफारसीप्रमाणे उर्वरित उमेदवार श्री. रतन केदार, श्री. बंसी सोहनजा व श्री. अनुप भागिया यांना ''जकात निरीक्षक'' या पदावर पदोन्नती देणे.

---

**<u>मा. सदस्य श्री. रामदास उमाप :—</u>**मा. महापौर, आयुक्त व सर्व सदस्य, हा जो पदोन्नतीचा विषय सभागृहामध्ये आला आहे तर याबाबत मी आयुक्तांना विनंती करु इच्छितो की, २६ व २७ जुलै रोजी झालेल्या अतिवृष्टीमुळे शहरात रोगराई पसरु नये यासाठी आरोग्य विभागाची एक मोठी जबाबदारी होती. यासाठी आपले जे प्रभारी आरोग्य निरिक्षक आहेत ज्यामध्ये श्री. दिपक उज्जैनवाल व श्री. वामन सोनोने यांचा समावेश आहे. या दोघांनी अतिशय चांगल्याप्रकारे साफसफाईचे काम केले होते. आजच्या महासभेमुळे आम्हांला मा. महापौर व आयुक्तांना विनंती करण्याची संधी मिळाली आहे त्यामुळे या दोघांचा प्रस्तावही पुढील महासभेत यायला हवा. दुसरे म्हणजे एखादा कर्मचारी जर चांगले काम करीत असेल व त्यानंतरही जर त्याला पदोन्नती मिळत नसेल तर यामुळे त्याचे मनोधैर्य खच्ची होते. असे होवु नये, त्याने शहरासाठी चांगल्याप्रकारे काम करावे यासाठी मी महापौरांना व आयुक्तांना विनंती करेन की, पुढील महासभेत या दोघांच्या पदोन्नतीचा विषय आणावा.

**<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :—</u>** मा. महापौरजी, श्री. उमाप यांनी जो मुद्दा उपस्थित केला त्याच्याशी मी देखिल सहमत आहे. आपला जो स्थानिक कर्मचारी वर्ग आहे, जो पदोन्नतीसाठी पात्र आहे अशा सर्वांचा प्रस्ताव महासभेसमोर यायला हवा. तसेच इतर जो स्थानिक कर्मचारी वर्ग आहे, ज्यांचे पदोन्नतीचे प्रस्ताव प्रलंबित आहेत असे प्रस्ताव पुढील महासभेत यायला हवे. तसेच हा प्रस्ताव इतिवृत्त कायम होण्याची वाट न पहाता सर्वानुमते मंजुर करायला हवा. धन्यवाद ।

<u>काही सदस्य :—</u>पास—पास......

<u>मा. उप—महापौर / पीठासीन अधिकारी :—</u> सदरचा विषय सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

---

**विषय क्र. १ :—** निवड समितीच्या शिफारसीप्रमाणे उर्वरित उमेदवार श्री. रतन केदार, श्री. बंसी सोहनजा व श्री. अनुप भागिया यांना ''जकात निरीक्षक'' या पदावर पदोन्नती देणे.

<u>प्रस्तावना</u>

महापालिकेच्या आस्थापनेवर जकात निरीक्षक या संवर्गात एकुण २० पदे मंजुर असुन त्यापैकी ५ पदे हि सरळसेवेने व १५ पदे ही पदोन्नतीने भरावयाची असुन पदोन्नतीने भरावयाच्या १५ पदांपैकी १ पद भरलेले असुन १४ पदे रिक्त आहेत. सदर पदांवर पदोन्नती देणेसाठी प्रवर्गनिहाय ११ उमेदवारांची शिफारस करण्यात आली होती. महासभा ठराव क्र. ४५ दिनांक ५/९/२००५ अन्वये शिफारस केलेल्या ११ उमेदवारांपैकी श्री. रतन केदार, श्री. बन्सी सोहंजा व श्री. अनुप भागिया या तीन कर्मचा—यांना वगळुन अन्य कर्मचा—यांना पदोन्नती देणेस मान्यता दिली आहे. परंतु महासभेने सदर तीन कर्मचारी यांना पदोन्नती नाकारण्यासंबंधी उपरोक्त ठरावात कोणतेही कारण नमुद केलेले नाही. तथापि, सदर कर्मचारी यांचेविरूध्द् कोणत्याही प्रकारची विभागीय चौकशी प्रलंबित नाही. तसेच निवडसमितीने पदोन्नतीचे निकष तपासुन त्यांचे पदोन्नतीची शिफारस केली आहे.

तरी महासभेने सदर कर्मचा—यांना निवड समितीने शिफारस केल्याप्रमाणे जकात निरीक्षक या पदावर पदोन्नती देण्यास महासभेपुढे पुन्हा प्रस्तावित करण्यात येत आहे.

<u>विशेष महासभा ठराव क्र:</u> ८२ <u>दिनांक:—१८/२/२००६</u>

सुचकाचे नाव :— श्री. किशोर वनवारी

अनुमोदकाचे नाव :— श्री. उमाप रामदास

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमूद केलेल्या कारणास्तव व निवड समितीच्या शिफारशी अनुसार श्री. रतन केदार, श्री. बन्सी सोहंजा व श्री. अनुप भागिया या कर्मचा—यांची ''जकात निरीक्षक'' या पदावरील पदोन्नती मान्य करीत आहे.

तसेच इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता सदरचा ठराव कायम समजण्यात येईल व त्याप्रमाणे अंमलबजावणी करण्यात येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

उपमहापौर / पीठासीन अधिकारी
विशेष महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>मा. सचिव :—</u> विषय क्र. २ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. २ :—** सुधारीत उल्हासनगर पाणी पुरवठा योजना अंतर्गत पाले ते गायकवाड पाडा दरम्यान जलवाहिनी पुर्ण करण्याच्या दृष्टीने एकुण ५ जणांना उल्हासनगर महानगरपालिकेच्या सेवेत वर्ग ४ अस्थायी पदावर नियुक्ती देणे.

---

<u>मा. सदस्य श्री. अशोक ठाकुर :—</u>मा. महापौर व आयुक्त साहेब, आमचा या प्रस्तावाला पुर्ण पाठींबा आहे. तसेच हे देखिल सांगु इच्छितो की, हे काम फार पुर्वी सुरु व्हायला हवे होते. आजमितीस कॅम्प नं. ४ मध्ये पाण्याची परिस्थिती फार गंभीर झाली आहे. कॅम्प नं. ४ व ५ चा भाग यामुळे हाल सोसत आहे. त्यासाठी हे काम होणे अत्यावश्यक आहे व यासाठी आमचा पुर्ण पाठिंबा आहे. तसेच मी विनंती करु इच्छितो की, हे काम पुर्ण झाल्यानंतर कॅम्प नं. ५ येथुन जेव्हा पाणी येईल तेव्हा कॅम्प नं. ४ चा देखिल विचार केला जावा. तसेच सध्या एमआयडीसीची जी वर्तणुक आहे त्याकडे कुणीही लक्ष देत नाही. याकडे लक्ष देईल तरी कोण? एमआयडीसी सध्या जी वर्तणुक करीत आहे, त्यांचा जो व्यापार आहे तो म्हणजे मदर इंडिया चित्रपटातील लाला ज्या प्रकारे लोकांची सतवणुक करीत असे त्या प्रकारेच त्यांची वर्तणुक आहे. एमआयडीसीबद्दल येथे खुलासा होणे आवश्यक आहे.

<u>मा. सदस्य श्री. राजु जग्यासी :—</u> मा. महापौर, आयुक्त व सचिव साहेब, या विषयाबद्दल मी सभागृहात माहिती देवु इच्छितो. ५ वर्षापासुन हे काम एमजेपीने बंद केले होते. एकुण १६ किलोमिटर पैकी १५ किमी जलवाहिनी टाकण्याचे काम पुर्ण झाले आहे. फक्त १ किलोमिटर जलवाहिनी टाकण्याचे काम शिल्लक आहे. सदरचे काम तेथिल गाववाल्यांच्या विरोधामुळे बंद झाले आहे. त्यांची अशी मागणी होती की, जर तुम्ही आमच्या जागेतुन जलवाहिनी टाकत असाल तर आमच्या काही लोकांना कामावर घेतले जावे. या विवादामुळेच हे काम ५ वर्षापासुन बंद पडले होते. येथे उपस्थित सर्व सदस्यांना माहिती आहे की, कॅम्प नं. ४ व ५ मध्ये पाण्याची किती टंचाई

आहे. आता आमचे सन्माननिय सदस्य श्री. अशोक ठाकुर यांनी सांगितले की, एमआयडीसीच्या वर्तणुकीमुळे व भारनियमनामुळे त्रासात भर पडली आहे. कधी एकेकाळी आपणांस तेथुन ३७ द.ल.लि. पाणी मिळायचे परंतु सध्या फक्त ३० ते ३२ द.ल.लि. पाणी मिळत आहे. यामुळे शेवटच्या टोकाला आपण पाणी पुरवठा करु शकत नाही. मी आमच्या महापौर श्रीमती ज्योती कालानी, मा. आमदार श्री. पप्पु कालानी व आमच्या आयुक्तांना धन्यवाद देतो की, त्यांनी पुढाकार घेवुन ग्रामस्थ व एमजेपीच्या अधिका—याची एक संयुक्त बैठक घेवुन निर्णय घेतला की, त्यांच्या ५ लोकांना कामावर घेतल्यास हे काम त्वरीत सुरु होईल. मी आपणांस माहिती देवु इच्छितो की, सध्या आपणांस जे ३१ द.ल.लि. पाणी मिळत आहे, या जलवाहिनीचे काम पुर्ण झाल्यानंतर आपणांस कमीत कमी ४० द.ल.लि. पाणी मिळणे सुरु होईल. एमजेपीच्या अधिका—यांनी आम्हांला आश्वासन दिले आहे की, काम सुरु झाल्यानंतर एक महिन्याच्या आत ते पुर्ण करुन दाखविणार आहेत. यासाठी मी सर्व सभागृहाला विनंती करेन की, हा शहराच्या चांगल्या कामाचा विषय असल्याने सर्व संमतीने मंजुरी दयावी. धन्यवाद.

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण :— मा. महापौरजी, आम्ही या विषयाला समर्थन देत आहोत. परंतु आपण आपल्या अधिका—यांना निर्देश दयावेत की, हे जे पाणी येणार आहे, ते आमच्या पर्यंत येईल याची दक्षता घेतली जावी. कारण जर आपले वितरणच व्यवस्थित नसेल तर कितीही पाणी आले तरी ते पुरे पडणार नाही. वितरण व्यवस्थेंवर यांचे नियंत्रण नाही. आम्ही श्री. सावकारे यांना सांगुन थकलो आहोत. आपण श्री. लुंड यांना विचारावे की किती त्रास आहे. टाकी भरल्यानंतर जेव्हा पाणी सोडतात तेव्हा ते कुठे जाते हेच यांना कळत नाही. लोकांना पाणी मिळत नाही. ते दुस—याच जलवाहिनीमध्ये जाते. यासाठी आपण अधिका—यांना निर्देश दयावेत.

मा. सदस्य श्री. लालबिहारी यादव :—मा. महापौरजी, आयुक्त साहेब, मी प्रत्येक बैठकीमध्ये माझ्या प्रभागातील पाणी समस्येवर बोलत असतो. परंतु कुणीही अधिकारी याकडे लक्ष देत नाही. ज्याप्रमाणे गेंडयाची कातडी जाड असते त्याचप्रमाणे येथिल अधिकारी आहेत. कधी पर्येंत येथे पाण्यासाठी अशाप्रकारे बोलावे लागेल? याचे उत्तर आयुक्तांनी दयावे. मी आयुक्तांकडे यासाठी गेलो असता त्यांनी पैसे नसल्याचे कारण सांगितले. पैसे आहेत परंतु कामे करतांना दुजाभाव केला जातो. आजही ब—याच प्रभागात पाणी पुरवठयाची कामे सुरु आहेत. २००३ पासुन प्राकलन मंजुर झाले आहे. परंतु तीन वर्षांत देखिल कामे होत नाही. नळांमध्ये पाणी तर यायला हवे.

मा. सदस्य श्री. अशोक ठाकुर :— मा. महापौरजी, मी आपणांस एमआयडीसीच्या वर्तणुकीबद्दल सांगितले होते. महापालिका त्यांना करोडो रुपये देते. तरी देखिल पाण्याचा प्रश्न आहे. याबद्दल सावकारे साहेबांनी येथे खुलासा करावा.

मा. उप—महापौर/पीठासीन अधिकारी :— हा जो प्रस्ताव आहे, यामुळे कॅम्प नं. ४ व ५ मधील पाण्याचा प्रश्न सुटण्यास मदत होईल.

मा. सदस्या श्रीमती मालती करोतिया :—येथे अशाप्रकारे फक्त प्रस्ताव पास होणार आहे काय? प्रत्येक नगरसेवकाच्या प्रभागात पाण्याची समस्या आहे. लोकांना पाण्यासाठी मोटारी लावाव्या लागत आहेत. यामुळे लाईटचे बिल देखिल जास्त येत आहे. त्या लोकांवर केसेस सुरु आहेत. त्या लोकांनी पोलिसांना पैसे खाऊ घातले आहेत. तसेच कोर्टात देखिल पैसे भरले आहेत. त्यादिवशी देखिल मी सावकारे साहेबांना सांगितले की, माझ्या प्रभागात पाण्याची समस्या आहे. मला रोज दोन टॅकर दयायला हवेत. तरी देखिल माझ्या प्रभागात एकच टॅकर पाठविला जातो.

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण :— आमचा या प्रस्तावाला पाठिंबा आहे. परंतु ब—याचवेळा पाणी येते तेव्हा लाईट नसते. आणि जेव्हा लाईट असते तेव्हा पाणी नसते. यासाठी त्यांनी काय नियोजन केले आहे? याची माहिती दयायला हवी.

मा. उप—महापौर / पीठासीन अधिकारी :— भार नियमनाची समस्या पुर्ण महाराष्ट्रात आहे.

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण :— यासाठी पाण्याची वेळ बदलायला हवी.

मा. उप—महापौर / पीठासीन अधिकारी :—सावकारे साहेब, जर पाण्याची वेळ बदलुन मार्ग निघत असेल तर आपण तशी कार्यवाही करावी.

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण :— यासाठी आपण एमआयडीसीकडे शिष्टमंडळ घेवुन जायला हवे. आम्ही देखिल आपणासोबत येवु.

मा. सदस्य श्री. चंदाराम मोकल :— मा. महापौर, आयुक्त, सचिव व सर्व सन्माननिय सदस्य, हा जलवाहिनी टाकण्याचा जो प्रस्ताव आहे त्याचे आम्ही स्वागत करतो. परंतु या प्रस्तावात काही त्रृटी आहेत असे वाटते. कारण पाले ते गायकवाड पाडा दरम्यान फक्त वसार हे गाव येते. असे असतांना या प्रस्तावामध्ये मौजे अंबरनाथचा उल्लेख केला आहे. हा विभाग त्या प्रस्तावात येतो का? श्री. जितेंद्र मढवी व श्री. फुलोरे यांची जागा खरोखरच जात आहे की नाही हे बघायला हवे. नाहीतर आपण काम सुरु करु व परत बंद होईल. काही ठिकाणी मौजे वसार लिहिले आहे व काही ठिकाणी मौजे अंबरनाथ लिहिले आहे. काम सुरु केल्यानंतर काहीही अडचण यायला नको. यासाठी महापालिकेने याकडे लक्ष दयावे.

मा. सदस्य श्री. लालबिहारी यादव :— मा. महापौरजी, माझ्या प्रभागात किती दिवस पाणी येणार नाही याची माहिती दयावी.

मा. उप—महापौर / पीठासीन अधिकारी :—सध्या या विषयावर चर्चा सुरु नाही. आपल्या कामासाठी मी श्री. सावकारे यांना सुचना देत आहे. ते पाहणी करुन आपला त्रास दुर करतील. कृपया बसुन घ्यावे.

मा. सदस्य श्री. राजु जग्यासी :— मा. महापौरजी, इतिवृत्त कायम होण्याची वाट न पहाता या ठरावाची अंमलबजावणी करावी जेणेकरुन काम त्वरीत सुरु करता येवु शकेल.

मा. सदस्य श्री. विश्वनाथ पाटील :— मा. महापौर, ही जी जलवाहिनी टाकली जाणार आहे यामुळे पाणी पुरवठा वाढण्याच्या दृष्टीकोनातुन फार चांगले काम होणार आहे. परंतु सदरचे काम केल्याने कॅम्प नं. ४ व ५ मधील पाण्याची समस्या दुर होणार आहे का? या शंकेचे निराकरण होणे आवश्यक आहे. दुसरी गोष्ट म्हणजे कॅम्प नं. ५ येथिल प्रभात गार्डन येथुन ज्या वितरण वाहिन्या येतात त्या योग्य आहेत काय? तसेच ज्या विभागात पाण्याची कमतरता आहे तेथे ते पाणी पोहोचणार आहे काय? ती व्यवस्था अगोदर झाली पाहिजे नाहीतर ज्या ठिकाणी पाणी जास्त आहे त्याच ठिकाणी ते जाईल. माझ्या प्रभागात बघितले तर ५० टक्के सुध्दा पाणी पुरवठा होत नाही. आता श्री. रमेश चव्हाण यांनी सुध्दा सांगितले की, त्यांच्या प्रभागात नेहमी पाण्याची समस्या असते. तुम्ही पाले येथुन जलवाहिनी टाकण्याअगोदर ज्या प्रभागात पाण्याची समस्या आहे तेथिल वितरण वाहिन्या व्यवस्थित करणार आहात काय? संबंधित अधिका—यांना तुम्ही तसे आदेश दिले आहेत काय? ते पाणी योग्य ठिकाणी पोहोचण्याची व्यवस्था आहे काय? आधी या शंकांचे निराकरण करा. आमचा याला विरोध नाही परंतु आधी खुलासा करा.

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण :—आम्ही आता हा विषय पास करीत आहोत. परंतु सावकारे साहेबांना यावर खुलासा करायला सांगावे.

कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा (श्री. आर.आर. सावकारे):— मा. महापौर, आयुक्त, सर्व सन्माननिय सदस्य, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने १९९७—९८ मध्ये ही योजना हाती घेतली होती. ही योजना रुपये १८.८० कोटींची होती. या योजनेंतर्गत १६ किमीच्या जलवाहिन्या व ३५ एमएलडी क्षमतेच्या सम्पची उभारणी करायची होती. यापैकी बहुतेक काम पुर्ण झालेले आहे. उर्वरीत पाले येथे ७६२ मिटर जलवाहिनीचे काम बाकी आहे. एक किलोमिटर लांबीच्या जलवाहिनीचे काम पुर्ण झाल्यानंतर आपणांस पुरेश्या प्रमाणात ४० ते ४५ एमएलडी पाणी मिळु शकेल. आपणांस सद्यस्थितीत ३८ एमएलडी पाणी मिळाल्यास ते पुरेसे होवु शकते. सध्या एमआयडीसीने त्यांची तिसरी जलवाहिनी कार्यान्वीत केल्याने आपणांस कमी दाबाने ३१ एमएलडी पाणी मिळत आहे. तसेच एमएसईबीचे भारनियमन सुरु असल्याने त्यामुळेही पाणी वितरणास अडचणी येत आहेत. ही जलवाहिनी टाकल्यानंतर आपण सर्वांना पुरेसे पाणी देवु शकतो.

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण :— एमएसईबीचे जे स्लॉट्स आहेत यासाठी आपण काय उपाययोजना केली आहे?

<u>कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा (श्री. आर.आर. सावकारे):–</u>एमएसईबीच्या भारनियमनावर मार्ग काढण्यासाठी त्यांच्या कार्यकारी अभियंतांना भेटुन चर्चा केली आहे. यासाठी आवश्यक त्या ठिकाणी जास्तीचे फिडर बसविण्यासाठी त्यांना विनंती केली आहे. त्यांनी त्याचे प्राकलन सादर केल्यानंतर त्याप्रमाणे कारवाई करण्यात येईल. पुढच्या आठवडयात सदरचे काम होवु शकते.

<u>काही सदस्य :–</u>पास–पास……

<u>मा. उप–महापौर / पीठासीन अधिकारी :–</u> सदरचा विषय सर्वानुमते संमत करण्यात येत आहे. 

---

☑

**विषय क्र. २:–** सुधारीत उल्हासनगर पाणी पुरवठा योजना अंतर्गत पाले ते गायकवाड पाडा दरम्यान जलवाहिनी पुर्ण करण्याच्या दृष्टीने एकुण ५ जणांना उल्हासनगर महानगरपालिकेच्या सेवेत वर्ग ४ अस्थायी पदावर नियुक्ती देणे.

<u>प्रस्तावना</u>

उल्हासनगर शहरातील पाणी पुरवठा व्यवस्थेत सुधारणा करण्याच्या दृष्टीने टप्पा क्र.१ अंतर्गत रु. १८.८० कोटीची योजना राबविण्यात आली या योजनेअंतर्गत उल्हासनगर शहरातील विविध संप, पंप गृह तसेच जलकुंभ बांधणेच्या कामांचा समावेश होता. या योजनेअंतर्गत मुख्य जलवाहिन्या टाकण्याचे काम जवळ जवळ ९५ टक्के पूर्ण झालेले आहे. व यापैकी काही जलकुंभ व जलवाहिन्या कार्यान्वित करण्यात आलेल्या आहेत. या योजनेअंतर्गत पाले ते गायकवाड पाडा या दरम्यान ७६२ मी.मी. व्यासाच्या जलवाहिनीचे काम भुसंपादन प्रक्रिया अदयाप पुर्ण न झाल्यामुळे तसेच खाजगी जमीन धारकाची हरकत असल्यामुळे टाकता आलेली नाही. याकिरता महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत भुसंपदानाचा प्रस्ताव दि. ९.७.२००२ रोजी संबंधीत विशेष भुसंपादन अधिकारी, ठाणे यांचेकडे सादर केलेला आहे. तसेच महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातर्फे भुसंपादन प्रक्रिया पुर्ण करण्यास ब–याच कालावधी लागणार आहे. उल्हासनगर शहर (दक्षिण) भागात महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या पाले येथुन बारवी मुख्य जलवाहिनीतुन घेतलेल्या जोडणीतुन सद्यस्थितीत पाणी पुवठा होत आहे.

म.औ.वि. महामंडळाच्या बारवी जलवाहिनीवरील पाण्याचा दाब सरासरी ४.५० के.जी./से.मी. २ राहिल्यास शहराच्या दक्षिण भागास पुरेशा प्रमाणात पाणी पुरवठा होवु शकतो. परंतु म.औ.वि. महामंडळाने अतिरिक्त नविन तिसरी जलवाहिनी कार्यान्वित केल्यामुळे जलवाहिनीवरील पाण्याचा दाब सरासरी ३.४० ते ३.७० के.जी./से.मी. २ या दरम्यान असल्यामुळे पुरेशा प्रमाणात पाणी उपलब्ध होत नाही. त्यामुळे उल्हासनगर दक्षिण भागातील कॅम्प क्र. ४ व ५ मध्ये ब–याच प्रमाणात पाणी टंचाई जाणवत आहे. तसेच भविष्यामध्ये म.औ.वि. महामंडळाने त्यांच्या मुख्य जलवाहिनीवरील दाब २.५० के.जी./से.मी. २ पेक्षाही कमी होण्याची शक्यता आहे असे कळविले आहे. कॅम्प क्र. ४ व ५ मधील पाणी टंचाई दूर करण्याच्या दृष्टीने पाले ते गायकवाड पाडा या दरम्यान अपूर्ण असलेले काम पूर्ण करणे आवश्यक आहे. जलवाहिनी टाकण्याकरीता संबंधित जमिन धारकांसोबत चर्चा केली असता त्यांनी त्यांच्या वतीने एकुण ०५ माणसे उल्हासनगर महानगरपालिकेच्या सेवेत सामावुन घेणेबाबत माणी केलेली आहे. जलवाहिनी ज्या जमिन मालकांच्या जागेतुन जाणार आहे त्या जमीन धारकांच्या वतीने सुचविलेल्या व्यक्तीस उल्हासनगर महानगरपालिकेच्या सेवेत सामावुन घेतल्यास वरील जलवाहिनीचे काम पूर्ण होणे शक्य होईल. याबाबतचा तपशील पुढील प्रमाणे––

| क्रमांक | | हिस्सा नं. | | उल्हासनगर महानगरपालिकेच्या सेवेत समाविष्ट करण्यात येणा–या व्यक्तिचे नाव |
|---|---|---|---|---|

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | मौजे वसार, ता. अंबरनाथ | १६०/५ | १) श्रीमती अंसुबाई वायले<br>२) श्री. सुभाष वायले<br>३) श्री. प्रेम वायले | श्री. सुभाष राजाराम वायले<br>व<br>श्री. सुभाष नाना फुलोरे |
| २ | मौजे वसार ता. अंबरनाथ | १११ | १) श्री. राजेश वायले<br>२) श्री. शंकर वायले<br>३) श्री. पंडित वायले<br>४) श्री. जनार्दन वायले<br>५) श्री. नाथा वायले<br>६) श्री. रमेश वायले व इतर | श्री. पप्पू दत्तू वायले |
| ३ | मौजे अंबरनाथ ता. अंबरनाथ | १४७ हि.नं. २,४,५,१२ ते १४ | १) श्री. जेजोराम वायले<br>२) श्री. अनंता वायले<br>३) श्री. गणपत वायले<br>४) श्री. आण्या वायले व इतर | श्री. जितेंद्र देवराज मढवी |
| ४ | मौजे अंबरनाथ ता. अंबरनाथ | १५०, हि.नं. ७ | १) श्री. गुरुनाथ पांडु फुलोरा व इतर | श्री. गोपीनाथ फुलोरा |

तसेच ज्या जमीनधारकांच्या जमीनीतुन जलवाहिनी टाकावयाची आहे अशा जमिनधारकांस / त्याने संमती दिलेल्या व्यक्तिस सेवेत सामावुन घेण्याबाबत कोणत्याही प्रकारची कायदयात तरतूद नाही. परंतू पाण्याचा अतिमहत्वाचा प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीकोनातून व योजनेचा पूर्णपणे लाभ व उपयोगितेच्या दृष्टीने एकूण ०५ जणांना उल्हासनगर महानगरपालिकेच्या सेवेत अस्थायी पदावर (वर्ग–४) सामावून घेतल्यास पाले ते गायकवाड पाडा या दरम्यान अपूर्ण असलेले जलवाहिनीचे काम पूर्ण करता येणे शक्य आहे. या प्रस्तावामुळे सध्या कार्यरत कर्मचा–यांवर कोणत्याही प्रकारचा अन्याय होणार नाही.

भुसंपादनाच्या प्रस्तावास बराच कालावधी लागणार असल्यामुळे व पाण्याचा प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीने विशेष बाब म्हणुन जमीन धारकांनी मागणी केल्यानुसार एकुण ०५ जणांना उल्हासनगर महानगरपालिकेच्या सेवेत सामावुन घेणेबाबत मंजुरी मिळावी. सदर प्रस्तावास मान्यता मिळणेकरीता महासभेच्या मंजूरीसाठी सादर.

<u>विशेष महासभा ठराव क्र:</u> ८३ <u>दिनांक:–१८/२/२००६</u>

सुचकाचे नाव :– श्री. राजु जग्यासी

अनुमोदकाचे नाव :– श्री. रमेश चव्हाण

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्यानुसार सुधारित उल्हासनगर पाणी पुरवठा योजनेंतर्गत पाले ते गायकवाड पाडा दरम्यान खाजगी जमिनीतुन मृदु लोखंडी जलवाहिनीचे (७६२ मि.मी) काम पुर्ण करण्याच्या दृष्टीने संबधित प्रकल्पग्रसत जमिनधारकांच्या मागणीनुसार श्री. सुभाष राजाराम वायले, श्री. सुभाष नाना फुलोरे, श्री. पप्पु दत्तु वायले, श्री. जितेंद्र देवराज मढवी व श्री. गोपीनाथ फुलोरा यांना उल्हासनगर महानगरपालिकेच्या सेवेत अस्थायी पदावर (वर्ग–४) सामावुन घेण्यास मान्यता देत आहे.

तसेच इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता सदरचा ठराव कायम समजण्यात येईल व त्याप्रमाणे अंमलबजावणी करण्यात येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

उपमहापौर / पीठासीन अधिकारी
विशेष महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>मा. सचिव :—</u> विषय क्र. ३ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ३ :—** उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात ''राष्ट्रीय युवा धोरण'' अंतर्गत युवकांसाठी विविध विकासात्मक तथा कल्याणकारी उपक्रम राबविण्यास मान्यता देणे.

---

<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u> मा. महापौर महोदया, मा. आयुक्त व सर्व सदस्य, हा जो विषय आला आहे, या विषयाअंतर्गत युवकांसाठी विविध उपक्रम राबविणे ही एक चांगली गोष्ट आहे. परंतु आपण यातील शेवटची ओळ वाचली तर आपणांस दिसुन येईल की, मा. महापौर यांचेकडुन प्राप्त झालेल्या सुचनेनुसार महानगरपालिका प्रभाग क्षेत्र १ ते ४ मध्ये दिनांक २५ जानेवारी, २००६ रोजी प्राथमिक स्वरुपात एकुण ४ युवक कल्याण केंद्र सुरु करणेत आलेली आहेत. या ४ केंद्राची माहिती लोकांना कशी काय मिळणार? जर महापालिका सदस्यांना माहिती मिळत नसेल तर लोकांना कसे कळणार? जेव्हा एखादा असा कार्यक्रम होतो तेव्हा आयुक्तांचे कर्तव्य असते की, त्यांनी सर्व सदस्यांना त्याची माहिती दयायला हवी. जर नगरसेवकांनाच माहिती नसेल तर त्यांच्या प्रभागातील युवक कश्या प्रकारे मार्गदर्शन घेवु शकतील? आपण जेव्हा केंद्र सुरु करतात तेव्हा सर्व महापालिका सदस्यांना व लोकांना त्याची माहिती देणे आवश्यक असते. शहरातील अनेक संस्था ज्या चांगल्याप्रकारे काम करतात त्यांना देखिल माहिती दयायला हवी होती. जेणेकरुन जास्तीत जास्त लोक त्याचा लाभ घेवु शकतील.

<u>मा. सदस्य श्री. चंदाराम मोकल :—</u> मा. महापौर, आयुक्त व सर्व सन्माननिय सदस्य, हा जो विषय सभागृहासमोर आणला आहे हा एक चांगला विषय आहे. परंतु यामध्ये चुका आढळुन येत आहेत. सदर विभागासाठी सामान्य प्रशाासन विभागाने सध्या मंजुर असलेल्या कर्मचारी वर्गामधुन एक अधिक्षक, एक वरीष्ठ लिपिक, एक कनिष्ठ लिपिक, व एक शिपाई दयावेत. त्यामुळे नविन पदे मंजुर करण्याची गरज नाही असे लिहिले आहे. आता यामध्ये तुम्ही ४ पदे तर निर्माण करीतच आहात. त्यामूळे ही केंद्र कुठे सुरु केली आहेत याची यादी लवकरात लवकर सभागृहासमोर आणावी. जेणेकरुन सदस्यांना माहिती मिळु शकेल. एक केंद्र साधुबेला मध्ये सुरु केले आहे. त्यांचे काम कसे असेल व युवकांसाठी काय अटी असतील? याची माहितीही मिळायला हवी. ही सर्व माहिती तयार करुन प्रत्येक सहा महिन्याला सभागृहासमोर सादर करायला हवी.

<u>मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण :—</u> मा. महापौर महोदया, ही केंद्रे कधी सुरु झाली व उद्घाटनाच्या वेळी कोण—कोणते सदस्य उपस्थित होते व कुणी चालु केली? याचा खुलासा दयावा. विरोधी पक्ष नेता व गटनेता यांना आमंत्रित केले नव्हते. ही आपली खाजगी मालमत्ता आहे काय?

**वैद्यकीय आरोग्य अधिकारी (डॉ.के. आर खरात):—** मा. महापौर, आयुक्त व सर्व सदस्य, २६ जानेवारीला ही केंद्रे सुरु करावी अशी आमच्या सन्माननिय महापौरांची इच्छा होती. यासाठी प्रायोगिक तत्वावर आम्ही या शहरात ४ केंद्राचे उद्घाटन २६ जानेवारीला केले होते. युवा वर्गासाठी या योजनेअंतर्गत विविध उपक्रम राबविण्यासाठी आपल्या समोर हा विषय ठेवला आहे. यासाठी सर्वांना १९ पानांची एक पुस्तिका वाटण्यात आली आहे. त्या अंतर्गत आम्ही आपणाकडुन मार्गदर्शन घेवु इच्छितो की, आपल्या अर्थसंकल्पावर ताण न पडता आपण युवकांसाठी काय करु शकतो.

**मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :—** शिष्टाचाराप्रमाणे ज्या वेळी आपण उद्घाटन केले त्यावेळी विरोधी पक्ष नेत्यांना आमंत्रण देणे आवश्यक होते. परंतु आपण आपल्या घरच्या उदयोगासारखे जे उद्घाटन केले ते चुकीचे आहे. आपण विरोधी पक्ष नेता व गटनेता यांना आमंत्रित करणे आवश्यक होते. एखादया खाजगी कंपनीप्रमाणे कामकाज चालविणे चुकीचे आहे. आमचा प्रश्न असा आहे की, आपण गटनेता, विरोधी पक्ष नेता यांना आमंत्रित केले होते काय? आयुक्त साहेब, शहरात कोणताही सार्वजनिक कार्यक्रम होत असतांना शिष्टाचाराचे पालन करणे हे आपले देखिल कर्तव्य आहे.

**मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—** आपण सांगितले की, २६ तारखेला उद्घाटन झाले परंतु गोषवा—यामध्ये २५ तारखेचा उल्लेख केला आहे. ज्यावेळी हा कार्यक्रम आयोजित केला त्यावेळी सर्व सदस्यांना याची माहिती देणे हे आपले कर्तव्य होते. जर सदस्यांनाच माहिती नसेल तर याची माहिती सर्वांना कशी काय मिळेल?

**मा. सदस्य श्री. विश्वनाथ पाटील :—** जेव्हा देखिल एखादा शासकिय कार्यक्रम, योजना आयोजित केली जाते तेव्हा त्याची माहिती आम्हांला का दिली जात नाही? बीपीएलच्या योजनेचे देखिल असेच झाले. नगरसेवकांना त्याची माहितीच नव्हती. त्याचे सवेक्षण झाल्यानंतर नगरसेवकांना त्याची माहिती मिळाली. तर अशी माहिती नगरसेवकांना का दिली जात नाही? थोडेफार नगरसेवक एकत्र होवुन कार्यक्रम पार पाडतात. याला काय अर्थ आहे? बीपीएल योजनेचे असेच झाले आहे. मध्यंतरी मी त्यांच्या कार्यालयात गेलो तर असे कळले की, तो अधिकारीच तेथे नव्हता. त्यांनी मला आयटीआय येथे अधिकारी असल्याचे सांगितले. तेथिल अधिकारी नेहमी बेपत्ता असतो. तर आम्ही याची चौकशी करणार तरी कुठे? लोकप्रतिनिधींना जर माहिती मिळाली तर ते लोकांना माहिती देवु शकतात. नगरसेवकांच्या मागे लोक फिरतात व विचारतात की, अशी अशी योजना सुरु आहे, आम्ही काय करावे? परंतु जर आम्हांलाच माहिती नसेल तर आम्ही लोकांना काय सांगणार? यासाठी महासभेत आपण सदस्यांना आधी योजनेची माहिती दयायला हवी.

**मा. सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :—** मा. महापौरजी, मी आताच डॉ. खरात यांचे एक चांगले वाक्य ऐकले की, मा. महापौरांची ही योजना सुरु करायची इच्छा होती. मी त्यांना विचारु इच्छितो की, २६ जानेवारी पुर्वी येथे बैठक झाली होती त्या बैठकीत आपण कुणालाही याबद्दल माहिती दिली होती काय? येथे ८१ नगरसेवक आहेत. जेव्हा चार केंद्रे सुरु केली तेव्हा त्यांना आमंत्रित करण्याची आवश्यकता आपणांस वाटली नाही काय? तुम्ही प्रभाग समितीच्या सभापतींना बोलावले होते का? उदया तुम्हांला स्वप्न पडले की, दवाखाना बंद करायचा आहे तर तुम्ही बंद कराल का? तुम्हांला वाटले की, उदया ही औषधे बंद करायची तर बंद कराल का? तुमच्या मनात जे येईल ते तुम्ही कराल काय?

**मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी :—**मा. महापौर महोदया, हा जो प्रस्ताव आहे त्याच्या विरोधात आम्ही नाही. चांगला प्रस्ताव आहे, मा. महापौरांनी स्वप्न बघितले आहे, त्याची अंमलबजावणी व्हायला हवी. आम्ही या प्रस्तावाच्या विरोधात नाही परंतु सध्या प्रशासनात जो बेशिस्तपणा आहे त्याच्या विरोधात आम्ही आहोत. युवकांच्या ब—याच समस्या आहेत, त्यासाठी उपक्रम राबवायला हवे हे खरे आहे. या योजनेत ब—याचशा चांगल्या गोष्टी आहेत. परंतु त्यावर अंमलबजावणी कशी होईल? आज महापालिकेच्या ज्या आवश्यक सेवा आहेत त्या पुर्ण केल्या जात आहेत काय? या आधी काही ग्रामस्थांना कामावर ठेवायचा विषय आला असता त्याला कुणीही विरोध केला नाही. मुद्दा असा होता की, पाण्याचे वितरण व्यवस्थित होणार अथवा नाही? आता हा जो प्रस्ताव आला

आहे, त्याच्या विरोधातही कुणी नाही. आपण कृपा करुन सभागृहाला सांगावे की, ज्यावेळी बैठक झाली त्यावेळी आपण सदस्यांना माहिती दिली होती काय? आपण पहिली बैठक कधी बोलावली? जंगलात मोराने नृत्य केले ते बघितले तरी कोणी? सभागृहाच्या भावना आपण समजुन घ्या. सभागृहाला रबरी शिक्का समजु नका. सभागृहाचा गौरव लक्षात घ्या. आम्ही या योजनेच्या विरोधात नाही. अशा योजना यायला हव्यात. आज या शहरात एड्सचा फैलाव मोठया प्रमाणावर होत आहे. युवकांमध्ये याबद्दल जागृती होणे आवश्यक आहे. परंतु आम्ही या सुचना देणार तरी कुणाला? यासाठी कृपा करुन आपण सभागृहाला विश्वासात घ्यावे तसेच रबरी शिक्का म्हणुन वागणुक देवु नये. धन्यवाद ।

मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणी :— मा. महापौरजी, या विषयावर विरोधी पक्षातील सदस्यांनी त्यांचे जे विचार प्रकट केले आहेत ते योग्य आहेत. परंतु जर मा. महापौर त्या समारंभाला उपस्थित राहिल्या असतील तर आपण असे मानायला हवे की, आपण सर्व तेथे उपस्थित होतो. मला असे वाटते की, मा. महापौरांनी एखादा निर्णय घेतला असेल तर आपण त्या निर्णयावर ठाम राहायला हवे. यासाठी आपण तेथे प्रत्यक्ष उपस्थित नसलो तरी चालेल.

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी :—सभागृहात सर्वांचे एकमत आहे की, मा. महापौरांनी चांगली योजना आणली आहे. परंतु आमची अशी इच्छा आहे की, आम्हांला देखील विश्वासात घेतले जावे.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :— माझा हरकतीचा मुद्दा आहे की ही मा. महापौरांची योजना नसुन केंद्र सरकारची, मा. अटलबिहारी वाजपेयी पंतप्रधान असतांना त्यांनी आणलेली योजना आहे.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :— मा. महापौरजी, या विषयावर मी खुलासा करु इच्छितो की, या विषयावर आता बरीच चर्चा झाली आहे. अधिका—यांना तर बोलण्याची संधी दिलेलीच नाही. आतापर्यंत या विषयावर अधिका—यांची व महापौरांची एकही बैठक झालेली नाही. फक्त अधिका—यांचीच बैठक झालेली आहे. यानंतर पदाधिका—यांची बैठक होईल. जेव्हा पहिली बैठक होईल तेव्हा सर्वांना बोलवले जाईल. ते हेच सांगण्याचा प्रयत्न करत आहेत.

मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाड :— मा. महापौरजी, यामध्ये स्पष्ट लिहिले आहे की, ४ केंद्रे सुरु करण्यात आलेली आहेत.

मा. उपमहापौर /पीठासीन अधिकारी :— खरात साहेबांना उत्तर देवु दया.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :— सभागृह नेता त्यांना उत्तर कसे दयायचे याचे मार्गदर्शन करीत आहेत.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :— हे चुकीचे आहे. मी खरात साहेबांना विचारले की, बैठक कुणाची झाली? यावर त्यांनी सांगितले की, अधिका—यांची बैठक झाली आहे. पदाधिका—यांची नाही.

वैद्यकीय आरोग्य अधिकारी (डॉ.के. आर खरात):— मा. महापौर, आयुक्त, ज्यावेळी मा. महापौरांनी सांगितले की, केंद्र शासनाची ही योजना आपणांस लागु करायची आहे. त्यावेळी विभागप्रमुखांकडुन मते मागविण्यासाठी मा. महापौरांनी सर्व अधिका—यांची एक बैठक घेतली होती. त्यामध्ये असे ठरले होते की, आधी ४ केंद्र सुरु करावीत. त्यानंतर त्यामध्ये कोणते उपक्रम राबवायचे हे ठरविले जावे. या पुस्तीकेमध्ये दिलेले सर्व उपक्रम आपण राबवु शकत नाही कारण ते आपल्या आर्थिक शक्ती बाहेरचे आहे. परंतु ना नफा ना तोटा या तत्वावर काही योजना राबविण्यासाठी काही सदस्यांची एक समिती स्थापन करावी अशी मा. महापौरांची इच्छा होती. अशी समिती

स्थापन केल्यानंतर त्या समितीच्या ज्या सुचना असतील त्यांची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी वैद्यकीय आरोग्य अधिकारी यांच्या कार्यालयाची राहिल. हे माझे अतिरिक्त काम आहे. माझ्या विभागाचे काम नाही. युवक वर्गासाठी एक अतिरिक्त जबाबदारी आमचा विभाग पार पाडणार आहे.

<u>मा. सदस्य श्री. रामदास उमाप :–</u> मा. महापौरजी, खरात साहेबांनी जे आडुन सांगितले ते आम्हांला कळले आहे. परंतु मुद्दा तो नाही. आयुक्त साहेबांनी कृपया लक्ष दयावे. ते लक्ष देत नसल्याने आम्ही नाराज आहोत. हे आपल्या प्रशासनामुळे होत आहे. विरोधी पक्षातील सदस्य आपल्या कार्यालयात येवुन आपणांस भेटले होते. हे आपल्या लक्षात असेल. विरोधी पक्ष फक्त विरोधाचेच काम करीत नाही शहराच्या भल्यासाठी भाजपा–शिवसेनेने नेहमी सहकार्य केले आहे व यापुढेही करेल. परंतु आम्हांस अशाप्रकारे वंचित ठेवु नका. यापुढे शिष्टाचाराची अशाप्रकारे पायमल्ली झाल्यास आम्ही ते सहन करणार नाही हे आपण लक्षात घ्या.

<u>मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाड :–</u> मा. महापौरजी, मी आपल्या निदर्शनास आणु इच्छितो की, आमचे गटनेते श्री. पाटील साहेबांनी सांगितल्याप्रमाणे नविन योजनेची माहिती सदस्यांना दिलेली नाही. तसेच बीपीएल योजनेसाठी फॉर्म भरण्याची जी नविन पध्दत आहे त्याची देखिल सदस्यांना माहिती दिलेली नाही. त्याबाबत मी आपले लक्ष वेधु इच्छितो की, आपले सुवर्ण जयंती विभागाचे प्रकल्प अधिकारी श्री. गायकवाड यांनी नुकतेच लग्न केले असून ते कामावर येत नाहीत. परंतु त्यांनी खाली एक नोटिस लावली आहे की, बीपीएलचा दाखला १५ तारखेला दिला जाईल. त्या दिवशी येथे ब–याच महिला आल्या होत्या. परंतु त्या दिवशी तेथे संबंधित अधिकारी उपस्थित नव्हता. तर सुवर्ण जयंती कार्यालयात अशाप्रकारे जे खोटे काम सुरु आहे ते त्वरीत बंद करायला हवे. धन्यवाद ।

<u>काही सदस्य :–</u>पास–पास......

<u>मा. उप–महापौर / पीठासीन अधिकारी :–</u> सदरचा विषय सर्वानुमते संमत करण्यात येत आहे. 

---

☑ **विषय क्र. ३:–** उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात ''राष्ट्रीय युवा धोरण'' अंतर्गत युवकांसाठी विविध विकासात्मक तथा कल्याणकारी उपक्रम राबविण्यास मान्यता देणे.

<u>प्रस्तावना –</u>

महासभा ठराव क्रमांक.२७ दिनांक.२६/७/२००४ अन्वये केंद्र शासनाचे (राष्ट्रीय युवा धोरण–२००३) नुसार 'राष्ट्रीय युवा धोरण' उल्हासनगर शहरामध्ये राबविण्यास प्रशासकीय व वित्तीय मान्यता दिलेली होती.

सदरहू योजनेत युवकांच्या दृष्टीने (१) शिक्षण (२) प्रशिक्षण व उद्योग (३) आरोग्य आणि कुटुंब कल्याण (अ) सामान्य आरोग्य (ब) वैचारिक आरोग्य (क) आध्यात्मिक आरोग्य (ड) एच.आय.व्ही.एडस, प्रजनन संस्थेशी निगडीत आजार, लैंगिक आजार इत्यादी, प्रजनन आरोग्य व कुटूंब कल्याण (४) राष्ट्रीय संपत्तीचे जतन (५) क्रिडा (६) कला आणि संस्कृती (७) विज्ञान (८) कौशल्य, गुणसंपन्न नागरिक बनवणे इत्यादी महत्वाच्या विषयांचा समावेश आहे. सदरहू योजनेतील उद्दिष्ठे साध्य करण्यासाठी उल्हासनगर महानगरपालिकेत ''युवक कल्याण, क्रिडा व सांस्कृतीक विभाग'' निर्माण करुन त्या विभागामार्फत योजनेच्या अंमलबजावणीची कार्यवाही करावयाची आहे. सदर विभागासाठी पुढिलप्रमाणे अधिकारी/कर्मचारी मंजूर करण्यात यावेत.

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १) | अधिक्षक | – | १ | (२) | वरिष्ठ लिपिक | – | १ |
| ३) | कनिष्ठ लिपिक | – | १ | (४) | शिपाई | – | १ |

सदर कर्मचारी सामान्य प्रशासन विभागाने सध्या मंजूर असलेल्या कर्मचारी वर्गातून उपलब्ध करुन द्यावेत. त्यामुळे नवीन पदे मंजूर करण्याची जरुरी राहणार नाही. आणि महापालिकेवर आर्थिक बोजा पडणार नाही.

सदर विभागाचे नियंत्रण विभाग प्रमुख म्हणून तूर्तास वैद्यकीय आरोग्य अधिकारी, वैद्यकीय आरोग्य विभाग यांचेकडे राहिल.

सदर विभागामार्फत सदर योजना सर्व प्रभाग समिती क्षेत्रात टप्या–टप्याने राबविण्यात येईल. त्यासाठी प्रभाग क्षेत्र अधिकारी यांचेवर केंद्रातील उपक्रम विचारात घेऊन जबाबदारी, नियंत्रण/समन्वयक अधिकारी यांनी सोपवावी.

युवक कल्याण केंद्र सुरु करण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभाग, विद्युत विभाग, सामान्य प्रशासन विभाग इत्यादी संबंधित विभाग व त्यांचे विभाग प्रमुख यांनी आवश्यक ते सहकार्य करणेत यावे. सदरची योजना प्रभावीपणे व नियमितपणे राबविण्यासाठी प्राथमिक स्वरुपात युवक केंद्र सुरु करणेसाठी वैद्यकीय आरोग्य अधिकारी व त्यांचे अधिपत्याखालील वैद्यकीय आरोग्य विभाग समन्वयाचे काम पाहतील.

नियोजित युवक कल्याण केंद्र कार्यान्वित झालेनंतर त्यावर नियंत्रण व दैनंदिन कामकाजासाठी युवक कल्याण, क्रिडा व सांस्कृतिक विभाग निर्माण करणे, सदरहू विभागासाठी व युवक केंद्र चालविण्यासाठी कर्मचारी उपलब्ध करुन देणे, युवक केंद्र चालविण्यासाठी आवश्यकतेनुसार नियम, अटी व शर्ती इत्यादि नियंत्रण अधिकारी यांच्या मदतीने निश्चित करणे आदि जबाबदारी उप आयुक्त (मुख्यालय) यांचेकडे सोपविण्यात यावी.

मा. महापौर यांचेकडुन प्राप्त झालेल्या सुचनेनुसार महानगरपालिका प्रभाग क्षेत्र १ ते ४ मध्ये दिनांक २५ जानेवारी, २००६ रोजी प्राथमिक स्वरुपात एकुण ४ युवक कल्याण केंद्र सुरु करणेत आलेली आहेत.

उल्हासनगर महानगरपालिका प्रभाग क्षेत्र १ ते ४ मध्ये प्राथमिक स्वरुपात एकुण ४ युवक कल्याण केंद्र सुरु करणेस कार्योत्तर मंजूरी मिळणेस तसेच राष्ट्रीय युवा धोरण अंतर्गत महानगरपालिका क्षेत्रमध्ये अधिक युवक कल्याण केंद्र सुरु करणेस महासभेची मंजूरी मिळणेस प्रस्तावित.

विशेष महासभा ठराव क्र: ८४ दिनांक:–१८/२/२००६

सुचकाचे नाव :– श्री. गोविंदराम लुंड

अनुमोदकाचे नाव :– श्री. बच्चाराम रुपचंदानी

ही महासभा वरील प्रस्तावने अनुसार ''राष्ट्रीय युवा धोरण'' अंतर्गत उल्हासनगर महानगरपालिका प्रभाग क्षेत्र समिती क्र. १ ते ४ मध्ये युवकांसाठी विविध विकासात्मक तथा कल्याणकारी उपक्रम राबविण्यासाठी मान्यता देत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

सर्वानुमते

उपमहापौर / पीठासीन अधिकारी
विशेष महासभा

<u>मा. सचिव :—</u> विषय क्र. ४ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र.** ४ :— श्रीमती माया लासी, श्रीमती विशाखा सावंत व श्रीमती नर्गीस खान यांना कनिष्ठ लिपिक व शिपाई या अस्थायी पदावर महापालिकेच्या सेवेत सामावुन घेण्यास मान्यता देणे.

---

<u>मा. सचिव :—</u>हा प्रस्ताव मागे घेण्यासाठी प्रशासनातर्फे एक पत्र आले असून ते आपणा सर्वांना दिलेले आहे.

<u>मा. सदस्य श्री. रामदास उमाप :—</u> मा. महापौर, मा. आयुक्त, सन्माननिय सभागृह, हा विषय पटलावर आणल्यानंतर मागे घेण्याबाबत पत्र दिले आहे. त्यामध्ये प्रशासनाने तांत्रिक कारणामुळे विषय मागे घेत असल्याबाबत कळविले आहे. पटलावर विषय आणण्यापुर्वी विचार करुन, अभ्यास करुन आणायला हवा. कारण कधी कधी विवाद उत्पन्न होतो तसे व्हायला नको. आम्ही विषय मागे घेण्याच्या विरोधात आहोत. या तिघांनाही कायम करायला हवे. यासाठी शिवसेना व भाजपाचे समर्थन आहे.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :—</u> मा. महापौरजी, एकदा विषय महासभेसमोर आणल्यानंतर तो महासभेची संपत्ती होतो. त्यावर महासभेने सर्वानुमते अथवा बहुमताने निर्णय घेणे आवश्यक असते. मला असे वाटते की, सर्व राजकिय पक्ष स्थानिक कर्मचा—यांच्या बाजुने आहे. मला असे वाटते की, हा विषय मंजुर केला जावा. तसेच काही मुद्दे मी सचिव साहेबांपुढे सादर करीत आहे. यांचा उल्लेख इतिवृत्तात केला जावा. तसेच आता हा विषय सर्वानुमते मंजुर केला जात असुन या सर्वांना आता महापालिकेत बरीच वर्ष झाली आहेत त्यामुळे त्यांना हे पद मिळायलाच हवे.

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :—</u> एकदा विषय सभासुचनेवर आणल्यानंतर तो सभागृहाची मालमत्ता होतो. त्यामुळे विषय मागे घेणे योग्य नाही असे आम्हांला वाटते.

<u>मा. अतिरिक्त आयुक्त (श्री. नाना रौराळे):—</u> मा. महापौर, आयुक्त, सचिव व सर्व सन्माननिय सदस्य, ..........

<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u> हे कश्यासाठी बोलत आहेत.

<u>मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी :—</u> एकदा विषय पास झाल्यावर आपण कश्यासाठी बोलत आहात?

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :—</u> तुम्हांला वर कुणी बोलावले?

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :—</u> तुम्ही कुणाच्या मंजुरीने बोलत आहात? मा. महापौरांनी आपणांस परवानगी दिली आहे काय?

<u>मा. अतिरिक्त आयुक्त (श्री. नाना रौराळे):—</u>मी मा. महापौरांकडुन परवानगी घेतलेली आहे.

<u>मा. उपमहापौर / पीठासीन अधिकारी :—</u> सभागृहाची भावना बघुन आपण न बोलल्यास बरे होईल.

<u>मा. सदस्य श्री. चंदाराम मोकल :—</u>मा. महापौरजी, यांनी जे पत्र लिहिले आहे त्यामध्ये फक्त नाव लिहिले आहे, विषय क्रमांक टाकलेला नाही. आम्हाला कसे काय कळणार?

**मा. सदस्य श्री. राज असरोंडकर :—**मा. महापौर महोदया, या कर्मचा—यांना कायम करण्यासाठी निर्णय झाला आहे. त्याला कुणाचाही विरोध नाही. परंतु यामध्ये असे लिहिले आहे की, अस्थायी पदावर कायम करण्यात येत आहे. तर त्यांना स्थायी पदावर कायम करणार आहात की, अस्थायी पदावर करणार आहात? त्याची पध्दत काय आहे हे स्पष्ट व्हायला हवे. आपण जर एखादया कर्मचा—याला स्थायी पदावर कायम करत असु तर त्यांना त्याचा फायदा मिळेल. अस्थायी पदावर त्यांना कायम केल्याने काय फायदा मिळेल, त्यांना नोकरीची शाश्वती मिळणार आहे काय? हे येथे स्पष्ट व्हायला हवे. तसेच ब—याचशा कर्मचा—यांचे असेच प्रस्ताव प्रलंबित आहेत. तर असे किती कर्मचारी आहेत? सभागृहासमोर अशा सर्व कर्मचा—यांचा प्रस्ताव यायला हवा. सर्वांना न्याय मिळायला हवा.

**मा. अतिरिक्त आयुक्त (श्री. नाना रौराळे):—**श्रीमती माया लासी, श्रीमती विशाखा सावंत व श्रीमती नर्गिस खान यांना तत्कालीन नगरपालिका अस्तित्वात असतांना सेवेमध्ये मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३ नुसार सहा महिन्यासाठी तात्पुरत्या स्वरुपात कामावर ठेवण्यात आले होते. नियमाप्रमाणे आयुक्तांना फक्त ६ महिने नियुक्ती देण्याचे अधिकार आहेत. ६ महिन्यांचा कालावधी संपल्यानंतर श्रीमती विशाखा सावंत यांची नियुक्ती रद्द करण्यात आली होती, खंडित करण्यात आली होती, त्यानंतर पुन्हा त्यांना नियुक्ती देण्यात आली. पुन्हा ६ महिन्याचा कालावधी संपण्यापुर्वी श्रीमती सावंत यांनी औद्योगिक न्यायालयात दावा दाखल केला. औद्योगिक न्यायालयात त्यांचा निकाल शासनाच्या बाजुने लागला. त्यानंतर त्यांनी स्थगन आदेश प्राप्त केला. स्थगन आदेश घेतल्यानंतर त्यांच्या सेवा पुर्ववत चालु ठेवण्यात आल्या. केस चालू असतांनाच श्रीमती विशाखा सावंत यांनी केस मागे घेतली. त्यांनी मागे घेवुनही त्यांना पुन्हा सेवेत कायम करण्यात आले आहे. खरेतर त्यांची नियुक्ती ही पुर्णत: तात्पुरत्या स्वरुपाची आहे. मा. सर्वोच्च न्यायालयाच्या २५.८.२००५ च्या निर्णयाप्रमाणे जे कर्मचारी मागील दाराने सेवेत प्रवेश करतात अशा कर्मचा—यांना मागील दारानेच बाहेर काढावे असे स्पष्ट केले आहे. मी आपणांस सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयातील एक वाक्य वाचुन दाखवितो, ‘‘दोज हु आर कम बाय बॅक डोअर, शुड गो थ्रु दॅट डोअर’’ याचा अर्थ जे कर्मचारी अर्हताधारक नाहीत व मागील दाराने आलेले आहेत, त्या सर्व कर्मचा—यांना सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे त्यांची सेवा खंडित करायला हवी. पण सहानुभुतीच्या दृष्टीकोनातुन आतापर्यंत या कर्मचा—यांना सेवेत सामावुन घेतलेले आहे. श्रीमती माया लासी यांच्या संदर्भात मी आपणांस एक उदाहरण देवु इच्छितो. श्रीमती माया लासी यांची नेमणुक ५.८.९८ ला झाली. त्यांनाही सहा महिन्यासाठी नियुक्त करण्यात आले होते. तत्कालीन आयुक्तांनी त्यांची सेवा नियमित करण्यासाठी आदेश काढले होते. महासभेची मान्यता न घेता त्यांनी सदरचे आदेश काढले असल्याने त्यावेळेस ते आदेश रद्द करणे आवश्यक होते. परंतु त्यांना तरीही सेवेत कायम ठेवले. पुन्हा त्यांचा विषय महासभेत आला असता महासभेने निवड समितीने त्यांची पात्रता तपासावी असे आदेश दिले होते. तरीही आजपर्यंत निवड समितीने श्रीम. माया लासी यांचे प्रकरण तपासलेले नाही. प्रशासनाने निवड समितीसमोर प्रस्ताव सादर करावा असा जो उल्लेख केला आहे तो चुकीचा आहे. खरेतर महासभेने ज्यावेळी आदेश दिले त्यावेळी निवड समितीसमोर त्यांचे प्रकरण ठेवणे आवश्यक होते. परंतु त्यांचे प्रकरण निवड समितीसमोर ठेवलेले नव्हते. अंतत: श्रीमती माया लासी व श्रीमती विशाखा सावंत यांनी औद्योगिक न्यायालयाकडे दाखल केलेल्या याचिका स्वत:हुन मागे घेतल्या आहेत, त्यामुळे खरेतर त्यांचा सेवेत राहण्याचा अजिबात हक्क नाही. कारण त्यांनी फक्त स्थगन आदेश प्राप्त करुन घेतला होता. तो देखिल उठवण्यात आला आहे. या संदर्भात प्रशासनाने महासभेसमोर जो प्रस्ताव सादर केला होता तो २५.८.२००५ च्या शासन निर्णयातील तरतुदीप्रमाणे पुन्हा सखोल छाननी करणे, तपासणी करणे आवश्यक आहे. या सर्व बाबी लक्षात घेवुन प्रशासनाने महासभेला हा प्रस्ताव मागे घेण्याविषयी विनंती केली आहे. खरेतर हे तिनही कर्मचारी अनियमित आहेत. मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशामध्ये एक वाक्य स्वंयस्पष्ट आहे की, अनियमितता ही नियमित करण्याच्या पध्दतीने नियमित करता येत नाही.

**मा. सदस्य श्री. रामदास उमाप :—** एकदा सभागृहासमोर विषय सादर केल्यानंतर त्यावर काय निर्णय घ्यायचा हा सभागृहाचा हक्क आहे.

**मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :—** हा विषय आता मागे घेता येणार नाही. आम्ही हा विषय पास करण्याच्या बाजुने आहोत तसेच त्यांना इतरही लाभ दयायला हवेत व ठरावात तसा उल्लेख करायला हवा. याबाजुने आम्ही आहोत.

**मा. सचिव :—**सन्माननिय सदस्य श्री. लाल पंजाबी यांनी ज्या सुचना आणल्या आहेत, त्यांचा समावेश करता येईल असे मला वाटत नाही.

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :— मी समजु शकतो की, आता या सुचनांचा ठरावात समावेश करता येणार नाही कारण सभा सुचनेवर तो विषय नाही. परंतु यापूढे देखिल सर्वांना त्याचा फायदा मिळायला हवा. या बाजुने आम्ही आहोत. आता हा फक्त चर्चेचा भाग राहिल. आता या नंतर ३३ कर्मचा—यांचा विषय आहे. ते उच्च न्यायालयात गेले होते. तेथे देखिल न्यायालयाने त्यांचे प्रकरणात कारवाई करण्यासाठी निर्देश दिले आहेत. परंतु त्यापैकी ५—६ लोकांचा मृत्यु झाला आहे. आम्हांला वाईट वाटते की, ते जिवंत असतांना आम्ही काही करु शकलो नाही. आता हे लोक तर जिवंत आहेत, त्यामुळे त्यांच्या जिवंतपणीच त्यांना फायदा दयायला हवा.

मा. सदस्य श्री. शांताराम निकम :— मा. महापौरजी, विषय क्र. ४ व ५ हे पुर्णत: वेगळे आहेत. त्यांचा एकमेकांशी संबंध जोडु नये.

मा. सचिव :— मा. सभागृहनेता यांनी येथे जी सुचना दिली होती ती सुचना ते मागे घेवु इच्छितात कारण आपले जे मत आहे त्याच्याशी ती सुचना विपरित आहे.

मा. सदस्य श्री. राज असरोंडकर :— एक मुद्दा स्पष्ट झाला नाही की, आपण ही जी नियुक्ती करीत आहोत ती अस्थायी पदावर आहेत की स्थायी पदावर आहेत. हा प्रश्न मी का विचारत आहे ते मी आपणांस सांगतो. या कर्मचा—यांचा हा जो विषय आहे, तर हे कर्मचारी काही ५—६ महिन्यापुर्वी या महापालिकेत आलेले नाहीत. महापालिकेत यापुर्वी श्री. बायस म्हणुन जे प्रशासक होते त्यांनी २.११.९६ ला जो ठराव केला होता त्याचा फायदा या कर्मचा—यांना मिळाला आहे असे मला वाटते. जर एवढया दिवसांपासुन हे कर्मचारी कार्यरत असतील व त्यांना आपण आज कायम करत असु तर एवढया दिवसांपासुन ते कोणत्या पदावर कार्यरत होते? हा प्रश्न येथे उपस्थित होतो. मला असे वाटले होते की, आजपर्यंत ते अस्थायी होते व आज आपण त्यांना स्थायी करणार होतो.

मा. उपमहापौर /पीठासीन अधिकारी :— आपणांस जो गोषवारा दिला आहे त्यामध्ये सर्व लिहिले आहे.

मा. सदस्य श्री. राज असरोंडकर :— माझा जो प्रश्न आहे तो अगदी साधा प्रश्न आहे. आज आपण त्यांना अस्थायी पदावर कायम करीत असु तर एवढे दिवस ते कोणत्या पदावर होते?

मा. सचिव :— त्यांना अस्थायी पदावर सामावुन घेतले जात आहे.

मा. सदस्य श्री. राज असरोंडकर :—एवढे दिवस ते कोणत्या पदावर होते? किती दिवसांसाठी होते?

मा. सचिव :— ते ६ महिन्यांसाठी तात्पुरत्या पदावर कार्यरत होते. त्यानंतर त्यांच्या सेवा पुढे सुरु राहिल्या.

मा. सदस्य श्री. राज असरोंडकर :—अजुन असे किती कर्मचारी आहेत ज्यांना असा फायदा मिळायला हवा. आता जी चर्चा सुरु आहे त्यावरुन स्पष्ट होते की, काहीतरी अनियमितता झाली असुन ती नियमित करण्याचा प्रयत्न सुरु आहे. जर कोणासाठी आपण असे करत असु तर त्यामध्ये कोणाचाही आक्षेप नाही. परंतु अशा प्रकारे आपण काही विशिष्ट लोकांचे प्रकरण का आणले आहे? असे अजुन किती कर्मचारी आहेत ज्यांना आपण असा फायदा देवु शकु. त्यांचा विषय येथे का आणला नाही.

मा. अतिरिक्त आयुक्त (श्री. नाना रौराळे):—या प्रस्तावाच्या अनुषंगाने इतरही काही कर्मचारी अस्थायी स्वरुपात कार्यरत आहेत. त्यांच्या सेवा नियमित करण्याची कार्यवाही सुरु आहे. सध्या माझ्याकडे निश्चित अशी आकडेवारी नाही. मी आपणांस नंतर माहिती देईन.

मा. सदस्य श्री. राज असरोंडकर :—मा. महापौर महोदया, माझ्या प्रश्नाचा हेतु स्पष्ट आहे. प्रशासनामध्ये जो गुंता आहे तो कुठे तरी सुटायला हवा. त्याचा निकाल लागायला हवा. महापालिका अशा कर्मचा—यांविरुध्द एक औद्योगिक व उच्च न्यायालयात खटले दाखल करत राहिल व आपण त्यांना कायम करण्याचा निर्णय येथे घेत राहु असे किती दिवस चालेल? म्हणजे विधी विभाग व सामान्य प्रशासन विभाग आपापले काम करत राहिल. जर आपणांस त्यांना न्याय दयायचा असेल तर सर्व कर्मचा—यांविरुध्दच्या केसेस मागे घ्यायला हव्यात. कमीत कमी हे

तरी करा. आपण एका बाजुने त्यांच्या विरुध्द न्यायालयात लढत आहात व दुस–या बाजुने त्यांना कायम करण्यासाठी येथे ठराव आणत आहात. हे परस्पराविरोधी आहे. आपण त्यांना जर अस्थायी पदावर कायम केले व उदया न्यायालयाने त्यांच्या विरुध्द निकाल दिला तर आपण काय करणार? अशाच प्रकारची अजुन २१ प्रकरणे आहेत. यांच्या सोबतच जे कर्मचारी कार्यरत होते त्यांना एक–एक करुन निवडुन नोकरीवरुन काढुन टाकले गेले. का? त्याचे काय कारण आहे? ते २१ लोक कामगार न्यायालय, औद्योगिक न्यायालय व उच्च न्यायालयात खेटे घालत आहे. औद्योगिक न्यायालयात जिंकले तर उच्च न्यायालयात अपिल केले जाते. अशा प्रकारे भेदभाव का केला जातो? आपणांस जर अशा कर्मचा–यांना कायम करण्याचे धोरण स्विकारायचे असेल तर मग सर्वांसाठी एकच न्याय लावायला हवा. परंतु आपण १० लोकांपैकी, दोन लोकांना कायम कराल व ५ लोकांना करणार नाही तर मग यामध्ये काहीतरी घोटाळा आहे असे वाटते. मला असे वाटते की जे कर्मचारी अस्थायी पदावर कार्यरत आहेत त्यांना कायम करायला हवे. दुसरे म्हणजे त्यांच्या विरुध्द कामगार न्यायालय, औद्योगिक न्यायालय व उच्च न्यायालयात खटले चालु असतील तर ते मागे घ्यायला हवेत. ज्या ज्या वेळी सभागृहात अशा प्रकारचे विषय आले आहेत त्यावेळी मी सभागृहात व सभागृहाबाहेर त्याचा विरोध केला आहे कारण कोणत्याही कर्मचा–याला जेव्हा तुम्ही लाभ देत असाल तेव्हा अनुशेषाला कोणत्याही प्रकारे बाधा येता कामा नये असा महत्वपुर्ण निर्णय या ठरावा सोबत प्रशासनाने घेणे आवश्यक आहे. मी आपणांस विनंती करतो की, आपण प्रशासनाला तसे आदेश दयावेत. अशा कर्मचा–यांना न्याय देतांना दुस–या कर्मचा–यावर अन्याय न होण्याची पुर्ण काळजी घ्यायला हवी. मी येथे एक गोष्ट उघडपणे सांगेन की, एस.सी., एस.टी., एन.टी, व्ही.जे.एन.टी व ओ.बी.सी. च्या जेवढया जागा आहेत त्यांना कुठेही धक्का लागता कामा नये. त्याला हात न लावता आपणांस येथे ज्याला ज्याला न्याय दयायचा असेल तो दयावा. आपण सभागृहात तसा आदेश दयावा अशी माझी आपणांस विनंती आहे.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :–</u> मा. महापौरजी, महासभेसमोर आता जो मुद्दा आला आहे, तर हा मुद्दा शासनाने आणलेला नसुन प्रशासनाने आणलेला आहे. त्यामुळे त्यात काही वास येण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. एखादया पदाधिका–याने आणलेला नसुन प्रशासनाने आणलेला आहे आणि तो देखिल मागे घेत आहेत, त्यामुळे त्यात काही वास येण्याचा प्रश्नच येत नाही. त्यामुळे हे जे बोलत आहे त्याच्याशी मी असहमत आहे. तसेच मी या गोष्टीशीही सहमत आहे की, उल्हासनगर महापालिकेतील कर्मचा–यांसोबत आजपर्यंत जो अन्याय झाला आहे तो अधिका–यांनीच केलेला आहे. अनुशेषामध्ये येथिल स्थानिक कर्मचारी वर्गाचा देखिल समावेश होतो. ओ.बी. सी.,एस.सी., एस. टी., मध्ये स्थानिक कर्मचा–यांचा देखिल समावेश होतो. खुल्या प्रवर्गातील जागांवर अनुसुचित जाती व इतर मागासवर्गीयांना देखिल नियुक्त्या दिल्या आहेत. यामुळे खुल्या प्रवर्गातील कर्मचा–यांवर अन्याय झाला आहे. तसेच अनुशेष भरण्यासाठी सेवायोजन कार्यालयातुन यादी मागवुन बाहेरच्या लोकांची भरती करण्यात आलेली आहे. कुणी पनवेलचा, कुणी ठाण्याचा, कुणी भिवंडीचा, कुणी बदलापुरचा व कुणी कर्जतचा अशी भरती केली आहे. परंतु येथिल जो स्थानिक कर्मचारी वर्ग आहे व जो पदोन्नतीस पात्र आहे, अशा कर्मचा–यांचे प्रस्ताव येथे आणायला हवेत. मी अनुशेषाच्या विरोधात नाही. मी उघडपणे सांगु इच्छितो की, येथिल स्थानिक कर्मचा–यांना पदोन्नती न देता बाहेरच्या कर्मचा–यांना भरती करुन येथिल कर्मचा–यांवर अन्याय केला जात आहे. मी श्री. राज असरोंडकर यांच्याशी सहमत आहे की, येथिल स्थानिक कर्मचा–यांना न्यायालयात लढावे लागते. येथिल बरेच कर्मचारी निवृत्त झाले तरी त्यांना पदोन्नती मिळाली नाही. आता बरेच कर्मचारी निवृत्त होणार आहेत. त्यांच्या पुर्वीच महापालिकेत जो स्थानिक कर्मचारी आहे त्याला पदोन्नती मिळायला हवी. त्यातील बरेचसे कर्मचारी अनुशेषामध्ये देखिल येतात. येथिल १०० टक्के कर्मचा–यांना स्थायी पदावर नियुक्ती दिल्यानंतरच इतर जागा रोजगार कार्यालयातुन भरल्यास आमची काही हरकत नाही. परंतु येथिल कर्मचा–यांना पदोन्नती मिळण्यासाठी सर्व राजकिय पक्षांचे एकमत आहे हे मा. महापौरांनी येथे बघितले असेल. सर्वजण त्या बाजुने आहेत. धन्यवाद ।

<u>मा. सदस्य श्री. नाना पवार :–</u> मा. महापौर, आयुक्त व सचिव साहेब, येथे सभागृहात आरक्षणाबाबत चर्चा सुरु असतांना मी एक जबाबदार सदस्य म्हणुन माझे मत व्यक्त करु इच्छितो. आरक्षणाबाबत सरकारचे नियम व कायदे आहेत. त्यामध्ये बदल करणे हे आपल्या हातात नाही. येथे सन्माननिय सदस्य श्री. राज असरोंडकर यांनी सांगितले की, आयुक्त साहेबांनी व महापौरांनी आरक्षणाकडे विशेष लक्ष दयावे. हे योग्य आहे. कर्मचा–यांना पदोन्नती ही मिळायलाच हवी. याबाबत सभागृहाचे एकमत आहे. परंतु आरक्षण हे जसे आहे तसेच राहणे देखिल आवश्यक आहे. येथे बरेच कायदेशीर मुद्दे उपस्थित होतात, आतापर्यंत अनुशेष पुर्णपणे भरला जाणे आवश्यक होते परंतु महापालिका असे का करत नाही? येथे अनुशेषाबाबत कोणती पध्दत आहे, पदोन्नतीसाठी व सरळसेवेसाठी कोणती पध्दत आहे? आरक्षणामधील एखादया कर्मचा–यांना आपण जर पदोन्नती देवु शकत असु तर ती दयायला हवी होती. जर पदे रिक्त असतील तर सरळसेवेने देखिल आरक्षण भरायला हवे होते. येथे एका

गोष्टीचा वारंवार उल्लेख केला गेला की, स्थानिक कर्मचा—यांना पदोन्नती दयायला हवी. जरुर दयायला हवी परंतु ती कायदयाप्रमाणे, आरक्षणाप्रमाणे दयायला हवी. अनुशेषाच्या किती जागा रिक्त आहेत याची माहिती एखादा अधिकारी येथे देवु शकेल का? सरळसेवेप्रमाणे भरतीसाठी किती पदे रिक्त आहेत? जे लोक सध्या काम करीत आहे त्यामध्ये अनुशेषाप्रमाणे किती कर्मचा—यांना आपण पदोन्नती देवु शकतो? ही माहिती जर एखादया अधिका—याने आता सभागृहात दिली तर आम्हांला निर्णय घेणे सोपे होईल. आता विषय निघाला आहे तर मला असे वाटते की, महापालिकेने आरक्षणाबाबत निर्णय घ्यायला हवा. धन्यवाद।

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी :— मा. महापौर महोदय, या विषयावर एवढी सविस्तर चर्चा आता सभागृहात झाली आहे तर मला असे वाटते की, यावर काहीतरी ठोस निर्णय घ्यायला हवा. ही चर्चा म्हणजे इतिवृत्तात धुळ खाणारी चर्चा होवु नये असे मला वाटते. यामुळे आपणांस चांगली संधी मिळाली आहे, आपण महापौर पदावर बसला आहात तर आजच्या दिवसात आपण इतिहास रचावा. आपण आयुक्तांना आदेश दयावा की, या चर्चेच्या आधारावर आपले असे किती कर्मचारी आहेत ज्यांना न्याय मिळाला नाही असा कर्मचा—यांची यादी बनवुन सभागृहात सादर करावी व त्यांना न्याय दयावा. आज आपले उल्हासनगरमध्ये राहणारे जे कर्मचारी आहेत त्यांना न्याय मिळावा असे पुर्ण सभागृहाचे मत आहे. त्यामुळे आता ही जी चर्चा झाली आहे, तीचे रुपांतर एका निर्णयात व्हायला हवे. आपण असा निर्णय प्रशासनाला व आयुक्तांना आदेश दयावेत की पुढील सभेत याबाबत विस्तृत प्रस्ताव आणावा. असा निर्णय घेतल्यास आपले नाव उल्हासनगरच्या इतिहासात सुवर्ण अक्षरात लिहिले जाईल. धन्यवाद ।

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :— मा. महापौरजी, आता येथे आरक्षणाचा मुद्दा उपस्थित झाला आहे. सर्वांचे हेच मत आहे की, सर्व मुद्दे स्पष्ट व्हायला हवेत. आतापर्यंत महासभेसमोर एक मुद्दा आलेला नाही. जेव्हा श्री. लोणारे हे उपायुक्त होते त्यावेळी अनुशेषाप्रमाणे भरती करतांना आधी कर्मचा—यांना नियुक्ती देवुन त्यानंतर प्रस्ताव मान्यतेसाठी महासभेसमोर यायचा. खरेतर महासभा ही नियुक्ती प्राधिकारी आहे. त्यावेळी जी भरती केली होती त्यामध्ये एका कर्मचा—याचे प्रमाणपत्र नकली निघाले होते. नंतर एका कर्मचा—याने प्रमाणपत्र वैध नसल्याचे आढळुन आले होते. त्यानंतर ५ जणांचे प्रमाणपत्र रद्द झाले होते. त्याबद्दल सन्माननिय सदस्य श्री. मोहन बेहरानी यांनी प्रश्न विचारला होता की, तुम्ही ज्या नियुक्त्या दिल्या आहेत त्यापैकी किती कर्मचा—यांचे प्रमाणपत्र वैध असुन किती जणांचे वैध नाही? तर हे महासभेसमोर यायला हवे. ज्यावेळी देखिल नियुक्तीचा विषय आला आहे त्यावेळी मी बोललो आहे की, एखादयाचे प्रमाणपत्र नकली असेल तर यासाठी निवड समिती जबाबदार असून निवडुन आलेले लोकप्रतिनिधी जबाबदार नाहीत. कारण नियुक्त प्राधिकारी महासभा आहे. तुम्ही आधी येथे मान्यता घेवुन त्यानंतरच नियुक्तीचे पत्र दयायला हवे. परंतु श्री. लोणारे हे आधी नियुक्तीचे आदेश दयायचे व नंतर सहा महिन्याच्या कालावधीत विषय महासभेत आणायचे. आजपर्यंत आपण किती नियुक्त्या केल्या आहेत व किती लोकांचे प्रमाणपत्र अवैध ठरले आहे? हे येथे आणावे. नगरसेवक देखिल निवडुन आल्यानंतर त्यांचे जात प्रमाणपत्र वैधतेसाठी आयुक्त साहेब कोकण भवन येथे पाठवतात. यासाठी तीन महिन्याचा कालावधी दिला जातो. ज्या कर्मचा—यांचे प्रमाणपत्र अवैध ठरल्यानंतरही कामावर आहेत अशांची यादी महासभेत सादर केली जावी. यासाठी एक कर्मचारी उच्च न्यायालयात देखिल गेला होता. महासभेत यावर चर्चा देखिल झाली होती. त्याने जे प्रमाणपत्र दिले होते ते बोगस होते. तर त्या प्रकरणांचे काय झाले? याची माहिती महासभेत सादर करावी. यापुढे नियुक्ती देतांना आधी प्रस्ताव महासभेत आणावा त्यानंतरच त्यांना नियुक्ती दयावी धन्यवाद ।

मा. उपमहापौर/पीठासीन अधिकारी :— मी आयुक्तांना सुचना देतो की, जेवढी आरक्षित पदे आहेत व खुले पदे आहेत त्या सर्वांबाबत योग्य तो न्याय व्हायला हवा.

काही सदस्य :—पास—पास......

मा. उप—महापौर / पीठासीन अधिकारी :— सदरचा विषय सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

☑

**विषय क्र. ४:—** श्रीमती माया लासी, श्रीमती विशाखा सावंत व श्रीमती नर्गीस खान यांना कनिष्ठ लिपिक व शिपाई या अस्थायी पदावर महापालिकेच्या सेवेत सामावुन घेण्यास मान्यता देणे.

<u>प्रस्तावना</u>

तत्कालीन नगरपालिकेमध्ये रोजंदारी आस्थापनेवर प्रत्येक वर्षी २४० दिवस अशा सलग तीन वर्षात प्रत्येकी २४० दिवस सेवा झालेल्या विविध संवर्गातील वर्ग — ३ व वर्ग — ४ मधील कर्मचा—यांना प्रशासकिय ठराव क्र. १६ दिनांक २/११/१९९६ तसेच प्रशासकिय ठराव क्र. ६३ दिनांक २४/३/१९९७ अन्वये नगरपालिकेचे महानगरपालिकेत रूपांतर झाल्यानंतर नव्याने पदनिर्मितीचा प्रस्ताव तयार करून सदर कर्मचारी यांना शासनाकडे प्रस्तावित केलेल्या पदांना मंजुरी मिळणेच्या अटीस अधिन राहुन सहा महिन्याचा परिविक्षाधीन कालावधी देवुन अस्थायी स्वरूपात त्या त्या वेतनश्रेणीत नियुक्त्या देण्यात आल्या आहेत. सदर कर्मचारी यांना अस्थायी आस्थापनेवर सामावुन घेतल्यानंतर त्यांना रजा, वेतनवाढी, प्रवासभत्ता सवलत व इतर सेवाविषयक लाभ देण्यात येत आहेत.

तत्कालीन नगरपालिका व महानगरपालिका आस्थापनेवर मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५३ अन्वये खालिल कर्मचा—यांच्या त्यांच्या नावांसमोर दर्शविलेल्या संवर्गात सदर कर्मचारी ज्या संवर्गात कार्यरत आहेत त्या संवर्गासाठी महानगरपालिकेच्या सेवाशर्ती नियमावलीनुसार आवश्यक असलेली अर्हता धारण करीत असल्यामुळे ०६ (सहा) महिन्याच्या कालावधीसाठी नियुक्त्या करण्यात आल्या होत्या. उक्त ०३ कर्मचारी त्यांना नियुक्त्या दिल्यानंतर त्यांनी समाधानकारक काम केले परंतु त्यांना मुदतीनंतर सेवेतुन कमी करण्यापुर्वी त्यांनी मा. न्यायालयातुन स्थगन आदेश प्राप्त केल्यामुळे तसेच मा. न्यायालयाने त्यांच्याविषयक दिलेल्या निर्णयामध्ये सेवा खंड करण्याबाबतचे आदेश दिलेले नाहीत. त्यामुळे त्यांच्या नियुक्त्या रदद् न करता सदर कर्मचारी अजुनही सेवेत कार्यरत आहेत.

| अ. क्र. | कर्मचा—याचे नांव | पदनाम | नियुक्तीचा आदेश |
|---|---|---|---|
| १. | श्रीम. विशाखा वि. सावंत | क. लिपीक | क्र. उमपा/साप्रवि/आस्था/टे.१/३५,,दिनांक १२/१२/१९९६ |
| २. | श्रीम. माया पी. लास्सी | क. लिपीक | क्र. उमपा/साप्रवि/आस्था/टे.२/२७,,दिनांक ८/५/१९९८ |
| ३. | श्रीम. नर्गिस एम. खान | शिपाई | क्र. उमपा/साप्रवि/आस्था/टे.१/७४,,दिनांक १८/१२/१९९६ |

श्रीम. माया लासी, कनिष्ठ लिपीक यांच्या नियुक्तीस मान्यता देण्याचा प्रस्ताव महासभेपुढे ठेवला असता महासभेने महासभा ठराव क्र. ३४ दिनांक १९/१०/२००२ अन्वये त्यांची अर्हता व पात्रता तपासणीसाठी निवडसमितीपुढे ठेवण्यास सांगितले होते. त्याअनुषंगाने सादर करण्यात येते की, नियुक्तीपुर्वी निवड ही निवडसमितीमार्फत करावयाची असते. परंतु निवडसमितीपुढे प्रस्ताव न ठेवता मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम ५३ अन्वये सहा महिन्यांपर्यत नियुक्ती देण्याची तरतुद असल्याने सदर कर्मचा—यांना तात्पुरत्या सहा महिन्यासाठी नियुक्त्या दिल्या आहेत. मा. न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे त्यांची सेवा सलग २४० दिवसापेक्षा अधिक झाली आहे.

महापालिकेतील कर्मचा—यांना औद्योगिक कलह कायदा १९४७ व महाराष्ट्र रेकगनिशन ऑफ ट्रेड युनियन ॲण्ड अनफेअर लेबर प्रॅक्टीस ॲक्ट, १९७१ मधील तरतुदी लागु होतात. त्यामुळे त्यांना आता सेवेतुन कमी केल्यास व ते पुन्हा न्यायालयात गेल्यास त्यांना सेवेत सामावुन घ्यावे लागेल ही बाब विचारात घेता व सदर कर्मचारी हे त्या त्या पदाची अर्हता धारण करीत असल्याने सक्षम प्राधिकारी म्हणुन सदर कर्मचा—यांच्या नियुक्तीस मान्यता देण्याचा प्रस्ताव महासभेपुढे मान्यतेसाठी सादर करण्यात येत आहे.

<u>विशेष महासभा ठराव क्रः</u> ८५      <u>दिनांकः—१८/२/२००६</u>

सुचकाचे नाव :— श्री. किशोर वनवारी
अनुमोदकाचे नाव :— श्री. विश्वनाथ पाटील

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद कारणांमुळे श्रीमती माया लासी व श्रीमती विशाखा सावंत यांना कनिष्ठ लिपिक तसेच श्रीमती नर्गीस खान यांना शिपाई या अस्थायी पदांवर महापालिका सेवेत सामावुन घेण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—
अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

उप महापौर / पीठासीन अधिकारी
विशेष महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

मा. सचिव :— विषय क्र. ५ वाचुन दाखवितात

———————————————————————————————————————

⇨ **विषय क्र. ५** :—उल्हासनगर महानगरपालिका शिक्षण मंडळात शिपाई कम वॉचमन या अस्थायी पदावर कार्यरत कर्मचा—यांना महापालिका निधीतुन सेवानिवृत्ती वेतनादी लाभ देणे व त्या प्रयोजनार्थ अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकात समायोजन करण्यास मान्यता देणे.

———————————————————————————————————————

काही सदस्य :—पास—पास......

मा. उप—महापौर / पीठासीन अधिकारी :— सदरचा विषय सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

---

☑ **विषय क्र. ५**:— उल्हासनगर महानगरपालिका शिक्षण मंडळात शिपाई कम वॉचमन या अस्थायी पदावर कार्यरत कर्मचा—यांना महापालिका निधीतुन सेवानिवृत्ती वेतनादी लाभ देणे व त्या प्रयोजनार्थ अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकात समायोजन करण्यास मान्यता देणे.

**प्रस्तावना**

तात्कालीन उल्हासनगर नगरपालिकेमध्ये वर्ष १९७८ मध्ये प्रशासक उल्हासनगर नगरपालिका व अध्यक्ष, उल्हासनगर नगरपालिका यांनी शिपाई कम वॉचमन या संवर्गामध्ये रोजंदारी आस्थापनेवर प्रथम नियुक्त्या देवुन त्यांच्या सेवा शिक्षण मंडळ उल्हासनगर नगरपालिकेकडे वर्ग करण्यात आले आहेत. उल्हासनगर शहरात अस्तित्वात असलेल्या प्राथमिक शाळा जिल्हा परिषदेकडुन उल्हासनगर नगरपालिकेकडे सन १९७६ मध्ये वर्ग करण्यात आले आहेत. त्यावेळी सदर प्राथमिक शाळांच्या सुरक्षितेची उपाययोजना म्हणुन नगरपालिका शिक्षण मंडळ ठराव क्रमांक १३, दिनांक ३/७/१९७९ अन्वये शिपाई कम वॉचमन व वाहन चालक अशा ४४ पदांचे पदनिर्मितींचे प्रस्तावास मान्यता दिली होती. त्यानुसार नगरपालिकेने ठराव क्रमांक १४५, दिनांक २८/७/१९८० अन्वये सदर नगरपालिका शिक्षण मंडळाने पारीत केलेल्या ३/७/१९७९ च्या शिपाई कम वॉचमन या पदांचे पद निर्मितीचे प्रस्तावास मुंबई प्राथमिक शिक्षण नियम १९४९ मधील कलम ३६ (२) मधील तरतुदीनुसार मान्यता दिलेली आहे. त्यानुसार तात्कालीन म.न.पा. शिक्षण मंडळाने सदर पद निर्मितीच्या पदन्नोता शासनाची मंजुरीस अधिन राहून त्यांना वेतनश्रेणीमध्ये नियुक्त्या देवुन अनुशेष भत्ते व रजा इत्यादी लाभ देण्यात आले आहेत. सदर पदांचे पद निर्मितीचा प्रस्ताव नगरपालिका शिक्षण मंडळाने महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण विभाग यांच्याकडे पाठविला असता शासनाने सदर पदाला मंजुरी न दिल्याने सदर कर्मचा—यांना सेवानिवृत्ती लाभ मिळत नाही. त्यामुळे सदर कर्मचारी श्री. नाना कोंडिबा साठे व इतर ३२ कर्मचा—यांनी मा. उच्च न्यायालयातील याचिका क्र.

२३७०/१९९६ अन्वये याचिका दाखल केलेली होती. मा. उच्च न्यायालयाने सदर प्रकरणी दि. २६/७/२००२ च्या आदेशान्वये संबंधित कर्मचा–यांच्या वेतनापोटी विशेष निधी शासनाकडुन उपलब्ध करुन कायदयाच्या चौकटीत त्यांची सेवा कायम स्वरुपी करण्याबाबत शासनाकडे विचारणा करण्यासाठी दिलेल्या निर्देशनानुसार महापालिका शिक्षण मंडळ व महासभा त्यांनी त्यास मान्यता देवुन सदर कर्मचा–यांच्या वेतनापोटी होणारा संपूर्ण खर्च उल्हासनगर महानगरपालिका करीत असल्याने विशेष निधी उपलब्ध करुन मिळण्यास प्रस्ताव इकडील दिनांक २४/८/२००४ च्या पत्रान्वये शसनाकडे पाठविला असता शासनाकडील नगरविकास विभागाने त्यांच्याकडील क्र. उनपा/२३२५/५७९७/प्र.क्र. १८०/०५ नवि.२१, दि. ३० जुन, २००५ च्या पत्रान्वये सदर कर्मचा–यांच्या वेतनाचा खर्च महापालिका ज्या पध्दतीने गेल्या २०–२५ वर्षापासुन सोसत आलेली आहे त्याच पध्दतीने वेतन व सेवानिवृत्ती लाभांसाठी खर्च महापालिकेने त्यांच्या स्तरावर करावा असे कळविले आहे. सदर ३३ कर्मचा–यांच्या नियुक्त्या या प्रथम तत्कालीन नगरपालिकेने रोजंदारी आस्थापनावर केलेल्या आहेत व त्यानंतर अस्थाई पदावर त्यांना शिपाई कम वॉचमन या पदावर वेतनश्रेणीमध्ये नियुक्त्या देवुन त्यांच्या वेतनावरील खर्च संपूर्ण महापालिका सोशित आहे. शासनाने सदर कर्मचा–यांच्या सेवानिवृत्ती वेतनादी लाभ देण्याबाबत खर्च महापालिकेने आपल्या स्तरावर करावा असे कळविले आहे. मनपा शिक्षण मंडळामध्ये सध्या अस्थायी पदावर शिपाई कम वॉचमन म्हणुन कार्यरत असलेल्या कर्मचा–यांना सेवानिवृत्ती वेतनादी लाभ देण्याबाबत अंदाजपत्रकामध्ये तरतुद करणे आवश्यक आहे. ही धोरणात्मक बाब असल्याने सदर प्रस्ताव महासभेपुढे ठेवण्यासाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

<u>विशेष महासभा ठराव क्र:</u> ८६ <u>दिनांक:–१८/२/२००६</u>

सुचकाचे नाव :– श्री. होशियारसिंग लबाना
अनुमोदकाचे नाव :– श्री. अशोक ठाकुर

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे उल्हासनगर महानगरपालिका शिक्षण मंडळात ''शिपाई कम वॉचमन'' या पदावर निवृत्त झालेल्या किंवा सध्या कार्यरत असलेल्या एकुण ३३ कर्मचा–यांना महापालिका निधीतुन सेवानिवृत्ती वेतनादी लाभ देणे व त्या प्रयोजनार्थ अर्थसंकल्पीय अंदाजात समायोजनास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/–
अनुमोदकाची सही/–

<u>सर्वानुमते</u>

उप महापौर / पीठासीन अधिकारी
विशेष महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>मा. सचिव :–</u>कृपया राष्ट्रगिताकडे लक्ष दयावे.

जनगणमन या राष्ट्रगीताच्या सामुहिक गायनानंतर सांयकाळी ५.४० वाजता मा. उप–महापौर/पीठासीन अधिकारी यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांकः– ३१/३/२००६

## उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. ३१/३/२००६ रोजीच्या विशेष महासभेचे इतिवृत्त.

उल्हासनगर महानगरपालिकेची विशेष महासभा शुक्रवार दिनांक ३१/३/२००६ रोजी सायंकाळी ५.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभेत मा.महापौर, श्रीमती ज्योती कालानी हया पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्या. व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य/सदस्या उपस्थित होते / होत्या.

१) मा. महापौर :–श्रीमती ज्योती कालानी

२) मा. उपमहापौर :–श्री. विनोद तलरेजा

| | | | |
|---|---|---|---|
| ३. | श्रीमती संगिता जावळे | ३७. | श्री. राज असरोंडकर |
| ४. | श्री. राजेंद्रसिंह भुल्लर | ३८. | श्री. ठाकुर अशोक |
| ५. | श्री. सोनवणे नथु | ३९. | श्रीमती माने किरण |
| ६. | श्री. टेकचंदानी राजु | ४०. | श्री. रमेश चव्हाण |
| ७. | श्रीमती रामचंदानी भावना | ४१. | श्री. जाधव प्रशांत |
| ८. | श्री. सुर्यकांत (बबन) लिंगे | ४२. | श्री. जाधव सुरेश |
| ९. | श्रीमती मोकल सीमा | ४३. | श्रीमती सुर्वे जयश्री |
| १०. | श्री. दिलीप गायकवाड | ४४. | श्री. देवेंद्रसिंग खेमाणी |
| ११. | श्री. मुलचंदानी महेंद्र | ४५. | श्रीमती कारीरा रेखा मन्नुमल |
| १२. | श्री. मोकल चंदाराम विठोबा | ४६. | श्री. पमनानी ईश्वर सतरामदास |
| १३ | श्री. एडके गणपत गोविंद | ४७ | श्री. बोडारे धनंजय बाबुराव |
| १४. | श्रीमती. शर्मा कमला गंगाधर | ४८. | श्रीमती कृष्णानी रेखा |
| १५. | श्री. यादव लालबिहारी बुझारत | ४९. | श्री. भालेराव गौतम |
| १६. | श्रीमती बामणकर नंदिनी गजानन | ५०. | श्रीमती वसिटा बेबी |
| १७. | श्री. रोहडा श्यामसुंदर जानीलाल | ५१. | श्रीमती. लक्ष्मीबाई ससाणे |
| १८. | श्री. गुप्ता प्रभुनाथ दुखंती | ५२. | श्री. अंकुश म्हस्के |
| १९. | श्रीमती अनिता गुप्ता | ५३. | श्री. चौधरी राजेंद्र |
| २०. | श्रीमती आहुजा निता प्रकाश | ५४. | श्री. पंजाबी नारायण |
| २१. | श्री. जग्यासी राजु | ५५. | श्रीमती पंजाबी दिपा |
| २२. | श्रीमती खांडेकर प्रेमा | ५६. | श्री. साधवानी मनोज |
| २३. | श्री. निकम शांताराम | ५७. | श्री. पुरस्वानी जमनादास |
| २४. | श्री. टाले प्रमोद | ५८. | श्रीमती भटिजा कोमल |
| २५. | श्री. ठाकुर विनोद लालसिंग | ५९. | श्री. रामरख्यानी मोहनदास |
| २६. | श्रीमती. सोनेजी मीना (सोंडे) | ६०. | श्रीमती किरण माखिजा |
| २७. | श्रीमती. मसंद माया घनश्यामदास | ६१. | श्री. होशियारसिंग हरिसिंग लबाना |
| २८. | श्री. सुरेश नामदेव गायकवाड | ६२. | श्री. नरेंद्रकुमार ठाकुर |
| २९. | श्रीमती वनवारी मोना अशोक | ६३. | डॉ. श्रीमती निना नाथानी |
| ३०. | श्री. वनवारी किशोर नारायणदास | ६४. | श्रीमती छाब्रिया भारती |
| ३१. | श्री. साधवानी मोहन | ६५. | श्री. संजय रामचंद्र बठीजा |
| ३२. | श्री. सतरामदास जेसवानी | ६६. | श्रीमती. रिझवाणी सुजाता रमेश |
| ३३. | डॉ. साधवानी जया | ६७. | श्रीमती करोतिया मालती |
| ३४. | श्री. लुंड गोविंदराम डोलुमल | ६८. | श्रीमती मिनु दासानी |
| ३५. | श्रीमती भावना खिलनानी | ६९. | श्री. इदनानी राजु चंद्रभान |
| ३६. | श्री. बच्चाराम रुपचंदानी | ७०. | श्री. पंजाबी लाल देवनदास |
| | | ७१. | श्री. लालवानी दिलीप जेठानंद |

तर,

मा.सदस्य / सदस्या १. श्री. वाघे शामु, २. श्री. वलेचा पृथ्वी व्यापारीलाल, ३. श्री. उमाप रामदास, ४. श्री. पवार नाना, ५. श्री. पाटील विश्वनाथ, ६. श्री. जयसिंघानी अनिल, ७. श्री. बेहरानी मोहन वर्यलदास, ८. श्री. बेहराणी ठाकुरदास वर्यलदास, ९. श्री. हरदास माखिजा, १०. श्री. राजेश वधारिया हे सभेस अनुपस्थित होते / होत्या.

सायंकाळी ५.०० वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

मा. सचिव :– विषय क्र. १ वाचुन दाखवितात.

---

⇨ विषय क्र. १ :– मागील महासभेचे दिनांक २२/०३/२००६ रोजीचे इतिवृत्त कायम करणे.

---

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :–इतिवृत्त कुठे दिले आहे?

मा. सचिव :– दिले आहे. स्थायी समिती सदस्य पदाच्या निवडणुक सभेचे.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :–मा. महापौरजी, त्यावेळेस मी जसेजसे बोललो होतो त्याप्रमाणेचीच नोंद इतिवृत्तांतात आली आहे ना? कारण की या अगोदर सुध्दा मी सांगितले आहे की, मी उमेदवारी मागे घेतलेली नाही व आज छाननीचा दिवस नाही. माझा उमेदवारी अर्ज १४ तारखेलाच मंजुर झालेला आहे. तर त्यावेळेस मी ज्या ज्या हरकती घेतल्या होत्या, ज्याप्रमाणे सभेच्या कामकाजाचे ध्वनीमुद्रण (रेकॉर्डींग) झाले आहे त्याप्रमाणे इतिवृत्तांतात नोंद आली आहे ना? त्यामध्ये काही शब्द कमी तर केले नाहीत ना? कृपया याची माहिती दयावी.

मा. सचिव :– मा. महापौर महोदया, आपणां सर्वांना जे इतिवृत्त प्रस्तृत केले आहे त्यात या सभागृहात त्या दिवशी जे जे काही झाले त्याची सत्यपरिस्थिती आहे.

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:– मा. महापौरजी, एखादा सदस्य जर आपल्या मर्जीनुसार आपला उमेदवारी अर्ज मागे घेण्याची सुचना (विथड्रावल) देत नसेल तर त्याचा उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा (विथड्रा करण्याचा) पीठासीन अधिका–यांना अधिकार आहे का?

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :– मा. महापौरजी, त्या दिवशी सचिव साहेबांनी सांगितले होते की, मला बोलु दिले जात नाही. मी बोलु इच्छित आहे. त्याची नोंद इतिवृत्तांतात सुध्दा नोंद आली आहे. इतिवृत्त कायम होण्याअगोदर श्री. राजेंद्र चौधरी या प्रश्नाचे सचिव साहेबांकडुन उत्तर मागत आहेत. तर एखादया उमेदवाराच्या मर्जीविना त्याचा उमेदवारी अर्ज मागे घेतला (विथड्रावल केला) जावु शकतो का? त्यांच्या या प्रश्नाचे उत्तर दिले जावे.

मा. सचिव :– मा. महापौर महोदया, या वेळेस इतिवृत्त कायम केले जावे किंवा नाही यावर चर्चा होत आहे. मागील महासभेत जेव्हा विचारायचे होते तेव्हा मला बोलण्याची संधी दिली गेली नाही. त्यानंतर मा. महापौरांनी जो निर्णय घेतला त्यावर आता मी काही बोलु शकत नाही.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :– मा. महापौर महोदया, हे जे इतिवृत्त आहे यामध्ये अशी नोंद आहे की, ९ उमेदवार निवडणूकीस उभे आहेत, व या ९ लोकांचे उमेदवारी अर्ज मान्य केले आहेत. त्यानंतर आपण म्हटले आहे की, किशोर वनवारी यांचा फॉर्म रिजेक्ट केला जात आहे. तर हे काय त्यावेळेस आपण म्हटले होते काय की रिजेक्ट केले जात आहे, की चुकीने अशी नोंद आली आहे?

मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणी :– मा. महापौरजी, असे नाही त्या अगोदर सचिव साहेबांनी घोषणा केली आहे की, श्री. उमाप व श्री. किशोर वनवारी हे आपली उमेदवारी मागे घेत आहेत. त्यापुढे .......... असे झाले आहे.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :— मी विथड्रावल बाबत बोलत नाही. मी मा. महापौरांना विचारत आहे की त्यामध्ये असे एक वाक्य आले आहे की, मा. महापौर म्हणत आहेत श्री. किशोर वनवारी यांचा फॉर्म रिजेक्ट केला जात आहे. आपण असे म्हटले होते का? ही जी नोंद आली आहे ती बरोबर आहे की चुकीची आहे?

मा. महापौर :— हे पहा, मी म्हटले होते की, भाजपाचे सन्माननिय उमेदवारी श्री. रामदास उमाप हे आपली उमेदवारी मागे घेत आहेत त्यांचा फॉर्म रिजेक्ट झाला अशा प्रकारे एकेकाचे नाव वाचून, श्री. किशोर वनवारी यांनी सुध्दा आपला फॉर्म विथड्रा केला आहे त्यामुळे त्यांचा फॉर्म रिजेक्ट झाला. हे दोन शब्द दोघांबाबतीत बोलले आहे. उर्वरीत सात लोकांची उमेदवारी ओके आहे. अशा प्रकारचा मी अधिनिर्णय दिला आहे.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :— श्री. उमाप यांचा फॉर्म रिजेक्ट असे आपण बोलल्याचे इतिवृत्तांतात आलेले नाही.

मा. महापौर :— दोघांच्या बाबतीत मी रिजेक्ट म्हटले आहे. श्री. उमाप यांनी उमेदवारी मागे घेतल्यामुळे त्यांचा फॉर्म रिजेक्ट .......

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :— हे वाक्य दुरुस्त केले जावे. श्री. उमाप यांचा फॉर्म रिजेक्ट केल्याबाबत आपण जे बोललात ते इतिवृत्तांतात आलेले नाही.

मा. महापौर :— तर ते लिहिले जावे.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :— मा. महापौरजी, आता आपण म्हटलांत की, श्री. उमाप यांचा फॉर्म रिजेक्ट झाला तो आपण कोणत्या कायदयान्वये रिजेक्ट केला? त्यांनी तर तो विथड्रा केला होता. आपण असे म्हणावयास पाहिजे होते की, फॉर्म विथड्रा केला आहे. परंतु त्याऐवजी आपण म्हटलांत रिजेक्ट केला आहे.

मा. महापौर :—मी स्पष्ट शब्दात म्हटले आहे की, श्री. रामदास उमाप यांनी आपला फॉर्म विथड्रा केला आहे त्यामुळे त्यांचा फॉर्म रिजेक्ट आहे.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :— रिजेक्ट का आहे?

मा. महापौर :— विथड्रा केला आहे म्हणुन रिजेक्ट. आपण त्यास विथड्रा सुध्दा समजु शकता.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :— इतिवृत्तांतात नोंद आली आहे, त्यानुसार विथड्रावल व रिजेक्ट यामध्ये फार मोठे अंतर आहे.

मा. महापौर :— मी स्पष्ट शब्दात म्हटले आहे की, त्यांनी फॉर्म विथड्रा केले असल्याने त्यांचे फॉर्म रिजेक्ट असल्याने बाकी ७ उमेदवार निवडून आले आहेत.

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :— मा. महापौर महोदया, त्या दिवशी काय झाले? आपण रिजेक्ट म्हणालात, विथड्रा झाले. होवु शकते घाई—घाईने आपण रिजेक्ट म्हटलांत. आपणांस घाई होती. परंतु त्यादिवशी जे काही झाले ते चुकीचे झाले आहे. एक उमेदवार स्वत: सांगत आहे की, मी उमेदवारी अर्ज मागे घेत नाही (विथड्रा करत नाही) परंतु पीठासीन अधिकारी या नात्याने आपण म्हणत आहात की, मी फॉर्म रिजेक्ट करत आहे, ठिक आहे आपण म्हणत आहात. हस्तक्षेप करण्याची आम्हांस जरुरत आहे. त्या दिवशी सभागृहात लोकशाहीची विटंबना झाली आहे. म्हणजेच आवाज दाबण्याचा प्रकार झाला. व त्या दिवशी सचिव साहेबांनी त्यावर टिप्पणी करावयास पाहिजे होती जी त्यांची जबाबदारी आहे ती त्यादिवशी त्यांनी टाळली. आपण सभागृहाचे सचिव आहात. सचिव या नात्याने मी १० वेळा आपणांस सांगितले आहे की, सभागृहाचे कामकाज सांभाळणे व ते योग्य त्याप्रकारे चालविणे हे आपले काम आहे जबाबदारी आहे. आज सुध्दा आपण ते टाळत आहात. कारण की, सत्ताधारी पक्ष जर चुकीचे करत असेल तर अशाप्रकारचे कामकाज यापुढे होता कामा नये. तसे पाहता महापौर महोदया, पक्षीय

भुमिकेतुन पाहता हा सर्व आपला प्रश्न आहे. श्री. किशोर वनवारी राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे सदस्य आहेत व सभागृहाचे नेते आहेत. ते निवडुन येवु शकतात, नाही येवु शकत ही बाब वेगळी आहे. परंतु त्यादिवशी काय झाले की, एक उमेदवार उभा राहुन म्हणतो की, मी आपली उमेदवारी मागे घेवु इच्छित नाही. मी निवडणूक लढवु इच्छितो. परंतु तरीही त्यांचा फॉर्म रिजेक्ट केल्याचे बोलले जाते. दुस—यांदा असा प्रकार होता कामा नये.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :— मा. महापौरजी, सर्व सदस्य म्हणत आहेत त्यानुसार हे अतिशय स्पष्ट आहे की, त्यादिवशी मी म्हटले होते की, मी ना माझी उमेदवारी मागे घेत आहे ना आज फॉर्म रिजेक्ट करण्याचा दिवस आहे. अर्जांची छाननी करण्याचा अधिकार सचिव साहेबांना आहे. व १४ तारखेस माझा उमेदवारी अर्ज वैध झाला होता. व महासभेत जो पर्यंत उमेदवार स्वत: म्हणत नाही की, माझा उमेदवारी अर्ज मागे घेतला जावा (विथड्रा केला जावा) तोपर्यंत तसे होवु शकत नाही. तर आता इतिवृत्त कायम करण्याचा जो विषय आला आहे इतिवृत्तांतात सचिव साहेबांचे असे म्हणणे होते की, मी खुलासा करु इच्छितो परंतु आपण लोक मला खुलासा करु देत नाहीत. परंतु आज जर सचिव साहेब खुलासा करत असतील तर पुढील कालावधीसाठी आपणांस सुध्दा मार्गदर्शन होईल. उमेदवाराच्या मर्जी व्यतिरिक्त त्याचा उमेदवारी अर्ज मागे घेतला (विथड्रा केला) जावु शकतो का? व आज जे इतिवृत्त कायम करण्याबाबत आपण बोलत आहात त्यामध्ये जी घटना घडलेली आहे त्यानुसार मी फॉर्म विथड्रा करण्याचा किंवा तो रिजेक्ट करण्याचा संबधच नाही. म्हणून इतिवृत्त कायम करण्यासाठी याबाबींचा खुलासा तर करा की माझा जो फॉर्म विथड्रा केला, रिजेक्ट केला तो उमेदवाराच्या संमती विना रिजेक्ट होवु शकतो का? व तो दिवस फॉर्म रिजेक्ट करण्याचा होता का? किंवा सुचक व अनुमोदक महासभेमध्ये एखादया उमेदवारांचा फॉर्म विथड्रा करु शकतो का? याबाबतचा खुलासा व्हावा, कायदा काय आहे याचा खुलासा व्हावा. जेणेकरुन सर्व सदस्यांना माहित पडु शकेल की, उमेदवारा व्यतिरिक्त त्याचा उमेदवारी अर्ज सुचक, अनुमोदकांच्या संमतीने विथड्रा होवु शकतो काय? महासभेमध्ये अशाप्रकारे उमेदवारी अर्ज विथड्रा होवु शकतो काय?

मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणी :— मा. महापौरजी, इतिवृत्तांताच्या पृष्ठ क्र. २ वर शेवटी शेवटी लिहिले आहे की, यावेळी मा. सदस्य श्री. लाल पंजाबी यांनी सभागृहात प्रवेश केला. मा. सचिव म्हणत आहेत की, श्री. रामदास उमाप व श्री. किशोर वनवारी यांनी त्यांचे अर्ज विथड्रा केले असुन तर ते स्पष्टपणे सांगत आहेत की, त्यांचे अर्ज विथड्रा झाले आहे तर याबाबतीत अधिक चर्चा करायची की नाही ते आपण ठरवा.

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :— मा. महापौरजी, सचिव साहेब, ते सांगतात त्याप्रमाणे जर उमेदवारी अर्ज विथड्रा करण्याचा अधिकार आपणांस असेल तर तसे सभागृहास कायदेशीर मत दया की आम्ही विथड्रा करु शकतो?

मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणी :— विथड्रा करायच्या अधिकाराबाबत मी बोलत नाही. मा. सचिवांनी काय म्हटले आहे, हे पहा येथे लिहिले आहे की, यावेळी श्री. रामदास उमाप यांनी त्यांची उमेदवारी मागे घेत असल्याबाबत मा. सचिव यांच्याकडे अर्ज सादर केला. तसेच श्री. किशोर वनवारी यांनी त्यांची उमेदवारी मागे घेत असल्याबद्दल अर्ज मा. महापौर यांच्याकडुन ...............

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :— असे सचिव साहेबांनी म्हटले आहे ना? तर सचिव साहेब, आता सुध्दा सभागृहात सांगु शकतात, ते विथड्रा करु शकतात काय?

मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणी:—नाही मी इतिवृत्तांताबाबत आपणांस सांगत होतो की, इतिवृत्तांतात असे लिहिले आहे. यापुढे जसे सचिव साहेब निर्णय घेतील..........

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण :— मा. महापौर महोदया, आयुक्त साहेब, आम्हांला कायदा माहित नाही. आम्ही कायदा जाणुन घेवु इच्छितो. इतिवृत्त कायम करण्याबाबतीत कायदा काय म्हणतो त्याची आम्हांला माहिती दया.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—मा. महापौर महोदया, आता थोडयावेळा नंतर निवडणुक व्हायची आहे. मा. सचिव साहेब, आपणाकडुन माहिती घेवु इच्छितो. आता या नंतर जी महासभा होणार आहे ज्यामध्ये निवडणुक व्हायची आहे, मी जर श्रीमती सिमा मोकल यांचा उमेदवारी अर्ज मागे घेण्याबाबतचा अर्ज दिला तर काय मा. महापौर महोदया श्रीमती सिमा मोकल यांना विचारल्या विना आपण त्याचा उमेदवारी अर्ज विथड्रा कराल काय? याबाबत आपण मला सांगावे. त्यादिवशी आपण जे केले आहे त्याबाबतीत आम्हांला माहिती दया.

**मा. सचिव :—** मा. महापौर महोदया, जेव्हा स्थायी समितीच्या रचनेसाठी, निवडणुक प्रक्रियेसाठी घोषणा केली जात होती तसे तर कायदा असा आहे की, उमेदवारी अर्ज सचिव कार्यालयात सचिवांकडे सादर करायचे असतात. उमेदवारी अर्ज मागे घेण्यासाठी जी तारीख निश्चित केलेली असते ती तारीख सचिवांच्या कार्यक्षेत्रांतर्गत असते. परंतु महासभेमध्ये निवडणुक प्रक्रिया सुरु होण्याअगोदर जर कोणताही निर्णय घ्यायचा असेल तर तो मा. महापौरांनी घ्यायचा आहे. तर मागील सभेमध्ये जे झाले ते याप्रकारे होते की मा. महापौरांकडे दोन विथड्रावल लेटर देण्यात आलेले होते. एक श्री. रामदास उमाप यांचे तर दुसरे श्री. किशोर वनवारी यांचे. दोन्हींवर संबंधीत उमेदवारांची सही होती. आता प्रश्न असा निर्माण होतो की, त्यांनी विथड्रावल फॉर्म दिला होता अथवा नाही हे त्यांनाच माहित आहे. मात्र सही त्यांची होती. होवु शकते याचा उपयोग किंवा दुरुपयोग सुध्दा होवु शकतो. परंतु त्याबाबतीत मी काही करु शकत नाही. समोर जे लिहिले असेल त्या आधारावर चालावे लागते. व मागील सभेत मी स्पष्टीकरण करु इच्छित होतो परंतु येथे वातावरण एवढे तंग होते की, मला बोलण्याची संधी दिली नाही. व दुसरे असे की, सन्माननिय विरोधी पक्ष नेता श्री. धनंजय बोडारे यांनी आता—आताच असे म्हटले की, सचिवांचे काम आहे की, महासभेचे काम कायदयानुसार कसे चालेल ते पहावे. मला तर नेहमी असे वाटते की, सभेचे कामकाज नेहमी कायदयातील तरतुदीनुसार चालावे. परंतु सभेच्या कामकाजावर मा. महापौरांचे नियंत्रण असते. त्यांचे निर्णय हे स्वतंत्रपणे असतात. त्यांच्याबाबतीत मी हस्तक्षेप किंवा प्रश्न उपस्थित करु शकत नाही. तर जे काही झाले ते आपल्या समोर झाले आहे त्याबाबतीत आता जास्त बोलणे योग्य होणार नाही.

**मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण :—** सचिव साहेब, आम्हांला माहित नाही, कायदा काय म्हणतो. आता ही जी निवडणुक होणार आहे त्याबाबतीत कायदा काय म्हणतो? उमेदवारी मागे घेण्याची उमेदवाराची इच्छा नाही.

**मा. सचिव :—** मी या अगोदरच स्पष्टीकरण केले आहे की ज्या दोन सन्माननिय सदस्यांनी उमेदवारी मागे घेतली होती, उमेदवारी मागे घेण्याबाबतच्या दोन पत्रांवर त्यांची स्वतःची स्वाक्षरी होती. आता त्यांच्याशी विचारविनिमय केला आहे किंवा नाही किंवा आणखी काही कारण आहे याबाबतीत मी काही बोलु शकत नाही.

**मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण :—** विथड्रावल केल्यानंतर सुध्दा जर उमेदवार म्हणत असेल की, मी उमेदवारी मागे घेवु इच्छित नाही.....................

**मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :—** सचिव साहेब, म्हणजेच याचा अर्थ असा की, येथे व्यक्तीपेक्षा कागदाला जास्त महत्व दिले जाते. एखादे ॲफिडेव्हिड करण्यासाठी आम्ही जेव्हा तहसिलदार कार्यालयात जातो तेव्हा तहसिलदार स्वाक्षरी करणारा कोण आहे त्याबाबत प्रथम विचारणा करतात. येथे उमेदवार ओरडुन—ओरडुन सांगत आहे की, मी उमेदवारी अर्ज विथड्रा केलेला नाही. परंतु नाही, नाही आपण उमेदवारी अर्ज विथड्रा केला आहात असे म्हटले जाते व ही वृत्ती लोकशाहीचा गळा घोटण्यासारखी आहे. ती बंद करा. समोर उमेदवार ओरडुन सांगत आहे की, ती स्वाक्षरी माझी नाही. परंतु तरीही त्यास सांगितले जाते की, नाही—नाही तुमचा फॉर्म रिजेक्ट. तहसिलदार कार्यालयात व अन्य सरकारी कार्यालयात ॲफिडेव्हिड करण्यासाठी जेव्हा आपण जातो तेव्हा प्रथम ती व्यक्ती कोण आहे त्यांनी स्वतः स्वाक्षरी केली आहे की नाही? याची प्रथम चौकशी केली जाते. परंतु येथे उमेदवार ओरडुन सांगत आहे की, ती स्वाक्षरी माझी नाही.

**मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी :—**मा. महापौर महोदया, शासकीय कामकाजामध्ये कित्येकवेळा असे होते की, व्यक्ती स्वतः समोर उभा असतांना सुध्दा ॲफिडेव्हिड दयावे लागते. व त्यानंतर त्यास मान्यता दिली जाते. म्हणुन कागदपत्रांना अतिशय महत्व आहे. विरोधी पक्ष नेता जे म्हणत आहेत त्यानुसार पहिले अंडे की कोंबडी अशी ही गोष्ट आहे. प्रत्येक व्यक्ती भलेही समोर उभी असो परंतु ॲफिडेव्हिडला जास्त महत्व असते लिखीत दस्तेऐवजांना जास्त महत्व असते. म्हणुन लेखी दस्तऐवजास मान्यता दिली पाहिजे.

**मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :—** मा. महापौरजी, आताच आमचे बंधु श्री. दिलीप लालवानी यांनी जे म्हटले त्या गोष्टीशी मी सुध्दा सहमत आहे. लिखीत दस्तऐवजास जास्त महत्व असते. परंतु त्यावेळी मी म्हटले होते की, मी माझा उमेदवारी अर्ज मागे घेत नाही. व राष्ट्रवादी कॉंग्रेसपक्षाचे अध्यक्ष श्री. अरुण गुजराथी यांनी मला ही निवडणुक लढण्यास सांगितले आहे. व ज्याप्रकारे लिखित दस्तऐवजांना अधिक महत्व आहे त्यानुसार त्या दिवशी जे काही झाले त्याचा इतिवृत्तांताबाबतीत हरकत नोंदवत आहे. कारण की, त्या दिवशी माझा उमेदवारी अर्ज जो

विथड्रा करण्यात आला होता तो मी केलेला नव्हता. त्याबाबतीत मी माझी हरकत नोंदवितो. भलेही आपण मतदान घेवुन इतिवृत्त कायम करा.

मा. सचिव :— इतिवृत्तांतामध्ये चुक थोडीच आहे. त्यादिवशी सभेमध्ये जे काही झाले ते इतिवृत्तांतात स्पष्टपणे आलेले आहे.

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :— मा. महापौर महोदयांनी आता—आताच म्हटले की, श्री. रामदास उमाप यांचा फॉर्म रिजेक्ट असे म्हटले होते. ते या इतिवृत्तांतात लिहिलेले नाही.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :—सचिव साहेब, वेगवेगळया गोष्टी आहेत. मी म्हटले होते की, मी विथड्रा केलेले नाही. इतिवृत्तांतात आले आहे की, मी विथड्रा केले आहे.

मा. सचिव :— आपली इच्छा आहे?

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :—मी एवढेच म्हणतो की, इतिवृत्तांतामध्ये ज्या—ज्या गोष्टी लिहिल्या आहेत त्या मी म्हटलेल्या नाहीत. मी असे म्हटले आहे की, माझा उमेदवारी अर्ज विथड्रा केलेला नाही. आणि ना ही आज छाननीचा दिवस आहे. या दोन्ही गोष्टी बरोबर आहेत कारण की, छाननी १४ तारखेला होती. उमेदवारी अर्ज उमेदवाराच्या संमती विना मागे घेतला जावु शकत नाही.

मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणी :—मा. महापौरजी, आमचे मित्र श्री. किशोर वनवारी यांच्या दोन गोष्टी आहेत. एक तर ते आपणांस आपली उमेदवारी मागे घेत असल्याबाबतचे विथड्रावल लेटर देतात. जे आपण सचिवांकडे हस्तांतरीत करता. दुसरी गोष्ट अशी की, ते उभे राहुन म्हणतात की, मी माझी उमेदवारी मागे घेतलेली नाही (विथड्रा केलेली नाही.) आता या दोन गोष्टींपैकी कोणती गोष्ट सत्य मानली जावी ते आमच्या श्री. किशोर वनवारी यांनी सांगावे.

मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी :—मा. महापौरजी, आणखी एक गोष्ट आहे, जसे की, आता इतिवृत्तांतावर चर्चा होत आहे. तर यांनी जे काही म्हटले जे ते आता सांगत आहेत तर ते सर्व इतिवृत्तांतात आलेले आहे. इतिवृत्त कायम करण्याचा अर्थ असा आहे की, जे काही त्यादिवशी सभेमध्ये झाले त्याची नोंद इतिवृत्तांतात आली आहे अथवा नाही. जर ते सर्व आले असेल तर इतिवृत्त कायम झाले पाहिजे. व ते सर्वसंमतीने कायम झाले पाहिजे. श्री. किशोर वनवारी यांनी जे काही म्हटले ते सर्व इतिवृत्तांतात आलेले आहे.

मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—मा. महापौरजी, सचिव साहेब, आता—आताच मा. सदस्य श्री. किशोर वनवारी यांनी सांगितले की, त्यांनी जे म्हटले ते इतिवृत्तांतात आलेले नाही. ते आले नाही म्हणुनच ते विरोध करीत आहेत. सभागृहात सदस्य जे जे काही बोलेल त्याची इतिवृत्तांतात नोंद आली पाहिजे. असा कायदा आहे. त्यानुसार ते बोललेले इतिवृत्तांतात आलेले नाही.

मा. सचिव :— इतिवृत्तांताबाबत त्यांची हरकत दिसत नाही. जे त्यांनी म्हटले त्याच बरोबर अन्य सदस्यांनी म्हटले ते तंतोतंत इतिवृत्तांतात आले आहे. या व्यतिरिक्त येथे कॅसेट रेकॉर्ड करण्यात आली होती. त्याची सुध्दा प्रत त्यांना देण्यात आलेली आहे. त्यांना हे सुध्दा सांगण्यात येते की, त्यांना वाटत असेल तर ते कॅसेट लावुन इतिवृत्तांतातील नोंदी जुळतात की नाही ते पाहु शकतात. इतिवृत्तांतात कोणती नोंद आलेली नाही, त्याचबरोबर यांनी म्हटले आणि ते इतिवृत्तांतात आलेले नाही ते सुध्दा सांगितले जावे. कारण की एक—एक वाक्य इतिवृत्तांतात आलेले आहे. यांचा मुद्दा असा आहे की त्यादिवशी सभागृहात जो निर्णय झाला तो त्यांना मान्य नाही. इतिवृत्त चुकीचे आहे असे म्हणु शकत नाही. कारण की सचिव जे आहेत ते नि:पक्ष आहेत. इतिवृत्त पारदर्शी आहे.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :— सचिव साहेब जे म्हणत आहेत ते बरोबर आहे. त्यादिवशी सभागृहात जे झाले ते कायदयानुसार बरोबर नाही. उमेदवाराच्या संमतीविना उमेदवारी अर्ज मागे घेतला जावु शकत नाही. व महासभेमध्ये फॉर्म रिजेक्ट होवु शकत नाही. ते अधिकार सचिवांचे आहेत. १४ तारखेला छाननीचे अधिकार

सचिवांचे होते. त्यावेळी जो अर्ज वैध ठरविला तो त्यानंतर नामंजुर होवु शकत नाही. (रिजेक्ट होवु शकत नाही.) व महासभेमध्ये उमेदवारी अर्ज मागे घेण्यासाठी ५ मिनिटं जी वेळ दिली जाते ती उमेदवाराच्या संमतीसाठी दिली जाते. व मला असे वाटते की, १९९७ पासुन व त्या अगोदरच्या ५० वर्षापासुन आज पर्यंत कधीही असे झालेले नाही. असे एकही उदाहरण नाही. कुण्या उमेदवाराने आपला उमेदवारी अर्ज मागे घेतला (विथड्रा केला) आहे व नंतर त्यांनी म्हटले आहे की मी उमेदवारी मागे घेतलेली नाही. असे एकही उदाहरण आज पर्यंत घडलेले नाही. श्री. रामदास उमाप यांनी आपली उमेदवारी मागे घेतली. त्यामुळे ते असे म्हणत नाही की मी उमेदवारी मागे घेतली नाही म्हणुन. त्यांनी उमेदवारी मागे घेतलेली आहे. परंतु जे मी केलेले नव्हते त्याबाबतीत चुकीचे झाले आहे, कायदयाने ते चुकीचे आहे त्यासाठी माझा विरोध आहे.

मा. सचिव :— तर इतिवृत्तांतावर आपण कसे आक्षेप घेवु शकतात? इतिवृत्त तर जसेच्या तसे आहे जसे आपण बोललात. जे आपण म्हणालात ते सुध्दा आले आहे. जो निर्णय झाला तो सुध्दा आला आहे. त्या निर्णयाबाबत जर आपणांस हरकत असेल तर ती योग्य आहे.

मा. सदस्य श्री. नथु सोनवणे :— मा. महापौरजी, उपमहापौरजी, आयुक्त व सचिव साहेब, आम्ही यासाठी वारंवार म्हणतो की मराठीमध्ये बोला. मराठीत बोला. आता विथड्रावल त्यांचा अधिकार होता. रिजेक्ट त्यांचा अधिकार आहे. यामधुन लोकांना व सदस्यांना हे जाणुन घ्यायचे आहे की, उमेदवार व पीठासीन अधिकारी यांचे जे अधिकार आहेत त्यापैकी कोणत्या अधिकाराचा यावेळी वापर करण्यात आला आहे? फिरुन फिरुन मुद्दा तेथेच येतो. विथड्रावल असेल तर छाननीच्या वेळी आपण त्याचा अर्ज बाद करु शकत होतात. किंवा हे मागे घेवु शकत होते. रिजेक्ट करायचे असेल तर मा. महापौरांना अधिकार आहे. तर कुणाच्या अधिकारानुसार हे झाले पाहिजे? हे आपण येथे सांगावयास पाहिजे.

मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणी :— सभेच्या कामकाजाचे रेकॉर्डींग झाले आहे व आमचे सर्व सहकारी स्विकृत करत आहे. तर या मुद्दयावर आता मतदानाची जरुरत कशी पडेल?

मा. सचिव :—त्यांची हरकत निर्णयाबाबतीत आहे. इतिवृत्तांताबाबतीत नाही. इतिवृत्तांताबाबतीत मतदान होवु शकत नाही. ते म्हणतात की, माझ्यावर अन्याय झाला आहे.

मा. सदस्या श्रीमती जया साधवानी :— ज्याबाबतीत त्यांची हरकत आहे, त्याबाबतीत आमची सुध्दा हरकत आहे. आम्ही तर जोर—जोराने ओरडुन सांगितले होते की हा अन्याय आहे. ते तर आज ओरड करत आहे आम्ही तर त्याच दिवशी ओरडुन ओरडुन सांगत होतो.

मा. सचिव :— इतिवृत्त तर सर्व संमतीने मंजुर आहे ना?

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण :— मा. महापौरजी, आम्हांला कायदा माहित नाही. जो आपण आम्हांला सांगितलाच नाही. काय करु शकतो काय करु शकत नाही? त्याबाबत आम्ही विचारणा केली परंतु आपण सांगतच नाही.

मा. सचिव :— मी पुर्ण स्पष्टीकरण केले आहे.

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण :— नाही, नाही. उमेदवाराची इच्छा नसतांनाही त्याचा उमेदवारी अर्ज विथड्रा करु शकतो का? त्यांनी हरकत घेतल्यानंतर सुध्दा? याबाबत आपण काही सांगत नाहीत.

मा. सचिव :—मी सविस्तर खुलासा केला आहे. त्यात हे सर्व आले आहे. इतिवृत्त कायम ? सर्वसंमतीने? फक्त कायदेशीर बाबी बाबत हरकत आहे काय?

मा. सदस्या श्रीमती जया साधवानी :— आमचा विरोध आहे.

मा. सचिव :—आपला विरोध आहे?

मा. सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—सचिव साहेब, मी आपणाकडुन एक माहिती घेवु इच्छितो.

मा. महापौर :— सभागृहात बरीच चर्चा झाली आहे. त्यादिवशी सभागृहात जी काही चर्चा झाली होती, जे काही बोलले गेले होते, त्याची शब्दशाह नोंद इतिवृत्तांतात आहे. इतिवृत्तांतात कुणाला काही जोडायची असतील किंवा जे बोलले गेले नव्हते ते आले आहे किंवा जे बोलले गेले ते इतिवृत्तांतात आले नाही. असे जर काही असेल तर ती वेगळी गोष्ट आहे. बाकी आपली जी काही हरकत असेल तसेच माझ्या निर्णयावर आपण हरकत घेवु शकतात. बाकी इतिवृत्त जे आहे ते जसे आहे ते तसेच राहिल. माझ्या निर्णयावर जर आपणांस हरकत असेल तर आपण आपला हात वर करुन विरोध नोंदवु शकता. बाकी इतिवृत्त जसे आहे तसे सर्वानुमते कायम करण्यांत येत आहे.

मा. सचिव :— निर्णय आपणांस मान्य नाही?

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :—इतिवृत्तांताबाबतीत माझी काही हरकत नाही. परंतु त्यादिवशी मी माझी उमेदवारी मागे घेतलेली नसतांनाही महापौरांनी माझा उमेदवारी अर्ज रिजेक्ट करण्याचा जो निर्णय घेतला व घोषणा केली मा. महापौरांच्या त्या निर्णयाबाबतीत माझी हरकत आहे.

मा. सचिव :— आणखी कुणा कुणाची हरकत आहे? आपली एकटयाचीच आहे ना?

मा. सदस्या श्रीमती जया साधवानी :— इतिवृत्तांताबाबतीत आमची हरकत नाही. मा. महापौरांनी त्यांचा उमेदवारी अर्ज रिजेक्ट करण्याचा जो निर्णय घेवुन त्याची जी घोषणा केली त्यास आमचा विरोध आहे.

मा. सचिव :— आणखी कुणी?

यावेळी सभागृहात उपस्थित असलेल्या शिवसेना—भाजपाच्या व कॉग्रेसच्या काही सदस्यांनी हात वर करुन त्यादिवशी मा. महापौरांनी घेतलेल्या त्या निर्णयाबाबत आपला विरोध दर्शविला.

मा. महापौर :— येथे इतिवृत्तांताबाबत बोलले जात आहे. आपणांस इतिवृत्त कायम करायचे आहे अथवा नाही त्याबाबत फक्त बोला.

मागील महासभेचे दिनांक २२/०३/२००६ रोजीचे इतिवृत्त जसे आहे तसे सर्वानुमते कायम करण्यांत येत आहे. 

सचिव साहेब, सभेचे कामकाज पुढे चालवा.

मा. सचिव :— एक सूचना आहे. राष्ट्रवादी कॉग्रेस पक्षाकडुन मा. महापौरांना एक सूचना येथे प्राप्त झाली आहे. सन्माननिय सदस्य श्री. देवेंद्रसिंग उर्फ दर्शनसिंग चंदासिंग खेमाणी यांची सभागृह नेता पदी नियुक्ती करण्यात आली आहे. त्यास मा. महापौरांनी स्विकृती दिली आहे. श्री. दर्शनसिंग खेमाणी यांचे हार्दिक अभिनंदन करुन त्यांना शुभेच्छा देतो.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :— मा. महापौरजी, सभेचे पुढील कामकाज सुरु करण्याआधी काही बोलु इच्छितो.

मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणी :—धन्यवाद तर देवु दया.

मा. महापौर :— आपण कोणत्या गोष्टी बाबत बोलु इच्छिता.

**मा. सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :–** एक अपघात झाला आहे. २६ जुलै रोजी एक पुल तुटला होता तो अर्धवट होता. त्यामुळे काल दोन मुलांचा अपघात झाला आहे. त्याबाबत मी बोलु इच्छितो. तो जो पुल आहे, देविसोपच्या बाजुला हा जो पुल तुटला आहे त्याचे काम लवकरात लवकर पुर्ण केले जावे. जेणेकरुन आणखी बळी जाता कामा नयेत.

**मा. महापौर :–**ठिक आहे.

**मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंग खेमाणी :–**मी देवेंद्रसिंग चंदासिंग खेमाणी आमच्या राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या वतीने सभागृहात उपस्थित असलेल्या माझ्या सर्व सहकार्यांचे, सर्व बंधु–भगिनींना धन्यवाद देतो, अशी अपेक्षा व्यक्त करतो की, आपणा सर्वांच्या आर्शिवादाने या सभागृहात शहराच्या व लोकांच्या हिताचे अधिकाधिक चांगले काम करु शकेन. धन्यवाद.

**मा. सचिव :–** विषय क्र. २ ....................

**मा. सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :–** सचिवजी, मी जे म्हटले त्याची आपण इतिवृत्तांतात नोंद घ्या. २६ जुलै रोजी जी घटना घडली होती व हा जो पुल तुटला आहे त्यामुळे जो अपघात झाला आहे त्याबाबतीत लवकरात लवकर चौकशी करुन पुलाचे काम पुर्ण करण्यात यावे.

**मा. सचिव :–** विषय क्र. २ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. २:–** उल्हासनगर शहराच्या मंजुर विकास योजनेच्या तरतुदीनुसार विकास साधणे.

---

**मा. सदस्य श्री. होशियारसिंग लबाना:–**मा. महापौरजी, व आयुक्त साहेब, जसे की, आज एखादया इमारतीचा बांधकाम नकाशा मंजुर करतांना दोन–दोन विकास आराखडे विचारात घ्यावे लागतात. एक एमएमआरडीएचा नविन जो विकास आराखडा आहे तो अगोदरच रद्द करण्यात आलेला आहे. त्यामध्ये ब–याचशा त्रुटी आहेत. शासनाने त्या विचारात घेतल्या आहेत व नविन विकास आराखडा तयार करण्यासाठी उल्हासनगर महानगरपालिकेची नियुक्ती केली आहे. परंतु शेवटी एक वाक्य लिहिले आहे की जो पर्यंत आपण नविन विकास आराखडा तयार करत नाही तोपर्यंत या दोन्ही आराखडयातील तरतुदी लक्षात घ्या. आज आपल्या उल्हासनगर महानगरपालिकेच्या नगररचना विभागाची स्थिती अशी आहे की, ............ जसे की, अगोदरच ८५५ इमारतींची ................................ एवढे दिवस आमच्या उल्हासनगर वाशियांची गैरसोय होवु नये यासाठी आम्ही येथे एक ठराव सर्वसंमतीने पास करुन पाठवु की जोपर्यंत नविन विकास आराखडा तयार होत नाही तोपर्यंत आमचा जो जुना विकास आराखडा आहे तो एकच लागु केला जावा व तो लक्षात घेवुन इमारतींचे बांधकाम आराखडे मंजुर केले जावेत.

**मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :–** मला असे वाटते की, या विषयासंदर्भात सत्ताधारी पक्षाकडे निश्चित अशी दिशा नाही. या सभागृहामध्ये दोन–तीन वर्षापुर्वी याबाबत विषय आला होता तसेच पुणे महानगरपालिकेने मागील वर्षी सुधारीत विकास आराखडा तयार केला आहे. व दिड वर्षापुर्वी आम्ही या महापालिकेत मंजुर करुन पाठविला आहे. सध्याची जी निवडणूक आलेली इलेक्टेड बॉडी आहे या इलेक्टेड बॉडीमध्ये आम्ही ठराव पारीत करु. दिड वर्षापुर्वी पारीत करुन पाठविलेल्या त्या ठरावाचे काय झाले ते अजुन समजुन येत नाही. व तो दिड वर्षाचा कालावधी कुठे गेला तो अदयाप समजुन येत नाही. सर्व लोक असे म्हणतात की जुना जो विकास आराखडा आहे तो घरी बसुन तयार केला होता. तर मग तो चालु का ठेवु इच्छित आहेत. जसे मी म्हटले दिड वर्षात नविन विकास आराखडा तयार केला जातो आता दिड दोन वर्ष झाले आहेत अदयापपर्यंत आपणांस त्याचे काही निर्देशच नाहीत. तर मला असे वाटते आपण कुठलेच काम करु इच्छित नाहीत. फक्त ठराव पारीत करुन चुकवाचुकव करु पाहत आहात. सर्व लोक असे म्हणतात की जुना जो विकास आराखडा आहे तो घरी बसुन तयार केला होता. आता लवकर नविन आराखडा तयार केला जावा. यासाठी आम्ही या ठरावाचा विरोध करीत आहोत.

**मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :–** मा. महापौर महोदया, आयुक्त साहेब, आज आपण हा जो विषय आणलेला आहे त्यामध्ये प्रशासनाची कल्पना किंवा नियोजन असे काही वाटत नाही. फक्त नियोजन व विकास समितीच्या

सभापतीने आपणांस पत्र दिले आहे म्हणुन हा विषय आपण आणला आहात. त्याचा परिणाम पुढे काय होणार आहे, मागे आम्ही काय केले आहे याकडे सुध्दा लक्ष दिले नाही. सभापतीने पत्र दिले ते आपण विषय या रुपाने महासभेपुढे ठेवले प्रशासनाचे काम एवढेच आहे काय? या उल्हासनगरला आपण काय देणार आहात? आम्ही मागे काय केले आहे याची आपणांस माहिती नाही. यापुढे काय करत आहोत त्याची सुध्दा माहिती नाही. तर उल्हासनगरला आपण मिळुन कोठे घेवुन जाणार आहात. हा जो प्रस्ताव आज आपण आणला आहात. प्रारुप विकास आराखडा रद्द करुन मंजुर विकास आराखडयाचा, नियोजन प्राधिकरण महानगरपालिका आहे. यासाठी महानगरपालिकेस नियोंजन करण्यासाठी परवानगी दिली जावी. याबाबतचा प्रस्ताव २००२ पासुन शासनाकडे पडून आहे. येथे नमुद केले आहे की, २६/१०/२००४ रोजी शासनाने अधिसुचना काढली व आमचा जो प्रारुप विकास आराखडा होता तो रद्द केला, नगररचना विभागाचा कुणी अधिकारी येथे उपस्थित आहे का? नगररचना विभागचा विषय आहे आणि त्या विभागाचा कुणीच अधिकारी येथे उपस्थित नाही? आयुक्त साहेब, तुम्ही या विषयाबाबत गंभीर आहात का? येथे लागोपाठ दोन विषय नगररचना विभागाचे असुन त्याबाबतीत उत्तर देण्यासाठी कुणी संबंधीत अधिकारी येथे उपस्थित नाहीत. कुठे गेले नगररचनाकार? विचारावे तेव्हा ते बाहेर गेलेले असतात. काय पोरखेळ लावला आहे काय तुम्ही? महापौर महोदया काय सभेचे कामकाज चालले आहे?

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :—</u> आयुक्त साहेब प्रशासनावर आपले नियंत्रण नाही असे वाटते.

यावेळी काही सन्माननिय सदस्य एकाच वेळी जोर—जोरात बोलत होते त्यांच्या एकत्रित आवाजात कोण नेमके काय बोलत आहेत हे समजुन येत नव्हते.

<u>मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण :—</u> नगररचनाकार कुठे आहेत? जेव्हा—जेव्हा विषय येतात तेव्हा—तेव्हा ते येथे सभेत नसतात.

<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :—</u> आपण हा विषय पुढे ढकला नगररचनाकारांना बोलवा आणि हे दोन्ही विषय आम्हांला समजावुन सांगा. तोपर्यंत हे विषय दुस—या सभेत ठेवा.

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :—</u> हे दोन्ही विषय पुढे ढकला.

<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :—</u>पुर्ण सभेचे कामकाज पुढे ढकला. व नगररचनाकारांना येवु दया. काहीही घाई नाही.

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :—</u> कोण उत्तर देणार आहे कुणीतरी समजावुन सांगावयास पाहिजे ना? ठिक आहे रजेवर आहेत ना? तुम्हांला माहित आहे ना तर मग दुस—या कुणाला बोलवा. प्रशासनास माहिती आहे किंवा नाही फक्त सभापतींनी पत्र दिले म्हणुन तुम्ही प्रस्ताव आणला आहात.

<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :—</u>या सभेचे कामकाज पुढे ढकला, आणि नंतर आणा.

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :—</u>पुढे ढकला हा अतिशय महत्वपुर्ण विषय आहे. विशेषतज्ज्ञांचा विषय आहे.

<u>मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :—</u> आम्ही हे विषय पुढे का ढकलत आहोत? केवळ प्रशासनाची तयारी नाही म्हणुन. प्रशासन जे प्रस्ताव आणते त्याबाबत तयारी करण्याची प्रशासनाची मानसिकता नाही. या उल्हासनगरला आम्ही काय देणार आहोत? आपण काय प्रशासन चालविणार आहात?

<u>मा. महापौर :—</u> नगररचनाकार आज सुट्टीवर गेले आहेत. त्यामुळे हे विषय पुढील सभेत आणले जातील.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—</u> केवळ प्रशासनामुळे हे विषय पुढे ढकलले जात आहेत.

**मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :–** महापौर महोदया, आज विशेष महासभा बोलावली आहे. सर्वसाधारण महासभा नाही. ही सभा नगररचनाकाराने किती गांभीर्याने घ्यायला पाहिजे होती? अशा या नगररचनाकारांवर कारवाई केली जावी.

**मा. महापौर:–** नगररचनाकार ब–याच दिवसापासुन येथे राहत नाहीत. याबाबत ब–याचशा वेळा आम्ही आक्षेप घेतलेले आहेत. परंतु आज त्यांच्या घरी काही गंभीर स्वरुपाची अडचण उद्‌भवली होती त्यामुळे ते आज येथे आलेले नाहीत. परंतु यापुढे त्यांना नोटिस बजावली जाईल.

**मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :–**मा. महापौरजी, आपले आक्षेप असतांनाही प्रशासन जर आपले ऐकत नसेल तर आपण काय कराल?

**मा. महापौर :–** तातडीचे काम निघाल्यामुळे ते येवु शकले नाही.

**मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :–** तातडीची निकड होती म्हणुनच तर विशेष महासभा बोलावली होती.

**मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण :–** मा. महापौरजी, आयुक्त साहेब, दिनांक २६ जुलै, २००५ रोजी पुरामुळे ज्यांच्या घरात पाणी आले होते अशा घरांची किरकोळ दुरुस्ती करण्यासाठी त्यांना परवानगी देण्याबाबत आपण येथे संमती दर्शविली होती. त्यानंतर शहरातील बरेचसे लोक परवानगीसाठी येथे चकरा मारत आहेत परंतु आजपर्यंत त्याबाबतचा फॉर्म तयार करण्यात आलेला नाही. त्याची जबाबदारी कोणाची आहे? जेव्हा सभागृह परवानगी देते अशा वेळी अशा मिळकतींचा सर्व्हे करणे दुरुस्तीपरवानगी कामी फॉर्म तयार करणे ही जबाबदारी कुणाची आहे? नागरी सुविधा केंद्रामध्ये या कामी लोक रोज रांगा लावत आहेत. व परत जात आहेत. तर याबाबतची जबाबदारी कुणाची आहे? हा आपल्या सभागृहाचा अवमान आहे. नाहीतर आपण अशी घोषणाच करु नका. सभागृहाच्या कामकाजाचे थेट प्रक्षेपण के न्यूज आणि जनादेश या वृत्तवाहिन्यांवरुन दाखविले जात आहे की आम्ही अशा लोकांना घर दुरुस्ती परवानगी देण्याचे काम सूरु केले आहे त्यानुसार लोक येथे येतात.

**मा. महापौर :–** बांधकाम परवानगी देण्याचे काम सुरु केले आहे असे कधीही कुठल्याही वृत्तवाहिनीवर दाखविले नाही.

**मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण :–** महासभेच्या कामकाजाचे प्रक्षेपण दाखविले आहे.

**मा. महापौर :–**करु, करु.

**मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण :–** लोकांमध्ये काय संदेश जात आहे? लोक आज आपणाकडुन दुरुस्ती परवानगी मिळण्याची वाट पाहत आहेत. ज्यांच्या घरात खरोखरच पाणी गेले होते. त्यांच्याकडे पुरग्रस्ताचे दाखले आहेत. अशा लोकांना त्यांच्या घरांची उंची वाढविण्याची परवानगी दिली पाहिजे.

**मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :–** नगररचना विभागाच्या ब–याचशा अनियमितता आहेत. नगररचनाकार जर चुकीचे असतील तर त्यांच्या हाताखालील अधिकारी कर्मचारी हे सुध्दा चुकीचे कामे करतात. यापुर्वी ३३ रस्त्यांचा विकास करण्याचा प्रस्ताव आम्ही पारीत केला होता. त्यामध्ये डॉल्फीन क्लबचा एक रस्ता होता. तत्कालीन नगररचनाकारांना त्या ठिकाणचे असलेले सारस्य लक्षात घेता डॉल्फीन हॉटेल वाचविण्यासाठी सचदेव नगर कॉम्पलेक्सला, ज्या कॉम्पलेक्सचे बांधकाम पुर्णपणे कायदेशीर होते त्यांच्या कंपाउंड मध्ये अतिक्रमण करुन रस्ता तयार करण्यात आला. तेव्हा ते लोक वारंवार येथे येत होते. त्यांची कुणी दखल घेतली नाही. नगररचनाकाराने डॉल्फीन हॉटेल वाचविण्यासाठी त्यांची दखल घेतली नाही. त्यानंतर ते लोक उच्च न्यायालयात दाद मागण्यासाठी गेले. उच्च न्यायालयाने तालुका भुमीअभिलेख अधिका–यास निर्देश दिले की, जागेचे मोजमाप करा व ज्यांची ज्यांची जागा असेल ती त्यांना मोजुन दया. निशानी करुन दया. त्यानुसार महानगरपालिकेच्या नगररचनाकार व इतर अधिका–यांचे स्पष्ट मत झाले आहे की आम्ही सचदेव कॉम्पलेक्सची भिंत चुकीने पाडली आहे. जाणीवपुर्वक तोडली आहे. डॉल्फीन क्लबला २४ फुटाची मार्किंग दिली होती ती वाचविण्यासाठी सचदेव कॉम्पलेक्सवाले लेखी मागत होते परंतु स्वत:ला वाचविण्यासाठी त्या लोकांना लेखी दिले नाही. असे नगररचनाकार आहेत? श्री. रमेश

चव्हाण यांनी घरदुरुस्तीचा मुद्दा आता उपस्थित केला होता ज्यास महासभेने मान्यता दिली होती परंतु अदयापपर्यंत प्रशासन दुरुस्ती परवानगी देण्यास तयार नाही. आयुक्त साहेब, या दोन गोष्टी तुमच्याही कानावर टाकलेल्या आहेत. सचदेव नगरचे लोक लेखी मागत आहेत की, आमची जागा किती घेतली आहे ती परत दया. आम्हांला फक्त लिहून दया.

<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी:—</u> आयुक्त साहेबांनी यावर प्रकाश झोत टाकावा. आपण पुरग्रस्तांना घरदुरुस्ती परवानगी का देत नाहीत? याबाबत महासभेत निर्णय झालेला आहे की अशा लोकांना अशी परवानगी दयायची आहे. आपणांस याबाबतीत काय अडचण आहे? महापौर महोदया तर याबाबतीत खुलासा करतील परंतु प्रशासनाच्या वतीने आयुक्तांनी खुलासा केला तर अधिक बरे होईल.

<u>मा. सचिव :—</u>यांचे म्हणणे असे आहे की, दोन्ही विषय वगळले जावेत. त्यामुळे या सभेचे कामकाज येथेच संपृष्टात येईल. ठिक आहे? दुसरी सभा समाप्त होत आहे व पहिल्या सभेची सुरुवात करण्यात येत आहे.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांकः— २४/११/२००६

## उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. २४/११/२००६ रोजीच्या तातडीच्या विशेष महासभेचे इतिवृत्त.

उल्हासनगर महानगरपालिकेची तातडीची विशेष महासभा शुक्रवार, दिनांक २४/११/२००६ रोजी दुपारी २.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभेत मा.महापौर, श्रीमती ज्योती कालानी हया पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्या. व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य/सदस्या उपस्थित होते / होत्या.

१) मा. महापौर :—श्रीमती कालानी ज्योती (पप्पु) सुरेश

| | | | |
|---|---|---|---|
| २. | श्रीमती जावळे संगिता रमेश | ३७. | श्री. ठाकुर अशोक भगवानदास |
| ३. | श्री. भुल्लर राजेंद्रसिंह विरसिंह | ३८. | श्रीमती माने किरण बाळकृष्ण |
| ४. | श्री. सोनवणे नथु काशीराम | ३९. | श्री. चव्हाण रमेश महादेव |
| ५. | श्री. टेकचंदानी राजु मथुरादास | ४०. | श्री. जाधव प्रशांत जगन्नाथ |
| ६. | श्रीमती रामचंदानी भावना मनोहर | ४१. | श्री. जाधव सुरेश मधुकर |
| ७. | श्री. लिंगे सुर्यकांत (बबन) | ४२. | श्रीमती सुर्वे जयश्री सुनिल |
| ८. | श्री. वाघे शामु बाबु | ४३. | श्री. खेमाणी देवेंद्रसिंह चंदासिंह |
| ९. | श्री. गायकवाड दिलीप | ४४. | श्रीमती कारीरा रेखा मन्नुमल |
| १०. | श्री. मुलचंदानी महेंद्र परसराम | ४५. | श्री. पमनानी ईश्वर सतरामदास |
| ११. | श्री. मोकल चंदाराम विठोबा | ४६. | श्री. बोडारे धनंजय बाबुराव |
| १२. | श्री. एडके गणपत गोविंद | ४७ | श्रीमती कृष्णानी रेखा हरेश |
| १३ | श्रीमती. शर्मा कमला गंगाधर | ४८. | श्री. भालेराव गौतम यशवंत |
| १४. | श्री. वलेचा पृथ्वी व्यापारीलाल | ४९. | श्रीमती वसिटा बेबी तुलसीदास |
| १५. | श्री. उमाप रामदास राघोजी | ५०. | श्रीमती. ससाणे लक्ष्मीबाई रोहिदास |
| १६. | श्री. यादव लालबिहारी बुझारत | ५१. | श्री. म्हस्के अंकुश निवृत्ती |
| १७. | श्रीमती बामणकर नंदिनी गजानन | ५२. | श्री. चौधरी राजेंद्र शांताराम |
| १८. | श्री. गुप्ता प्रभुनाथ दुखंती | ५३. | श्रीमती पंजाबी दिपा नारायण |
| १९. | श्रीमती गुप्ता अनिता धमेंद्र | ५४. | श्री. साधवानी मनोज लालचंद |
| २०. | श्री. पवार नाना आनंदा | ५५. | श्री. पुरस्वानी जमनादास खुबचंद |
| २१. | श्रीमती आहुजा निता प्रकाश | ५६. | श्रीमती बठीजा कोमल अमृत |
| २२. | श्री. जग्यासी राजु किशनचंद | ५७. | श्री. जयसिंघानी अनिल भगवानदास |
| २३. | श्री. निकम शांताराम ओंकार | ५८. | श्री. रामरख्यानी मोहनदास (गाडो) नारायणदास |
| २४. | श्री. टाले प्रमोद नामदेवराव | ५९. | श्रीमती माखिजा किरण लखी |
| २५. | श्री. ठाकुर विनोद लालसिंग | ६०. | श्री. लबाना होशियारसिंग हरिसिंग |
| २६. | श्रीमती. मसंद माया घनश्यामदास | ६१. | श्री. ठाकुर नरेंद्रकुमार केवलराम |
| २७. | श्री. गायकवाड सुरेश नामदेव | ६२. | डॉ. (श्रीमती) नाथानी निना प्रकाश |
| २८. | श्रीमती वनवारी मोना अशोक | ६३. | श्रीमती छाब्रिया भारती पहलाज |
| २९. | श्री. वनवारी किशोर नारायणदास | ६४. | श्रीमती. रिझवाणी सुजाता रमेश |
| ३०. | श्री. साधवानी मोहन रहंदोमल | ६५. | श्री. बेहरानी मोहन वर्यलदास |
| ३१. | श्री. जेसवानी सतरामदास फतनदास | ६६. | श्रीमती करोतिया मालती राधाचरण |
| ३२. | डॉ. (श्रीमती) साधवानी जया | ६७. | श्रीमती दासानी मिनु राजकुमार |
| ३३. | श्री. लुंड गोविंदराम डोलुमल | ६८. | श्री. इदनानी राजु चंद्रभान |
| ३४. | श्रीमती खिलनानी भावना रवी | ६९. | श्री. पंजाबी लाल देवनदास |
| ३५. | श्री. रुपचंदानी बच्चाराम बाशोमल | ७०. | श्री. लालवानी दिलीप जेठानंद |
| ३६. | श्री. असरोंडकर राजेश उर्फ राज जयसिंग | ७१. | श्री. वधारिया राजेश नानिकराम |

तर,

मा.सदस्य / सदस्या १. श्री. तलरेजा विनोद चंदीराम, २. श्रीमती मोकल सीमा चंदाराम, ३. श्री. रोहडा श्यामसुंदर जानीलाल, ४. श्रीमती खांडेकर प्रेमा भिमा, ५. श्रीमती. सोनेजी मीना (सोंडे), ६. श्री. पाटील विश्वनाथ गौतम, ७. श्री. मनवानी अनु (सनमुख), ८. श्री. बठीजा संजय रामचंद्र , ९. श्री. बेहराणी ठाकुरदास वर्यलदास, १०. श्री. माखिजा हरदास सन्मुखदास हे सभेस अनुपस्थित होते / होत्या.

आयुक्त श्री.आर.डी.शिंदे हे अनुपस्थित असल्याने त्यांच्या जागी श्री.नाना रौराळे, अतिरिक्त आयुक्त हे आयुक्तांच्या वतीने प्राधिकृत अधिकारी म्हणुन सभेस उपस्थित होते. तसेच खालील अधिकारी सभेस हजर होते.

१. श्री. अशोक बागेश्वर, उप—आयुक्त
२. श्री. दिपक सावंत, उप—आयुक्त
३. श्री. मिलींद सावंत, उप—आयुक्त
४. डॉ. के.आर.खरात, वैद्यकिय आरोग्य अधिकारी
५. श्री. सु.कृ.नाकाडी, मुख्य लेखा परिक्षक
६. श्री. बी.सुंदरेश्वरन, प्रभारी शहर अभियंता,
७. श्री. आर.बी. सुखरामानी प्रभारी कार्यकारी अभियंता, सार्व.बांध. विभाग
८. श्री. सेलवन, प्रभारी कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा विभाग
९. श्री. युवराज भदाणे, जनसंपर्क अधिकारी
१०. श्री. सा.अ.पठाण, प्रभाग अधिकारी, प्रभाग समिती क्र. १
११. श्री. रमेश काजळे, प्रभारी प्रभाग अधिकारी, प्रभाग समिती क्र. २
१२. श्री.बी.एस.गायकवाड, प्रशासन अधिकारी, शिक्षण मंडळ
१३. डॉ. राजा रिझवानी, वैद्यकिय अधिकारी

दुपारी २.१० वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

<u>महापालिका सचिव :—</u> विषय क्रमांक १

<u>मा. सदस्य श्री. राज असरोंडकर :—</u> मा. महापौर महोदया........

<u>महापालिका सचिव :—</u> विषय क्रमांक १— आयुक्तांविरुध्द् अविश्वास ठराव संमत करणे.

<u>मा. महापौर :—</u> राजजी तुम्ही बोला.

<u>मा. सदस्य श्री.राज असरोंडकर :—</u> मा. महापौर महोदया, आज येथे जो विषय आणला आहे त्या विषयावर यापूर्वीही महासभेमध्ये बरीच चर्चा व वादविवाद झाले आहेत. या विषयावर अंतिमत: मतदान घेवुनच निर्णय घ्यायचा असतो. त्यामुळे यावर जास्त चर्चा न करता व सभागृहाचा वेळ वाया न घालवता यावर मतदान घ्यावे अशी माझी विनंती आहे.

<u>मा. महापौर :—</u> सचिव महोदय, या विषयावर मतदान घ्यावे.

<u>मा. सदस्य श्री.देवेंद्रसिंह खेमाणी :—</u> मतदान घ्या.

<u>मा. सदस्य श्री.किशोर वनवारी :—</u> मा. महापौरजी त्या दिवशी आयुक्तांसंबधी लक्षवेधी सूचना आली असता आपण सांगीतले होते की, त्यावर २४ तारखेला चर्चा करा त्यामुळे आज सर्वांना आपल्या भावना व्यक्त करावयाच्या आहेत.

<u>मा. सदस्य श्री.देवेंद्रसिंह खेमाणी :—</u> मा. महापौरजी आपण मतदान घेण्याचे आदेश दिले असल्याने कृपा करुन सदरच्या प्रक्रीयेस सुरवात करण्यासाठी सचिवांना सांगावे.

**मा. सदस्य श्री.प्रमोद टाले :–** मा. महापौरजी आज हा जो विषय आणला आहे त्यामागे काय हेतु आहे हे निष्पन्न होण्यासाठी चर्चा होणे आवश्यक आहे.

**मा. सदस्य श्री.धनंजय बोडारे:–** मा. महापौर महोदया, ज्यांनी प्रस्तावाची सूचना ठेवली आहे त्यांना तरी बोलू द्या. मतदान घेण्याची ही कोणती पध्दत आहे. सुचक व अनुमोदक आम्ही आहोत, चर्चेनंतर आपण मतदान घेवु शकता. सूचना व प्रस्ताव आमचा आहे.

**मा. सदस्य श्री.देवेंद्रसिंह खेमाणी :–** मा.महापौरजी सभा सूचनेवर विषय स्पष्ट आहे की, आयुक्तांविरुध्द अविश्वास प्रस्ताव संमत करणे. आमच्या सहका–यांनी त्यांचे विचार स्पष्टपणे प्रकट केले असल्याने त्यावर पुन्हा चर्चा करण्यात काही एक अर्थ नाही. तुम्ही देखिल मतदान घेण्यासाठी आदेश दिले असल्याने मतदानाची कारवाई करायला हवी.

**मा. सदस्य श्री.राज असरोंडकर :–** मा.महापौर महोदया अशा प्रकारच्या विषयावर कितीही चर्चा झाली तरी शेवटी त्यावर मतदानानेच निर्णय घ्यावा लागतो. त्यामुळे यावर मतदान घ्यावे अशी आमची मागणी आहे. हा प्रस्ताव पूर्वग्रहदुषित आहे. हे लोक देखिल प्रस्ताव पास करायच्या तयारीनेच आले असल्याने मतदानास सुरवात करावी.

**मा. सदस्य श्री.प्रमोद टाले :–** मा. महापौरजी, अविश्वासाचा ठराव का आला आहे यावरही चर्चा व्हायला हवी. ज्यांनी हा प्रस्ताव आणला आहे त्यांचे म्हणणे देखिल ऐकुन घ्यायला हवे, सभागृहाचे मत काय आहे तसेच अविश्वासाचा ठराव का आणला गेला आहे याची सर्वांना माहिती मिळायला हवी.

**मा. सदस्य श्री.राजेश वधरिया :–** मा. महापौरजी, आपण आधीच मतदान घेण्यासाठी आदेश दिले आहेत त्यामुळे मतदानाला सुरवात करायला हवी.

**मा. सदस्य श्री.जमनादास पुरसवानी :–** मा. महापौर महोदया, मा. आयुक्त साहेब व उपस्थित सर्व सदस्य हा विषय आणण्यामागे मुख्य कारण काय आहे याची सर्वांना माहिती आहे. काही दिवसांपूर्वी महासभेत आयुक्तांवर श्री. भुल्लर यांनी आरोप लावला होता की, त्यांनी ठेकेदार व शहरातील जनतेविरुध्द अपशब्द काढले आहेत. ब–याचदा नगरसेवक जेव्हा आयुक्तांकडे कामानिमित्त जातात तेव्हा आयुक्त त्यांच्याकडे लक्ष देत नाहीत व कामात टाळाटाळ करतात. आयुक्ताचे हे वर्तन शहर विरोधी आहे. आयुक्तांच्या या वर्तणुकी विरोधात महासभेत हा ठराव आणला आहे. यासाठी सभागृहात आयुक्त उपस्थित असणे आवश्यक आहेत तसेच श्री. भुल्लर जे नेहमी आयुक्तांच्या विरोधात बोलत असतात ते देखिल आज अनुपस्थित आहेत. यामुळे मी आपणास विनंती करतो कारण वर्षभर आपण सभा स्थगित करीत आला आहात त्यावेळेस आम्ही तुम्हाला समर्थन दिले होते. आज श्री. भुल्लर ज्यांनी नेहमी आयुक्तांवर आरोप केले आहेत ते अनुपस्थित असल्याने तसेच त्यांना आयुक्तांविरुध्द बोलण्यासाठी संधी मिळणे आवश्यक असल्याने ही सभा स्थगित करावी अशी मी विनंती करेन.

**मा. सदस्य श्री. राज असरोंडकर :–** मा.महापौर महोदया, या विषयावर मतदान घ्यावे.

**मा. सदस्य श्री.धनंजय बोडारे :–** मा. महापौर महोदया, सभा स्थगित करण्यासाठी आम्ही आपल्याकडे प्रस्ताव दिला आहे. आज श्री.उध्दव ठाकरे हे उल्हासनगरला येत आहेत. आयुक्तांच्या वर्तणुकी विरोधात श्री. भुल्लर यांनी लक्षवेधीद्वारे वेळोवेळी आक्षेप घेतले आहेत. यापूर्वी आपण जेव्हा जेव्हा सभा स्थगित केली आहे त्यावेळी आम्ही आपल्याला सहकार्य केले आहे. आज आम्ही कायदेशिररित्या आपल्याकडे प्रस्ताव दिला आहे कारण श्री. उध्दवजी ठाकरे हे पहिल्यांदाच उल्हासनगरला येत आहेत. त्यासाठी आम्हाला तयारी करायची आहे. तसेच आयुक्त देखिल येथे उपस्थित नाहीत. नितीमत्तेच्या दृष्टीकोनातुन आयुक्तांच्या विरोधात प्रस्ताव असल्याने त्यांच्या समोरच चर्चा करणे योग्य आहे. यासाठी ही सभा स्थगित करुन डिसेंबरच्या पहिल्या आठवडयात ठेवण्यासाठी आम्ही प्रस्ताव दिला आहे.

**मा. सदस्य श्री.जमनादास पुरसवानी :–** सभा स्थगित करण्यासाठी आपण मतदान घेवु शकता.

**मा. सदस्य श्री.देवेंद्रसिंह खेमाणी :—** मा. महापौरजी, येथे हा जो प्रस्ताव आणला आहे त्याच्या मागचा हेतु स्पष्ट आहे. आयुक्तांविरुध्द अविश्वास प्रस्ताव आहे. सभा सूचनेवर विषय स्पष्ट असल्याने त्यावर चर्चा करण्याची आवश्यकता नाही. ज्यांना आयुक्तांविरुध्द अविश्वास प्रस्ताव प्रकट करायचा असेल ते तो प्रकट करतील व ज्यांना करायचा नसेल ते प्रकट करणार नाही. जेथे स्पष्टीकरण करण्याची आवश्यकता असते असा मुद्दा येथे नसल्याने चर्चा करण्याची आवश्यकता नाही तसेच तो चर्चेचा विषयही नाही. आपण मतदानाचा आदेश दिला असल्याने त्या आदेशा प्रमाणे लवकरात लवकर मतदानाची प्रकीया सुरु करावी असे माझे निवेदन आहे.

यावेळी मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर यांनी सभागृहात प्रवेश केला.

**मा. सदस्य श्री.जमनादास पुरसवानी :—** मा. महापौर महोदया, मी आमचे मित्र जे भाजपा मध्ये आमचे सहकारी होते श्री. दर्शनसिंह त्यांना मी सांगु इच्छितो की, सभागृह नेता ऐवढया मोठया पदावर विराजमान असताना ऐवढा गंभीर विषय आला असताना, आयुक्तां विरुध्द अविश्वास प्रस्ताव आहे, असा प्रस्ताव आल्या नंतर थेट मतदान करणे व चर्चा करण्याची संधी न देणे असे कसे काय होवु शकते? एवढया मोठया पदावर बसल्यानंतरही आपण असे कसे काय बोलु शकता? यावर आयुक्तांनी देखिल त्यांचे म्हणणे मांडायला हवे माझ्याविरुध्द अविश्वास प्रस्ताव का आणला आहे हे त्यांना समजायला हवे. ज्या लोकांना आयुक्तांचे काम पंसत नाही, जे आयुक्त शहराविरुध्द अपशब्द बोलतात अशा आयुक्तांविरुध्द बोलण्याचा सर्वाना अधिकार आहे. श्री. महाराज भुल्लर जे नेहमी आयुक्तांविरुध्द बोलत आले आहेत ते आता येथे आले आहेत, अविश्वास प्रस्ताव का आणला आहे ते तुम्हाला आता सांगतील. आयुक्तांनी देखिल येथे उपस्थित राहायला हवे. जेणे करुन त्यांना खुलासा करता येईल. आयुक्त साहेब येथे नसल्याने त्यावर चर्चा होवु शकत नाही. आपण वर्षभर सभा स्थगित करत आला आहात, आज सभेत एवढा गंभीर विषय असल्याने सभा स्थगित करावी अशी मी विनंती करतो.

**मा. महापौर :—** श्री. राजेशजी तुम्ही बोला.

**मा. सदस्य श्री.राजेश वधरिया :—** मा. महापौरजी, आमचे मित्र श्री. पुरसवानी यांनी सांगितले की, आयुक्त आज येथे उपस्थित नाहीत, आयुक्त साहेब पंधरा दिवसांच्या सुट्टीवर गेले आहेत, हे सर्वाना आधी पासुनच माहित होते. हे सर्वाना माहित असतानाही काही सदस्यांनी आज सभा ठेवण्यासाठी दबाव आणला होता. असे असताना आज त्यांना मतदान करण्यास काय त्रास होत आहे. त्यांच्याकडे पुरेसे संख्याबळ उपलब्ध नसेल म्हणुन ते असे करत असतील.

**मा. सदस्य श्री.बच्चाराम रुपचंदानी :—** मा. महापौरजी, एनसीपीच्या गटनेत्यांनी सांगितले की, आयुक्त २७ तारखेपर्यत सुट्टीवर आहेत, हे महापौरांना देखिल माहिती होते. असे असताना त्यांनी सभा २४ तारखेला न ठेवता २७ तारखेला ठेवणे आवश्यक होते.

**मा. महापौर :—** २४ तारखेची मागणी आपणच केली होती.

**मा. सदस्य श्री.जमनादास पुरसवानी :—** आम्ही २८ तारखेची मागणी केली होती.

**मा. महापौर :—** असे होते तर त्यावेळी विरोध करायचा होता. मी २४ तारखेला ४.०० वाजता वेळ निश्चित केली होती, परंतू आपण दुपारी २.०० ची मागणी केली होती. आपण त्यावेळी तारीख देखिल बदली करु शकला असता.

**मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :—** एका सभेची वेळ आपण अशीच वाया घालवली होती. आम्ही जिद्द करु इच्छित नव्हतो. एकदा सदस्यांना बाहेर काढण्याचे आदेश दिल्यानंतर आपण गप्प बसुन होता व काहीही न होता ७.०० वाजे पर्यत सभा सुरु राहिली होती. त्या दिवशी देखिल त्या शिपायाला घरी जायचे होते म्हणुन नाईलाजाने आपण मान्यता दिली होती.

**मा. महापौर :—** आपण त्यावेळी २४ तारखेला मान्यता दर्शविली होती.

मा. सदस्य श्री.धनंजय बोडारे :– आम्ही हट्टीपणा करु इच्छित नव्हतो. आम्ही २७ तारीखच बोलणार होतो.

मा. महापौर :– त्यावेळी तुम्ही २४ तारीख बोलला होतात तसेच आता तुम्ही श्री. भुल्लर यांचे कारण सांगीतले होते परंतू ते देखिल आता आले आहेत. श्री. भुल्लर आपण चर्चा करावी.

मा. सदस्य श्री.धनजंय बोडारे :– आज आपण स्थायी समिती का स्थगित केली?

मा. सदस्य श्री.राज असरोंडकर :– मतदान घ्या.

मा. सदस्य श्री.राजेंद्रसिंह भुल्लर :– मा. महापौरजी, आपण असे सांगीतले होते की, तो माणुस येथे उपस्थित असेल तरच चर्चा करावी. तुम्हाला माहिती असताना देखिल, काही बोलले तरी कमी होईल. आमच्या बहिणी येथे बसल्या आहेत, ते कितीही खालच्या स्तराला गेले तरी आम्ही त्या स्तराला जावु शकत नाही. ते असे का बोलले याचा खुलासा त्यांनी येथे येवुन करायला हवा. हरामखोर या शब्दाचा अर्थ काय आहे हे त्यांनी येथे येवुन सांगायला हवे. असे केले नाही तर हे शहर आपल्याला माफ करणार नाही. एक बाहेरचा माणूस येवुन आपल्या शहरवासियांना हरामखोर असे बोलतो. तुम्ही मेहरबानी करुन ही सभा स्थगित करा व ज्या दिवशी ते येतील त्या दिवशी सभा ठेवा. आम्ही तसा प्रस्ताव देखिल दिला आहे.

मा. सदस्य श्री.लाल पंजाबी :– मला या विषयावर बोलायचे आहे.

मा. सदस्य श्री.राज असरोंडकर :– मतदान घ्या.

मा. सदस्य श्री.राजेंद्रसिंह भुल्लर :– मा. महापौर महोदया, आपण मतदान घ्या कारण आपल्या सदस्यांना अशा आयुक्ताला समर्थन दयायचे आहे जो आयुक्त उल्हासनगरवासियांना हरामखोर बोलत आहे. तुमच्या लोकांना त्याच्याशी काही एक देणेघेणे नाही.

मा. सदस्य श्री.देवेंद्रसिंह खेमाणी :– मतदान घ्या.

मा. सदस्य श्री.लाल पंजाबी :– मा. महापौर महोदया, अतिरिक्त आयुक्त, आम्ही अविश्वास ठरावासाठी जी सूचना दिली आहे तर नैसर्गिक न्यायानुसार ज्याच्या विरुध्द हा प्रस्ताव आहे तो समोर असणे आवश्यक आहे. आम्ही त्यावर चर्चा करु इच्छितो तसेच आमचा प्रस्तावही तयार आहे परंतू नैसर्गिक न्यायाप्रमाणे ज्याच्या विरुध्द बोलणार आहोत तो येथे सभागृहात असणे आवश्यक आहे. दुर्भाग्याने ते रजेवर आहेत. आम्हाला असे वाटते की, ते उपस्थित असताना येथे चर्चा करणे योग्य होईल. त्यांना त्यांचे म्हणणे सादर करण्याचा अधिकार दयायला हवा. जर आयुक्त स्वत:हून येवु इच्छित नसतील तर ती गोष्ट वेगळी आहे. परंतू त्यांच्या पश्चात त्यांच्यावर आरोप करणे हे आम्हाला योग्य वाटत नाही. यासाठी आजची सभा स्थगित करुन इतर दिवशी ठेवण्यासाठी आम्ही प्रस्ताव दिला आहे. आम्ही याच्यावर चर्चा करु इच्छितो, आम्ही चर्चेला घाबरत नाही. आमचे श्री. सोनावणे सांगायचे की, त्यांना उत्तर देण्याचा अधिकार आहे, तो हक्क त्यांना मिळायला हवा. यासाठी आजची सभा स्थगित करुन इतर दिवशी ठेवावी असे आम्हाला वाटते. यामुळे त्यांनाही उत्तर देण्याचा अधिकार मिळेल. असा आमचा आग्रह आहे.

यावेळी मा. सदस्य श्री. मोहन साधवानी हे सभागृहातून बाहेर गेले. 

मा. सदस्य श्री.किशोर वनवारी :– मा.महापौरजी आता येथे चर्चा सुरु आहे की, सभा स्थगित करुन २ तारखेला ४.०० वाजता ठेवण्यात यावी. यासाठी सूचक व अनुमोदक यांनी प्रस्ताव तयार करुन आपल्याकडे व आयुक्तांकडे दिला आहे. तुम्हाला ती प्राप्त झाली आहे. आज मा. श्री.उध्दवजी ठाकरे हे उल्हासनगरला येत आहेत हे एक कारण आहे व दुसरे म्हणजे आयुक्त येथे उपस्थित नाहीत. मतदानाचा प्रश्न आहे तर मतदान हे सभा स्थगिती साठी सुध्दा घेता येवु शकते.त्यावेळी माहिती पडेल की, स्थगितीच्या बाजुने किती सदस्य आहेत व विरोधात किती सदस्य आहेत. मतदानाबददल आपले सदस्य जे सांगत आहेत त्याबद्दलही खुलासा करतो की, आज दुपारी १.०० वाजता झालेल्या स्थायी समिती सभेमध्ये आपल्या सोबत असलेल्या ८ सदस्यांपैकी ३ सदस्य अनुपस्थित होते.

तुमचे ५ सदस्य होते तर आमचे ८ सदस्य होते. तरी देखिल आपले सदस्य श्री. राजु जग्यासी, श्री.खेमाणी व आपण सांगितले की, सभा स्थगित करा. त्यावेळी आमच्या ८ सदस्यांनी बहुमत असताना देखिल आपल्या ५ सदस्यांचे म्हणणे ऐकले. हे दुपारी १.०० वाजताचे उदाहरण आहे. जे लोक सांगत आहेत आमच्याकडे बहुमत नाही, ते तर सर्वाना दिसुन येत आहे. हा मुद्दा बहुमताचा नसुन आयुक्तांच्या विश्वासाबद्दलचा प्रश्न आहे. ते विश्वास हरवून बसले आहेत तसेच बहुसंख्य सदस्य त्यांच्या विरोधात आहे हे ठरणार आहे. श्री. भुल्लर यांनी सांगितले की, सभा पहिल्यादा स्थगित होत नाही आहे. यापूर्वी दोन वेळा देखिल सभा स्थगित झाली होती. आमचे म्हणणे असे होते की, आयुक्तांचा मुद्दा असल्याने आयुक्त उपस्थित असायला हवेत. तुमच्याकडे आम्ही जो प्रस्ताव दिला आहे त्यावर मतदान घेतले जावे. २ तारखेला दुपारी ४.००वाजता ही सभा ठेवण्यासाठी मतदान घेतले जावे.

मा. सदस्य श्री.लाल पंजाबी :— नियमा प्रमाणे कोणताही सदस्य कोणत्याही वेळी सभा स्थगित करण्याची मागणी करु शकतो.तो प्रस्ताव मतदानासाठी आधी घेतला जातो यासाठी आधी त्यावर मतदान घ्यावे.

मा. सदस्य श्री.राजु जग्यासी :— मा.महापौरजी, श्री. किशोर वनवारी जे बोलले त्या बद्दल मी आपणास सांगु इच्छितो की, त्यांनी सांगितले की, स्थायी समिती मध्ये आमचे तीन सदस्य नव्हते तर याबद्दल त्यांना मी माहिती देवू इच्छितो की सभा स्थगित करण्याची मागणी मा. सदस्य श्री. मोहन साधवानी व श्री. सुरेश जाधव व आम्ही सर्वानी मिळून केली होती. तसेच यांनी आयुक्तांविरुध्द अविश्वास प्रस्तावासाठी ४७ सदस्यांच्या स्वाक्षरीनिशी पत्र दिले आहे, हे सर्व सभागृहाला माहिती आहे. परंतू आता त्यांच्याकडे ४७ सदस्य आहेत काय? त्यांनी मोजुन बघावे.

यावेळी मा. सदस्य श्री. रामदास उमाप हे सभागृहातून बाहेर गेले. 

मा. सदस्य श्री.देवेंद्रसिंह खेमाणी :— मा. महापौरजी, आपण मतदान घेण्यासाठी आदेश दिले आहे त्या आदेशाचे पालन केले जावे.

मा. सदस्य श्री.नाना पवार :— मा.महापौरजी, मा. आयुक्त साहेब व मा. सचिव साहेब, सभागृहात उपस्थित सर्व सन्माननिय सदस्य मी सभागृहाला विनंती करतो की, ही सभा आज सुरु ठेवली जावी.

मा. सदस्य श्री.जमनादास पुरसवानी :— मा. महापौर महोदया व सचिव साहेब, ......

मा. सदस्य श्री.नाना पवार :— मा. आयुक्तांविरुध्दचा अविश्वासाचा प्रस्ताव ज्या सदस्यांनी येथे आणला आहे व आज त्या विषयावर सभा देखिल ठेवली आहे. येथे काही सदस्यांचे म्हणणे असे आहे की, आयुक्त येथे उपस्थित असायला हवेत. माझ्या मते आज आपण येथे निर्णय घ्यायला हवा. ज्या अधिका—या विरुध्द अविश्वासाचा प्रस्ताव आणला आहे तो अधिकारी येथे उपस्थित राहिल अशी अपेक्षा आपण कशी काय करु शकतो? आयुक्तांचे पद हे एक सन्माननिय पद आहे, अधिकारी आहेत. अधिका—याचा अपमान, अवहेलना व्हायला नको. वारंवार या मुद्दयासाठी सभा स्थगित केली तर योग्य होणार नाही. मला असे वाटते की, काही लोक आयुक्तांना जाणुन बजुन अपमानीत करु इच्छित आहेत. जे आरोप आयुक्त साहेबांवर केले जात आहेत की, आयुक्तांनी काही लोकांना बरेवाईट म्हटले आहे. यात काही तथ्य आहे किंवा नाही हे सर्वाना माहिती नाही. काही लोक बोलले आणि सर्वानी ऐकले असे होणार नाही. माझी विनंती अशी आहे की, ज्या सन्माननिय सदस्यांनी अविश्वासाचा प्रस्ताव आणला आहे त्यांनी तो मागे घ्यावा. आयुक्तांच्या वागणुकीमुळे शहरात फार मोठी घटना घडली आहे असे दिसुन येत नाही. आयुक्तांमुळे विकास कामात बाधा येत आहे असे कोणतेही कारण दिसुन येत नाही. उल्हासनगर शहरात नेहमी असे दिसुन आले आहे की, जे आयुक्त येतात त्यांच्या मागे कोणीना कोणी सदस्य लागतात. मा. महापौरजी मी आपल्याला व सभागृहाला सांगु इच्छितो की, १९९६ मध्ये महापालिकेची स्थापना झाली होती, १९९७ मध्ये जेव्हा येथे सदस्य निवडून आले त्यावेळेस कॅप्टन शूळ हे आयुक्त होते. कॅप्टन शूळ यांनी चांगल्या प्रकारे शहराच्या विकासाचे काम हाती घेतले होते. नि:स्वार्थ अधिकारी असताना देखिल त्यांच्या विरुध्द या सभागृहात खुर्ची व माईक उचलून फेकले गेले होते, पाण्याची बाटली फेकली होती. त्यानंतर पोखरकर साहेब आले, त्यांनाही सभागृहात मोठया प्रमाणात बरेवाईट बोलले गेले. त्यानंतर सोनवणे साहेब आले. सुरवातीला त्यांची स्तुती करण्यात आली व नंतर त्यांच्या विरोधात देखिल काही सदस्य गेले.

मा. सदस्य श्री.किशोर वनवारी :— श्री. सोनवणे यांच्या विरोधात कोण गेले होते?

मा. सदस्य श्री.नाना पवार :— किशोरजी मला बोलू दया. येथे असे दिसुन आले आहे की, ज्या लोकांचे मर्जी प्रमाणे काम होत नाही ते लोक आयुक्तां विरुध्द बोलत आले आहेत. आता कांबळे साहेब येथे आले आहेत चांगल्या प्रकारे काम करत आहेत, त्यांनी कामात शिस्त आणली आहे,कायदयाने काम करीत आहेत. परंतू येथे एक मुद्‌दा उपस्थित केला आहे, तो खरा आहे की खोटा ते माहिती नाही. शहरातील नागरीकाला कोणी बरेवाईट म्हटले तर आम्हाला देखिल वाईट वाटते. परंतू येथे उद्‌देश दुसराच आहे. मी सभागृहात पुन्हा एकदा सांगु इच्छितो की, संपुर्ण देशात मागासवर्गीयांविरुध्द एक षडयंत्र सुरु आहे.

मा. सदस्य श्री.प्रशांत जाधव :— हे बघा साहेब, येथे मागासवर्गीयांचा काहीही विषय सुरु नाही. तो विषय येथे आणु नका, सभागृहाची दिशाभुल करु नका. हा विषय तुम्ही सभागृहात आणु नका. तुम्हाला काय बोलायचे असेल ते बोला परंतू जातीयवादाचा विषय आणु नका.

यावेळी काही सदस्य एकाच वेळी जोरजोराने बोलत असल्याने कोण काय बोलत आहे ते कळून येत नव्हते.

मा. सदस्य श्री.नाना पवार :— तुम्ही कोणाच्याही विचारावर बंधन आणु शकत नाही.

मा. सदस्य श्री.मोहन बेहरानी :— तुम्ही येथे जातीयवाद पसरवत आहात.

मा. सदस्य श्री.नाना पवार :— तुम्हाला जे बोलायचे आहे ते तुम्ही तुमच्या भाषणात बोला. मला माझे बोलणे पुर्ण करु दया.

मा. सदस्य श्री.विनोद ठाकुर :— मेहरबानी करुन येथे जातीयवाद आणु नका. एखादा आयुक्त ब्राम्हण असता तर मग काय केले असते? आयुक्त काम करीत नाही म्हणुन आम्ही अविश्वास प्रस्ताव आणला आहे. त्यामध्ये जातीयवाद आणु नका.

मा. सदस्य श्री.नाना पवार :— आम्ही जातीयवाद आणत नाही, या राज्यामध्ये काय चालु आहे हे आपण स्वत: पहात आहात. हे मी सांगण्याची आवश्यकता नाही.

मा. सदस्य श्री.विनोद ठाकुर :— नाना पवार घरी बसले असताना त्यांचा अपघात झाला आहे असे सांगुन येथे सभा स्थगित करण्यासाठी सगळयाच्या सहया घेतल्या होत्या. तेव्हा हेच सदस्य होते.

मा. सदस्य श्री.नाना पवार :— या देशामध्ये व राज्यामध्ये मागासवर्गीयांच्या बाबतीत काय सुरु आहे हे सर्व आपण पहात आहोत. येथे आम्ही आमचा विचार व्यक्त करीत असताना तुम्ही आमच्या विचारावर घाला घालू शकत नाही. आम्ही बोलणार, हे आमचे विचार आहेत. मी या सभागृहामध्ये रिपब्लीकन पक्षाचा कार्यकर्ता म्हणुन बोलत आहे हे तुम्ही लक्षात ठेवा. आम्ही आमचे विचार व्यक्त करतो तुम्ही तुमचे विचार व्यक्त करा.

यावेळी मा. सदस्य श्री. नरेंद्रकुमार ठाकुर हे सभागृहातून बाहेर गेले. 

मा. सदस्य श्री. विनोद ठाकुर :— लगे रहो.

मा. सदस्य श्री. नाना पवार :— हा काय तमाशा थोडीच सुरु आहे. तमाशा तुम्ही करीत आहात. मी सभागृहात उपस्थित असलेल्या मागासवर्गीय नगरसेवकांना विनंती करतो की, ......

मा. सदस्य श्री. प्रशांत जाधव :— येथे मागासवर्गीयांचा विषय सुरु नसुन आयुक्तांचा विषय सुरु आहे. तुम्ही देखिल मागासवर्गीय आहात व आम्ही देखील मागासवर्गीय आहोत. तुम्हाला त्यावर बोलण्याची काही गरज नाही. तुम्ही एक वरीष्ठ सदस्य आहात तुम्ही असा शब्द वापरु नका. कृपा करुन आयुक्तांबददल बोला, आयुक्तांना कोणतीही जात नाही. ते या शहराचे सेवक आहेत याची माहिती तुम्हाला असायला हवी.

मा. सदस्य श्री. विनोद ठाकुर :— भावनांशी खेळू नका.

मा. सदस्य श्री. नाना पवार :— मा. महापौरजी, मी बोलू इच्छितो.

मा. सदस्य श्री. विनोद ठाकुर :— माझा हरकतीचा मुद्दा आहे. मा. महापौरजी येथे आयुक्त बसले आहेत, त्यांची जात व धर्म दाखवायची काहीही आवश्यकता नाही. आम्ही सर्व मागासवर्गीय आहोत, येथे जातीचा उल्लेख करण्याची आवश्यकता नाही.

मा. महापौर :— सर्वांना बोलण्याची संधी देण्यात येत आहे त्यामुळे मध्ये मध्ये उठून बोलू नका, त्यांना त्यांचे बोलणे पूर्ण करु दया.

मा. सदस्य श्री. प्रशांत जाधव :— ते सभागृहात काहीही अपशब्द बोलले तर आम्ही ऐकुन घ्यायचे का? ते जर तसे बोलले नाहीत तर आम्ही देखिल मध्ये बोलणार नाही. त्यांनी त्यांचे म्हणणे मांडावे आमची काही हरकत नाही. परंतू त्यांनी शब्दांचा प्रयोग योग्य प्रकारे करायला हवा. आम्ही त्यांना तशी विनंती करत आहोत.

मा. सदस्य श्री. नाना पवार :— मा. महापौरजी, मी माझे मित्र श्री.प्रशांत जाधव यांना आपल्या माध्यमातून काही सांगु इच्छितो. ते असे म्हणतात की, सभागृहात जातीवर बोलायला नको. परंतू मी अनुसुचित जातीच्या आरक्षणातुन येथे प्रतिनिधीत्व करीत आहे.

मा. सदस्य श्री. प्रशांत जाधव :— आम्ही देखिल त्याच आरक्षणातून निवडून आलो आहोत.

मा. सदस्य श्री. होशियारसिंह लबाना :— तुम्ही नंतर बोला आधी त्यांना त्यांचे बोलणे पुर्ण करु दया.

यावेळी मा. सदस्य श्री. मोहन साधवानी यांनी पुन्हा सभागृहात प्रवेश केला.

मा. सदस्य श्री. प्रशांत जाधव :— जर ते चुकीचे बोलत असतील तर आम्ही ऐकुन घेवु का? आम्ही ऐकुन घेणार नाही मग ते कोणीही असो.

मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी :— तुम्ही किती वेळा बोलणार आहात?

मा. सदस्य श्री. प्रशांत जाधव :— आयुक्तांबद्दल जे बोलायचे असेल ते बोला.

मा. सदस्य श्री. नाना पवार :— तुम्ही मध्ये अडथळा का आणत आहात?

मा. सदस्य श्री. प्रशांत जाधव :— तुम्ही चुकीचे बोलत आहात. तुम्ही येथे जातीभेद आणायलाच नको होता. तुम्ही मागासवर्गीयांच्या भावनांशी खेळण्याचा प्रयत्न करु नका.

मा. सदस्य श्री. नाना पवार :— जातीभेद तुम्ही करीत आहात. मा. महापौरजी, मी असे बोललो की मी येथे अनुसूचित जाती साठी आरक्षित असलेल्या प्रभागातुन निवडून आलो आहे. मी अनुसूचित जातीचा लोकप्रतिनिधी आहे हे कोणीही नाकारु शकत नाही.

मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी :— तुम्ही एकटेच नाही तर बरेच लोक निवडून आले आहेत.

मा. सदस्य श्री. नाना पवार :— मला माझे विचार व्यक्त करु दया.

मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी :— तुम्ही आम्हाला किती वेळ महाभारताची कथा ऐकवणार आहात? जातीवाद पसरवत आहात.

मा. सदस्य श्री. नाना पवार :— तुम्ही दोन मिनीट शांतपणे ऐकुन घ्या.

मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी :— दोन मिनीटाची पंधरा मिनीटे झाली आहेत.

मा. सदस्य श्री.नाना पवार :— जो पर्यत तुम्ही मला बोलू देणार नाही तो पर्यत मी उभा राहिन.

मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी :— उभे रहा आणि टाईमपास करा.

यावेळी मा. सदस्य श्री. रामदास उमाप यांनी पुन्हा सभागृहात प्रवेश केला.

मा. सदस्य श्री. नाना पवार :— मा. महापौरजी मी सभागृहातील सर्व मागासवर्गीय सदस्यांना विनंती करतो की, त्यांनी त्यांच्या सदस्यांना विनंती करावी व हा जो अविश्वास ठराव आणला आहे तो मागे घ्यावा. अन्यथा माझी दुसरी विनंती अशी आहे की, ही सभा स्थगित न करता याच सभेत मतदान घ्यावे. कारण हा आयुक्त दर्जाच्या अधिका—याचा विषय आहे. त्यांचीही अवहेलना व्हायला नको. आज सभागृहात त्यांच्या विरुध्द अविश्वासाचा प्रस्ताव आणला आहे त्यामुळे त्याच्यावर मतदान घ्यावे. धन्यवाद!

मा. महापौर :— राजेशजी आपण काही बोलू इच्छित आहात काय?

मा. सदस्य श्री.राजेश वधरिया :— मा.महापौरजी, काही सदस्यांनी सांगीतले की, आयुक्त येथे उपस्थित नाहीत तर त्यांची वाट बघीतली जावी. यापूर्वी काही सभांमध्ये आयुक्त अनुपस्थित असताना देखिल त्यांच्यावर आरोप लावण्यात आले होते. त्यामुळे ते येथे उपस्थित असायला हवे हे तर्कसंगत होत नाही. कारण ते यापूर्वी येथे नसताना देखिल त्यांच्यावर आरोप लावले होते. दुसरे म्हणजे महापौरानी मतदान घेण्याचे आदेश दिल्या नंतर ऐवढी चर्चा का होत आहे हे मला कळुन येत नाही. महापौरांनी एकदा मतदान घेण्याचे आदेश दिल्या नंतर मतदान घ्यायला हवे.

यावेळी मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण, श्री. राजेंद्र चौधरी यांनी सभागृहात प्रवेश केला.

मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी :— महापौरांनी आदेश दिला ते आम्ही ऐकले आहे परंतू येथे निर्णय बहुमताने घेतला जातो.

मा. महापौर :— मी, सचिवांना मतदान घेण्यासाठी आदेश देत आहे. त्यांनी मतदान घ्यावे.

मा. सदस्य श्री. प्रमोद टाले :— मा. महापौरजी, आज येथे जो ठराव आणला आहे.......

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे :— सचिव साहेब कायदा काय आहे ते तुम्ही सांगा. आम्ही सभा चालवू देणार नाही, मनमानी करु देणार नाही.

यावेळी काही सदस्य एकाच वेळी जोरजोराने बोलत असल्याने कोण काय बोलत आहे ते कळून येत नव्हते.

मा.महापौर :— सचिव तुम्ही मतदान घ्या. सभा २४ तारखेला ठेवण्यासाठी तुम्हीच मागणी केली होती त्यामुळे आता मतदान करा.

मा. सदस्य श्री.धनंजय बोडारे :— कायदा काय सांगतो?

मा. सदस्य श्री.मोहन बेहरानी :— येथे बीएमसी ॲक्ट चालतो, ज्योती कालानी ॲक्ट चालत नाही.

मा. सदस्य श्री..धनंजय बोडारे :— सचिव साहेब, कायदा काय आहे तो सांगा.

मा. सदस्य श्री.जमनादास पुरसवानी :— मा. महापौर महोदया, महापालिकेच्या नियमावली नुसार, नियमावलीत स्पष्ट लिहिले आहे की, सभेचे कामकाज चालु असताना सभागृहातील कोणताही सदस्य जर सभा स्थगित करण्यासाठी प्रस्ताव देत असेल तर सभा स्थगित करण्याच्या प्रस्तावावर आधी मतदान घ्यायला हवे.

मा. सदस्य श्री.धनंजय बोडारे :— सचिवजी, सभा जर चुकीची चालली तर आपल्यावर कारवाई होईल.

मा. सदस्या श्रीमती जया साधवानी :— कायदा काय आहे?

मा. महापौर :— मतदान घेण्यासाठी मी आधीच आदेश दिला आहे.

मा. सदस्य श्री.राज असरोंडकर :— मा. महापौरांच्या आदेशाचे पालन व्हायला हवे.

मा. सदस्य श्री. राजेश वधरिया :— यांचा प्रस्ताव नंतर आला आहे. महापौरांनी मतदान घेण्यासाठी आधीच आदेश दिला आहे.

मा. सदस्य श्री. शांताराम निकम :— मतदान घ्या.

मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी :— दादागिरी चालणार नाही.

मा. सदस्य श्री. राज असरोंडकर :— मा. महापौर महोदया आपल्या आदेशाचे पालन व्हायला हवे.

मा. सदस्य श्री. देवेंद्रसिंह खेमाणी :— मा. महापौरांच्या आदेशाचे पालन केले जावे.

यावेळी काही सदस्य एकाच वेळी जोरजोराने बोलत असल्याने कोण काय बोलत आहे ते कळून येत नव्हते.

मा. सदस्य श्री.जमनादास पुरसवानी :— महापालिकेचा नियम काय सांगतो ते बघा.

मा. सदस्य श्री.देवेंद्रसिंह खेमाणी :— आपला प्रस्ताव येण्यापूर्वीच महापौरांनी मतदानाचे आदेश दिले आहेत.

मा.महापौर :— सचिव साहेब तुम्ही मतदान घ्या.

मा. सदस्य श्री.प्रशांत जाधव :— मतदान कसे होईल आम्हाला कायदा सांगा.

मा. सदस्य श्री.देवेंद्रसिंह खेमाणी :— मा. महापौरांनी पुन्हा मतदान घेण्याचे आदेश दिले आहेत त्यामुळे सचिवांनी त्यांच्या आदेशाचे पालन करावे.

मा. सदस्य श्री.धनंजय बोडारे :— चुकीच्या आदेशाचे पालन करु नका. सचिव साहेब आदेश चुकीचा असेल तर त्याचे पालन करण्याची गरज नाही.

मा. सदस्य श्री.राजेश वधरिया :— मा. महापौरजी......

मा. सदस्य श्री.प्रशांत जाधव :— सचिवांना बोलू दया, तुम्ही खाली बसा.

मा. सदस्या श्रीमती कमला शर्मा :— मा.महापौरांचा आदेश आहे, मतदान घ्या.

मा. सदस्य श्री.शांताराम निकम :— सचिवजी तुम्ही नियम सांगा.

मा. सदस्य श्री.लाल पंजाबी :— आम्ही जो ठराव दिला आहे त्याचे काय झाले?

मा. सदस्य श्री.राजेश वधरिया :— तुम्ही स्थगितीचा प्रस्ताव देण्यापूर्वीच महापौरांनी मतदानाचे आदेश दिले आहेत त्यामुळे आयुक्तां विरुध्द प्रस्तावावर मतदान घेतले जावे. एकदा मतदानाचे आदेश दिल्या नंतर हे प्रस्ताव कसे काय आणु शकतात?

यावेळी काही सदस्य एकाच वेळी जोरजोराने बोलत असल्याने कोण काय बोलत आहे ते कळून येत नव्हते.

मा. सदस्य श्री.जमनादास पुरसवानी :— नियमामध्ये स्पष्ट दिले आहे की, कोणत्याही वेळी प्रस्ताव देता येवु शकतो.

मा. सदस्य श्री.मोहन बेहरानी :— सभा कायदयाने चालते.

मा. सदस्या श्रीमती सुजाता रिझवानी :— मा.महापौरांनी मतदानाचे आदेश दिले आहे त्याचे पालन करावे.

मा. सदस्या श्रीमती कमला शर्मा :— मतदाना शिवाय दुसरा कोणताही पर्याय उपलब्ध नाही.

मा. सदस्य श्री.शांताराम निकम :— मतदान घ्या, संध्याकाळी श्री.उध्दव ठाकरे येणार आहेत. टाईमपास करु नका.

महापालिका सचिव :— मा. महापौर महोदया, सभेचे कामकाज कायदा व नियमा प्रमाणे चालायला हवे. आपण जो काही निर्णय घ्याल तो आपला असेल त्यापूर्वी मी एक आवश्यक सूचना देवू इच्छितो कारण योग्य सूचना देणे ही माझी जबाबदारी आहे.

मा.महापौर :— तुम्ही सूचना देवु नका मतदान घ्या.

यावेळी काही सदस्य एकाच वेळी जोरजोराने बोलत असल्याने कोण काय बोलत आहे ते कळून येत नव्हते.

मा. सदस्य श्री.किशोर वनवारी :— त्यांना बोलू दया.

मा. सदस्य श्री.देवेंद्रसिंह खेमाणी :— बोलण्याची काही आवश्यकता नाही तुम्हाला आदेश दिला आहे त्याचे पालन करा.


मा. सदस्य श्री.राज असरोंडकर :— तुम्हाला सूचना देण्यासाठी आदेश दिलेले नाहीत.

मा. सदस्य श्री.रमेश चव्हाण :— तुम्ही त्यांचा आवाज दाबण्याचा प्रयत्न करत आहात. कायदा काय आहे ते त्यांना सांगु दया.

मा. सदस्य श्री.किशोर वनवारी :— सचिव साहेबांना बोलु दया.

मा. सदस्य श्री.सुरेश जाधव :— मा. महापौरजी कायदयाचा गळा दाबु नका.

यावेळी काही सदस्य एकाच वेळी जोरजोराने बोलत असल्याने कोण काय बोलत आहे ते कळून येत नव्हते.

 यावेळी मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी, श्री. महेंद्र मुलचंदानी, श्री. अनिल जयसिंगानी व श्री. मनोज साधवानी यांनी सभागृहात प्रवेश केला.

<u>मा.महापौर :—</u> सचिव साहेब मतदान घेण्याच्या बाजुने नाहीत त्यामुळे माझे आदेश आहेत की, जे सदस्य आयुक्तांच्या ........

यावेळी काही सदस्य एकाच वेळी जोरजोराने बोलत असल्याने कोण काय बोलत आहे ते कळून येत नव्हते.

<u>मा. सदस्य श्री.मोहन बेहरानी :—</u> कायदयाचा खुन करु नका.

<u>मा. सदस्या श्रीमती मालती करोतिया :—</u> दादागिरी चालणार नाही.

<u>मा. सदस्य श्री.मोहन बेहरानी :—</u> लोकशाहीचा खुन करु नका.

<u>मा.महापौर :—</u> यांना बोलण्याची परवानगी दिली नाही. तुमच्याकडे बहुमत असेल तर आयुक्तांविरुध्द मतदान करा. जे आयुक्तांविरुध्द मतदान करु इच्छितात त्यांनी आपले हात वर करावेत.

*यावेळी सभागृहात उपस्थित असलेल्या सदस्यांपैकी कोणत्याही सदस्याने आपला हात वर केला नाही किंवा मत जाहीर केले नाही.*

<u>मा. सदस्य श्री.मोहन बेहरानी :—</u> हात कसले वर करतात, कोणीही तुमचे येथे ऐकणार नाही.

<u>मा. महापौर :—</u> जे आयुक्तांच्या सोबत राहू इच्छितात .......

<u>मा. सदस्य श्री.मोहन बेहरानी :—</u> दादागिरी चालणार नाही.

<u>मा. सदस्य श्री.शांताराम निकम :—</u> भांडणे करु नका.

<u>मा. सदस्य श्री.मोहन बेहरानी :—</u> ए सरदार, xxxxxxxxxxxxxxxx

<u>मा. सदस्य श्री.शांताराम निकम :—</u> तुम्ही उल्हासनगर मधील जनतेला काय संदेश देत आहात?

<u>मा. महापौर :—</u> जे आयुक्तांच्या बाजुने आहेत त्यांनी आपले हात वर करावेत.

*यावेळी उपस्थित बहुसंख्य सदस्य सभा स्थगित करण्यासाठी व्यासपीठासमोर जमा होवुन जोरजोराने घोषणा देत होते व महापौरांच्या मतदानाच्या निर्णयास विरोध करीत होते. दरम्यानच्या कालावधीत महापौरांच्या सांगण्यावरुन काही सदस्यांनी हात वर केले. त्यांची नांवे पुढीलप्रमाणे आहेत.*

१ श्रीमती ज्योती कालानी
२ श्री. लिंगे सुर्यकांत (बबन)
३ श्री. मोकल चंदाराम विठोबा
४ श्री. एडके गणपत गोविंद
५ श्रीमती. शर्मा कमला गंगाधर
६ श्री. वलेचा पृथ्वी व्यापारीलाल
७ श्री. गुप्ता प्रभुनाथ दुखंती
८ श्रीमती गुप्ता अनिता धमेंद्र

९ श्री. पवार नाना आनंदा
१० श्रीमती आहुजा निता प्रकाश
११ श्री. जग्यासी राजु किशनचंद
१२ श्री. निकम शांताराम ओंकार
१३ श्रीमती. मसंद माया घनश्यामदास
१४ श्री. गायकवाड सुरेश नामदेव
१५ श्री. जेसवानी सतरामदास फतनदास
१६ श्रीमती खिलनानी भावना रवी
१७ श्री. असरोंडकर राजेश उर्फ राज जयसिंग
१८ श्री. खेमाणी देवेंद्रसिंह चंदासिंह
१९ श्री. लबाना होशियारसिंग हरिसिंग
२० डॉ. (श्रीमती) नाथानी निना प्रकाश
२१ श्रीमती छाब्रिया भारती पहलाज
२२ श्रीमती. रिझवाणी सुजाता रमेश
२३ श्रीमती दासानी मिनु राजकुमार
२४ श्रीमती भावना रामचंदानी
२५ श्री राजेश वधरिया *(हयांना मतदानाचा अधिकार नाही)*

<u>मा. सदस्य श्री.मोहन बेहरानी</u> :— दादागिरी चालणार नाही, गुंडागर्दी चालणार नाही. गुंडाचे राज्य संपले आहे.

<u>काही सदस्य :—</u> महापौर चोर आहेत, महापौर हाय हाय.

<u>मा. महापौर :—</u> २५ सदस्यांनी आयुक्तांच्या बाजुने हात वर केले आहेत.आयुक्त जावु नये अशी त्यांची इच्छा आहे. यासाठी हा प्रस्ताव पास केला जात आहे. कृपया जन गण मन साठी उभे राहावे.

<u>मा. सदस्य श्री.मोहन बेहरानी</u> :— महापौर हाय हाय, गुंडागर्दी चालणार नाही.

<u>मा. महापौर :—</u> आयुक्तांच्या बाजुने २५ सदस्यांनी मतदान केले असल्याने हा प्रस्ताव नामंजुर केला जात आहे. कृपया जन गण मन साठी उभे राहावे.

*यावेळी महापौरांकडुन प्रस्ताव पास झाल्याची घोषणा झाली मात्र सभेसमोर कोणत्याही प्रकारचा लेखी गोषवारा किंवा प्रस्ताव सादर करण्यात आला नव्हता. त्याचप्रमाणे विरोधी पक्षातील सदस्यांचे मत देखिल आजमावण्यात आले नाही. कोणत्याही पालिका सदस्याने आपले मत स्पष्टपणे जाहीर करणे आवश्यक आहे. या परिस्थितीत विरोधी पक्षातील सदस्यांचे मत गृहित धरुन सदरचा निर्णय सर्वानुमते होता की बहुमताने याबाबत महापौरांनी काहीही घोषणा केली नाही. तसेच महापौरांनी वर केलेल्या दोन्ही घोषणा परस्पराविरोधी असल्याचे दिसुन येते त्यामुळे महापौरांनी नेमका काय निर्णय घेतला ते कळुन आले नाही.*

*यावेळी गदारोळ सुरु असतानाच मा. महापौर व इतर काही सदस्यांनी जन गण मन गायनास सुरुवात केली. यावेळी काही सदस्य मात्र त्यांच्या जागेवरच बसुन होते.*

*जन गण मन संपल्यानंतर मा. महापौर व खालील सदस्य/सदस्या सभागृहातुन बाहेर गेल्या.*

१ श्रीमती ज्योती कालानी
२ श्री. लिंगे सुर्यकांत (बबन)
३ श्री. मोकल चंदाराम विठोबा
४ श्री. एडके गणपत गोविंद
५ श्रीमती. शर्मा कमला गंगाधर
६ श्री. वलेचा पृथ्वी व्यापारीलाल
७ श्री. गुप्ता प्रभुनाथ दुखंती
८ श्रीमती गुप्ता अनिता धर्मेंद्र

| | |
|---|---|
| ९ | श्री. पवार नाना आनंदा |
| १० | श्रीमती आहुजा निता प्रकाश |
| ११ | श्री. जग्यासी राजु किशनचंद |
| १२ | श्री. निकम शांताराम ओंकार |
| १३ | श्रीमती. मसंद माया घनश्यामदास |
| १४ | श्री. गायकवाड सुरेश नामदेव |
| १५ | श्री. जेसवानी सतरामदास फतनदास |
| १६ | श्रीमती खिलनानी भावना रवी |
| १७ | श्री. असरोंडकर राजेश उर्फ राज जयसिंग |
| १८ | श्री. खेमाणी देवेंद्रसिंह चंदासिंह |
| १९ | श्री. लबाना होशियारसिंग हरिसिंग |
| २० | डॉ. (श्रीमती) नाथानी निना प्रकाश |
| २१ | श्रीमती छाब्रिया भारती पहलाज |
| २२ | श्रीमती. रिझवाणी सुजाता रमेश |
| २३ | श्रीमती दासानी मिनु राजकुमार |
| २४ | श्रीमती भावना रामचंदानी |
| २५ | श्री मनोज साधवानी |
| २६ | श्री राजेश वधरिया |

*यावेळी खालील सदस्य सभागृहात आसनस्थ होते.*

१. श्री.मोहन बेहरानी
२. श्रीमती जया साधवानी
३. श्री. मोहन साधवानी
४. श्रीमती मालती करोतिया
५. श्री. अशोक ठाकुर
६. श्री. भालेराव गौतम
७. श्रीमती बेबी वसीटा
८. श्रीमती मोना वनवारी
९. श्रीमती कोमल बठीजा
१०. श्रीमती दिपा पंजाबी
११. श्रीमती किरण माखिजा
१२. श्रीमती रेखा कारिरा
१३. श्री. किशोर वनवारी
१४. श्री. प्रमोद टाले
१५. श्री. मोहन रामरख्यानी
१६. श्री. लालबिहारी यादव
१७. श्री.लुंड गोविंदराम
१८. श्री. धनंजय बोडारे
१९. श्री. दिलीप गायकवाड
२०. श्री. राजेंद्रसिंह भुल्लर
२१. श्री. नथु सोनावणे
२२. श्रीमती लक्ष्मी ससाणे
२३. श्रीमती नंदिनी बामणकर
२४. श्रीमती जयश्री सुनिल सुर्वे
२५. श्री. ईश्वर पमनानी
२६. श्री. अंकुश म्हस्के
२७. श्री. वाघे शामू
२८. श्री. राजु टेकचंदानी

२९. श्री. विनोद ठाकुर
३०. श्री. बच्चाराम रुपचंदानी
३१. श्री. सुरेश जाधव
३२. श्री. जमनादास पुरसवानी
३३. श्रीमती संगिता जावळे
३४. श्रीमती रेखा कृष्णानी
३५. श्री. रामदास उमाप
३६. श्री. प्रशांत जाधव
३७. श्रीमती किरण माने
३८. श्री.रमेश चव्हाण
३९. श्री. राजेद्र चौधरी
४०. श्री. महेद्र मुलचंदानी
४१. श्री. अनिल जयसिंघानी.
४२. श्री लाल पंजाबी
४३. श्री राजु इदनानी
४४. श्री. दिलीप लालवानी

*यावेळी काही सदस्यांनी आयुक्तांच्या जागी प्राधिकृत अधिकारी श्री. नाना रौराळे यांना व इतर सर्व अधिका–यांना बाहेर येण्यासाठी अटकाव केला व सभेत बसायला सांगितले. श्री. नाना रौराळे हे अधिकारी कक्षात येवुन बसले.*

*त्यानंतर उपस्थित पालिका सदस्यांनी खालीलप्रमाणे संभाषणास सुरुवात केली.*

<u>मा.सदस्य श्री.धनंजय बोडारे:–</u> सभेचे कामकाज चालविण्यासाठी मी, श्री. मोहन बेहरानी यांचे नांव पीठासीन अधिकारी म्हणुन सूचवित आहे.

<u>मा.सदस्या श्रीमती जया साधवानी :–</u> मी श्री. मोहन बेहरानी यांच्या नावाला अनुमोदन देत आहे.

<u>महासभा ठराव क्र. २६ अ</u> <u>दिनांक :– २४/११/२००६</u>

सुचकाचे नाव :– श्री. धनंजय बोडारे

अनुमोदकाचे नाव :– श्रीमती जया साधवानी

ही महासभा सभेचे कामकाज चालु ठेवण्यासाठी श्री. मोहन बेहरानी यांची सर्वानुमते पीठासीन अधिकारी म्हणुन निवड करीत आहे.

सुचकाची सही

अनुमोदकाची सही

<u>सर्वानुमते मंजुर</u>

यावेळी श्री. मोहन बेहरानी  हे सर्वानुमते पीठासीन अधिकारी म्हणुन आसनस्थ झाले.

**मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :–** श्री. रौराळे यांनी आयुक्तांच्या जागेवर बसावे.

**मा. पीठासीन अधिकारी :–** मी श्री. रौराळे यांना आदेश देतो की, त्यांनी व्यासपीठावर येवुन बसावे.

**मा.सदस्य श्री.प्रमोद टाले :–** आयुक्त खुर्चीवर बसत नसतील तर त्यांच्यावर कायदेशिर कारवाई व्हायला हवी.

**मा.सदस्य श्री.किशोर वनवारी :–** कृपया शांतता राखा.
**मा.सदस्य श्री.लाल पंजाबी :–** मा.महापौरजी मी बोलु इच्छितो.आपण इतिवृत्त लिहिण्यासाठी त्यांना आदेश दया.
**मा. पीठासीन अधिकारी :–** इतिवृत्त लिहिण्यासाठी मी आदेश देत आहे. मी सभा सुरु करण्यासाठी आदेश देत आहे सर्वानी आप आपल्या जागेवर बसुन घ्यावे.
**मा.सदस्य श्री.लाल पंजाबी :–** मा. महापौरजी सभा सुरु असताना मी सांगीतले होते की, कोणतीही सभा कोणत्याही वेळी स्थगित करण्याची मागणी करता येवु शकते. नियमावलीतील पृष्ठ क्र.४ वर नियम स्पष्ट आहे. नियमानुसार कोणताही सदस्य कोणत्याही वेळी सभा स्थगित करण्याची मागणी करु शकतो.  यासाठीचा प्रस्ताव आम्ही सुरवातीलाच दिला होता. मी स्थगिती प्रस्ताव वाचून दाखवितो.  आमचे विरोधी पक्ष नेते श्री. धनंजय बोडारे व श्री. बच्चाराम रुपचंदानी यांनी यासाठी प्रस्ताव दिला होता.  मी आपणास प्रस्ताव वाचून दाखवितो. ''आम्ही खाली स्वाक्षरी करणारे पालिका सदस्य उल्हासनगर महानगरपालिकेची दिनांक २४/११/२००६ रोजी दुपारी २–००वाजता होणा–या तातडीच्या विशेष महासभेत आयुक्त उपस्थित नसल्यामुळे सदरची सभा स्थगित करुन दिनांक २/१२/२००६ रोजी सायंकाळी ४–०० वाजता ठेवण्यात यावी.'' तसेच ठराव पुढील प्रमाणे आहे. '' ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केलेल्या कारणांमुळे दिनांक २४/११/२००६ रोजीच्या सभेचे कामकाज पुढे ढकलुन सदरची सभा  दिनांक २/१२/२००६ रोजी सायंकाळी ४–०० वाजंपर्यत स्थगित करण्यास  मान्यता देत आहे.'' मला असे वाटते की, सचिवांनी या बद्दल खुलासा करावा.  कायदा स्पष्ट आहे.
**मा. पीठासीन अधिकारी :–** सभागृहात कोणताही प्रस्ताव बहुमताच्या आधारे आणावा लागतो.  मी या प्रस्तावावर मतदान घेवु इच्छितो.

यावेळी मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी हे सभागृहातून बाहेर गेले. 

**मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :–** ही सभा शनिवार २.१२.२००६ रोजी दूपारी ४.०० वाजे पर्यत स्थगित केली जावी.
**मा. पीठासीन अधिकारी :–** जे सदस्य ही सभा शनिवार दिनांक २.१२.२००६ रोजी दूपारी ४.०० वाजे पर्यत स्थगित करण्याच्या बाजुने आहेत त्यांनी कृपया आपले हात वर करावेत.

१ श्री.मोहन बेहरानी
२ श्रीमती जया साधवानी
३ श्री. मोहन साधवानी
४ श्रीमती मालती करोतिया
५ श्री. अशोक ठाकुर
६ श्री. भालेराव गौतम
७ श्रीमती बेबी वसीटा
८ श्रीमती मोना वनवारी
९ श्रीमती कोमल बठीजा
१० श्रीमती दिपा पंजाबी
११ श्रीमती किरण माखिजा
१२ श्रीमती रेखा कारिरा
१३ श्री. किशोर वनवारी
१४ श्री. प्रमोद टाले

१५ श्री. मोहन रामरख्यानी
१६ श्री. लालबिहारी यादव
१७ श्री.लुंड गोविंदराम
१८ श्री. धनंजय बोडारे
१९ श्री. दिलीप गायकवाड
२० श्री. राजेंद्रसिंह भुल्लर
२१ श्री. नथु सोनावणे
२२ श्रीमती लक्ष्मी ससाणे
२३ श्रीमती नंदिनी ब्राम्हणकर
२४ श्रीमती जयश्री सुनिल सुर्वे
२५ श्री. ईश्वर पमनानी
२६ श्री. अंकुश मस्के
२७ श्री. वाघे श्यामू
२८ श्री. राजु टेकचंदानी
२९ श्री. विनोद ठाकुर
३० श्री. बच्चाराम रुपचंदानी
३१ श्री. सुरेश जाधव
३२ श्री. जमनादास पुरसवानी
३३ श्रीमती संगिता जावळे
३४ श्रीमती रेखा कृष्णानी

३५ श्री. रामदास उमाप
३६ श्री. प्रशांत जाधव
३७ श्रीम. किरण माने
३८ श्री.रमेश चव्हाण
३९ श्री. राजेद्र चौधरी
४० श्री. महेद्र मुलचंदानी
४१ श्री. अनिल जयसिंघानी.
४२ श्री लाल पंजाबी *(हयांना मतदानाचा अधिकार नाही)*
४३ श्री. जीवन इदनानी *(हयांना मतदानाचा अधिकार नाही)*

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :—</u> किती सदस्य उपस्थित आहेत याचा खुलासा करावा.

<u>मा. सदस्या श्रीमती जया साधवानी :—</u> अनिलजी व महेंद्रजी, धन्यवाद.

<u>मा.पीठासीन अधिकारी :—</u> ४३ सदस्यांनी सभा स्थगित करण्यास मान्यता दर्शविली असल्याने ही सभा २.१२. २००६ रोजी दुपारी ४.०० वाजे पर्यत सर्वानुमते स्थगित करण्यात येत आहे.

*<u>प्रस्ताव :</u>*

सूचक : श्री. धनंजय बोडारे

अनुमोदक : श्री. बच्चाराम रुपचंदानी

विषय : सभा स्थगित करणेबाबत....


आम्ही खाली स्वाक्षरी करणारे पालिका सदस्य उल्हासनगर महानगरपालिकेची दिनांक २४/११/२००६ रोजी दुपारी २—००वाजता होणा—या तातडीच्या विशेष महासभेत आयुक्त उपस्थित नसल्यामुळे सदरची सभा स्थगित करुन दिनांक २/१२/२००६ रोजी सायंकाळी ४—०० वाजता ठेवण्यात यावी.

<u>महासभा ठराव क्र. २६ ब</u>   <u>दिनांक : २४/११/२००६</u>

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केलेल्या कारणांमुळे दिनांक २४/११/२००६ रोजीच्या सभेचे कामकाज पुढे ढकलुन सदरची सभा दिनांक २/१२/२००६ रोजी सायंकाळी ४—०० वाजंपर्यत स्थगित करण्यास मान्यता देत आहे.

<u>सर्वानुमते</u>

पीठासीन अधिकारी
विशेष महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

यावेळी मा. सदस्य श्री. महेंद्र मुलचंदानी व श्री. अनिल जयसिंगानी हे सभागृहातून बाहेर गेले. 

<u>मा.सदस्य श्री.किशोर वनवारी :—</u> यासाठी सभासूचना काढण्यात यावी.

<u>मा. पीठासीन अधिकारी :—</u> सभासूचना काढण्यासाठी सचिवांना आदेश देत आहे.

<u>मा. सदस्या श्रीमती जया साधवानी :—</u> सभा सूचना काढणार नाही का?

<u>मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :—</u> शनिवार २.१२.२००६ दुपारी ४.०० वाजे पर्यत सभा स्थगित करण्यात यावी. तसेच नविन सभा सूचना देखिल काढावी.

<u>मा.सदस्य श्री.प्रमोद टाले :—</u> मा. महापौर, या बैठकीत राष्ट्रगिताचा अपमान झाला आहे त्याबद्दल संबधितांवर कार्यवाही व्हायला हवी.

<u>मा.सदस्य श्री.किशोर वनवारी :—</u> मा. महापौरजी सर्व उपस्थित सदस्यांच्या सहया घेण्यात याव्यात.

<u>मा. पीठासीन अधिकारी :—</u> या सभेसाठी सर्वाच्या सहया घ्याव्यात. यासाठी मी, सचिवांना आदेश देत आहे.

<u>मा.सदस्य श्री.किशोर वनवारी :—</u> आधी सर्वाच्या सहया घ्याव्यात त्यानंतर राष्ट्रगितास सुरवात करावी.

<u>मा. पीठासीन अधिकारी :—</u> श्री. रौराळे यांनी पीठासीन अधिकारी यांचा अपमान केला आहे त्यामुळे सचिवांनी त्यांच्यावर कार्यवाही करावी.

<u>मा.सदस्य श्री. रामदास उमाप :—</u> मा. महापौरजी २ तारखेला काही सदस्यांचे वैयक्तिक काम असल्याने २ तारखेला सभा न ठेवता ४ तारखेला ठेवावी.

<u>मा.सदस्य श्री.किशोर वनवारी :—</u> मा. महापौरजी ४ तारखेला स्थायी समितीची देखिल सभा असल्याने ही सभा देखिल ४.तारखेला ठेवली तर बरे होईल. किती वाजता ठेवायची?

<u>मा.सदस्य श्री.लाल पंजाबी :—</u> २.०० वाजता ठेवा.

**मा.सदस्य श्री.किशोर वनवारी :—** २.०० वाजता आमचे लोक झोपलेले असतात. ५.०० वाजता ठेवा. सर्वानुमते निर्णय घ्या. ४ तारखेला ४.०० वाजता स्थायी समितीची सभा आहे. महापौरानी २ तारखेला ४.०० वाजता सभा ठेवण्यासाठी जो आदेश दिला आहे तो ठिक आहे.

**मा. सदस्या श्रीमती जया साधवानी :—** मेहुणीच्या जागेवर जीजा बसला. त्या कायदया प्रमाणे काम करीत नाहीत व तुम्ही कायदयाचे मास्टर आहात.

**मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :—** मा. महापौरजी, महापौरांच्या खुर्चीवर बसल्याबददल मी सभागृहातर्फे आपले अभिनंदन करतो. दुसरे म्हणजे २ तारखेला ४.०० वाजता जी सभा ठेवली आहे त्यासाठी नविन सभासूचना काढली जावी. तसेच आज येथे बीपीएमसी अॅक्ट प्रमाणे काम न करता लोकशाहीचा जो खुन केला आहे, ही एक चुकीची प्रथा आहे, सचिवांना बोलू दिले गेले नाही, ते कायदा सांगत होते की बहुसंख्य सदस्य सभा स्थगित करु शकतात. परंतू त्यांचे ऐकले नाही. अशी घटना दुस—यांदा घडली आहे. आता सर्व सदस्यांच्या सहया करुन झाल्या आहेत त्यामुळे आपण आदेश दयावेत.

**मा. पीठासीन अधिकारी :—** मी सचिवांना २ तारखेला ४.०० वाजता सभा आयोजित करण्यासाठी सूचना काढण्याचे आदेश देत आहे.

कृपया राष्ट्रगिताकडे लक्ष दयावे.

जनगणमन या राष्ट्रगीताच्या सामुहिक गायनानंतर दुपारी ३.२२ वाजता मा. पीठासीन अधिकारी यांनी सभा दिनांक २.१२.२००६रोजी दुपारी ४.०० वाजे पर्यत स्थगित केल्याचे जाहिर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांकः– ०२/१२/२००६

## उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. ०२/१२/२००६ रोजीच्या तातडीच्या विशेष महासभेचे इतिवृत्त.

उल्हासनगर महानगरपालिकेची तातडीची विशेष महासभा शुक्रवार, दिनांक २४/११/२००६ रोजी दुपारी २.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभेचे कामकाज स्थगित करुन सदरची सभा दि. ०२/१२/२००६ रोजी दुपारी ४–०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभेत खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य/सदस्या उपस्थित होते / होत्या.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्रीमती जावळे संगिता रमेश | २२. | श्रीमती कारीरा रेखा मन्नुमल |
| २. | श्री. भुल्लर राजेंद्रसिंह विरसिंह | २३. | श्री. पमनानी ईश्वर सतरामदास |
| ३ | श्री. सोनवणे नथु काशीराम | २४. | श्री. बोडारे धनंजय बाबुराव |
| ४. | श्री. टेकचंदानी राजु मथुरादास | २५ | श्रीमती कृष्णानी रेखा हरेश |
| ५. | श्री. वाघे शामु बाबु | २६ | श्री. भालेराव गौतम यशवंत |
| ६. | श्री. गायकवाड दिलीप | २७. | श्रीमती वसिटा बेबी तुलसीदास |
| ७. | श्री. उमाप रामदास राघोजी | २८. | श्री. ठाकुर अशोक भगवानदास |
| ८. | श्री. यादव लालबिहारी बुझारत | २९. | श्रीमती. ससाणे लक्ष्मीबाई रोहिदास |
| ९. | श्री. रोहरा शामसुंदर | ३०. | श्री. म्हस्के अंकुश निवृत्ती |
| १०. | श्री. टाले प्रमोद नामदेवराव | ३१. | श्री. चौधरी राजेंद्र शांताराम |
| ११. | श्री. ठाकुर विनोद लालसिंग | ३२. | श्री. अन्नु मनवानी |
| १२ | श्रीमती वनवारी मोना अशोक | ३३. | श्रीमती पंजाबी दिपा नारायण |
| १३. | श्री. वनवारी किशोर नारायणदास | ३४. | श्री. पुरस्वानी जमनादास खुबचंद |
| १४. | श्री. साधवानी मोहन रहंदोमल | ३५. | श्रीमती बठीजा कोमल अमृत |
| १५. | डॉ. (श्रीमती) साधवानी जया | ३६. | श्री. रामरख्यानी मोहनदास (गाडो) नारायणदास |
| १६. | श्री. लुंड गोविंदराम डोलुमल | ३७. | श्रीमती माखिजा किरण लखी |
| १७. | श्री. रुपचंदानी बच्चाराम बाशोमल | ३८. | श्री. बेहरानी मोहन वर्यलदास |
| १८. | श्री. चव्हाण रमेश महादेव | ३९. | श्रीमती करोतिया मालती राधाचरण |
| १९ | श्री. जाधव प्रशांत जगन्नाथ | ४०. | श्री. इदनानी राजु चंद्रभान |
| २०. | श्री. जाधव सुरेश मधुकर | ४१ | श्री. पंजाबी लाल देवनदास |
| २१. | श्रीमती सुर्वे जयश्री सुनिल | ४२ | श्री. लालवानी दिलीप जेठानंद |

तर,

मा.सदस्य / सदस्या १. श्रीमती रामचंदानी भावना मनोहर २.श्री. लिंगे सुर्यकांत (बबन) ३. श्रीमती मोकल सीमा चंदाराम, ४. श्री. मुलचंदानी महेंद्र परसराम ५. श्रीमती कालानी ज्योती ६.श्री. मोकल चंदाराम विठोबा
७.श्री. एडके गणपत गोविंद ८. श्रीमती. शर्मा कमला गंगाधर ९.श्री. वलेचा पृथ्वी व्यापारीलाल १०.श्रीमती बामणकर नंदिनी गजानन ११.श्री. गुप्ता प्रभुनाथ दुखंती १२.श्रीमती गुप्ता अनिता धमेंद्र १३.श्री. पवार नाना आनंदा १४.श्रीमती आहुजा निता प्रकाश १५.श्री. जग्यासी राजु किशनचंद १६ श्रीमती खांडेकर प्रेमा भिमा,
१७श्री.निकम शांताराम ओंकार १८. श्रीमती. सोनेजी मीना (सोंडे) १९. श्रीमती. मसंद माया २०. श्री. गायकवाड सुरेश नामदेव २१. श्री. जेसवानी सतरामदास फतनदास २२. श्रीमती खिलनानी भावना रवी २३. श्री. असरोंडकर राजेश उर्फ राज जयसिंग २४.श्रीमती माने किरण बाळकृष्ण २५. श्री. खेमाणी देवेंद्रसिंह चंदासिंह
२६. श्री. पाटील विश्वनाथ २७ श्री. साधवानी मनोज लालचंद २८. श्री. जयसिंघानी अनिल भगवानदास
२९. श्री. लबाना होशियार सिंह ३०. श्री. ठाकुर नरेंद्रकुमार केवलराम ३१. श्री. तलरेजा विनोद

३२. डॉ. (श्रीमती) नाथानी निना प्रकाश  ३३. श्रीमती छाब्रिया भारती पहलाज ३४ श्री. बठीजा संजय
३५. श्रीमती. रिझवानी  सुजाता रमेश ३६. श्रीमती दासानी मिनु राजकुमार ३७. श्री. बेहराणी ठाकुरदास
३८. श्री. माखिजा हरदास सन्मुखदास ३९. श्री. वधारिया राजेश नानिकराम
हे सभेस अनुपस्थित होते / होत्या.

श्री. बबीश गंगारामानी , कनिष्ठ अभियंता,( विदयुत) हे , विदयुत विभागा तर्फे प्राधिकृत अधिकारी म्हणुन उपस्थित होते.

तर खाली दर्शविलेले अधिकारी सभेत उपस्थित नव्हते.

१. श्री.नाना रौराळे, अतिरिक्त आयुक्त
२. श्री. अशोक बागेश्वर, उप–आयुक्त
३. श्री. दिपक सावंत, उप–आयुक्त
४. डॉ. के.आर.खरात, वैद्यकिय आरोग्य अधिकारी
५. श्री. सु.कृ.नाकाडी, मुख्य लेखा परिक्षक
६. श्री. बी.सुंदरेश्वरन, प्रभारी शहर अभियंता,
७. श्री. अ.पां.गुरगुळे, नगररचनाकार
८. श्री. एस .बी. सुखरामानी प्रभारी कार्यकारी अभियंता, सार्व.बांध. विभाग
९. श्री. सेलवन, प्रभारी कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा विभाग
१०. श्री. युवराज भदाणे, जनसंपर्क अधिकारी
११. श्री. सा.अ.पठाण, प्रभाग अधिकारी, प्रभाग समिती क्र. १
१२. श्री. अ.म.काटे, प्रभाग अधिकारी, प्रभाग समिती क्र. ३
१३. श्री. तुकाराम तारदाळकर, वाहन विभाग प्रमुख
१४. श्री. डी.पी.चंदनशिवे, कर निरीक्षक

सायंकाळी ४.२५  वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

मा.सदस्या श्रीमती जया साधवानी :– श्री. प्रमोद टाले यांनी आजच्या सभेचे पीठासीन अधिकारी म्हणुन काम पहावे अशी माझी त्यांना विनंती आहे. मी त्यांचे नांव सुचवित आहे.

मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाड :– मी श्री.टाले यांच्या नावाला अनुमोदन देत आहे.

महासभा ठराव क्र. २६ क  दिनांक :–२/१२/२००६

सुचकाचे नाव :– श्रीमती जया साधवानी
अनुमोदकाचे नाव :– श्री. दिलीप गायकवाड

ही महासभा सभेचे कामकाज चालु ठेवण्यासाठी श्री. प्रमोद टाले यांची सर्वानुमते पीठासीन अधिकारी म्हणुन निवड करीत आहे.

सुचकाची सही

अनुमोदकाची सही

सर्वानुमते मंजुर

विशेष महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

यावेळी श्री. प्रमोद टाले हे पीठासीन अधिकारी म्हणुन आसनस्थ झाले.

<u>**मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी :—**</u> मा. पीठासीन अधिकारी, उत्तर प्रदेश मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळयाची जी विटंबना झाली आहे व त्याचे निमित्त साधुन उल्हासनगर मध्ये जो दंगा झाला आहे, ज्या मध्ये प्रख्यात संत स्वामी शांतीप्रकाश व पवई चौक येथे देवी देवतांच्या प्रतिमांची विटंबना झाली आहे. याबद्दल आम्ही येथे निषेध व्यक्त करीत आहोत. हा आमच्या समाजात व शहरात विष पसरविण्याचा प्रयत्न केलेला आहे तसेच आज महापौर पदावर दलीत समाजाचे नेते श्री. प्रमोद टाले यांना बसवुन आम्ही पुर्ण शहरात व देशात संदेश देवु इच्छितो की दलित व सिंधी समुदायामध्ये जो कोणी विष पसरविण्याचा प्रयत्न करेल तर आम्ही त्यांना यश मिळू देणार नाही. दलित व सिंधी एकतेचा हा प्रत्यय यापुढेही असाच सुरु राहिल. धन्यवाद.

<u>**मा. सदस्य श्री.मोहन बेहरानी :—**</u> मा. महापौरजी, आपल्या शहरात जो दंगा झाला तो एक सुनियोजित दंगा होता. कानपुर येथे बाबासाहेबांच्या मुर्तीची अवहेलना झाली त्याचे उल्हासनगर शहरात जे प्रतिसाद उमटले त्यामागे एक मोठे षडयंत्र आहे. आम्हाला ज्या सुचना मिळाल्या आहेत त्या सांगतात की,दंगा सुनियोजित प्रकारे झाला आहे. १९८५ मध्ये ज्या प्रकारे दंगा भडकावुन नगरपालिकेच्या निवडणूका एक वर्षा साठी पुढे ढकलण्यात आल्या होत्या त्याच प्रकारे परवा रात्री जे झाले ती उत्सफुर्त प्रतिक्रिया होती परंतु काल जे झाले ते विचार करुन झाले आहे. गुरुवारचा दिवस उल्हासनगर शहराच्या इतिहासात काळा दिवस म्हणुन साजरा केला जाईल. ५० वर्षाच्या इतिहासात अशा प्रकारचा दंगा कधीही झालेला नाही. आमच्या लोकांना घरातून बाहेर काढुन मारले गेले. डेक्कनक्विन जी ७५ वर्षा पासुन चालु आहे तीला जाळण्यात आले. आमच्या माहिती प्रमाणे सदरची गाडी थांबविल्या नंतर तीन तासांनी काही लोक आले व त्यांनी तीला जाळली. हे एक मोठे कारस्थान आहे, यासाठी जबाबदार कोण आहे याची चौकशी व्हायला हवी. सभागृह तशी मागणी करत आहे. उल्हासनगर मध्ये जे दंगे झाले त्याची चौकशी करण्याची मागणी आम्ही शासनाकडे करीत आहोत.ज्या लोकांनी नगरपालिकेच्या निवडणूका टाळण्यासाठी १९८५ मध्ये दंगे केले होते त्यांनीच आता देखिल दंगे केले आहेत. आता ते लोक अल्प मतात आले असल्याने निवडणूका व्हाव्यात असे त्यांना वाटत नाही. यासाठी शासनाकडे पुर्ण सभागृहाच्या वतीने मी चौकशी करण्याची मागणी करत आहे. यामागे कोण आहे ते लोकांना कळावे यासाठी शासनाकडे ठराव पाठवायला हवा तसेच अशा लोकांवर कठोर कार्यवाही व्हायला हवी. ही पुर्ण सभागृहाची मागणी आहे.

<u>**मा. सदस्य श्री.लाल पंजाबी:—**</u> उल्हासनगर शहरामध्ये जो हिंसाचार झाला आहे त्याचा आम्ही सर्व निषेध करीत आहोत. लोकशाही मध्ये हिंसाचाराला मान्यता नाही व लोकशाहीत याला काही स्थान देखिल नाही. उल्हासनगर शहरामध्ये विविध समुदायाचे लोक एकजुटीने वर्षांपासुन रहात आहेत. एक दोन दंगे सोडले तर उल्हासनगर शहरात कधीही अशी अप्रिय घटना घडलेली नाही. सर्व समुदायाचे नागरिक एकत्र राहू इच्छितात परंतू उल्हासनगर मध्ये जे घडले आहे त्याचा आम्ही सर्व येथे निषेध करीत आहोत. आम्ही सर्व अशी मागणी करीत आहोत की, याची चौकशी शासनाने करायला हवी तसेच यामध्ये जे दोषी समोर येतील, ज्यांनी हिंसाचार केला फक्त तेच दोषी नसुन यामागे जे लोक आहेत ज्यांना हिंसाचारा मागचा मेंदु असे आपण म्हणु शकतो अशा लोकांवरही कार्यवाही व्हायला हवी. उल्हासनगर शहरातील सर्व नागरिकांनी, नगरसेवकांनी मग ते कोणत्याही जातीचे असोत त्यांनी एकत्र येवुन असे प्रयास करायला हवेत की, ज्यामुळे शहरात शांतता टिकुन राहिल. आपण सर्वानी मिळून एका शांतीपूर्ण समाजाचे नवनिर्माण करण्यासाठी प्रयत्न करायला हवेत. धन्यवाद.

यावेळी मा. सदस्य श्री. प्रशांत जाधव हे सभागृहातून बाहेर गेले. 

<u>**मा. सदस्या श्रीमती जया साधवानी :—**</u> मा. महापौरजी, माझे बंधु श्री. लालवानी, श्री. पंजाबी व श्री. बेहरानी यांनी त्यांचे विचार येथे व्यक्त केले आहेत. आम्ही या दंग्याचा निषेध करतो त्याच बरोबर या दंग्याची चौकशी करण्यासाठी श्री. बेहरानी यांनी जो प्रस्ताव दिला आहे त्यासाठी आम्ही आपल्याला ठराव देत आहोत त्याला आपण मान्यता दयालच. मा. महापौरजी हे दंगे जेव्हा झाले त्यावेळी मी दिल्ली येथे होते. उल्हासनगर येथील दंग्यांबाबत मला टिव्ही चॅनेल व मोबाईल व्दारे माहिती मिळाली. हे फार दुर्भाग्यपुर्ण आहे. मला कळुन येत नाही की दंगा करणा—यांना कोणत्या गाडया व कोणती घरे तोडायची आहेत ही माहिती कशी काय मिळाली. आमच्या विभागात

१० गाडया उभ्या होत्या परंतु माझ्या घरा समोर जी गाडी उभी होती तीच गाडी तोडण्यात आली आहे. तसेच जेथे माझे कार्यकर्ते राहत होते त्यांच्याच घरावर दगडफेक करण्यात आली आहे. हे एक षडयंत्र आहे, कारस्थान आहे. यामागची वस्तुस्थिती समोर येईल याची मला पुर्ण आशा आहे. याची चौकशी करण्यासाठी महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांनी सक्षम अधिकारी श्री. संजीव दयाल यांची नियुक्ती केली आहे. मला आशा आहे की ते याची चांगल्या प्रकारे चौकशी करतील. ज्यांनी हे कारस्थान रचले आहे त्यांना शहर कधीही माफ करणार नाही. लोकांची व जनतेची हाय त्यांना लागेल. श्री. मोहन बेहरानी यांनी जो ठराव दिला आहे त्यामध्ये अजुन एक ओळ टाकली जावी अशी विनंती मी करीत आहे. याची चौकशी सीआयडी मार्फत करावी अशी मी विनंती करत आहे. तुम्ही या प्रस्तावाला मान्यता दयाल अशी मी आशा करते. या पुर्ण प्रकरणाची जेवढी निंदा केली जावी तेवढी कमीच आहे.

<u>मा. सदस्य श्री.रामदास उमाप :–</u> मा. महापौरजी, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळयाच्या विटंबने नंतर शहरात जो प्रकार घडला आहे तो अति झाला आहे असे मला वाटते. स्वामी शांतीप्रकाश यांच्या मुर्तीची देखिल तोडफोड करण्यात आली. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळयाच्या विटंबने नंतर शांतीपुर्ण आंदोलन करणे हा दलितांचा हक्क आहे. राष्ट्रीय संपत्तीचे नुकसान केल्या बद्दल दलितांना दोष देण्यात येत आहे परंतु आमचे दलित बंधु शांतीप्रिय आहेत तसेच आज पर्यत आम्ही दलितांवरील अन्याया विरुध्द जी आंदोलने केली आहेत ती आंदोलने शांतीपुर्ण झाली होती परंतू कालचे आंदोलन येत्या निवडणूका लक्षात घेवुन केलेले आहे. मला असे वाटते की यामागे षडयंत्र रचुन राष्ट्रीय संपत्तीचे व खाजगी मालमत्तेचे नुकसान केले आहे.काही गुंडानी हे आंदोलन करुन यामध्ये दलितांचे नांव खराब केले आहे. सिंधी समाज व दलित समाज या दोघांमध्ये भांडण लावुन आपला फायदा कसा होईल हे बघुन कोणीतरी षडयंत्र केले आहे. याची चौकशी व्हायलाच हवी. आमचा दलित समाज गरीब असुन उग्र आंदोलन करणारा समाज नाही. आमच्या भावनांना धक्का लागल्यानंतर पुढे येवुन त्याचा निषेध करणे देखिल आवश्यक ठरते. अशा प्रकारे जेव्हा आम्ही आंदोलन करण्याचा प्रयत्न केला तेव्हा कोणीतरी त्याचा गैरफायदा उचलून संपुर्ण देशात उल्हासनगर शहराचे नांव खराब केले आहे. यामागे कोण आहे याची चौकशी व्हायला हवी. यासाठी मी दलित समाजातर्फे व अनुसूचित जाती जमाती मोर्चा भाजपातर्फे मागणी करतो की, याची उच्चस्तरीय चौकशी व्हायला हवी. मा.मुख्यमंत्री यांनी यामध्ये लक्ष घालुन चौकशी करायला हवी धन्यवाद.

<u>मा. सदस्य श्री.अशोक ठाकुर :–</u> मा. महापौर महोदय, कानपुर येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मुर्तीचा अपमान करण्यात आला याचे आम्हाला देखिल दु:ख आहे. परवा आमच्या परिसरात एक घटना घडली ज्यामध्ये एका मंदिरात जेथे देवाच्या मुर्तीची सर्व लोक पुजा करतात तेथे एक माणुस चादर पांघरुन आला व त्यानंतर तेथील सर्व मुर्त्या तोडल्या. ज्यामुळे आमच्या परिसरात व शहरात दु:खाचे वातावरण पसरले आहे. त्या माणसाला पकडून लोकांनी पोलिसांच्या हाती दिले आहे. मला असे वाटते की याची चौकशी व्हायला हवी की त्याला कोणी पाठवले होते.

<u>मा. सदस्य श्री.किशोर वनवारी :–</u> मा. महापौरजी, शहराची परिस्थिती सर्वांच्या समोर आहे. कानपुर येथे जी घटना घडली त्याचे सर्वाना दु:ख आहे. या घटनेबद्दल शांतीपुर्ण आंदोलन करायला हवे होते परंतु जी तोडफोड केली आहे, लोकांचे करोडो रुपयांचे नुकसान केले आहे, ट्रेन जाळण्यात आली आहे. हे जे केले आहे ते निंदनीय आहे. श्री. मोहन बेहरानी यांनी सांगितले की, याची सीआयडी चौकशी व्हायला हवी त्याला मी अनुमोदन देत आहे. ज्या नेत्यानी शहर बंद केले त्यांचा या मध्ये हात असु शकत नाही कारण संध्याकाळी केबलवर ते तसा संदेश देखिल देत होते. हे दंगे कोणी घडवले, यामागे कोण आहे याची सीआयडी चौकशी व्हायला हवी. त्याच प्रमाणे या दंग्यामध्ये जे कोणी मृत्यु पावले आहेत त्यांना व दादा उध्दाराम मिराणी यांच्या पत्नीचे देखिल निधन झाले आहे, आज संध्याकाळी त्याची पगडी आहे त्यांना श्रध्दाजंली दयायला हवी. मा.मुख्यमंत्री श्री. विलासराव देशमुख व उपमुख्यमंत्री श्री. आर. आर. पाटील यांच्याकडे ठराव जायला हवा, या दंग्याची चौकशी व्हायला हवी. ज्यांनी दंगे घडवले याची चौकशी होवुन कार्यवाही व्हायला हवी अशी माझी महापौरांना विनंती आहे. श्रध्दाजली साठी देखिल महापौरांनी परवानगी दयावी तसेच आजची महासभा शहराची गंभीर परिस्थिती लक्षात घेता ७.१२.२००६ दुपारी ४.०० वाजे पर्यत स्थगित केली जावी. आज अधिकारी देखिल उपस्थित नाहीत त्यामुळे पुढील महासभेत सर्व अधिका–यांना उपस्थित राहण्यासाठी महापौरांनी निर्देश दयावेत. आज रिक्षा व गाडया बंद आहेत त्यामुळे बरेच सदस्य आज येवु शकले नाहीत यासाठी ही सभा ७ तारखेला १२.०० वाजे पर्यत स्थगित केली जावी. याबद्दल कोणाला काही आक्षेप असेल तर त्यांनी सांगावे अन्यथा महापौरांनी आदेश दयावेत.

**मा. सदस्य श्री.धनंजय बोडारे :—** मा. महापौरजी, आजची विशेष महासभा आयुक्तां विरुध्द अविश्वास प्रस्ताव मंजुर करण्यासाठी आयोजित केली होती परंतू गेल्या तीन दिवसा पासुन उल्हासनगर शहरामध्ये जनजिवन विस्कळीत झाले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळयाची कानपुर येथे विटंबना झाल्याबद्दल आम्ही त्याचा निषेध करत आहोत कारण डॉ. आंबेडकर व शिवाजी महाराज यांना आम्ही आमचे दैवत मानतो. त्यांची विटंबना कोणीही भारतीय नागरिक सहन करु शकत नाही. त्याचे प्रदर्शन व निषेध कसा करावा याला देखिल काही मर्यादा आहेत. उल्हासनगर मध्ये यापूर्वीही अशी आंदोलन ब—याचवेळा झाली आहेत. ते शिवसेना, आरपीआय, कॉंग्रेस, व्यापारी संघटना व सर्व पक्षांनी केलेली आहेत. परंतु अशा प्रकारे आंदोलनाला कधीही दिशा दिलेली नव्हती.१९८५—८६ मध्ये असा एक दंगा झाला होता आज बरोबर २० वर्षा नंतर त्याच ठिकाणी उल्हासनगर शहर आले आहे. यामध्ये समान दुवा काय आहे? याची चौकशी होणे आवश्यक आहे कारण पोलिस यंत्रणेला देखिल अपेक्षा नव्हती की अशा प्रकारे आंदोलन होईल. श्री. बेहरानी यांनी सांगितल्या प्रमाणे हे सर्व सुनियोजित होते. याला एक विकृत स्वरुप दिले होते. कोणीतरी चिथावणी देवुन या आंदोलनाला उग्र स्वरुप दिले होते. तसेच समाजाला दोन विभागात वाटण्याचा प्रयत्न झाला होता. याची सखोल चौकशी होण्या करीता आम्ही मागणी करत आहोत. याच्या मुळाशी जावुन शोध घ्यायला हवा. दंगा करणा—यांना कठोर शिक्षा व्हायला हवी तसेच यामागे मुख्य कोण आहे याची चौकशी करण्या करीता सीआयडी मार्फत सखोल चौकशी व्हायला हवी. आयुक्तांबद्दल मी सांगु इच्छितो की, जान है तो जहान है, उल्हासनगर शहर सुरक्षित राहिले तर ५० आयुक्त मिळतील. सर्व नगरसेवक आप आपल्या विभागात शांतता प्रस्थापित करण्यासाठी प्रयत्न करीत आहेत त्यामुळे येथे उपस्थित राहू शकलेले नाहीत. येथे चर्चा करुन वेळ घालविण्या पेक्षा शहरात जावुन शांतता प्रस्थापित करावी अशी मी सर्व नगरसेवकांना विनंती करतो. श्री. वनवारी यांनी सांगितल्या प्रमाणे ७ तारखे पर्यत सभा स्थगित करावी तो पर्यत जनजिवन पुर्वपदावर येईल यासाठी मी त्यांना अनुमोदन देत आहे.

**मा. सदस्य श्री.किशोर वनवारी :—** मा. महापौरजी, मला कळुन येत नाही की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना सर्व लोक मानतात, सिंधी, महाराष्ट्रीयन सर्व धर्माचे लोक त्यांना मानतात. हिंदु लोकांनीच स्वामी शांतीप्रकाश यांच्या पुतळयावर हल्ला केला, हे लोक कोण होते? पवई येथे भोलेनाथ मंदिरात, गजानन स्वामी यांची जी मुर्ती आहे जीला सर्व लोक मानतात तिचे देखिल नुकसान केले आहे. हे कोणी केले आहे? आज व्यापारी संघटनेने उल्हासनगर शहरात शांतीपुर्णरितीने जो बंद केला आहे त्याचे कारण हेच आहे. यासाठी शिवसेना पक्षाच्या सर्व नगरसेवकांनी व नेत्यानी पुर्ण सहकार्य दिले. ज्या लोकांनी हे कृत्य केले आहे त्यांना अटक व्हावी म्हणुन हा बंद केला आहे. हा बंद व्यापा—यांनी स्वत:हून केला असुन कोणत्याही राजकिय नेत्यांनी केला नाही. यामध्ये रिक्षा संघटनेने देखिल सहकार्य केले आहे. कारण दंगा करणा—यांनी रिक्षा देखिल जाळली होती, कार देखिल जाळली होती, स्कुटर देखिल जाळली होती. व्यापारी स्कुटर घेवुन जात असताना त्याला उभे करुन स्कुटर जाळली आहे. दुकानदार दुकान बंद करुन सांगत होते की, आम्ही तुम्हाला सहकार्य करत असताना तुम्ही आमची गाडी का जाळत आहात? या सर्वांची चौकशी होवुन दोषी लोकांवर सक्त कार्यवाही व्हायला हवी. धन्यवाद.

**मा. पीठासीन अधिकारी, श्री. प्रमोद टाले :—** सन्माननिय सदस्य, प्रेक्षकगण, सर्व पत्रकार बंधु, आज या महासभेत सर्वानी सिध्द करुन दाखविले की आपण सर्व एकत्र आहोत. सिंधी, मराठी सर्व लोक एकत्र आहेत असा संदेश आज येथे दिला गेला आहे. पत्रकारांना विनंती करेन की, हा संदेश पुर्ण शहरात पाठवावा. कानपुरची घटना निंदनीय आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळयाचा अपमान केला तर फक्त दलित बांधवच नाही तर कोणीही ते सहन करणार नाहीत. याचा विरोध करताना काल परवा शहरात जी घटना घडली आहे. त्यावेळी मी स्वत: पुर्ण शहरात फिरत होतो परंतु एक गोष्ट्र लक्षात आली की, कोणत्याही राजकिय पक्षाने बंद केला नव्हता. हा जो बंद झाला त्यामागे एक मोठे असमाजिक तत्व होते. हे सर्व पुर्व नियोजित होते. डेक्कनक्विनची घटना असो अथवा लोकल ट्रेनची घटना असो शहरात जेथे जेथे घटना झाल्या आहेत त्या बद्दल मी सभागृहाला सांगु इच्छितो की, शहराच्या विशिष्ट भागातच या घटना घडल्या आहेत. गोलमैदान, टर्निगपाईंट , भाटीया चौक अशा सहा सात ठिकाणी ज्या घटना घडल्या आहेत त्या विशिष्ट भागातच घडल्या आहेत. मी सभागृहाला सांगु इच्छितो की, पुर्ण सभागृहाच्या वतीने पोलिस विभागाला विनंती करायला हवी व याची कठोर चौकशी करायला हवी. यासाठी एक मताने ठराव करायला हवा. मी सर्व लोकांना विनंती करतो की, पुर्ण शहरात शांतता राखावी. तसेच येथे कोणीही अधिकारी उपस्थित नसल्याने त्यांच्या विरुध्द कठोर कारवाही करण्याचा मी आदेश देत आहे. तसेच शहरातील

वातावरण बघुन ही सभा दिनांक ७.१२.२००६ सायंकाळी ४.०० वाजे पर्यत स्थगित करण्यात येत आहे. तत्पुर्वी शोक प्रस्ताव घेण्यात येत आहे.

सुचकाचे नाव :— श्री. किशोर वनवारी

अनुमोदकाचे नाव :—श्री दिलीप लालवानी

**शोक प्रस्ताव**

कानपुर येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळयाची झालेल्या विटबंनेच्या निषेधार्थ महाराष्ट्र ठिक ठिकाणी उद्‌भवलेल्या दंग्यामध्ये जे नागरिक मृत्यु पावले, तसेच उल्हासनगर मधील एक रहिवासी श्री. उध्दाराम मिराणी यांच्या पत्नी श्रीमती पुष्पा उध्दाराम मिराणी यांचे नुकतेच निधन झाले आहे,

त्यांच्या कुटूंबियांचे दु:खात हे सभागृह सहभागी असुन हे दु:ख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो. तसेच मृतात्म्यास चिरशांती लाभावी अशी प्रार्थना करण्यासाठी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पित करण्यासाठी प्रस्तावित.

**महासभा ठराव क्र.२६ ड** **दिनांक:—२/१२/२००६**

ही महासभा वरील प्रस्तावने अनुसार कानपुर येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळयाची झालेली विटबंना व त्यानंतर ठिक ठिकाणी उद्‌भवलेल्या दंग्यामध्ये मृत्युमुखी पडलेल्या नागरिकांना तसेच श्रीमती पुष्पा उध्दाराम मिरानी यांच्या निधनामुळे दोन मिनिटे मौन पाळून श्रध्दांजली अर्पण करीत आहे. तसेच त्यांच्या कुटूंबियांच्या दु:खात सहभागी होऊन हे दु:ख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो अशी प्रार्थना करीत आहे.

**सर्वानुमते**

पीठासीन अधिकारी
विशेष महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

**मा. सदस्य श्री. अशोक ठाकुर :—** मा.महापौर महोदय, शहरात तणाव आहे व पाण्याची समस्या आहे. टॅकर बंद असल्याने ते त्वरीत चालु करण्यात यावेत. तसेच लोड शेडीग मुळे लोकांना रात्रीचा जो त्रास होत आहे त्यावरही मार्ग काढावा.

**मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी :—** मा. महापौर महोदय, आपण सभागृहाच्या मागणी वरुन जी हिंसेची घटना घडली आहे त्याबद्‌दल पीठासीन अधिकारी म्हणुन जी निंदा केली आहे या बद्‌दल आम्ही आपले आभारी आहोत. तुम्ही सभागृहाच्या भावना समजुन घेतल्या. सभागृहाची अशी भावना आहे की, याची सीआयडी चौकशी करावी

कारण हा एक गंभीर मुद्‌दा आहे. हे फक्त एक आंदोलन नव्हते, आंदोलन असते तर लोकांच्या घरात घुसुन त्यांना मारले गेले नसते. उल्हासनगर मध्ये १९४७ साली शरणार्थी म्हणुन जे सिंधी लोक आले होते तेव्हा पासुन आज पर्यत ६० वर्षाचा इतिहास आहे. कारगिल युध्द जेव्हा झाले तेव्हा याच शहराने सर्व प्रथम मदत पाठविली होती, तामीळनाडू मध्ये जेव्हा सुनामी आली तेव्हा याच शहराने सर्व प्रथम मदत केली होती. उसमानाबाद, लातुर, किलारी येथे जेव्हा भुकंप झाला तेव्हा याच शहराने सर्व प्रथम मदत केली होती. गुजरात मध्ये जेव्हा भुकंप झाला तेव्हा याच शहराने सर्व प्रथम मदत केली होती. २६ जुलैला पुर आल्या नंतर येथील लोकांनी आसपासच्या गावांमध्ये जावुन सर्व प्रथम मदत केली होती. महापौर महोदय, काल या दंग्याच्या आडून त्याच सिंधी समाजाला घरातून बाहेर काढुन मारले गेले तसेच देवाच्या मुर्तीचीही

विटंबना करण्यात आली. त्या मुर्ती तोडून एका विक्षिप्त माणसांने त्या मुर्त्यांवर लघुशंका करण्याचा प्रयत्न देखिल केला आहे. हे आंदोलन नसुन सिंधी व मराठी भाषीकांमध्ये तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न होता तसेच राजकीय फायदा घेण्याचा प्रयत्न होता. श्रीमती जया साधवानी यांनी सांगितले की, याची सीआयडी चौकशी व्हायला हवी, सखोल चौकशी व्हायला हवी. अशा लोकांवर जर कठोर कार्यवाही झाली तर पुन्हा या शहरात असे कृत्य घडणार नाही. दुसरे म्हणजे शहरात दंगे सुरु असताना आपल्या महापौर श्रीमती ज्योती कालानी अधिका–यांसह बेपत्ता आहेत. आज येथे आयुक्त व अन्य अधिकारी देखिल उपस्थित नाहीत. बाहेर मानवतेची हत्या होत आहे परंतू येथे मात्र लोकशाहीची हत्या सभागृहात होत आहे. याचे रक्त कोणालाही दिसुन येत नाही. सभागृहाची मागणी होती की, २ तारखेला सभा ठेवण्यात यावी. आयुक्त व इतर सर्व अधिकारी बेपत्ता झाले आहेत. तीन साडे तीन वाजे पर्यत सर्व अधिकारी उपस्थित होते परंतू आता कोणीही अधिकारी उपस्थित नाहीत. हा लोकप्रतिनिधींचा अपमान आहे, लोकशाहीची हत्या आहे. याची जेवढी निंदा केली जावी तेवढी कमी आहे. मला असे वाटते की जो ठराव मंजुर होणार आहे त्यामध्ये याचा उल्लेख केला जावा धन्यवाद. तसेच सर्वाना सांगु इच्छितो की, ८ तारखेला श्री. किशोर वनवारी यांचा वाढदिवस आहे, दोन मंदिरांचा मुहुर्त आहे, दुपारी दिड वाजता भोजन आहे त्यामुळे सर्वानी तेथे येवुन त्यांना शुभेच्छा दयाव्यात अशी मी विनंती करतो. नायक चित्रपटा प्रमाणे आपल्याला एक दिवसाचा महापौर बनण्याची संधी मिळाली आहे त्यामुळे या एका दिवसात असे ठराव पास करावेत जे येणा–या काळात उदाहरण बनतील.

<u>मा.सदस्या श्रीमती जया साधवानी :–</u> आताच्या महापौरांना जनतेने हाकलुन लावावे.

<u>मा. पीठासीन अधिकारी,श्री.प्रमोद टाले :–</u> एक दिवसाचा महापौर पुर्ण शहराचा इतिहास बदलेल. या शहरात जे दंगे झाले आहेत, दोन समाजांमध्ये जी दरी निर्माण झाली आहे, कोणी तरी षडयंत्र केले आहे, ती दरी मिटवण्याचे काम आजच्या महासभेने केले आहे असे मला वाटते. मी पत्रकारांना यासाठी विनंती करत आहे की, शहरात हा संदेश जायला हवा की आम्ही सर्व एक आहोत. पुर्ण महाराष्ट्रात हा संदेश जायला हवा. उल्हासनगर शहर हे आधी पासुन शांतता प्रिय शहर होते, आजही आहे आणि उदयाही राहिल. असामाजिक तत्वांना आम्ही मिटवुन राहु. मी मा. मुख्यमंत्री यांना विनंती करतो की, उल्हासनगर शहरामध्ये जो दंगा झाला त्याची सीआयडी चौकशी व्हायला हवी तसेच त्यामागे मुख्य सुत्रधार कोण आहे त्यांच्या पर्यत पोहोचुन त्यांना शासन करायला हवे.

<u>मा. सदस्य श्री. जमनादास पुरसवानी :–</u> मा. महापौर महोदय, तीन दिवसां पासुन शहरात जी स्थिती आहे त्यामुळे लोकांना फारच त्रास सहन करावा लागला. उल्हासनगर महानगरपालिकेचा १५६ कोटीचा अर्थ संकल्प आहे. एक व्यक्ती गोलमैदान येथे रस्त्याने जात असताना तो तेथेच कोसळला व त्याचा मृत्यु झाला. ज्या शहराला आज पुर्ण देश टिव्हीवर बघत आहे अशा महापालिकेची दुदर्शा मी आपल्याला सांगतो. आपल्या रुग्णवाहिकेसाठी जर कोणी अग्निशमन दलासाठी फोन केला तर आपल्याला कधीही गाडी मिळणार नाही. एकही रुग्णवाहिका चालु स्थितीत नाही. शववाहिनी देखिल चालु नाही. तुम्ही फोन केला तर तुम्हाला रुग्णवाहिका व शववाहिका मिळणार नाही. गोलमैदानच्या घटने बाबत जेव्हा मला कळले व मी फायरबिग्रेडला फोन केला तेव्हा त्यांचे उत्तर ऐकुण मला असे वाटले की, ही ग्रामपंचायत आहे काय? त्यांनी मला सांगितले की, फायरबिग्रेडची गाडी चालु नाही. रुग्णवाहिका बंद आहे. शववाहिका ब–याच दिवसा पासुन बंद आहे. ऐवढे मोठे बजेंट असतांना देखिल आपण रुग्णवाहिका, शववाहिका घेवु शकत नाही, फायरबिग्रेडची गाडी घेवु शकत नाही. मा.महापौर मी आपणास निवेदन करेल की, आपण आज या सभागृहात आदेश करावेत की महापौर निधीतून, कारण आपण एक दिवसाचे महापौर आहात व

आपल्याला निधी खर्च करण्याचे अधिकार आहेत. आपण त्वरीत एक रुग्णवाहिका, फायरब्रिग्रेडची गाडी व एक शववाहिनी खरेदी करण्याचा आदेश दयावा. जेणे करुन आपले एक दिवसाचे महापौर पद सफल होईल.

<u>मा. पीठासीन अधिकारी श्री. प्रमोद टाले :–</u>सदरचे दोन प्रस्ताव पुढील प्रमाणे सर्वानुमते संमत करण्यात येत आहेत.

सुचकाचे नांव :– १.श्री. मोहन बेहरानी
२. श्रीमती जया साधवानी
३. श्री. धनंजय बोडारे

अनुमोदकाचे नांवः– १. श्री. किशोर वनवारी .
२. श्री. दिलीप लालवानी
३. श्री. लाल पंजाबी

विषय :– कानपुर येथे झालेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळाच्या विटबने नंतर उल्हासनगर मधे षडयंत्र व कट रचुन केलेल्या हिसाचार व मोठया प्रमाणावरील राष्ट्रीय व खाजगी संपत्तीचे नुकसानीबाबत सीआयडी मार्फत चौकशी करणे बाबत.

<u>प्रस्तावना :</u>

कानपुर येथे झालेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळयाच्या विटबने नंतर उल्हासनगर मध्ये बंद पाळण्यात आलेला होता यावेळी षडयंत्र व कट रचुन शहरातील विविध भागांमध्ये खाजगी संपत्तीचे नुकसान करण्यात आले तसेच उल्हासनगर रेल्वे स्टेशन येथे डेक्कन क्वीन व दोन लोकल ट्रेनला आग लावुन करोडो रुपयाच्या राष्ट्रीय संपत्तीचे नुकसान केले आहे.या प्रकारा मागे कोणती व्यक्ती आहे त्या समाजकंटका बाबतीत सीआयडी मार्फत चौकशी करुन त्याचा चेहरा जनते समोर उघड करुन त्यावर कठोर कार्यवाही करण्यात यावी अशी ही महासभा मागणी करत आहे.

<u>महासभा ठराव क्रमांकः–२६ इ</u> <u>दिनांकः– २.१२.२००६</u>

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केलेल्या कारणास्तव कानपुर येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकराच्या पुतळयाच्या विटबंने नंतर उल्हासनगर मध्ये उद्‌भवलेल्या मोठया प्रमाणावरील दंगलीत झालेल्या राष्ट्रीय व खाजगी संपत्तीच्या नुकसानीच्या मागे कोणती समाजविघातक शक्ती आहे याची सीआयडी मार्फत चौकशी करण्याकामी राज्य शासनास विनंती करत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

<u>सर्वानुमते</u>

पीठासीन अधिकारी
विशेष महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

विषय :— दि २/१२/२००६ रोजी दुपारी ४—०० वा. होणाारी तातडीची विशेष महासभा स्थगित करणे बाबत.

**प्रस्तावना :**

आम्ही खाली स्वाक्षरी करणारे पालिका सदस्य उल्हासनगर महानगरपालिकेची दिनांक २.१२.२००६ रोजी दुपारी ४.०० वाजंता आयुक्तां विरुध्द् अविश्वास ठराव संमत करणेकामी विशेष महासभेचे आयोजन केलेले आहे. या सभेत अधिकारी उपस्थित नसल्याने पुढील सभेस सर्व अधिकारी उपस्थित राहावे यासाठी निर्देश देण्यात यावे. तसेच गेले ३ दिवस उल्हासनगर शहरामध्ये होणा—या दंगलसदृश परिस्थितीमुळे जनजीवन विस्कळीत झालेली आहे तसेच बरेचसे अधिकारी उपस्थित नसल्याने ही आजची सभा तहकुब करुन गुरुवार दिनांक ७.१२. २००६ रोजी सायंकाळी ४.०० वाजता ठेवण्यात यावी. सदर सभेत सर्व अधिकारी यांना वेळेवर उपस्थित राहण्यासाठी निर्देश देण्यात यावे.

**महासभा ठराव क्रमांकः— २६ ई** **दिनांकः— २.१२.२००६**

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केलेल्या कारणांमुळे दिनांक २.१२.२००६ रोजीच्या तांतडीच्या वशेष महासभेचे कामकाज स्थगित करुन सदरची सभा गुरुवार दिनांक ७.१२.२००६ रोजी सायंकाळी ४.०० वाजता ठेवण्यास मान्यता देत आहे. तसेच सदर दिवशी सर्व अधिका—यांना सभेत वेळेवर उपस्थित राहण्याचे निर्देश देत आहे व आजच्या सभेत अनुपस्थित अधिका—यांवर कडक कारवाई करण्याचे आदेश देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

पीठासीन अधिकारी
विशेष महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

**मा.सदस्य श्री.जमनादास पुरसवानीः—** मा. महापौर महोदय, सभा समाप्ती पुर्वी जेव्हा मी तुम्हाला सांगितले की, या शहरातील १५६ कोटीच्या महापालिकेत फायरबिग्रेड व रुग्णवाहिका बंद आहेत, त्या सुरु करण्यासाठी आपण त्वरीत आदेश दयावेत. आपण हे आदेश न दिल्यास पुढील महासभेत मी उपोषणास बसेल.

**पीठासीन अधिकारी, श्री. प्रमोद टाले :—** आज येथे अधिकारी उपस्थित नाहीत. जेव्हा अधिकारी येथे उपस्थित राहतील त्यावेळी त्यांना सदरचे आदेश देण्यात येतील.
कृपया राष्ट्रगिताकडे लक्ष दयावे.

जनगणमन या राष्ट्रगीताच्या सामुहिक गायनानंतर  सायंकाळी ५.०० वाजता मा. पीठासीन अधिकारी, श्री. प्रमोद टाले यांनी सभा दिनांक ७.१२.२००६ रोजी दुपारी ४.०० वाजे पर्यत स्थगित केल्याचे जाहिर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांकः— ०७/१२/२००६

**उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. ०७/१२/२००६ रोजीच्या**
**तातडीच्या विशेष महासभेचे इतिवृत्त.**

उल्हासनगर महानगरपालिकेची तातडीची विशेष महासभा शुक्रवार, दिनांक २४/११/२००६ रोजी दुपारी २.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभेचे कामकाज स्थगित करुन सदरची सभा दि. ०२/१२/२००६ रोजी दुपारी ४—०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदरची सभा पुन्हा स्थगित करुन गुरुवार दिनांक ७.१२.२००६ रोजी सायंकाळी ४.०० वाजंता घेण्यात आली. सदर सभेत खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य/सदस्या उपस्थित होते / होत्या.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्रीमती जावळे संगिता रमेश | २३. | श्रीमती कारीरा रेखा मन्नुमल |
| २. | श्री. भुल्लर राजेंद्रसिंह विरसिंह | २४. | श्री. पमनानी ईश्वर सतरामदास |
| ३ | श्री. सोनवणे नथु काशीराम | २५. | श्री. बोडारे धनंजय बाबुराव |
| ४. | श्री. टेकचंदानी राजु मथुरादास | २६ | श्रीमती कृष्णानी रेखा हरेश |
| ५. | श्री. वाघे शामु बाबु | २७ | श्री. भालेराव गौतम यशवंत |
| ६. | श्री. गायकवाड दिलीप | २८. | श्रीमती वसिटा बेबी तुलसीदास |
| ७. | श्री. उमाप रामदास राघोजी | २९. | श्री. ठाकुर अशोक भगवानदास |
| ८. | श्री. यादव लालबिहारी बुझारत | ३०. | श्रीमती. ससाणे लक्ष्मीबाई रोहिदास |
| ९. | श्री. रोहरा शामसुंदर | ३१. | श्री. म्हस्के अंकुश निवृत्ती |
| १०. | श्री. टाले प्रमोद नामदेवराव | ३२. | श्री. चौधरी राजेंद्र शांताराम |
| ११. | श्री. ठाकुर विनोद लालसिंग | ३३. | श्री. अन्नु मनवानी |
| १२ | श्रीमती वनवारी मोना अशोक | ३४. | श्रीमती पंजाबी दिपा नारायण |
| १३. | श्री. वनवारी किशोर नारायणदास | ३५. | श्री. पुरस्वानी जमनादास खुबचंद |
| १४. | श्री. साधवानी मोहन रहंदोमल | ३६. | श्रीमती बठीजा कोमल अमृत |
| १५. | डॉ. (श्रीमती) साधवानी जया | ३७. | श्री. जयसिंघानी अनिल भगवानदास |
| १६. | श्री. लुंड गोविंदराम डोलुमल | ३८. | श्री. रामरख्यानी मोहनदास (गाडो) नारायणदास |
| १७. | श्री. रुपचंदानी बच्चाराम बाशोमल | ३९. | श्रीमती माखिजा किरण लखी |
| १८. | श्रीमती माने किरण बाळकृष्ण | ४०. | श्री. बेहरानी मोहन वर्यलदास |
| १९ | श्री. चव्हाण रमेश महादेव | ४१. | श्रीमती करोतिया मालती राधाचरण |
| २०. | श्री. जाधव प्रशांत जगन्नाथ | ४२ | श्री. इदनानी राजु चंद्रभान |
| २१. | श्री. जाधव सुरेश मधुकर | ४३ | श्री. पंजाबी लाल देवनदास |
| २२. | श्रीमती सुर्वे जयश्री सुनिल | ४४. | श्री. लालवानी दिलीप जेठानंद |
| | | ४५. | श्रीमती बामणकर नंदिनी गजानन |

तर,

मा.सदस्य / सदस्या १. श्रीमती रामचंदानी भावना मनोहर २.श्री. लिंगे सुर्यकांत (बबन) ३. श्रीमती मोकल सीमा चंदाराम, ४. श्री. मुलचंदानी महेंद्र परसराम ५. श्रीमती कालानी ज्योती ६.श्री. मोकल चंदाराम विठोबा
७.श्री. एडके गणपत गोविंद ८. श्रीमती. शर्मा कमला गंगाधर ९.श्री. वलेचा पृथ्वी व्यापारीलाल १०.श्री. गुप्ता प्रभुनाथ दुखंती ११.श्रीमती गुप्ता अनिता धमेंद्र १२.श्री. पवार नाना आनंदा १३. श्रीमती आहुजा निता प्रकाश १४ . श्री. जग्यासी राजु किशनचंद १५. श्रीमती खांडेकर प्रेमा भिमा,
१६ श्री .निकम शांताराम ओंकार १७. श्रीमती. सोनेजी मीना (सोंडे) १८. श्रीमती. मसंद माया १९. श्री. गायकवाड सुरेश नामदेव २०. श्री. जेसवानी सतरामदास फतनदास २१. श्रीमती खिलनानी भावना रवी २२. श्री. असरोंडकर

राजेश उर्फ राज जयसिंग २३. श्री. खेमाणी देवेंद्रसिंह चंदासिंह २४. श्री. पाटील विश्वनाथ २५ श्री. साधवानी मनोज लालचंद २६. श्री. लबाना होशियार सिंह २७. श्री. ठाकुर नरेंद्रकुमार केवलराम

२८. श्री. तलरेजा विनोद २९. डॉ. (श्रीमती) नाथानी निना प्रकाश ३०. श्रीमती छाब्रिया भारती पहलाज ३१ श्री. बठीजा संजय ३२. श्रीमती. रिझवानी सुजाता रमेश ३३. श्रीमती दासानी मिनु राजकुमार ३४. श्री. बेहराणी ठाकुरदास ३५. श्री. माखिजा हरदास सन्मुखदास ३६. श्री. वधारिया राजेश नानिकराम
हे सभेस अनुपस्थित होते / होत्या.

श्री. बबीश गंगारामानी , कनिष्ठ अभियंता, (विदयुत) हे , विदयुत विभागा तर्फे प्राधिकृत अधिकारी म्हणुन उपस्थित होते.

तर खाली दर्शविलेले अधिकारी सभेत उपस्थित नव्हते.

१. श्री.नाना रौराळे, अतिरिक्त आयुक्त
२. श्री. अशोक बागेश्वर, उप—आयुक्त
३. श्री. दिपक सावंत, उप—आयुक्त
४. डॉ. के.आर.खरात, वैद्यकिय आरोग्य अधिकारी
५. श्री. सु.कृ.नाकाडी, मुख्य लेखा परिक्षक
६. श्री. बी.सुंदरेश्वरन, प्रभारी शहर अभियंता,
७. श्री. अ.पां.गुरगुळे, नगररचनाकार
८. श्री. एस .बी. सुखरामानी प्रभारी कार्यकारी अभियंता, सार्व.बांध. विभाग
९. श्री. सेलवन, प्रभारी कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा विभाग
१०.श्री. युवराज भदाणे, जनसंपर्क अधिकारी
११.श्री. सा.अ.पठाण, प्रभाग अधिकारी, प्रभाग समिती क्र. १
१२.श्री. अ.म.काटे, प्रभाग अधिकारी, प्रभाग समिती क्र. ३
१३.श्री. तुकाराम तारदाळकर, वाहन विभाग प्रमुख
१४.श्री. डी.पी.चंदनशिवे, कर निरीक्षक

सायंकाळी ४.३५ वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

**मा. सदस्य श्री.दिलीप लालवानी :—** सचिव महोदय, समस्यांपासुन तोंड लपवणा—या महापौर आज देखिल अनुपस्थित आहेत. यासाठी मी सभागृहा समोर प्रस्ताव ठेवतो की, महापालिकेचे वरीष्ठ नगरसेवक व माजी सभागृह नेता मा. श्री. किशोर वनवारी यांना पीठासीन अधिकारी म्हणुन व्यासपीठावर बसवुन महासभेचे कामकाज सुरु करावे.

**मा. सदस्य श्री.मोहन बेहरानी :—** मी, श्री. दिलीप लालवानी यांच्या सूचनेला अनुमोदन देत आहे.

महासभा ठराव क्र. २६ ई—१ दिनांक :—७/१२/२००६

सुचकाचे नाव :— श्री. दिलीप लालवानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. मोहन बेहरानी

ही महासभा सभेचे कामकाज चालु ठेवण्यासाठी श्री. किशोर वनवारी यांची सर्वानुमते पीठासीन अधिकारी म्हणुन निवड करीत आहे.

सुचकाची सही

अनुमोदकाची सही

सर्वानुमते मंजुर

विशेष महासभा

उल्हासनगर महानगरपालिका

यावेळी मा. सदस्य श्री. किशोर वनवारी हे पीठासीन अधिकारी म्हणुन आसनस्थ झाले.

**मा.महापालिका सचिव श्री. प्रकाश कुकरेजा :—** विषय क्रमांक.१ वाचुन दाखवितात.

**विषय क्रमांक.१ :— आयुक्तांविरुध्द् अविश्वास ठराव संमत करणे.**

**मा. सदस्य श्री.दिलीप लालवानी :—** महापौर महोदय, उदया आपला वाढदिवस आहे वाढदिवसाचे पुर्व संध्येला आजच्या महासभेत आपण पीठासीन अधिका—याच्या स्थानी असनस्थ झाला आहात त्या बद्दल या सभागृहाच्यावतीने आपणास वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा. महापौर महोदय आजच्या या सभेची कार्यवाही सुरु करण्या अगोदर आम्हास असे वाटते की, या सभागृहाच्यावतीने दोन प्रस्ताव पारीत केले जावेत. यातील पहिला प्रस्ताव आहे, महाराष्ट्राचे यशस्वी मुख्यमंत्री श्री. विलासराव देशमुख व विधान परिषदेचे उप सभापती श्री. वसंतरावजी डावखरे यांचे अभिनंदन करण्याचा, त्यांनी या सभागृहाच्या भावना लक्षात घेवुन, व उल्हासनगर महापालिकेच्या चारही युनियनच्या भावना लक्षात घेवुन या महानगरपालिकेतील समस्त कर्मचा—यांच्या भावनांचा आदर करुन महापालिका सचिव श्री. प्रकाश कुकरेजा यांच्या बाबतीत एका अन्यायकारक घटनेने त्यांना आयुक्तांनी जो निलबन आदेश बजावला होता त्यास स्थगिती देवुन त्वरीत न्याय दिला यासाठी मा.मुख्यमंत्री श्री. विलासराव देशमुख व विधान परिषदेचे उप सभापती श्री. वसंत डावखरे यांचे अभिनंदन करु इच्छितो. तसेच मी येथे दुसरा एक प्रस्ताव ठेवु इच्छितो की, दोन चार दिवसा पूर्वी शहरामध्ये दंगल झाली होती तेव्हा सिंधी व दलित जनतेमध्ये वैमनस्य पसरविण्याचा प्रयत्न केला होता व येथे सुध्दा एक सिंधी अधिकारी व दलित अधिकारी यांच्यामध्ये संघर्ष निर्माण करण्याचा प्रयत्न केला होता. या प्रकाराची जेवढी निंदा करावी तेवढी थोडीच आहे. हे सभागृह सर्व संमतीने या प्रकारांचे जोरदार निषेध करत आहे. काही लोक सिंधी आणि दलित समाजामध्ये विष पसरविण्याचा प्रयत्न करीत आहेत. महापालिका सचिव श्री.प्रकाश कुकरेजा हे भारतीय मानक संघाद्वारे मानाकन प्राप्त झालेले कार्यालय चालवितात. त्यांच्या कामाने हे संपुर्ण सभागृह समाधानी आहे. उल्हासनगर महानगरपालिकेमध्ये चांगल्यात चांगल्या अधिका—यांच्या नांवाची जी यादी आहे त्या यादीमध्ये त्यांचे नांव सर्वात वरच्या क्रमांकावर आहे. असे असतानाही या अधिका—यावर यासाठी कारवाही करण्यात आली की त्यांनी आपले काम अंत्यत प्रामाणिकपणे बजावले. महापौर महोदय सचिवांचे हे कर्तव्य ठरते की, बहुमताच्या आधारावर सभागृहाचे कामकाज चालवावे. त्यांनी असे केल्यामुळे काय गुन्हा केला? या महानगरपालिकेमध्ये अधिकारांचे जे उल्लघन होत आहे, एकमेकाच्या कार्यक्षेत्रामध्ये हत्यक्षेप केला जात आहे तो लोकशाही व्यवस्थेसाठी शुभसंकेत मानला जावु शकत नाही. मा.मुख्यमंत्री श्री. विलासराव देशमुख व विधान परिषदेतील उप सभापती श्री. वसंतरावजी डावखरे यांच्या प्रयत्नांमुळे आपले महापालिका सचिव श्री. प्रकाश कुकरेजा हे पुन्हा कामावर हजर होवु शकले. तेही आयुक्तांनी बजावलेल्या निलंबन आदेशाची शाई सुकण्या अगोदर महापालिका सचिवांना पुन्हा कामावर रुजु होण्याचे आदेश देण्यात आले,_ दिनांक २.१२.२००६ रोजी महासभेची जी बैठक झाली होती त्या सभेत पीठासीन अधिकारी श्री. प्रमोद टाले यांनी असा आदेश दिला होता की, सर्व अधिका—यांनी महासभेत उपस्थित राहिले पाहिजे व जे उपस्थित राहणार नाहीत त्यांच्यावर कठोर कारवाई केली पाहिजे. यास्तव हे सभागृह हे जाणुन घेवु इच्छिते की, त्या अधिका—यांवर कारवाई का झाली नाही? आणि जर झाली असेल तर ती काय झाली? आजच्या महासभेत अधिकारी उपस्थित का नाहीत? याचा आम्हास खुलासा पाहिजे.

**मा. सदस्य श्री.प्रमोद टाले :—** मा. महापौरजी, मा. सचिव साहेब, सर्वात प्रथम श्री.किशोर वनवारी यांना त्यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने सपुर्ण सभागृहाच्यावतीने हार्दिक शुभेच्छा. जेव्हा लोकशाहीचा गळा घोटला जातो तेव्हा बंड तयार होते आणि त्याचा जेव्हा उद्रेक बाहेर येतो. श्री. प्रकाश कुकरेजा जे आपल्या महानगरपालिकेचे सचिव यांच्यावर झालेल्या अन्यायाच्या विरोधात जेव्हा संपुर्ण यंत्रणा बंड करुन उठली.व मुख्यमंत्र्यांना सुध्दा ते मान्य करावे लागले आणि तो जो स्थगन आदेश आला आहे त्या बद्दल मा. मुख्यमंत्र्यांचे सुध्दा मी अभिनंदन करतो. तीसरी गोष्ट्र मागच्यावेळेस पीठासीन अधिकारी असताना मी आदेश दिला होता की आयुक्त कार्यालयाचा कुठलाही प्रतिनिधी सभेत उपस्थित नसल्याने त्यांच्यावर कारवाई झाली पाहिजे,त्यानुसार त्यांच्यावर काय कारवाई केली? आज मी परत एक सूचना करतो आजच्या या सभेमध्ये आयुक्त कार्यालयाचा एखादा प्रतिनिधी जर उपस्थित असेल

तर त्यांस आयुक्तांच्या खुर्चीवर बसवावे ही माझी विनंती आहे. आयुक्त कार्यालयाचा कोणताही प्रतिनिधी,....., आयुक्त नसतील तर उप आयुक्त, ते नसतील तर आणखी कुणी प्रतिनिधी उपस्थित असेल तर, सचिवांनी या सूचनेचा विचार करावा., धन्यवाद.

मा. सदस्य श्री.राजेंद्रसिंह भुल्लर :— सन्माननिय महापौरजी, सचिव साहेबांकडून मी हे जाणुन घेवु इच्छितो की जे अधिकारी आजच्या सभेत उपस्थित नाहीत त्यांना आजच्या सभेची माहिती देण्यात आली होती काय?

महापालिका सचिव श्री. प्रकाश कुकरेजा :— माहिती दिली आहे.

मा. सदस्य श्री.राजेंद्रसिंह भुल्लर :— माहिती दिलेली असतानाही जे अधिकारी आजच्या सभेत उपस्थित नाहीत तर त्यांच्यावर कायदया नुसार काय कारवाई होवु शकते ते सांगु शकाल? ते सांगितले तर फार बरे होईल. आम्ही येवढे नगरसेवक सभेत उपस्थित असतानाही अधिकारी सभेत उपस्थित राहात नाहीत हे काय आम्हाला वेडे समजतात काय?

मा. पीठासीन अधिकारी, श्री. किशोर वनवारी :— सन्माननिय सदस्य श्री. भुल्लर महाराज यांनी जो मुद्दा उपस्थित केला आहे, तो मुद्दा श्री. प्रमोद टाले यांनी सुध्दा उपस्थित केला आहे आजच्या महासभेची सूचना सर्व विभाग प्रमुखांना प्रस्तुत करण्यात आली आहे आणि तरीही ते अधिकारी येथे उपस्थित नाहीत याबाबतीत मागील महासभेत ठराव पारीत करण्यात आला होता त्यामध्ये असे म्हटले होते की, जे अधिकारी येथे उपस्थित नाहीत त्यांच्यावर कारवाई केली जावी. असे असतानाही आज सुध्दा जे अधिकारी उपस्थित नाहीत यासाठी मागच्या सभेत पारीत झालेला तो ठराव शासनाकडे पाठवु या व त्या अधिका—यांवर कारवाई करण्या बाबत विनंती करु या.

मा. सदस्य श्री.राजेंद्रसिंह भुल्लर :— महासभेची जी सूचना विभाग प्रमुखांना पाठविण्यात आली होती ती मिळाल्या बाबतीत अधिका—यांच्या स्वाक्ष—या आहेत का?
मा. पीठासीन अधिकारी श्री. किशोर वनवारी :— प्रत्येक विभागाची स्वाक्षरी आहे. विभागांमध्ये ते जर उपस्थित नसतील तर त्यांचे स्विय सहाय्यक किंवा लिपीक यापैकी जो कोणी टपाल स्विकारतो अश्या कर्मचा—यांच्या स्वाक्ष—या आहेत.

मा. सदस्य श्री.राजेंद्रसिंह भुल्लर :— असे असुनही ते महासभेत येत नसतील तर त्यांच्यावर कठोरात कठोर कारवाई झाली पाहिजे.

मा. सदस्य श्री.मोहन बेहरानी :— आता आपण त्यांच्यावर काय कारवाई करता याचा खुलासा करा.

मा. पीठासीन अधिकारी, श्री. किशोर वनवारी :— आपण ज्या भावना व्यक्त केल्या त्या शासनाला कळवुन अधिका—यां बाबतीत तक्रारी कळविल्या जातील की, यांच्यावर कारवाई केली जावी किंवा यांची येथुन बदली केली जावी.

मा. सदस्य श्री.दिलीप लालवानी :— मा. महापौरजी, हा अतिश गंभीर मुद्दा आहे हे संपुर्ण सभागृह अशी मागणी करत आहे की, अधिका—यांनी महासभेत उपस्थित राहिले पाहिजे. मागील महासभेत पीठासीन अधिकारी यांनी या बाबतीत आदेश दिले आहेत की, जे अधिकारी महासभेत उपस्थित राहणार नाहीत त्यांच्यावर कारवाई केली जाईल. तर हे सभागृह सचिवां कडून हे जाणुन घेवु इच्छिते की, त्या अधिका—यांवर कारवाई तर काही झाली नाही?

मा. पीठासीन अधिकारी, श्री. किशोर वनवारी :— सर्व सदस्यांच्या भावना लक्षात घेता आपले जे सुरक्षा अधिकारी आहेत श्री. गव्हाणे हे प्रेक्षक गॅलारीत उभे आहेत पीठासीन अधिकारी या नात्याने मी त्यांना आदेश देतो की, त्यांनी महापालिकेत उपस्थित असलेल्या सर्व अधिका—यांना महासभेत उपस्थित होणे बाबतीत सूचना देवुन येथे घेवून यावे.

मा. सदस्य श्री.राजेंद्रसिंह भुल्लर :— त्याच बरोबर असा आदेश दया की, जे अधिकारी आपल्या दालनामध्ये उपस्थित आहेत परंतू महासभेत येत नाहीत अशा अधिका—यांच्या नांवाची यादी तयार करुन आणावी.

**मा. पीठासीन अधिकारी, श्री. किशोर वनवारी :—** सन्माननिय सदस्य श्री. भुल्लर महाराज जे म्हणत आहेत ते अगदी योग्य आहे. जे अधिकारी आपल्या दालनामध्ये आहेत त्यांची नांवे लिहून आणावीत व त्यांना सूचना देवुन येथे घेवुन यावे. तसेच जे येथे येत नाहीत त्यांच्या नावांची यादी महासभेत सादर करावी.

**मा. सदस्य श्री.मोहन बेहरानी :—** मा.महापौरजी, आयुक्त श्री. सदाशिव कांबळे यांच्यावर अविश्वासाचा ठराव मांडण्यासाठी आपण ही तीसरी सभा घेत आहोत त्यांच्या विरोधातील अविश्वास प्रस्तावावर कमीत कमी ४५ सदस्यांनी स्वाक्ष—या केल्या आहेत. महानगरपालिकेची आगामी सार्वत्रिक निवडणूक लक्षात घेता आयुक्त श्री. सदाशिव कांबळे यांच्यावर कोणतीही जबाबदारी सोपवु नये अशी मी राज्यनिवडणूक आयुक्त श्री. नंदलाल यांच्याकडे मागणी करतो. कारण की ते नेहमीच पक्षपातीपणे वागतात. व आम्ही ज्या सदस्यांनी त्यांच्या विरोधात अविश्वास प्रस्ताव दिला आहे त्यामुळे आम्हा सर्वाच्या विरोधात ते येणा—या महासभेमध्ये कोणतेही षडयंत्र रचु शकतात यासाठी आम्ही सर्व समंतीने अशी मागणी करत आहोत की, महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणूकीत आयुक्त सदाशिव कांबळे यांच्याकडे कोणतीही जबाबदारी सोपवु नये. त्याच बरोबर हा ही एक प्रस्ताव मी मांडू इच्छितो की, श्री. नाना रौराळे जे अतिरिक्त आयुक्त आहेत ते उल्हासनगरचे रहिवासी असल्याने ते सुध्दा अगामी निवडणुकीमध्ये येथे पक्षपातीपणे काम करु शकतात. व त्यांचा जो कल आहे तो सत्ताधारी पक्षाच्या एका गटाकडे आहे. यासाठी महानगरपालिकेच्या निवडणूकीच्या अगोदर त्यांची येथुन बदली केली जावी असा मी प्रस्ताव मांडत आहे. नाहीतर आम्हाला पक्षपातीपणाचा सामना करावा लागेल व जी निवडणूक आहे ती नि:पक्षपातीपणे होणार नाही.

**मा. सदस्य श्री.लाल पंजाबी :—** मा. महापौरजी, तसेच सर्व नगरसेवक बंधु आणि भगिनीनो अधिका—यांच्या अनुपस्थितीचा हा जो विषय सभागृहात चालु आहे त्याबाबतीत महाराज भुल्लर व श्री. मोहन बेहरानी यांनी जे विचार व्यक्त केले त्या बाबतीत मी सांगु इच्छितो की, जेव्हा कधी आम्ही आयुक्तांच्या विरोधात पत्रकारां बरोबर बोलतो तेव्हा आम्ही त्यांना सांगत असतो की, आमचे आयुक्त किंवा अधिकारी कश्या प्रकारे राजकिय दबावा खाली येवुन काम करतात. त्यामुळे ते नेहमीच कसे चुकीचे निर्णय घेतात ते सत्ताधारी पक्षाला फायदेशिर असे निर्णय घेतात व मनमानीपणे कारभार चालतो. आजच्या या सभेमध्ये बहुमत आमच्याकडे आहे व आयुक्तां विरुध्द अविश्वासाचा ठराव आहे त्यामुळे अधिकारी या महासभेत उपस्थित नाहीत कारण की, महापौर सभागृहात उपस्थित नाहीत या पेक्षा जास्त दाखला तो आम्ही काय देवु शकतो? महापौर व त्यांच्या राजकिय पक्षाच्या दबावामुळे अधिकारी महासभेत येत नाहीत. बहुमत आमच्याकडे असताना सुध्दा अधिकारी सभेत उपस्थित नाहीत हा दाखला आम्ही वृत्तपत्र प्रचार माध्यम आणि शासनाला देवु इच्छितो की, यापैक्षा दुसरा कोणताही दाखला असु शकत नाही. व हे आज स्पष्ट्र झाले आहे जेव्हा या अधिका—यांच्या प्रतिनियुक्तीवरील नियुक्तीस मान्यता देण्याचे प्रस्ताव महासभेपुढे येत असतात तेव्हा आम्ही सर्व मिळून त्यांचे प्रस्ताव पारीत करतो कारण की, बहुमत आमच्याकडे आहे. बहुमत आमच्याकडे असुन सुध्दा आम्ही त्यांच्या प्रस्तावांना मंजुरी देतो आम्ही कधीही अधिका—यांच्या विरोधात काम करत नाहीत. आम्ही त्यांचे प्रस्ताव बहुमताच्या जोरावर नाकारु शकत होतो परंतू आम्ही असे काम कधीही केले नाहीत. आम्हाला असे वाटते की हे अधिकारी जेव्हा येथे येतात तेव्हा ते योग्य असे काम करतात. परंतू त्या अधिका—यांनी सुध्दा विचार केला पाहिजे की, ज्या लोकांच्या बहुमताच्या जोरावर आपल्या प्रतिनियुक्तीच्या नेमणूकीस मान्यता मिळाली आहे म्हणुन आजच्या या सभेमध्ये उपस्थित राहून आम्हास सहकार्य देणे हे त्यांचे कर्तव्य ठरत होते. सचिव श्री. प्रकाश कुकरेजा यांनी नि:पक्षपातीपणे काम केले आहे ते नेहमी जे सभेचे कामकाज चालवितात ते नि:पक्षपातीपणे चालवितात. त्यांच्यावर आयुक्तांनी जेव्हा निलंबनाची कारवाई केली तेव्हा २४ तासाच्या आत महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांनी स्थगिती आदेश दिला मला असे वाटते की, श्री. प्रकाश कुकरेजा यांच्यासाठी सर्वात मोठे प्रमाणपत्र आहे. यासाठी मी, महापालिका सचिवांचे अभिनंदन करतो त्याच बरोबर मा. मुख्यमंत्र्यांचेही अभिनंदन करतो की, त्यांनी असे दाखवुन दिले की, महाराष्ट्रामध्ये जो कोणी अधिकारी नि:पक्षपातीपणे काम करेल त्याच्या पाठीशी महाराष्ट्र शासन उभे राहिल. त्याच बरोबर मला असे वाटते की, जे अधिकारी भितीने लपुन राहतात किंवा महासभेत येत नाहीत त्यांनी सुध्दा या प्रकरणा पासुन धडा शिकला पाहिजे. मी पुन्हा एकदा सचिवांचे व महाराष्ट्र शासनाचे अभिनंदन करतो व आपले दोन शब्द संपवितो. जय हिंद जय महाराष्ट्र.

**मा. सदस्य श्री.धनंजय बोडारे :—** मा. महापौरजी, मी आपलीच वाट पहात होतो कारण की या अगोदरच्या पीठासीन अधिकारी यांनी आमचे म्हणणे कधी ऐकुण घेतलेच नाही व जसे त्यांना पाहिजे होते तसे त्यांनी केले. आपण ऐकुण घ्याल, वाढदिवसा निमीत्त आपणास सपुर्ण सभागृहाच्यावतीने हार्दिक शुभेच्छा देतो. दिवसेंदिवस

आपण अशीच प्रगती करत रहा. असे म्हणतात की, ''सच्चे का बोलबाला, छुटे का मुँह काला'' आपण तसे करुन दाखविले म्हणुनच आज आपणास महापौराच्या आसनावर पीठासीन अधिकारी म्हणुन बसविले आहे. त्याच बरोबर आमचे झूजार व नि:पक्षपातीपणे काम करणारे, परिणाम काहीही होवो, समोर कोणीही असो परंतु सत्याची लढाई लढणारे सचिव साहेबांचे मी अभिनंदन करतो. आज पर्यत सभागृहात मी कधीही त्यांच्या बाजुने बोललो नव्हतो परंतू आज त्यांची बाजु घेताना मला अभिमान वाटतो अश्या प्रकारची लढाई लढणारे सत्याची बाजु घेणा—या सचिवांचा मला अभिमान वाटतो. दहा वर्षाच्या इतिहासामध्ये मी असे कधी त्यांच्या बाबतीत म्हणालो नव्हतो मी नेहमी म्हणत असे की, हे तर त्यांचे कर्तव्यच आहे.सध्या ज्या प्रकारे महापालिकेत वातावरण चालु आहे अश्या वातावरणात त्यांनी निर्भयतेने आपले कर्तव्य बजावले आहे. सभेचे कामकाज चालविणे हे त्यांचे कर्तव्य आहे आणि ते पार पाडत आहेत. यासाठी त्यांना जो त्रास झाला तो कोणतेही कारण नसताना झाला. त्यांना मागील आठवडयात जो त्रास दिला जात होता तो चुकीचा आहे हे महाराष्ट्राच्या मुख्यमञ्यांनी दाखवुन दिले आहे. शेवटी सत्याचाच जय होतो हे सिध्द झाले आहे.

मा. पीठासीन अधिकारी श्री. किशोर वनवारी :—मा.विरोधी पक्ष नेता श्री धनंजय बोडारे,मा.सदस्य श्री लाल पंजाबी,व श्री दिलीप लालवानी यांनी माडलेल्या प्रस्तावास संमती देण्यात येत आहे तो सर्वानुमते संमत करण्यांत येत आहे.

सुचकाचे नांव :— श्री. धनंजय बोडारे
श्री लाल पंजाबी

अनुमोदकाचे नांव:— श्री. किशोर वनवारी
श्री. दिलीप लालवानी

अभिनंदन प्रस्ताव

महापालिका सचिव श्री. प्रकाश कुकरेजा यांना महापालिका आयुक्तांनी दिनांक ४/१२/२००६ च्या आदेशान्वये महापालिका सेवेतुन तडकाफडकी कोणतेही ठोस कारण न देता निलंबीत केले होते. वास्तविक श्री. प्रकाश कुकरेजा हे एक कार्यक्षम व तत्पर अधिकारी असुन त्यांच्या अथक परिश्रमांमुळे महापालिका सचिव कार्यालयास आंतरराष्ट्रीय मानकांनुसार आय.एस.ओ ९००१:२००० हा पुरस्कार प्राप्त झालेला आहे. परंतु या बाबी लक्षात न घेता केवळ राजकीय दबावापोटी श्री. कुकरेजा यांना निलंबीत केले होते. आयुक्तांच्या या कृतीविरुध्द महापालिकेतील सर्व कामगार संघटनांनी त्वरित लेखणी बंद आंदोलन सुरु करुन काम थांबविले. तसेच शहरात देखिल या अनुचित निर्णयाविरुध्द् नाराजी पसरली होती. सर्व पक्षीय सदस्यांनी देखिल याबद्दल तीव्र नाराजी प्रकट केली होती.

काही महापालिका सदस्यांनी सदरची बाब मा.उपसभापती विधानपरिषद ना.श्री.वसंतराव डावखरे यांच्या निदर्शनास आणुन दिल्यानंतर मा.श्री.डावखरे साहेब यांनी महाराष्ट्राचे मा.मुख्यमंत्री ना.श्री.विलासरावजी देशमुख यांना पत्र देवुन सदरची बाब निदर्शनास आणुन दिली व योग्य ती कार्यवाही करण्याची विनंती केली असता मा.मुख्यमंत्री महोदयांनी आयुक्तांनी बजावलेल्या निलंबन आदेशास विनाविलंब स्थगिती आदेश देवुन श्री.कुकरेजा यांच्यावरील अन्याय दुर केला.

श्री.प्रकाश कुकरेजा, महापालिका सचिव यांचे निलंबन आदेशास तात्काळ स्थगिती दिल्याबद्दल मा. मुख्यमंत्री ना.श्री.विलासराव देशमुख व मा.उपसभापती, महाराष्ट्र विधानपरिषद श्री.वसंतराव डावखरे यांचे आभार मानुन अभिनंदन करण्यासाठी प्रस्तावित.

महासभा ठराव क्रमांक:— २६ उ    दिनांक:— ७.१२.२००६

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केलेल्या कारणांमुळे मा.मुख्यमंत्री ना.श्री.विलासराव देशमुख व मा. उपसभापती, महाराष्ट्र विधानपरिषद श्री.वसंतराव डावखरे यांचे आभार मानुन अभिनंदनाचा ठराव पारीत करीत आहे.

## सर्वानुमते

पीठासीन अधिकारी
विशेष महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

**मा. सदस्य श्री.धनंजय बोडारे :–** अशा प्रकारच्या चुका करणारे आयुक्त श्री. सदाशिव कांबळे यांनी सचिवांच्या निलंबनाचा जो आदेश काढला होता त्यावर मुख्यमंञ्यांनी स्थगिती दिली.त्यावरून आयुक्तांचे वर्तन चुकीचे असल्याचे सिध्द झाले आहे. आमची अशी भावना आहे की, विश्वासास अपात्र असलेले आयुक्त येथे राहता कामा नयेत. यासाठीच हा प्रस्ताव आम्ही मांडत आहोत. त्याची कारणे बरीचशी आहेत आयुक्त म्हणुन व प्रशासनाचा प्रमुख म्हणुन महापालिका सदस्यांना आणि नागरिकांना त्यांच्याकडून ब–याचशा

अपेक्षा होत्या परंतू त्यावर पुर्णपणे पाणी फिरले आहे यासाठी अशा आयुक्तांना विश्वास तर मिळणार नाही त्यास ते योग्य नाहीत परंतू त्यांना येथुन लवकरात लवकर हटविणे जरुरीचे आहे जेणे करुन उल्हासनगरची बरबादी थांबविली जावु शकेल. प्रगती तर आपण करु शकत नाही कारण की, महानगरपालिकेच्या दहा वर्षाच्या कालावधीतील आठ वर्षाची सत्ता सत्ताधारीपक्षानं ज्या पध्दतीने चालविली आहे त्यावरुन असे दिसून येते की, या परिस्थितीतून महापालिका लवकर वर येणार नाही. परंतू बरबादीकडे जी वाटचाल चालू आहे ती थांबविण्यासाठी आयुक्तांना येथुन हटविणे हेच शहराच्या हिताचे आहे. मी त्या बाबतचा प्रस्ताव येथे वाचून दाखवितो.

श्री.सदाशिव कांबळे यांनी दिनांक ५/६/२००६ पासुन उल्हासनगर महानगरपालिकेत आयुक्त म्हणुन कार्यभार हाती घेतलेला आहे. त्यांनी आयुक्त पदाचा कार्यभार हाती घेतल्यानंतर शहर विकासाच्या कामाला ते गती देतील अशी सर्व शहरवासीयांची, नागरिकांची व महापालिका सदस्यांची अपेक्षा होती. परंतु त्यांच्या कार्यकालाचा आढावा घेतला असता सर्व अपेक्षा फोल ठरल्याचे दिसुन आले आहे. त्यांच्या कालावधीत झालेल्या अनियमीतता व नियमबाह्यता याचा विस्तारपूर्वक तपशिल पुढीलप्रमाणे आहे.

### १. कायद्याचे उल्लंघन

१ मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७ (अ) अन्वये दरवर्षी शहराचा पर्यावरण स्थितीबाबत अहवाल दिनांक ३१ जुलैपूर्वी महापालिकेला सादर करणे बंधनकारक असते, परंतु श्री.कांबळे यांच्या कालावधीत उल्हासनगर महानगरपालिकेने सन २००५–०६ करीता सदरचा अहवाल अद्याप सादर केलेला नाही.

मला तर असे वाटते की, या आयुक्तांना याची माहिती सुध्दा नाही. पर्यावरण सांभाळले पाहिजे. श्री. आर. के. सोनावने साहेबांनी पर्यावरणाकडे बरेचसे लक्ष दिले होते. गोलमैदान येथे पर्यावरण कसे आहे? नेताजीचौक येथे पर्यावरण कसे आहे,? व्हीनस चौक येथे पर्यावरण कसे आहे? याची मुद्देनिहाय माहिती त्यांनी आम्हास दिली होती. कुठल्या ठिकाणी किती प्रदुषण आहे ?ते कमी करण्यासाठी काय उपाय योजना केली पाहिजे? पर्यावरण स्थितीदर्शक अहवाल जो आहे तो ३१ जुलै पुर्वी महापालिकेला सादर केला पाहिजे. परंतू आज पर्यत दिला नाही.

२ मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९४ अन्वये स्थायी समितीने निश्चित करुन दिलेल्या नमुन्यातमध्ये महानगरपालिकेचा वार्षिक प्रशासन अहवाल व लेखा विवरणपत्र सादर करणे आवश्यक असताना सदरचा अहवाल व विवरणपत्र अद्याप सादर केलेले नाही.

३. महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम १९७५ चे कलम ८ (३)(ख) अन्वये वृक्ष प्राधिकरणाने (महापालिका आयुक्त हे सदर प्राधिकरणाचे पदसिध्द् अध्यक्ष असतात) झाडे तोडण्यासाठी दिलेल्या परवानगीचा

अहवाल ६ महिन्यातुन किमान एकदा सादर करणे आवश्यक असते तथापि सदरचा अहवाल महापालिकेसमोर श्री. कांबळे यांच्या कार्यकालात सादर करण्यात आलेला नाही.

आणि दुसरे असे की, आम्ही जे काही ठराव पारीत करतो त्यांच्यावर अंमलबजावणी करणे हे आयुक्तांचे काम असते परंतू अश्या ब—याचश्या ठरावांवर आयुक्तांनी अंमलबजावणी केली नाही. त्यातून त्यांची निष्क्रीयता दिसुन येते.

## २. ठरावांची अंमलबजावणी न करणे

४ वृक्ष प्राधिकरणाने दिनांक २/११/०४ रोजीच्या ठराव क्रमांक १४ अन्वये सर्व जमिनींवर विद्यमान झाडांची गणना करण्याचा ठराव केला होता परंतु आजपर्यंत सदरच्या ठरावाची अंमलबजावणी करण्यात आलेली नाही.

५ दिनांक २०/९/२००६ रोजी महासभेत ठराव क्र. १५ ते १९ अन्वये एकमताने संमत करण्यात आलेल्या महत्वाच्या ठरावांची अद्याप अंमलबजावणी झालेली नाही.

६ दुनिचंद कालानी हे कॉलेज ज्याच्या अध्यक्षा स्वत: महापौर श्रीमती ज्योती कालानी हया आहेत हया कॉलेजचे भाडे अद्याप निश्चित केलेले नाही त्याचे भाडे निश्चित करण्यासाठी महासभा ठराव क्रमांक २९ दिनांक २०.१२.२००० अन्वये पारित करण्यात आला होता. परंतु अद्याप त्यासाठी भाडे निश्चिती केलेली नाही परिणामी महापालिकेचे लाखो रुपयांचे नुकसान झालेले आहे.

नेहमी म्हंटले जाते की, उल्हासनगर महानगरपालिका डबघाईला आलेली आहे. खर्च जास्त उत्पन्न कमी , दरवर्षी फुगवटा आणुन बजेट सादर केले जाते. त्याचा परिणाम म्हणुन साफसफाईची समस्या, पाणी पुरवठयाची समस्या, ठेकेदारांच्या पेमेंटची समस्या, ठेकेदार लोक उघडे बसतात परंतु आयुक्तांना त्यांचे काही नाही आयुक्त त्यांना हरामखोर बोलुन मोकळे होतात. उत्पन्न वाढीसाठी उपाययोजना केली पाहिजे हे आयुक्तांना व प्रशासकीय अधिका—यांना कळत नाही. परंतु यास मुख्यत्वे आयुक्त जबाबदार आहेत.

## ३. उत्पन्न वाढीसाठी आवश्यक ती उपाययोजना न करणे

७ महापालिकेने स्वत:च्या खर्चाने बनविलेल्या भाजी मंडयांचा वापर अनधिकृतपणे सुरु असुन महापालिकेस त्यापासुन भाडयापोटी एक रुपयाही प्राप्त होत नाही. वास्तविक सदरच्या गाळयांचा लिलाव करुन ते वितरीत करण्यात आले असते तर महापालिकेला लाखो रुपयांचा महसुल मिळाला असता परंतु असे करण्यात आलेले नाही. खाजगी लोकांकडुन महापालिकेस एक पैसाही न मिळता सदरच्या गाळयांचा वापर बिनदिक्कतपणे सुरु आहे.

८ उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात तीन मुख्य रेल्वे स्टेशन्स असुन सदर स्टेशनच्या बाहेर महापालिकेतर्फे पे ॲण्ड पार्क ही योजना राबविल्यास महापालिकेस लाखो रुपयांचा महसुल प्राप्त होवु शकतो, परंतु सदरची योजना राबविणेसाठी काहीही ठोस उपाययोजना करण्यात आलेली नाही. या ठिकाणीही खाजगी लोकांकडुन सदरचा व्यवसाय महापालिकेच्या जागेवर सुरु आहे.

९ उल्हासनगर शहरातील अनधिकृत विकासकामे नियमाधीन करण्याकरता आणि तत्संबंधी तद्नुषंगिक बाबींसाठी तरतुद करण्याकरता केलेल्या कायद्याच्या तरतुदीनुसार शहरातील लोकांकडुन अनधिकृत बांधकामे नियमीत करण्यासाठी दंड वसुल करण्यासाठी योग्य पावले उचलण्यात आलेली नाहीत. तसेच लोकांना सदर योजनेचा लाभ घेण्यासाठी पुरेशी माहिती दिलेली नाही. सदर दंडापोटी मिळणारी रक्कम महापालिकेच्या विकास कामांसाठी खर्च होणार असल्याने सदरच्या निधीमधुन महापालिकेची विकासकामे होवु शकली असती.

एवढा प्रंचड प्रश्न होता शासनाने त्यामध्ये हस्तक्षेप करुन बाधित लोकांना लाभ मिळून देण्यासाठी शासकीय अधिसूचना प्रसिध्द केली परंतू येथील प्रशासनाच्या अडेलतट्टु धोरणामुळे, आम्ही त्याला मराठी मध्ये माणुसघाणी वृत्ती म्हणतो. लोकांशी बिल्कुल सहकार्य नाही, सदस्यांशी नाही, पत्रकारांशी नाही, ठेकेदारांशी नाही त्यांच्या दालनात जो कोणी व्यक्ती जाईल त्याच्याकडे तो गुन्हेगार आहे अशा रितीने पहाणे किंवा हा मला त्रास देण्यासाठी आला आहे अशा नजरेने पहाणे, सकाळी १०.०० वाजता येणे सायंकाळी ६.००वाजता जाणे. त्यातही आठवडयातील तीन तीन दिवस बाहेर कोठे तरी सभा बैठकांसाठी जाणे. नगरसेवकांना भेटण्यासाठी त्यांच्याकडे वेळ नसतो, सर्वसामान्य जनतेला तर सोडूनच दया. अशा प्रकारच्या त्यांच्या अडेलतट्टु वागण्याने लोकां मध्ये जागृती निर्माण करु शकले नाहीत. मग ती ८५५ इमारतीं बाबत असो किंवा आणखी कुठल्या मुद्दां बाबत असो यामध्ये मुख्य मुद्दा असा आहे की, या आयुक्तांच्या समज किवा ना समजीपणा मुळे किवा स्वत:ला एक मोठा अधिकारी समजणे या वृत्ती मुळे ८५५ इमारतीं बाबत लोकांमध्ये जी जागृती करायला पाहिजे होती ती ते करु शकले नाहीत. आपल्या खुर्चीत येवुन बसायचे, शासनाचा पगार खायचा, आय.ए.एस.याचा अर्थ आयएम सेफ अशा प्रकारची ते मनमानी करत आहेत. स्वत:ला मी.. मी समजणे, असा अधिकारी उल्हासनगरच्या हिताचा नाही. कारण की, ८५५ इमारतीच्या मुद्दया बाबत आयुक्तांची महत्वपुर्ण भुमिका असायला पाहिजे होती परंतू अडेलतट्टु आयुक्तांमुळे उल्हासनगरच्या जनतेचे नुकसान होत आहे. ते त्या अध्यादेशाची प्रभावीपणे अंमलबजावणी करु शकले नाहीत. यामुळेच आज उल्हासनगरचे भविष्य अंधकारमय आहे. जर यांची अंमलबजावणी योग्य पध्दतीची असती तर जो दंड वसुल झाला असता त्यातून उल्हासनगरचा विकास झाला असता. परंतू यांच्यामुळे ते होवु शकले नाही हे सुध्दा उल्हासनगरचे नुकसान आहे.

### ४. अर्थसंकल्पातील तरतुदीनुसार वसुली व खर्च न करणे.

बजेट तरतुदी नुसार उत्पन्न वाढविले पाहिजे व खर्च कमी केला पाहिजे परंतू ते सुध्दा हे करु शकले नाहीत. गोष्टी मोठमोठया काम मात्र कमी.

१०. याचे उत्तम उदाहरण म्हणजे महापालिका शिक्षण मंडळास वेतनादी खर्चासाठी अनुदान देते, यासाठी अर्थसंकल्पात तरतुद देखिल केलेली आहे. परंतु श्री.कांबळे यांच्या कालावधीत पुरेशी रक्कम अनुदानापोटी न दिली गेल्याने उच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली आहे.

माणुस कसाही असला तरी तो व्यवहारी वागतो, कागदोपत्री काय आहे, त्यानुसार न करता, सहा सहा महिने महापालिकेच्या शिक्षकांना पगार मिळाला नाही. अशीवेळ या आयुक्तांच्या काळात येथे आली आहे. शिक्षण मंडळाला जे अनुदान दयायचे होते तेही या आयुक्तांनी अडवुन ठेवले आहे. त्यामुळे सहा महिन्या पासुन शिक्षकांना पगार नाही. शिक्षक काय शिकविणार? शिक्षकांनी शिकविले नाही तर विदयार्थी काय शिकतील? शाळा कशा चालतील? विदयार्थी शिकले नाहीतर पुढे उल्हासनगरचे भविष्य काय? याचे सुध्दा आयुक्तांकडे उत्तर नाही.

११ एमआयडीसीला पाणी बिलापोटी नियमीत पैसे न दिल्याने एमआयडीसीतर्फे वारंवार शहरात पाणी कपात करण्यात येते, यामुळे शहरातील नागरिकांना त्रास सहन करावा लागत असुन जनतेमध्ये याबद्दल प्रचंड नाराजी आहे.

उल्हासनगर महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती डबघाईला आलेली आहे. प्रशासनाच्या एक विचित्रभुमीकेमुळे व नियमितपणा नसल्यामुळे वारंवार पाणी कपात होते परंतू हे महोदय कधी एम आय डी सी च्या मंञ्यांकडे जातो म्हणुन सांगतात परंतु प्रत्यक्षात होत मात्र काहीच नाही. वारंवार पाणी कपात होते. आम्ही विरोधी पक्षांनी आणि श्री. मोहन बेहरानी साहेबांनी संबधित मंत्री महोदय श्री. अशोक चव्हाण यांच्याशी चर्चा केल्या नंतर पाणी कपात रद्द झाली आहे. नाहीतर नेहमी वर्तमानपत्रा मध्ये बातमी येत असे की, महापौरांनी मध्यस्थी केली, आमदारांनी मध्यस्थी केली, किती वेळा मध्यस्थी केली तरीही कितीवेळा पाणी कपात झाली. मध्यस्थी करणारे हे आयुक्ताचे काम, पाण्याची समस्या प्रमुख आहे ती सोडविण्यासाठी आयुक्तांनी प्रयत्न केले नाहीत त्यामुळे वारंवार पाणी कपात झाली.......

<u>मा. पीठासीन अधिकारी, श्री. किशोर वनवारी :– </u>सुरक्षा अधिकारी श्री.गव्हाणे आपण व्यासपीठावर यावे.

<u>मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी :– </u> श्री.गव्हाणे साहेब, यांच्या कडून व्यासपिठावर खुलासा घेण्यात यावा.

मा. सदस्य श्री.धनंजय बोडारे :- सर्वसामान्य जनता त्रास सहन करत आहे. एवढा त्रास कधीही झाला नव्हता जेवढा त्रास दोन तीन महिन्यांपूर्वी म्हणजेच दिवाळी मध्ये झाला होता. वारंवार पाणी कपात.....

मा. सदस्य श्री.दिलीप लालवानी :- श्री. गव्हाणे साहेब काय निरोप घेवुन आले आहेत? तो व्यासपीठा वरुन सांगितला जावा. हे सभागृह जाणुन घेवु इच्छिते की, आयुक्त व अधिकारी कोठे आहेत? श्री. गव्हाणे आपण माईकवरुन सांगा. व आम्ही आपले अभिनंदन करतो कारण की आपण आमच्या पीठासीन अधिकारी यांना मानवंदना दिली आहे.

श्री.सी.अे.गव्हाणे, सुरक्षा अधिकारी :- मा.महापौर महोदय, मा. सचिव आणि सर्व सन्माननिय सदस्य, व्यासपीठावर बसलेल्या सर्वाचे मी अभिनंदन करतो, आपण लोकांनी दोन शब्द बोलण्यासाठी मला व्यासपीठावर बोलावले आहे. मा. पीठासीन अधिकारी यांनी मला जो आदेश दिला होता की, जे अधिकारी आपल्या दालनामध्ये बसले आहेत त्यांना आपण निरोप दया व सभेसाठी बोलावुन आणा. त्या निर्देशा नुसार मी त्वरीत प्रत्येकाच्या दालनामध्ये गेलो परंतु कुणीही आपल्या दालनामध्ये नाहीत. शहर अभियंता होते त्यांना मी निरोप दिला आहे.

मा.पीठासीन अधिकारी श्री. किशोर वनवारी :- शहर अभियंता श्री. बी. सुंदरेश्वरन साहेब, होते त्यांना यांनी निरोप दिला आहे.

मा. सदस्य श्री.दिलीप लालवानी :- महापौरजी, सभा सुरु होण्या अगोदर सर्व अधिकारी होते व ही महासभा होणार होती हे सर्वाना माहित होते परंतु तरीही ते सभागृहात उपस्थित राहिले नाहीत आणि श्री गव्हाणे साहेबांना त्यांना बोलवण्यासाठी पाठविले असताना, दालनामध्ये कोणीही अधिकारी उपस्थित नसल्याचे सांगितले जात आहे. अनुपस्थित अधिका-यांवर कठोरात कठोर कारवाई केली जावी असे पीठासीन अधिकारी म्हणुन आपण आदेश दया. दैनंदिन हजेरी पत्रकावरील नोंदी नुसार आज जे जे अधिकारी आले आहेत त्यांच्या बाबतीत सभागृहात माहिती दिली जावी.

मा. पीठासीन अधिकारी श्री. किशोर वनवारी :- सर्व सदस्यां समोर श्री. गव्हाणे यांचे निवेदनाची इतिवृत्तांत नोद झाली आहे की शहर अभियंता यांच्या व्यतिरिक्त कोणीही अधिकारी आपल्या दालनामध्ये उपस्थित नव्हता. आता सायंकाळचे पाच सव्वा पाच वाजत आले आहेत या दरम्यान कोणीही अधिकारी आपल्या दालनामध्ये उपस्थित नाही ज्या अधिका-यांना पावणे सहाच्या अगोदर मुख्यालय सोडायचे नाही अशा अधिका-यांनी पावणे सहाच्या अगोदरच मुख्यालय सोडले असल्याने त्यांच्यावर कारवाई केली जावी.

मा. सदस्य श्री.धनंजय बोडारे :- यास सुध्दा जबाबदार आयुक्तच आहेत.

मा.पीठासीन अधिकारी श्री. किशोर वनवारी :- प्रशासनाचे जे प्रमुख आहेत ते आयुक्त साहेबच आहेत त्याच्यासाठीच आज सभेत महत्वाचा मुद्दा आहे. आम्हाला आयुक्तां विरुध्द अविश्वासाचा ठराव पारीत करावयाचा आहे. किवा या बाबतीत दुसरी ही प्रस्तावना आम्ही मांडत आहोत की, आयुक्तांच्या कारभाराची चौकशी व्हावी यापैकी कोणता ठराव मंजुर करावयाचा या बाबतीत सभागृहाचे सार्वमत अजमावुन ठराव पारीत केला जाईल. व या अगोदर सुध्दा मी जो खुलासा केला आहे की, महासभेत जे अधिकारी उपस्थित राहिले नाहीत त्यांच्या बाबतीत शासनास अहवाल पाठविला जाईल.

मा. सदस्य श्री.धनंजय बोडारे :-तसेच पाण्याची समस्याही आहे.

१२ शहरात विकासकामे करणा-या ठेकेदारांना वेळेवर देयके देण्यात येत नाहीत. तसेच याबद्दल विचारणा केल्यास ठेकेदारांना गैरवागणुक देण्यात येते तसेच हरामखोर असे शब्द उच्चारुन त्यांचा अपमान करण्यात आला आहे.

या विषयाबाबत आमचे सदस्य श्री. भुल्लर महाराज यांनी लक्षवेधी सूचना मांडली होती. एकतर ठेकेदारांना देयक रक्कमा अदा केल्या जात नाहीत आणि ते जेव्हा याकामी त्यांच्या कडे जातात तेव्हा त्यांना समजावून सांगणे

आवश्यक असताना, त्यांना विनंती करणे आवश्यक असताना त्यांना हरामखोर म्हणणे हे कोणत्या शिष्ट्राचारामध्ये येते? ज्यांना शिष्ट्राचार माहित नाही त्यांनी आयुक्त म्हणुन येथे राहणे उचित नाही.

१३ घरपट्टी व पाणीपट्टीपोटी थकित असलेल्या प्रचंड रक्कमेची वसुली करण्यासाठी प्रशासनातर्फे काहीही ठोस उपाययोजना करण्यात आलेली नाही. परिणामी आजमितीस थकित रक्कम रु १५० कोटी एवढया मोठया प्रमाणावर आहे.

या अगोदरच्या आयुक्तांचा कार्यकाल आपण पाहिलात तर त्यावेळी प्रत्येक महिन्यात जी करवसुली होत होती ती व आताची करवसुली पाहिली तर कमीत कमी ५० टक्क्यांचा फरक आहे. वसुलीमध्ये यांचे लक्ष नाही, यांचे लक्ष कुठे आहे हेच काही कळत नाही. याचे दुस–याच वसुलीकडे लक्ष आहे. तर ही त्यांची निष्क्रीयता आहे. व्यवस्थेवर नियंत्रण नाही, कार्यालयीन कामकाजावर आणि शिस्तीवरही नियंत्रण नाही. फक्त मी, मी आणि मी आणि याच मुळे प्रशासनातील अनियमीतता. ...

## ५. प्रशासनातील अनियमीतता

१४ श्री.सदाशिव कांबळे यांनी त्यांच्या आयुक्त पदाच्या कालावधीत अधिकारी व कर्मचारी यांच्यावर योग्य नियंत्रण ठेवले नाही त्यामुळे प्रशासनात शैथिल्य आले आहे. याच कारणामुळे महापालिका केंद्र शासन पुरस्कृत जवाहरलाल नेहरु नागरी पुनरुथ्थान अभियान या योजनेंतर्गत निधी प्राप्त करुन घेण्यासाठी योग्य तो अहवाल शासनाला सादर करु शकली नाही.

अगोदर म्हंटल्या प्रमाणे आयुक्तच आठवडयातून दोन दिवस सुट्टीवर, ज्या दिवशी कामावर येणार त्या दिवशी एखादया लिपिका सारखे दहा वाजता कामावर येणार सहा वाजता निघुन जाणार आणि अभिमानाने सांगणार सहा वाजे नंतर मी येथे थांबत नाही. आणि त्याचा परिणाम..., आज आयुक्त नाहीत आणि ज्या दिवशी आयुक्त नसतात त्या दिवशी येथील सर्व अधिकारी उपस्थित नसतात . याचे जिवंत उदाहरण आज आपणा समोर आहे. मराठी मध्ये म्हण आहे आधंळ दळतय व कुत्रे पिठ खातय अशी येथील स्थिती आहे. आयुक्त नसल्यामुळे अधिकारीही गायब असतात. वरीष्ठ अधिकारी नसल्यामुळे कनिष्ठ अधिकारी कार्यालयात थांबत नाहीत. आयुक्तच जर बरोबर काम करीत नसतील तर त्याचा परिणाम खालच्या स्तरावरील कर्मचा–यां पर्यत म्हणजेच सफाई कामगारां पर्यत पडतो. प्राथमिक स्वरुपाच्या सुविधाही त्यामुळे प्रभावीत होतात. जव्हारलाल नेहरु रोजगार योजना ही आपल्या निद्रीस्त प्रशासनामुळे ठप्प झाली आहे. आपली उल्हासनगर महानगरपालिका ही एकमेव अशी महानगरपालिका आहे जीने या योजनेचा फायदा उचलला नाही. एक परिपत्रक माझ्याकडे आले होते, कल्याण महानगरपालिके मध्ये कमीत कमी ७ कोटीची योजना हाती घेण्यात आली होती. ती योजना गरीब लोकांच्या कामी आली आहे. दिड लाखा अंतर्गत गरीबांना घरे उपलब्ध करुन देण्या बाबत या योजने अंतर्गत तरतुद आहे त्यानुसार जवळ जवळ ५०० लोकांना ते घरे देत आहेत. अंबरनाथ। नगरपालिका या योजनेतून ९०० घरे देत आहे. बदलापूर नगरपालिका या योजनेतून ६०० घरे देत आहे. . ठाणे महानगरपालिकेने तर उच्चांक गाठला आहे ते साडे नउ हजाराच्या आसपास घरे देत आहेत. पुणे, पिंपरी चिंचवड महानगरपालिका अशा मोठ मोठया महानगरपालिका व छोटया छोटया नगरपालिकांनी सर्वानी आपले प्रस्ताव पाठविले आहेत परंतू आपल्या महानगरपालिकेने एक सुध्दा प्रस्ताव पाठविला नाही ही अतिशय दुर्भाग्याची गोष्ट आहे.

१५ आयुक्तांकडुन महापालिका सदस्यांना व अधिका–यांना गैरवागणुक देण्यात येते, पदोपदी त्यांचा अवमान करण्यात येतो.

या अगोदर जे जे आयुक्त होते ते सर्व कर्मचारी, अधिकारी, पदाधिकारी, नगरसेवक, यांच्याशी सन्मानपूर्वक वागत असत. जे कायदेशिर आहे तेच काम करत असत. जे बेकायदेशिर असे ते करत नसत. परंतू सन्मान दोन्ही बाजुंनी दिला जात होता. या आयुक्तांनी आपला स्वत:चा मान सन्मान गमावला आहे कारण की दुस–याला मान सन्मान कसा दयावा हे यांना माहित नाही. आमचे नगरसेवक श्री. प्रशांत जाधव यांच्या बाबतीत सुध्दा त्यांनी अपमानकारक वागणुक दिली होती, ठेकेदारांना अपमानकारक वागणुक दिली ती जगजाहिर आहे, याच बरोबर ब–याचश्या नगरसेवकांना यांनी अशीच वागणुक दिली आहे त्यामुळे विश्वासार्हता गेली आहे. असा आयुक्त

विश्वासाला योग्य नाही. श्री. अंकुश म्हस्के यांचे म्हणणे आहे की, त्यांच्या बाबतीत सुध्दा अशीच अपमानकारक वागणुक देण्यात आली.

१६ मा.मुख्यमंत्री हे मुख्य असलेल्या नगरविकास विभागातर्फे श्री.सा.अ. पठाण यांची महापालिकेत सहायक आयुक्त या पदावर प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्यात आली होती. परंतु श्री.कांबळे यांनी श्री.पठाण यांना हजर करुन न घेता मा.मुख्यमंत्री यांच्या आदेशाची देखिल अवमान्यता केली होती. सरतेशेवटी नगर विकास विभागाने सक्त सूचना दिल्यानंतरच श्री.पठाण यांना कामावर हजर करुन घेण्यात आले.

येथे आवश्यकता आहे व येथे एक कार्यक्षम अधिकारी पाठविण्यात बाबत मा. मुख्यमंत्र्यांनी आदेश दिलेला असतानाही आयुक्तांनी त्या सहाय्यक आयुक्तास हजर करुन न घेता मुख्यमंत्र्यांच्या आदेशाचा अवमान केला.

## ६. स्थायी समिती/महापालिकेची मंजुरी विना कर्तव्य पार पाडणे

जे मंजुर आहे त्यांची अंमलबजावणी न करणे व जे मंजुर नाहीत त्यास आपल्या मनमानी प्रमाणे पुर्ण करणे या बाबतची उदाहरणे आहेत ती मी देत आहे.

१७ मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७२ चे उल्लंघन करुन सन २००६–०७ या वर्षात अर्थसंकल्पीय अनुदाना व्यतिरिक्त त्यांनी आपल्या अधिकारांचा वापर करुन खर्च केलेला आहे.

१८ मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६ अन्वये कोणत्याही कर्मचा–याला निलंबीत केल्यानंतर सहा महिन्यांच्या आत महासभेमध्ये मान्यता घेणे आवश्यक असताना अशी कारवाई केलेली नाही.

१९ श्री.एस.एस.साळवे यांची विधी सल्लागार या पदावर फेरनियुक्ती करताना महासभेची मान्यता घेणे आवश्यक होते परंतु अशी मान्यता घेतलेली नाही. अशाचप्रकारे इतरही काही अधिका–यांच्या विशेष कार्य अधिकारी या पदावर नियुक्त्या करण्यात आल्या होत्या.

२० वशीला पध्द्तीने केलेल्या नियुक्त्यांना महासभेची मान्यता घेणे आवश्यक असताना अशी मान्यता न घेताच नियुक्त्या केलेल्या आहेत.

२१ सन २००६–०७ मध्ये कर्मचा–यांना दिवाळीनिमीत्त सानुग्रह अनुदान देण्यात आले. नगर विकासविभागाच्या निर्णयाप्रमाणे यासाठी महासभेची पुर्वमंजुरी घेणे आवश्यक असताना कोणतीही मंजुरी न घेता सदरची रक्कम वितरीत करण्यात आलेली आहे.

## ७. शहरातील अनधिकृत बांधकामे

२२ मा.उच्च न्यायालयात यापूर्वीच शहरातील अनधिकृत बांधकामां बाबतचा मुद्दा प्रलंबित असतानाही दिनांक १/१/२००५ नंतर झालेल्या अनधिकृत बांधकामांवर काहीही ठोस कारवाई केलेली नाही. यामुळे शहरात दिवसेंदिवस अनधिकृत बांधकामांचे प्रमाण वाढत चालले आहे.

२३ सदर याचिकेतील याचिकाकर्ता श्री. हरी तनवानी यांनी नगररचना विभागाकडुन शहरात सुरु असलेल्या बांधकामांची माहिती विचारली असता नगररचना विभागाने १७ ठिकाणी बांधकाम परवानगीचे उल्लंघन करुन वाढीव बांधकाम केल्याची माहिती दिली आहे असे असतानाही सदरच्या बांधकामांवर काही एक कारवाई केलेली नाही.

याचाच अर्थ माहिती आहे परंतु कारवाई काही नाही.कनिष्ठ स्तरावरील अधिकारी कारवाई करु इच्छित असले तरी आयुक्त त्यांना कारवाई करु देत नाहीत.

२४ श्री.कांबळे यांनी आयुक्तपदाचा कार्यभार हाती घेतल्यापासुन केवळ तीन बांधकाम परवानगीचे प्रकरण मंजुर केलेले आहेत. वास्तविक एम.आर.टी.पी ॲक्टचे कलम ४५ अन्वये प्रकरण प्राप्त झाल्यापासुन ६० दिवसांच्या आत त्यावर निर्णय घेणे आवश्यक असते परंतु श्री.कांबळे यांनी काहीही निर्णय न घेतल्याने ते लोकांना नाईलाजास्तव अनधिकृत बांधकामास भाग पाडत आहेत.

लोकांनी अर्ज केले आहेत, घरे तोडून बसले आहेत व नकाशा मंजुरी साठी येथे प्रकरण दाखल केले आहे. परंतु सहा सहा सात सात महिने होवुन सुध्दा त्यांचे अर्जावर काहीही कारवाई केली जात नाही. अर्ज मंजुर किंवा नामंजुरही करत नाहीत. म्हणजे त्यांची भुमिका नकारात्मक स्वरुपाची आहे, उदासिन आहेत, उदात्त नाहीत. व सहा महिन्या नंतर, कोणाचा फोन आल्या नंतर, दोन, तीन असे प्लान मंजुर करतात. सहा महिने अडवुन ठेवण्याचे कारण काय होते? जेव्हा सर्व सामान्य माणूस त्यांच्याकडे जातो तेव्हा त्याचा प्लान मंजुर होत नाही परंतु जेव्हा कोणी वशिला घेवुन जातो तेव्हा हे प्लान मंजुर करतात. स्वारस्य काहीही असो कसाही असो टेबलावरुन प्लान मंजुर होतो टेबला खाली काय होते ते माहित पडत नाही. परंतु सहा सहा महिने प्लान मंजुर न करण्याचे कारण तेच होवु शकते. एकतर लोकांना त्रास देणे किंवा काही तरी स्वारस्य आहे. तर ही सुध्दा भुमिका शहरासाठी चांगली नाही. याचाच परिणाम म्हणुन अनाधिकृत बांधकामे होतात मग ती बांधकामे तोडली जातात किंवा त्यांच्या कडून दंड वसुल केला जावु शकतो.

२५ मा.मुंबई उच्च न्यायालयाने गार्डन क्र. ४४४ येथील फेरीवाल्यांना हटविण्यासाठी स्पष्ट आदेश दिल्यानंतरही सदर आदेशाची अवहेलना करुन काहीही कारवाई केलेली नाही. आजही सदर परिसरात फेरीवाले मोठया प्रमाणावर आहेत. याबद्दल सदरच्या परिसरातील नागरिकांनी मा.पालकमंत्री श्री गणेश नाईक यांच्या जनता दरबारात केलेल्या तक्रारीनंतर मा.पालकमंत्री यांनी सदरचे फेरीवाले हटविण्यासाठी आयुक्तांना आदेश दिल्यानंतरही आयुक्तांनी काहीही कारवाई न करता पालकमंत्री यांच्या आदेशाची देखिल अवमान्यता केलेली आहे.

## ८. पक्षपातीपणा

संपुर्ण उल्हासनगर शहरास माहिती आहे की, कोणीही अधिकारी जर निपक्षपातीपणे काम करीत असेल तरच तो लोकाभिमुख काम करु शकतो परंतु कोणाची बाजु घेवुन ज्यास दुस—या भाषेत म्हटले जाते ''पे रोलवर काम करणे'' तर हे येथे पक्षपातीपणा करत आहेत ते जाहिर आहे व सर्वाना दिसत आहे. सचिवांवर कारवाई केली या वरुन दिसुन येते की, ते पक्षपातीपणा करत आहेत.

२६ कुख्यात स्थानिक आमदारयांच्या निर्देशावरुन त्यांच्या राजकीय विरोधी सदस्यांवर व सदस्यांच्या नातेवाईकां विरुध्द् २० वर्षे जुन्या प्रकरणात पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला. तथापि आमदारांचे सहयोगी सदस्य श्री.देवेंद्रसिंग खेमाणी हयांनी त्यांच्या वडिलांच्या नावाने महापालिकेची जागा बळकावल्याबाबत तक्रार केल्यानंतरही ते फक्त श्री.कालानी यांचे समर्थक असल्याने त्यांच्या विरुध्द् गुन्हा दाखल करण्यात आला नाही.

एम.आर.टी.पी.ॲक्ट नुसार एकाच व्यक्तीवर एकाच प्रकरणात दोन दोन केसेस, या अगोदर झाल्या होत्या. आता पुन्हा आयुक्तांच्या कालावधीत झाल्या आहेत परंतु आमदारांचे समर्थक श्री. देवेंद्रसिंह खेमानी यांच्यावर कारवाई केली नाही. जर केसेसच करावयाच्या होत्या तर प्रत्येकावर केसेस करावयास पाहिजे होत्या परंतु तसे न करता हे पक्षपातीपणा करत आहेत. व हे शहरासाठी फायदयाचे नाही.

२७ दिनांक २०/१०/२००६ रोजी होणा—या महासभेसाठी काही सदस्यांनी सचिवांकडे नियम १ (जे) अन्वये प्रस्ताव दाखल केले होते. परंतु महापौरांच्या दबावाखाली सदरच्या प्रस्तावांचा सभेत समावेश न करण्यासाठी महापालिका सचिवांना ज्ञापन देण्यात आला व सदरचे प्रस्ताव थांबवण्यात आले. अशाप्रकारे विरोधी पक्षातील सदस्यांची मुस्कटदाबी करण्याचा प्रकार असुन आयुक्तांनी महासभेच्या अधिकारांमध्ये हस्तक्षेप केलेला आहे.

दिनांक २०.१०.२००६ रोजीच्या सभेपुढे अशासकीय प्रस्ताव आणण्यात आले होते ते कायदेशिर होते असे आजही आमचे ठाम मत आहे. कारण आम्ही त्याला कायदयाचा आधार दिला होता. परंतु ते विरोधात आहेत, त्यांच्या कॉलेज विषयीचा एक प्रस्ताव आहे. व बांधा वापरा व हस्तांतरीत करा या तत्वा नुसार जी पाणी

पुरवठयाची योजना त्या बाबतीतील प्रस्ताव, याबाबत त्यांचे स्वारस्य होते काही पैश्यांची देवाण घेवाण होती यामुळेच सत्ताधारी पक्षांनी ते ठराव अमान्य केले अमान्य केले असे म्हणत ते सभागृहातून बाहेर गेले त्यानंतर बहुमताच्या आधारावर सभेचे कामकाज चालविण्यात आले. ते अशासकिय प्रस्ताव चुकीचे असते तर त्यावेळी आयुक्तांनी सभेतुन जाणे योग्य होते. परंतु कायदयानुसार सभेचे कामकाज चालविण्या—या सचिवांनी सांगितल्या नंतरही आयुक्त सभेतुन बाहेर गेले. याचाच अर्थ हे आयुक्त महानगरपालिकेचे काम करत नसुन एका राजकिय पक्षाचे काम करत आहेत. एका आमदाराचे, महापौरांचे काम करत आहेत. त्यांच्या इशा—या नुसार चालत आहेत. त्यांनी म्हटले बसा तर बसतात, त्यांनी म्हटले उठा तर उठतात याच बरोबर ते सर्व अधिका—यांचीही पिळवणुक करत आहेत. त्या दिवशी सचिवांना ते ज्या पध्दतीने निर्देश देत होते ते चुकीचे होते. ते त्यांच्या अधिकारात नव्हते तसेच त्यांना जर त्यावेळी चुकीचे वाटत होते तर त्यांनी सभेतुन जावयास पाहीजे होते. परंतु सचिवांचे जर चुकीचे असेल तर याबाबतीतील प्रकरण सध्या उच्च न्यायालयात प्रलंबित आहे. व असे असताना सुध्दा त्यांनी सचिवांना ज्ञापन दिले की, या पुढे आपण असे प्रस्ताव आणु शकत नाहीत आणि जर का आपण आणलेत तर आपल्यावर कारवाई केली जाईल. म्हणजे हा महासभेचा सुध्दा अपमान आहे. चुकीच्या पध्दतीने प्रत्येक अधिकार आपल्या हातात घेतात. असे आयुक्त कामाचे नाहीत. व कोणाच्या इशा—यावर ते असे करत आहेत. आपले अधिकार काय आहेत ते पहात नाहीत आपल्या डोळयांवर पट्टी बांधुन ते चालत आहेत. स्वत:चे अधिकार काय आहेत हे न पहाता महासभेचे अधिकारही ते आपल्या हातात घेवु पाहात आहेत. हे स्वत:साठी नसुन कोणाच्या तरी इशा—यावरुन करत आहेत. याचाच अर्थ पक्षपातीपणा करतात.

२८. प्रभाग समिती क्र ३ व ४ च्या सभापतीपदाची निवडणूक दिनांक १/४/२००६ पर्यंत घेणे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २९ अ अन्वये आवश्यक असतानाही महापौरांनी दिनांक २२/५/२००६ व २३/५/२००६ रोजी सदरच्या निवडणूका अनिश्चित कालावधीसाठी स्थगित केल्या आहेत कारण त्यांच्याकडे आवश्यक ते बहुमत नाही. सदर निवडणूका घेणेसाठी आयुक्तांनी प्रभाग अधिकारी व महापौर यांना अद्याप काहीही निर्देश दिलेले नाहीत. अशाप्रकारे ते पक्षपातीपणा करीत आहेत.

## ९. आयुक्तांचे अपयश

२९ उल्हासनगर शहरात पाणी पुरवठयाचे असमान वितरण केले जाते त्यामुळे काही विभागातील लोकांना भरपुर पाणी मिळते तर काही विभागात अजिबात पाणी मिळत नाही यामुळे लोकांमध्ये असंतोष आहे.

ही गोष्ट जुन महिन्याच्या सभेत झाली होती. त्यावेळी त्यांनी मोठ मोठी आश्वासने दिली होती त्यावेळी ते नव्यानेच येथे आले होते. शहरामध्ये कच—याची समस्या आहे, पाणी पुरवठयाची समस्या आहे तीच्याकडे लक्ष देण्यासाठी वेळ नाही हे पुर्ण दिवस आपल्या दालनात बसुन असतात व पुर्ण दिवस फक्त बैठका बैठका घेतात मात्र लोकांच्या व लोकप्रतिनिधीच्या भेटी घेत नाहीत. जर समस्या समजावुनच घेणार नसतील तर त्या सोडविणार तरी कशा,

३० शहरात साफसफाई विषयक मोठी समस्या आहे. ज्या ठेकेदाराला कचरा उचलण्याचे काम दिले आहे तो ठेकेदार व्यवस्थित काम करीत नसल्याने शहरात जागोजागी कच—याचे ढिग पडलेले आहेत. यामुळे शहरात रोगराई पसरली असुन ४००० व्यक्तींना चिकुनगुन्याची बाधा झाली असुन डेंग्युमुळे २ व्यक्ती बळी पडलेल्या आहेत.

चिकुनगुनियाची उल्हासनगर मध्ये साथ उद्भवली होती त्यावेळी याच्यावर जी जबाबदारी होती ती यांनी व्यवस्थितरित्या पार पाडली नाही यापुर्वी जे आयुक्त होते श्री. आर.डी. शिंदे तसेच श्री. आर.के.सोनावने होते ते अश्या वेळी बेचैन होत असत व म्हणत की, हे माझे शहर आहे, माझ्या शहरातील लोक चिंतीत आहेत परंतु या आयुक्तांना त्याचे काहीही नाही. त्या दिवशी मी त्यांच्या चेह—याचे निरीक्षण केले त्यांच्या चेह—यावर कुठलेही हावभाव नव्हते हजारो लोक रोज सेंट्रल हॉस्पिटल मध्ये जात होते इंजेक्शन घेत होते. परंतु जनजागृती नव्हती, प्रतिबधात्मक उपाय योजना केल्या नव्हत्या व त्यानंतर त्यावर उपाय योजना करावयाच्या होत्या त्या सुध्दा केल्या नव्हत्या. आम्ही लोक त्यांच्याकडे जात होतो व म्हणत होतो की, काही तरी करा त्यावेळे ते म्हणत होते की, होय करतोय या व्यतिरिक्त त्यांच्याकडे कोणतेही उत्तर नव्हते. त्यांच्याकडे ना आपलेपण होते ना याबाबतीत काम करण्याची धडपड होती. लोक मरत होते मरु दया . लोक चिकुनगुनियाने आजारी पडत होते, पडु दया.

आम्हाला काहीच नाही, लोक पाण्यासाठी त्रस्त होते, होवु दया. अश्या प्रकारची भावना जर आयुक्तांची असेल तर उल्हासनगरची प्रगती होणार नाही. उल्हासनगर बरबादीच्या दिशेने जाईल.

३१ वृक्ष प्राधिकरणाने वृक्ष तोडण्यासाठी मंजुरी दिल्यानंतर त्या ठिकाणी संबधित व्यक्तीने नवीन झाड लावणे आवश्यक असते. परंतु एकही नवीन झाड लावले जात नाही.

यांची विचार करण्याची वृत्ती वेगळी आहे. ''सेल्फ इंट्रेस्ट, सेल्फ इंट्रेस्ट सीटी इंट्रेस्ट काहीही नाही ''

३२ अपंग व्यक्तींसाठी काहीही कल्याणकारी योजना राबविण्यात येत नाहीत अथवा महापालिकेकडे त्यासाठी काहीही ठोस कार्यक्रम नाही.

३३ आयुक्तांकडे कोणतीही फाईल गेल्यानंतर त्यावर निर्णय घेण्याऐवजी ''चर्चा करा'' असा शेरा मारुन फाईल प्रलंबित ठेवली जाते. यामुळे कामात शिथीलता आलेली आहे.

गोलमैदान एका संस्थेने भाडयाने मागीतले होते या आयुक्तांनी त्या प्रकरणा बाबतीत सुध्दा लिहिले की, चर्चा करा. ४ तारखेला कार्यक्रम आहे. १५ दिवसापूर्वी त्यांनी अर्ज केला की आम्हाला गोलमैदान भाडयाने पाहिजे अर्ज आल्या नंतर एक आठवडयाची वेळ कार्यवाही मध्ये गेली २९ तारखेला प्रकरण त्यांचेकडे गेले ५ दिवस ते त्याच्याकडेच पडून राहिले व दोन तारखेला हे लिहितात की, चर्चा करा. ४ तारखेला कार्यक्रम आयोजित करणार करेल काय? पुन्हा ते प्रकरण संबधित विभागाकडे म्हणजे मालमत्ता विभागाकडे येते व कार्यक्रम झाल्या नंतर यांची परवानगी मिळते. अश्या प्रकारे येथे वातावरण आहे यांची पूर्णपणे नकारात्मक भुमिका आहे.

## ९. आयुक्तांचे असहकार्य

३४ मा.उपसभापती, महाराष्ट्र विधानपरिषद श्री.वसंत डावखरे यांनी त्यांच्या निधीतुन उल्हासनगर महानगरपालिकेला रुग्णवाहिका घेवुन देण्याचे जाहीर केल्यानंतरही महापालिकेने वेळेत त्यांच्याकडे मागणीपत्र दिले नाही त्यामुळे अद्याप रुग्णवाहिका मिळालेली नाही.

आपल्याकडे न रुग्ण वाहिका आहे ना शव वाहिका आहे. ना आपण घेवु शकत, घेवु शकत असतो तर आता पर्यत घ्यावयास पाहिजे होती. कारण की खाजगी रुग्णवाहिका जास्त भाडे आकारते. महापालिकेची रुग्णवाहिका गरीब लोकांच्या उपयोगी यावी म्हणुन आपण ती खरेदी केली होती परंतु सध्या ती वापरात नाही. परंतु सध्या आपण घेवु शकत नाही.मा.उप सभापती श्री. वसंत डावखरे हे देत आहेत परंतु त्यांच्याकडे प्रस्ताव पाठविणे साठी सुध्दा यांच्याकडे वेळ नाही हे करतात काय हे समजुन येत नाही.

३५ शहरातील हातगाडया हटविणेकामी वाहतुक पोलीसांना आयुक्तांनी योग्य सहकार्य दिले नाही त्यामुळे शहरात वाहतुकीची समस्या मोठया प्रमाणावर आहे.

३६ आयुक्त जाणुनबुजून स्थायी समिती व महासभेच्या बैठकांना उशीराने येतात अथवा अनुपस्थित राहतात असे करुन त्यांनी सदस्यांचा अपमान केलेला आहे.

अशा परिस्थितीत श्री.सदाशिव कांबळे या महापालिकेत आयुक्त म्हणुन काम करण्यासाठी विश्वास हरवुन बसले आहेत.

त्यांचे सपुर्ण कर्तृत्व मी आपणास सांगीतले आहे. व यावेळी त्यांचे एक सुध्दा काम व्यवस्थित नाही. ना नियोजन आहे ना व्यवस्था आहे ना नियंत्रण आहे. त्यांनी एकच नियमितता आणली आहे ती फक्त ओळखपत्र लावण्याची मी किती शिस्तप्रिय आहे मी सुध्दा ओळखपत्र लावतो, बाकी काही नाही. फक्त अधिकारी कर्मचा—यांना ओळखपत्र दया त्यावरुन लोकांना समजेल की अधिकारी कोण आहे व कर्मचारी कोण आहे. त्यांच्या अगमनाचे सुरवातीचे दोन दिवस चांगले गेले परंतु त्या नंतर दाखवायचे एक आणि प्रत्यक्षातील दुसरेच असायचे. असा हा आयुक्त उल्हासनगरला बरबादीच्या दिशेने घेवुन जात आहे. यास्तव सर्व सदस्यांना विनंती आहे की, शहराला

बरबादीकडे घेवुन जाणा–या आयुक्तांना कोठेतरी थांबविले पाहिजे, त्यांना परत पाठविले पाहिजे. हे भारतीय प्रशासकीय सेवेतील अधिकारी आहेत त्यामुळे त्यांची जेथे कोठे बदली होईल तेथे ते चांगल्या हुद्दयावर जातील परंतु ते जर लोकांशी गैरशिस्तीने वागत राहतील तर त्यांना कोठेतरी धडा शिकविला पाहिजे. यांनी येथे जो सहा महिने जो कारभार केला आहे याची सखोल चौकशी होणे आवश्यक आहे. शासनाने त्यांना कोणत्या उद्देशाने येथे पाठविले होते, लोकांना सुविधा आणि लाभ मिळवुन देण्यासाठी त्यांना पाठविले होते, महानगरपालिकेचे काम करण्यासाठी पाठविले होते परंतु त्यांनी येथे आल्यानंतर कोणते काम केले आहे? लोकांना काय सुविधा दिल्या आहेत? काय काय त्रास दिला आहे याची चौकशी करुन व जो पर्यत चौकशी पुर्ण होत नाही, चौकशी दरम्यान त्यांच्याकडून हस्तक्षेप होण्याची शक्यता आहे ती लक्षात घेता त्यांची येथुन बदली होणे आवश्यक आहे. कारण की त्यांनी विश्वास गमावला आहे म्हणुन त्यांच्या कारभाराची चौकशी व येथुन बदली असा प्रस्ताव येथे ठेवतो.

यास्तव मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३६(३) तरतुदीनुसार त्यांस महापालिका आयुक्त पदावरुन काढुन टाकणेविषयीच्या ठरावाच्या बाजुने मत देणे व शासनास त्यांना ताबडतोब उल्हासनगर महानगरपालिका आयुक्त पदावरुन काढुन टाकण्याची विनंती करण्यासाठी प्रस्तावित

आपणा सर्वांना विनती आहे की, आपण त्याला सहमती दयाल. धन्यवाद जय हिंद जय महाराष्ट्र

<u>मा. सदस्य श्री. लाल पंजाबी :–</u> मा. महापौरजी, तसेच सर्व सन्माननिय सदस्य, विरोधी पक्ष नेता यांनी हा जो प्रस्ताव ठेवला आहे. तो अंत्यत परिपुर्ण असा प्रस्ताव आहे. एवढा सविस्तर आहे की, त्यामध्ये सर्व बाबींचा उल्लेख आलेला आहे त्यामुळे मी पुनरावृत्ती करु इच्छित नाही इंग्रजीत मी सांगु इच्छितो की, इट इज व्हरच्युअली इमपीचमेंट ऑफ दी कमिशनर हे आयुक्तांवर एक प्रकारचे आरोप आहेत व आमचे बोडारे साहेब जसजसे भाषण करत होते त्यांच्या भाषणातील काही मुद्दे मी लिहून घेतले त्यांच्या भाषणामध्ये सर्व प्रकारचे मुद्दे अंर्तभुत आहेत. मग ते कायदयाच्या उल्लंघनाचे असोत किंवा ठरावांची अंमलबजावणी होत नसल्या बाबतचा मुद्दा असो महसुल वाढविण्यासाठी काही प्रयत्न केले जात नाहीत. अर्थसंकल्प अयशस्वी करण्या मागे सुध्दा आयुक्तांचा हात आहे अशा प्रकारे दहा वेगवेगळया प्रकारामध्ये त्यांनी वर्गीकरण केले व सुमारे ३५ आरोप लावले आहेत त्यांना आम्ही सर्वजण समर्थन देतो. मी या सभागृहामध्ये १९७८ पासुनचा सदस्य आहे येथे श्री. मोहन बेहरानी बसले आहेत श्री. बच्चाराम रुपचंदानी आहेत. मला असे आठवत नाही की, कुण्या अधिका–याच्या विरोधात अशा प्रकारचा अविश्वासाचा ठराव आलेला आहे. याचा अर्थ असा आहे की, आमचे नगरसेवक कधीही जाणीवपूर्वक कुठल्याही आयुक्तास सतावण्यासाठी असे करत नाहीत व १९७८ पासुन आज पर्यत कधीही मुख्य अधिकारी किंवा आयुक्तां विरुध्द अविश्वासाचा प्रस्ताव सभागृहात आला नाही. पहिल्यांदाच हा प्रस्ताव या सभागृहामध्ये आला आहे. ही एक र्दुभाग्यपुर्ण स्थिती आहे की, सहा महिन्यापूर्वी आलेल्या आयुक्तांच्या विरोधात अविश्वासाचा प्रस्ताव येतो. आज ४२ नगरसेवक येथे उपस्थित आहेत व त्यांना असे वाटत नाही की, आयुक्तांनी येथे रहावे.आणि म्हणुन आम्ही या ठरावाचे जोरदार समर्थन करतो मी पुनरावृत्ती करु इच्छित नाही. प्रस्तावास मी अनुमोदन देतो. व हा प्रस्ताव आपण सर्वांनी सर्व संमतीने पारीत करावा व शासनाकडे पाठवावा व जो पर्यत त्यांची चौकशी पूर्ण होत नाही तो पर्यत त्यांची येथुन बदली करावी. इतिवृत्त कायम होण्याची वाट न पहाता या ठरावा अंतर्गतचा निर्णय थेट अंमलात आणण्यात यावा अशा प्रकारचे एक वाक्य या प्रस्तावामध्ये समाविष्ठ करावे. वेळ कमी आहे बहुसंख्य सदस्यांना असे वाटते की, आयुक्तांनी येथे राहू नये.महानगरपालिकेची सार्वत्रिक निवडणूक येत आहे ती निपक्षपातीपणे होणार नाही अशी शक्यता असल्यामुळे या ठरावाची एक प्रत राज्य निवडणूक आयुक्त श्री. नंदलाल यांच्याकडेही पाठविण्यात यावी व निवडणुकी पुर्वी त्यांची बदली केली जावी अशी माझी सूचना आहे.

<u>मा. सदस्य श्री. सुरेश जाधव :–</u> मा. महापौरजी आणि सन्माननिय सदस्य हो, आयुक्त साहेबांनी या महापालिकेत येवुन जे कारनामे केले त्यांच्या बाबतीत अविश्वासाचा ठराव आपण येथे आणला आहे आयुक्तांनी शासन निर्णयाच्या सुध्दा चिंधडया चिंधडया उडविल्या आहेत. शहरातील अनाधिकृत बांधकामे नियमित करण्या बाबतीत शासनाने अध्यादेश काढला होता तो अंमलात आणण्याचे काम आयुक्तांचे होते परंतु त्यांनी येथील महापौर श्रीमती ज्योती कालानी व आमदार श्री. सुरेश पप्पु कालानी यांच्या नादी लागुन एक परिपत्रक काढले होते की, झोपडपट्टीतील बांधकाम नियमित करण्यासाठीच्या प्रस्तावा बरोबर वास्तुविशारदांच्या प्रमाण पत्रांची आवश्यकता नाही अशा प्रकारचे पत्रक काढून लोकांना वितरीत केले होते.त्याचा परिणाम असा झाला की ब–याचशा लोकांनी आपले बांधकाम नियमित करण्याच्या प्रस्तावा बरोबर वास्तुविशारदाचे प्रमाणपत्र न जोडता संचिका पाठविली होती. त्यानंतर संबधित अर्जदारांना त्यांच्या घरी नोटिसा पाठविण्यात आल्या की, वास्तुविशारदाचे प्रमाणपत्र आठ दिवसांच्या

आत सादर करा अन्यथा आपल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही. अशा प्रकारे शासन निर्णय सुध्दा न मानणारे आयुक्त येथे आहेत. त्यांना या महानगरपालिकेतच काय कोणत्याच महानगरपालिकेत पाठवता कामा नये असे मी या महासभेच्या ठरावाव्दारे शासनास सुचित करु इच्छितो की, हे जे अधिकारी शासन निर्णय धुडकावुन राजकिय व्यक्तींच्या नादी लागुन काम करतात त्यांना घरीच बसविले पाहिजे. अशी मी विनंती करतो धन्यवाद.,

**मा.सदस्य श्री.मोहन बेहरानी :—** श्री. धनजंय बोडारे यांनी जो प्रस्ताव मांडला आहे तो एक सविस्तर प्रस्ताव मांडला आहे त्यामध्ये सर्व मुद्‌दयांचा समावेश आहे व आयुक्त सर्व बाबतीत अशयस्वी ठरले आहेत.ते स्थानिक आमदारांच्या दबावा खाली येवुन काम करीत आहेत. महापौर आणि आमदार जसे नाचवतात तसे ते नाचत आहेत. अशा आयुक्तां विरुध्द चौकशी बसविली पाहिजे मी श्री. बोडारे यांच्या प्रस्तावाचे समर्थन करतो. व शासनाकडून जो पर्यत त्यांची चौकशी होत राहिल तोपर्यत त्यांची येथुन बदली केली जावी. व येणारी निवडणूक त्यांच्या नेतृत्वाखाली घेतली जावु नये. त्याच बरोबर श्री. नाना रौराळे हे येथील स्थानिक रहिवासी आहेत आर्दश आचार संहिता लागु होण्या अगोदर त्यांची सुध्दा येथुन बदली केली जावी. जेणे करुन उल्हासनगर मध्ये नि:पक्षपातीपणे निवडणूका होवु शकतील. आभारी आहे.

**मा.सदस्य श्री. प्रमोद टाले :—** मा.महापौर महोदय, आपल्या विरोधी पक्ष नेत्यांनी जो ठराव आणला आहे त्यातून असे दिसुन येते की, सपुर्ण शहर बरबादीच्या दिशेने चालले आहे आणि ही बरबादी जर थांबवायची असेल तर आयुक्तांवर निश्चितपणे कारवाई झाली पाहिजे. मागच्या वेळेस आदेश देवुन सुध्दा कोणताही अधिकारी महासभेत उपस्थित राहिला नाही. त्याच्या अगोदर सुध्दा सूचना देवूनही कोणताही अधिकारी महासभेत उपस्थित राहिला नाही. आणि यावेळेस महापौरांनी सुरक्षा अधिका—यास आदेश देवुन सुध्दा एकही अधिकारी येथे उपस्थित झाला नाही. हा सरळ सरळ संपुर्ण शहराचा या अधिका—यांनी अपमान केला आहे. म्हणुन उदया पासुन पिपल्स रिपब्लिकन पक्षाच्यावतीने ''डांबर फासो आंदोलन'' या अधिका—यांच्या विरोधात आम्ही करणार आहोत याची कृपया नोंद घ्यावी धन्यवाद.

**मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—** सन्माननिय महापौरजी, या विषया बाबत मी दोन वेळा लक्षवेधी सूचना मांडलेली आहे. आयुक्तानी ठेकेदारांना हरामखोर म्हटले होते ते ठेकेदार नंतर आहेत प्रथम ते शहराचे नागरिक आहेत. ठेकेदारांबाबत हरामखोर शब्द उच्चारणा—या या व्यक्तिस येथुन त्वरीत हाकलले पाहिजे. विरोधीपक्ष नेत्यांनी आता सांगितले की, यांनी सहा महिन्यात फक्त तीनच बांधकाम नकाशे मंजुर केले आहेत. हे बांधकाम नकाशे मंजुर करत नाहीत. बांधकाम नकाशे मंजुर करण्यासाठी हे नगररचनाकारांना सांगतात की, पाच पेटी पाहीजेत, पेटी काय असते? पाच पेटी असतील तरच ती फाईल माझ्याकडे घेवुन या तरच मी नकाशा मंजुर करेन. तर पेटी काय असते याचा खुलासा झाला पाहिजे. आम्हाला समजुन येत नाही पेटी काय असते. व अशा व्यक्तीस त्वरीत येथुन हटविले पाहिजे व ज्या लोकांनी बांधकाम परवानगी साठी अर्ज सादर केले आहेत त्या लोकांना बोलावून या बाबतीत चौकशी केली पाहिजे की यांनी आपणा कडून कोणती मागणी केली होती. व बांधकाम नकाशे का मंजुर करत नाहीत? सहा महिन्यामध्ये फक्त तीन बांधकाम परवानग्या मंजुर केल्या आहेत त्यांची सुध्दा चौकशी केली पाहिजे. या तीनच बांधकाम परवानग्या का मंजुर केल्यात? व बिना पेटी मी बांधकाम परवानगी मंजुर करणार नाही असे त्यांनी नगररचनाकार यांना उघड उघड सांगितले आहे. पाच पेटी घेवुन या आणि संध्याकाळी माझ्याकडून बांधकाम परवानगी मंजुर करुन घेवुन जा. व अशा आयुक्तास त्वरीत येथुन हटविले जावे.

**मा.पीठासीन अधिकारी, श्री. किशोर वनवारी :—** सभागृहात सर्व सन्माननिय सदस्यांनी ज्या भावना व्यक्त केल्या आहेत त्या भावनांशी मी सुध्दा सहमत आहे. ज्या प्रमाणे कुटूंब प्रमुख आपले घर चालवित असतो त्या प्रमाणे महापालिकेचा प्रमुख या नात्याने आयुक्त कारभार चालवित असतात. आज पर्यतचा इतिहास पाहिला तर शिवसेना, भाजपा, आरपीआय, या पक्षांनी कधीही आयुक्तां विरुध्द किंवा कुण्या अधिका—या विरुध्द अविश्वासाचा प्रस्ताव आणला नाही. परंतु सर्वाना माहित असेल, श्री. पोखरकर साहेबांची बदली कोणी केली? हे सर्व उल्हासनगर शहरवासी जाणतात. श्री. आर.के.सोनावने साहेबांची बदली कोणी केली हे सुध्दा सर्व शहरवासीयांस माहित आहे. परंतु आज पहिल्यांदाच असे झाले आहे की, एका अधिका—या विरुध्द शिवसेना, भाजपा, कॉग्रेस, आरपीआय, गंगाजल फ्रन्ट, सत्ताधारी पक्षातील जेवढे नगरसेवक आहेत ते सुध्दा त्रस्त आहेत.यांचा स्वभावच असा आहे, ते स्वत: सांगतात की, मी जेथुन आलो तेथे सुध्दा माझ्या विरोधात अविश्वासाचा ठराव पारीत करुन धक्के देवुन मला बाहेर काढले होते. असे म्हटले जाते की, काम न करणा—या अधिका—यास एका ठिकाणाहून दुस—या ठिकाणी पाठविले जाते तेव्हा असे म्हटले जाते की, या हाताची जखम या हाताला झाली. तिकडचे लोक तर सुटले आम्ही

उल्हासनगरवासी त्रस्त झालो. असा अधिकारी जो भारतीय प्रशासकीय सेवेतील अधिकारी आहे. त्यांच्या बाबतीत विरोधीपक्ष नेत्यांनी म्हटले की, आय.ए.एस. म्हणजे आय एम सेफ असे असेल तर ते चुकीचे आहे. ते या शहरात राहत नाहीत म्हणुन त्यांना या शहराची चिंता नाही. आता आता सांगण्यात आले की, यांनी सहा महिन्याच्या कालावधीत फक्त तीन बांधकाम परवानग्या मंजुर केल्या मी माझ्या भावना व्यक्त करुन असे सांगु इच्छितो की, यांनी घर दुरुस्ती परवानग्या देणे सुध्दा बंद केले आहे. अशा प्रकारे खालच्यास्तरावर कोणताही आयुक्त गेला नाही. विदयुत विभागास मर्क्युरी, टयुब लाईट, खरेदी करण्याचा जो अधिकार होता तो सुध्दा यांनी काढून घेतला आहे. प्रत्येक विभागाच्या प्रमुखाचे अधिकार यांनी काढून घेतले आहेत. राजकिय लोकांशी तर सोडाच अधिका–यांशी सुध्दा यांनी वाद निर्माण केले आहेत. कोणताही अधिकारी यांच्याशी खुश नाही. आमचे सचिव साहेब २० वर्षा पासुन विधी अधिकारी होते त्यांना कायदयाची चांगल्या प्रकारे जाण आहे. मी त्यांची प्रशंसा यासाठी करत नाही की, ते आमच्या जवळ आहेत म्हणून . असे काही नाही. जी व्यक्ती कायदया नुसार चालते त्या प्रत्येक व्यक्तिशी त्यांची जवळीक आहे. सचिव साहेबां मध्ये मी एक पाहिले आहे की, त्यांनी कायदया पेक्षा कोणाला जास्त मान सन्मान दिला नाही.जो कायदा आहे तोच ते सर्वाना सांगत आले.म्हणुनच आज ज्या काही महासभा होत आहेत त्या कायदया नुसार होत आहेत. बांधा वापरा आणि हस्तांतरीत करा याबाबतीतील एक विषय उदयाच्या स्थायी समिती मध्ये ठेवण्यात आला आहे, हा मुद्दा महाराष्ट्र शासनाच्या विधी विभागाने प्रलंबित ठेवला आहे, उच्च न्यायालयात प्रलंबित आहे. तरीही उदयाच्या स्थायी समिती सभे मध्ये तो ठेवण्यात आला आहे. याचाच अर्थ त्यांना कायदयाची माहिती नाही. ते म्हणतात मी विधी शाखेचा पदविधर आहे. मला हसु येते, एक विधी शाखेचा पदवीधर उल्हासनगर मध्ये राहत होता त्यांना मी विचारले की, आपण तर विधी शाखेचे पदवीधर आहात आपण उलटे का चालत आहात? त्यांनी सांगितले की, पहिल्या पाना पासुन १००० व्या पानापर्यतचे जे पुस्तक असते ते मी चुकुन हजाराव्या पानापासुन पहिल्या क्रमांकाच्या पाना पर्यत वाचले होते.तर ते विधी शाखेचे पदविधर होते परंतु ते उलट शिकलेले होते ते नेहमी उलट चालायचे. जर एखादया व्यक्तिस कायदा माहित नसेल तर त्यांनी त्या बाबतीत दुस–यास विचारले पाहिजे. आज आम्ही मा. मुख्यमंत्री श्री. विलासराव देशमुख व विधान परिषदेचे मा. उप सभापती, श्री. वसंत डावखरे यांना धन्यवाद देवु इच्छितो सर्व पक्षाचे सदस्यांनी फॅक्स केले वर्तमानपत्रा मध्ये बातम्या दिल्या, उल्हासनगर महानगरपालिकेत जे काही होत आहे ते कायदयाचे उल्लंघन होत आहे. त्यामुळे मा.मुख्यमंत्री महोदयांनी आमच्या सचिव साहेबांना जो न्याय दिला त्या बद्दल सर्व सदस्यांना आनंद आहे . कधी कधी असे म्हटले जाते की, नागीन जेव्हा भुकेलेली असते तेव्हा ती स्वत:ची पिले देखिल खाते, त्यातीलच हे एक उदाहरण आहे. राजकिय लोकांना तर सोडाच परंतु अधिका–यांना सुध्दा सोडले जात नाही. ही बाब दुर्भाग्यपुर्ण आहे. विरोधीपक्ष नेत्यानी जो प्रस्ताव ठेवला आहे, त्यामध्ये चौकशी हा एक शब्द अंर्तभुत करुन तो जो ठराव आहे तो सर्व संमतीने पारीत करु या. व जसे सांगण्यात आले की, एखादया अधिका–याच्या विरुध्द चौकशी चालु केली आणि तो जर येथे उपस्थित राहत असेल तर चौकशी नि:पक्षपातीपणे होवु शकणार नाही. म्हणुन या अधिका–याची बदली करुन चौकशी केली पाहिजे. व येथे जे काही घोटाळे झालेले आहेत तसेच यांनी जे काही मुद्दे मांडले आहेत त्या सर्वान बाबतीत शासनाने लक्ष दिले पाहिजे, व आमचे वरिष्ठ नगरसेवक श्री. लाल पंजाबी यांनी म्हटल्या प्रमाणे या ठरावाची प्रत राज्य निवडणूक आयुक्त श्री. नंदलाल यांच्याकडे पाठविली पाहिजे, उल्हासनगर महानगरपालिकेच्या आगामी सार्वत्रिक निवडणूकीमध्ये जर आयुक्तांना निवडणूक निर्णय अधिकारी म्हणुन नेमले तर हे बदला घेण्याची भावना ठेवतील. मध्यतंरी उल्हासनगर महानगरपालिकेमध्ये एक पोट निवडणूक झाली होती त्यावेळी आमचे उप विभागीय अधिकारी श्री. कटक धोंड यांना त्या निवडणूकीचे प्रमुख केले होते. जेव्हा अन्नु मनवानी हे त्या निवडणूकीत निवडून आले होते व श्री. नाथानी हे निवडणूक हरले होते. त्याच प्रमाणे आगामी सार्वत्रिक निवडणूक यांच्या नियंत्रणाखाली होवु नये, कारण की यांच्या विरोधात बोलणारे, जे सत्य बोलतात, आज आम्ही सत्य तेच बोलत आहोत तसेच येथे जेवढया काही सदस्यांनी भावना व्यक्त केल्यात त्यापैकी कोणाचेही त्यांच्याकडे व्यक्तिगत काम नव्हते. केवळ जनतेच्या भल्यासाठी, शहराच्या भल्यासाठी ते बोलत होते. परंतु आयुक्त बदल्याची भावना ठेवुन वागु शकतात. विरोधी पक्ष नेत्यांनी हा जो प्रस्ताव ठेवला आहे तो सर्व समतीने पारीत केला जात आहे. हा ठराव महाराष्ट्र शासनाकडे त्वरीत पाठवुन अशी विनंती केली जावी की, या आयुक्तांना येथुन त्वरीत हटविले जावे व यांची चौकशी केली जावी. तसेच आमच्या एका सदस्यांनी म्हटले की, हा जो ठराव आहे तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पहाता थेट अंमलात आणला जावा. तसेच शहरवासीयां बाबत, ठेकेदारां बाबत, नगरसेवकां बाबत यांनी जे काही वक्तव्य केले आहे ते शहरातील सर्व वर्तमानपत्रामध्ये छापुन आले आहे.मला दु:खाने म्हणावे लागत आहे की, त्यांना २५ दिवसापूर्वी तीन महत्वाचे मुद्दे आम्ही दिले आहेत.

१. घरपट्टी आर्धी केली जावी. यापूर्वीचे जे दर होते तेव्हढे केले जावेत.

२. ॲन्थोनी ठेकेदार कच—याची बरोबर विल्हेवाट लावत नाही, साफसफाई बरोबर करत नाही त्याचा ठेकेदा रद्द केला जावा.

३. अनाधिकृत बांधकामांवर जो दंड आकारला जात आहे तो कमी केला जावा.

या तीन मुद्दयांवर विशेष महासभा आयोजित करण्यासाठी महापौरांना सूचना दिली आहे. त्यांनी म्हटले होते की, आचार संहिता लागु होण्या अगोदर या बाबतीत सभा आयोजित केली जाईल. त्यांना शहर हिता बाबतीत रस नाही त्यांना ज्या बाबीमध्ये रस आहे त्याचा ठराव कसा पारीत होईल याकडे त्यांचे लक्ष असते. व त्या जे काही चुकीच्या पध्दतीने ठराव पारीत करीत आहेत त्याबाबतीत शासनाला कळविले जाईल.व चौकशी बसविण्याची मागणी केली जाईल. तसेच श्री. मोहन बेहरानी यांनी अतिरिक्त आयुक्त श्री नाना रौराळे यांचा जो मुद्दा उपस्थित केला होता तो या ठरावा मध्ये जोडला जावु शकत नाही. त्यासाठी येथे जेवढे काही

सदस्य बसलो आहोत ते स्वाक्ष—या करुन राज्य निवडणूक आयुक्त श्री. नंदलाल यांना पत्र लिहितील किंवा विशेष महासभेची मागणी करुन यांना कार्यभार न देणे बाबत महाराष्ट्र शासनाला पत्र पाठवु.

**मा.सदस्य श्री. अनिल जयसिंघानी हे सभागृहातुन बाहेर गेले.** 

**मा. सदस्य श्री. जमनादास पुरसवानी :—** मा. महापौर महोदय, आपण सचिव साहेंबाना स्पष्ट निर्देश दया की, या ठरावाची प्रत मा. मुख्यमंत्री महोदय, तसेच नगरविकास सचिव, राज्य निवडणूक आयुक्त श्री. नंदलाल व सर्व संबधित अधिका—यांना त्वरीत पाठविण्यात यावी.

**मा.पीठासीन अधिकारी श्री. किशोर वनवारी :—** ते ठराव वाचुन दाखवित आहेत. तो वाचुन दाखवु दया त्यानंतर आदेश देवु.

**मा.महापालिका सचिव श्री. प्रकाश कुकरेजा :—** मा. महापौर महोदय, विरोधी पक्षनेता यांनी या सभेमध्ये जो ठराव ठेवला आहे त्यामध्ये कित्येक कारणे दर्शविण्यात आलेली आहेत. ती सर्व कारणे ठरावाच्या प्रस्तावने मध्ये अंर्तभुत करण्यात आलेली आहेत. व जो मुळ ठराव आहे तो या प्रमाणे आहे.

ही महासभा आयुक्तांविरुध अविश्वास ठराव समत न करता त्यांच्या विरुध वरील प्रस्तावनेत नमुद केलेल्या मुद्दया बाबत चौकशी बसविणे कामी शासनाकडे जोरदार मागणी करीत आहे आणि चौकशीचा निकाल येईपर्यत आयुक्तांची बदली करण्याची विनंती करीत आहे.

वरील ठरावा अंतर्गत असलेला निर्णय इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

**मा.पीठासीन अधिकारी, श्री. किशोर वनवारी :—** मा. सदस्य श्री. जमनादास पुरसवानी यांनी म्हटल्याप्रमाणे या ठरावाची प्रत मा.मुख्यमंत्री महोदय, राज्य निवडणूक आयुक्त, यांना पाठविण्यात यावी तसेच या ठरावाची प्रत सर्व सदस्यांनाही मिळेल ते ज्या कुणाला पाठवु इच्छित असतील त्यांना ती पाठवू शकतील.

**मा. सदस्य श्री. मोहन बेहरानी :—** या ठरावाची प्रत_ महापालिकेच्या वतीने मा. मुख्यमंत्री महोदयांना व सर्व संबंधितांना पाठविली पाहिजे.

**मा.पीठासीन अधिकारी, श्री. किशोर वनवारी :—** महापालिकेच्या वतीने सचिव कार्यालयाकडून औपचारिकपणे ती मा.मुख्यमंत्री महोदयांकडे पाठविली जाईल असा मी त्यांना आदेश देतो.

**मा. सदस्य श्री. दिलीप लालवानी :–** मा. महापौर महोदय, सुरवातीस मी म्हटल्या प्रमाणे मा. मुख्यमंत्री श्री. विलासराव देशमुख व विधान परिषदेचे उप सभापती श्री. वसंत डावखरे यांचे सर्व समतीने अभिनंदन करण्याचा प्रस्ताव पारीत करून नागपूर अधिवेशनात पाठविण्यांत यावा.

**मा.पीठासीन अधिकारी, श्री. किशोर वनवारी :–** हा ठराव सर्वसंमतीने पारीत केला जात आहे.

सुचक : श्री. धनंजय बोडारे
श्री. मोहन बेहरानी

अनुमोदक : श्री बच्चाराम रुपचंदानी
श्री. प्रमोद टाले

प्रस्ताव :–

श्री.सदाशिव कांबळे यांनी दिनांक ५/६/२००६ पासुन उल्हासनगर महानगरपालिकेत आयुक्त म्हणुन कार्यभार हाती घेतलेला आहे. त्यांनी आयुक्त पदाचा कार्यभार हाती घेतल्यानंतर शहर विकासाच्या कामाला ते गती देतील अशी सर्व शहरवासीयांची, नागरिकांची व महापालिका सदस्यांची अपेक्षा होती. परंतु त्यांच्या कार्यकालाचा आढावा घेतला असता सर्व अपेक्षा फोल ठरल्याचे दिसुन आले आहे. त्यांच्या कालावधीत झालेल्या अनियमीतता व नियमबाह्यता याचा विस्तारपूर्वक तपशिल पुढीलप्रमाणे आहे.

## १. कायद्याचे उल्लंघन

१ मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७ (अ) अन्वये दरवर्षी शहराचा पर्यावरण स्थितीबाबत अहवाल दिनांक ३१ जुलैपूर्वी महापालिकेला सादर करणे बंधनकारक असते, परंतु श्री.कांबळे यांच्या कालावधीत उल्हासनगर महानगरपालिकेने सन २००५–०६ करीता सदरचा अहवाल अद्याप सादर केलेला नाही.

२ मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९४ अन्वये स्थायी समितीने निश्‍चित करुन दिलेल्या नमुन्यातमध्ये महानगरपालिकेचा वार्षिक प्रशासन अहवाल व लेखा विवरणपत्र सादर करणे आवश्यक असताना सदरचा अहवाल व विवरणपत्र अद्याप सादर केलेले नाही.

३. महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम १९७५ चे कलम ८ (३)(ख) अन्वये वृक्ष प्राधिकरणाने (महापालिका आयुक्त हे सदर प्राधिकरणाचे पदसिध्द् अध्यक्ष असतात) झाडे तोडण्यासाठी दिलेल्या परवानगीचा अहवाल ६ महिन्यातुन किमान एकदा सादर करणे आवश्यक असते तथापि सदरचा अहवाल महापालिकेसमोर श्री. कांबळे यांच्या कार्यकालात सादर करण्यात आलेला नाही.

## २. ठरावांची अंमलबजावणी न करणे

४ वृक्ष प्राधिकरणाने दिनांक २/११/०४ रोजीच्या ठराव क्रमांक १४ अन्वये सर्व जमिनींवर विद्यमान झाडांची गणना करण्याचा ठराव केला होता परंतु आजपर्यंत सदरच्या ठरावाची अंमलबजावणी करण्यात आलेली नाही.

५ दिनांक २०/९/२००६ रोजी महासभेत ठराव क्र. १५ ते १९ अन्वये एकमताने संमत करण्यात आलेल्या महत्वाच्या ठरावांची अद्याप अंमलबजावणी झालेली नाही.

६ दुनिचंद कालानी हे कॉलेज ज्याच्या अध्यक्षा स्वत: महापौर श्रीमती ज्योती कालानी हया आहेत हया कॉलेजचे भाडे अद्याप निश्‍चित केलेले नाही त्याचे भाडे निश्‍चित करण्यासाठी महासभा ठराव क्रमांक २९ दिनांक २०.१२.२००० अन्वये पारित करण्यात आला होता. परंतु अद्याप त्यासाठी भाडे निश्‍चिती केलेली नाही परिणामी महापालिकेचे लाखो रुपयांचे नुकसान झालेले आहे.

## ३. उत्पन्न वाढीसाठी आवश्यक ती उपाययोजना न करणे

७ महापालिकेने स्वत:च्या खर्चाने बनविलेल्या भाजी मंडयांचा वापर अनधिकृतपणे सुरु असुन महापालिकेस त्यापासुन भाडयापोटी एक रुपयाही प्राप्त होत नाही. वास्तविक सदरच्या गाळयांचा लिलाव करुन ते वितरीत करण्यात आले असते तर महापालिकेला लाखो रुपयांचा महसुल मिळाला असता परंतु असे करण्यात आलेले नाही. खाजगी लोकांकडुन महापालिकेस एक पैसाही न मिळता सदरच्या गाळयांचा वापर बिनदिक्कतपणे सुरु आहे.

८ उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात तीन मुख्य रेल्वे स्टेशन्स असुन सदर स्टेशनच्या बाहेर महापालिकेतर्फे पे ॲण्ड पार्क ही योजना राबविल्यास महापालिकेस लाखो रुपयांचा महसुल प्राप्त होवु शकतो, परंतु सदरची योजना राबविणेसाठी काहीही ठोस उपाययोजना करण्यात आलेली नाही. या ठिकाणीही खाजगी लोकांकडुन सदरचा व्यवसाय महापालिकेच्या जागेवर सुरु आहे.

९ उल्हासनगर शहरातील अनधिकृत विकासकामे नियमाधीन करण्याकरता आणि तत्संबंधी तद्नुषंगिक बाबींसाठी तरतुद करण्याकरता केलेल्या कायद्याच्या तरतुदीनुसार शहरातील लोकांकडुन अनधिकृत बांधकामे नियमीत करण्यासाठी दंड वसुल करण्यासाठी योग्य पावले उचलण्यात आलेली नाहीत. तसेच लोकांना सदर योजनेचा लाभ घेण्यासाठी पुरेशी माहिती दिलेली नाही. सदर दंडापोटी मिळणारी रक्कम महापालिकेच्या विकास कामांसाठी खर्च होणार असल्याने सदरच्या निधीमधुन महापालिकेची विकासकामे होवु शकली असती.

## ४. अर्थसंकल्पातील तरतुदीनुसार वसुली व खर्च न करणे.

१०. याचे उत्तम उदाहरण म्हणजे महापालिका शिक्षण मंडळास वेतनादी खर्चासाठी अनुदान देते, यासाठी अर्थसंकल्पात तरतुद देखिल केलेली आहे. परंतु श्री.कांबळे यांच्या कालावधीत पुरेशी रक्कम अनुदानापोटी न दिली गेल्याने उच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली आहे.

११ एमआयडीसीला पाणी बिलापोटी नियमीत पैसे न दिल्याने एमआयडीसीतर्फे वारंवार शहरात पाणी कपात करण्यात येते, यामुळे शहरातील नागरिकांना त्रास सहन करावा लागत असुन जनतेमध्ये याबद्दल प्रचंड नाराजी आहे.

१२ शहरात विकासकामे करणा—या ठेकेदारांना वेळेवर देयके देण्यात येत नाहीत. तसेच याबद्दल विचारणा केल्यास ठेकेदारांना गैरवागणुक देण्यात येते तसेच हरामखोर असे शब्द उच्चारुन त्यांचा अपमान करण्यात आला आहे.

१३ घरपट्टी व पाणीपट्टीपोटी थकित असलेल्या प्रचंड रक्कमेची वसुली करण्यासाठी प्रशासनातर्फे काहीही ठोस उपाययोजना करण्यात आलेली नाही. परिणामी आजमितीस थकित रक्कम रु १५० कोटी एवढया मोठया प्रमाणावर आहे.

## ५. प्रशासनातील अनियमीतता

१४ श्री.सदाशिव कांबळे यांनी त्यांच्या आयुक्त पदाच्या कालावधीत अधिकारी व कर्मचारी यांच्यावर योग्य नियंत्रण ठेवले नाही त्यामुळे प्रशासनात शैथिल्य आले आहे. याच कारणामुळे महापालिका केंद्र शासन पुरस्कृत जवाहरलाल नेहरु नागरी पुनरुथ्थान अभियान या योजनेंतर्गत निधी प्राप्त करुन घेण्यासाठी योग्य तो अहवाल शासनाला सादर करु शकली नाही.

१५ आयुक्तांकडुन महापालिका सदस्यांना व अधिका—यांना गैरवागणुक देण्यात येते, पदोपदी त्यांचा अवमान करण्यात येतो.

१६ मा.मुख्यमंत्री हे मुख्य असलेल्या नगरविकास विभागातर्फे श्री.सा.अ. पठाण यांची महापालिकेत सहायक आयुक्त या पदावर प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्यात आली होती. परंतु श्री.कांबळे यांनी श्री.पठाण यांना हजर करुन न घेता मा.मुख्यमंत्री यांच्या आदेशाची देखिल अवमान्यता केली होती. सरतेशेवटी नगर विकास विभागाने सक्त सूचना दिल्यानंतरच श्री.पठाण यांना कामावर हजर करुन घेण्यात आले.

## ६. स्थायी समिती/महापालिकेची मंजुरी वाचुन कर्तव्य पार पाडणे

१७ मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७२ चे उल्लंघन करुन सन २००६–०७ या वर्षात अर्थसंकल्पीय अनुदाना व्यतिरिक्त त्यांनी आपल्या अधिकारांचा वापर करुन खर्च केलेला आहे.

१८ मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६ अन्वये कोणत्याही कर्मचा–याला निलंबीत केल्यानंतर सहा महिन्यांच्या आत महासभेमध्ये मान्यता घेणे आवश्यक असताना अशी कारवाई केलेली नाही.

१९ श्री.एस.एस.साळवे यांची विधी सल्लागार या पदावर फेरनियुक्ती करताना महासभेची मान्यता घेणे आवश्यक होते परंतु अशी मान्यता घेतलेली नाही. अशाचप्रकारे इतरही काही अधिका–यांच्या विशेष कार्य अधिकारी या पदावर नियुक्त्या करण्यात आल्या होत्या.

२० वशीला पध्द्तीने केलेल्या नियुक्त्यांना महासभेची मान्यता घेणे आवश्यक असताना अशी मान्यता न घेताच नियुक्त्या केलेल्या आहेत.

२१ सन २००६–०७ मध्ये कर्मचा–यांना दिवाळीनिमीत्त सानुग्रह अनुदान देण्यात आले. नगर विकासविभागाच्या निर्णयाप्रमाणे यासाठी महासभेची पुर्वमंजुरी घेणे आवश्यक असताना कोणतीही मंजुरी न घेता सदरची रक्कम वितरीत करण्यात आलेली आहे.

## ७. शहरातील अनधिकृत बांधकामे

२२ मा.उच्च न्यायालयात यापूर्वीच शहरातील अनधिकृत बांधकामां बाबतचा मुद्दा प्रलंबित असतानाही दिनांक १/१/२००५ नंतर झालेल्या अनधिकृत बांधकामांवर काहीही ठोस कारवाई केलेली नाही. यामुळे शहरात दिवसेंदिवस अनधिकृत बांधकामांचे प्रमाण वाढत चालले आहे.

२३ सदर याचिकेतील याचिकाकर्ता श्री. हरी तनवानी यांनी नगररचना विभागाकडुन शहरात सुरु असलेल्या बांधकामांची माहिती विचारली असता नगररचना विभागाने १७ ठिकाणी बांधकाम परवानगीचे उल्लंघन करुन वाढीव बांधकाम केल्याची माहिती दिली आहे असे असतानाही सदरच्या बांधकामांवर काही एक कारवाई केलेली नाही.

२४ श्री.कांबळे यांनी आयुक्तपदाचा कार्यभार हाती घेतल्यापासुन केवळ तीन बांधकाम परवानगीचे प्रकरण मंजुर केलेले आहेत. वास्तविक एम.आर.टी.पी ॲक्टचे कलम ४५ अन्वये प्रकरण प्राप्त झाल्यापासुन ६० दिवसांच्या आत त्यावर निर्णय घेणे आवश्यक असते परंतु श्री.कांबळे यांनी काहीही निर्णय न घेतल्याने ते लोकांना नाईलाजास्तव अनधिकृत बांधकामास भाग पाडत आहेत.

२५ मा.मुंबई उच्च न्यायालयाने गार्डन क्र. ४४४ येथील फेरीवाल्यांना हटविण्यासाठी स्पष्ट आदेश दिल्यानंतरही सदर आदेशाची अवहेलना करुन काहीही कारवाई केलेली नाही. आजही सदर परिसरात फेरीवाले मोठया प्रमाणावर आहेत. याबद्दल सदरच्या परिसरातील नागरिकांनी मा.पालकमंत्री श्री गणेश नाईक यांच्या जनता दरबारात केलेल्या तक्रारीनंतर मा.पालकमंत्री यांनी सदरचे फेरीवाले हटविण्यासाठी आयुक्तांना आदेश दिल्यानंतरही आयुक्तांनी काहीही कारवाई न करता पालकमंत्री यांच्या आदेशाची देखिल अवमान्यता केलेली आहे.

## ८. पक्षपातीपणा

२६ कुख्यात स्थानिक आमदारयांच्या निर्देशावरुन त्यांच्या राजकीय विरोधी सदस्यांवर व सदस्यांच्या नातेवाईकां विरुध्द् २० वर्षे जुन्या प्रकरणात पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला. तथापि आमदारांचे सहयोगी सदस्य श्री.देवेंद्रसिंग खेमाणी हयांनी त्यांच्या वडिलांच्या नावाने महापालिकेची जागा बळकावल्याबाबत तक्रार केल्यानंतरही ते फक्त श्री.कालानी यांचे समर्थक असल्याने त्यांच्या विरुध्द् गुन्हा दाखल करण्यात आला नाही.

२७ दिनांक २०/१०/२००६ रोजी होणा—या महासभेसाठी काही सदस्यांनी सचिवांकडे नियम १ (जे) अन्वये प्रस्ताव दाखल केले होते. परंतु महापौरांच्या दबावाखाली सदरच्या प्रस्तावांचा सभेत समावेश न करण्यासाठी महापालिका सचिवांना ज्ञापन देण्यात आला व सदरचे प्रस्ताव थांबवण्यात आले. अशाप्रकारे विरोधी पक्षातील सदस्यांची मुस्कटदाबी करण्याचा प्रकार असुन आयुक्तांनी महासभेच्या अधिकारांमध्ये हस्तक्षेप केलेला आहे.

२८. प्रभाग समिती क्र ३ व ४ च्या सभापतीपदाची निवडणूक दिनांक १/४/२००६ पर्यंत घेणे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २९ अ अन्वये आवश्यक असतानाही महापौरांनी दिनांक २२/५/२००६ व २३/५/२००६ रोजी सदरच्या निवडणूका अनिश्चित कालावधीसाठी स्थगित केल्या आहेत कारण त्यांच्याकडे आवश्यक ते बहुमत नाही. सदर निवडणूका घेणेसाठी आयुक्तांनी प्रभाग अधिकारी व महापौर यांना अद्याप काहीही निर्देश दिलेले नाहीत. अशाप्रकारे ते पक्षपातीपणा करीत आहेत.

## ९. आयुक्तांचे अपयश

२९ उल्हासनगर शहरात पाणी पुरवठयाचे असमान वितरण केले जाते त्यामुळे काही विभागातील लोकांना भरपुर पाणी मिळते तर काही विभागात अजिबात पाणी मिळत नाही यामुळे लोकांमध्ये असंतोष आहे.

३० शहरात साफसफाई विषयक मोठी समस्या आहे. ज्या ठेकेदाराला कचरा उचलण्याचे काम दिले आहे तो ठेकेदार व्यवस्थित काम करीत नसल्याने शहरात जागोजागी कच—याचे ढिग पडलेले आहेत. यामुळे शहरात रोगराई पसरली असुन ४००० व्यक्तींना चिकुनगुन्याची बाधा झाली असुन डेंग्युमुळे २ व्यक्ती बळी पडलेल्या आहेत.

३१ वृक्ष प्राधिकरणाने वृक्ष तोडण्यासाठी मंजुरी दिल्यानंतर त्या ठिकाणी संबधित व्यक्तीने नवीन झाड लावणे आवश्यक असते. परंतु एकही नवीन झाड लावले जात नाही.

३२ अपंग व्यक्तींसाठी काहीही कल्याणकारी योजना राबविण्यात येत नाहीत अथवा महापालिकेकडे त्यासाठी काहीही ठोस कार्यक्रम नाही.

३३ आयुक्तांकडे कोणतीही फाईल गेल्यानंतर त्यावर निर्णय घेण्याऐवजी ''चर्चा करा'' असा शेरा मारुन फाईल प्रलंबित ठेवली जाते. यामुळे कामात शिथीलता आलेली आहे.

## ९. आयुक्तांचे असहकार्य

३४ मा.उपसभापती, महाराष्ट्र विधानपरिषद श्री.वसंत डावखरे यांनी त्यांच्या निधीतुन उल्हासनगर महानगरपालिकेला रुग्णवाहिका घेवुन देण्याचे जाहीर केल्यानंतरही महापालिकेने वेळेत त्यांच्याकडे मागणीपत्र दिले नाही त्यामुळे अद्याप रुग्णवाहिका मिळालेली नाही.

३५ शहरातील हातगाडया हटविणेकामी वाहतुक पोलीसांना आयुक्तांनी योग्य सहकार्य दिले नाही त्यामुळे शहरात वाहतुकीची समस्या मोठया प्रमाणावर आहे.

३६ आयुक्त जाणुनबुजून स्थायी समिती व महासभेच्या बैठकांना उशीराने येतात अथवा अनुपस्थित राहतात असे करुन त्यांनी सदस्यांचा अपमान केलेला आहे.

अशा परिस्थितीत श्री.सदाशिव कांबळे या महापालिकेत आयुक्त म्हणुन काम करण्यासाठी विश्वास हरवुन बसले आहेत. यास्तव मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३६(३) तरतुदीनुसार त्यांस

महापालिका आयुक्त पदावरुन काढुन टाकणेविषयीच्या ठरावाच्या बाजुने मत देणे व शासनास त्यांना ताबडतोब उल्हासनगर महानगरपालिका आयुक्त पदावरुन काढुन टाकण्याची विनंती करण्यासाठी प्रस्तावित.

सुचक : श्री. धनंजय बोडारे
श्री. मोहन बेहरानी

अनुमोदक : श्री बच्चाराम रुपचंदानी
श्री. प्रमोद टाले

प्रस्ताव :

श्री.सदाशिव कांबळे यांनी दिनांक ५/६/२००६ पासुन उल्हासनगर महानगरपालिकेत आयुक्त म्हणुन कार्यभार हाती घेतलेला आहे. त्यांनी आयुक्त पदाचा कार्यभार हाती घेतल्यानंतर शहर विकासाच्या कामाला ते गती देतील अशी सर्व शहरवासीयांची, नागरिकांची व महापालिका सदस्यांची अपेक्षा होती. परंतु त्यांच्या कार्यकालाचा आढावा घेतला असता सर्व अपेक्षा फोल ठरल्याचे दिसुन आले आहे. त्यांच्या कालावधीत झालेल्या अनियमीतता व नियमबाह्यता याचा विस्तारपूर्वक तपशिल पुढीलप्रमाणे आहे.

## १. कायद्याचे उल्लंघन

१ मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७ (अ) अन्वये दरवर्षी शहराचा पर्यावरण स्थितीबाबत अहवाल दिनांक ३१ जुलैपूर्वी महापालिकेला सादर करणे बंधनकारक असते, परंतु श्री.कांबळे यांच्या कालावधीत उल्हासनगर महानगरपालिकेने सन २००५–०६ करीता सदरचा अहवाल अद्याप सादर केलेला नाही.

२ मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९४ अन्वये स्थायी समितीने निश्चित करुन दिलेल्या नमुन्यातमध्ये महानगरपालिकेचा वार्षिक प्रशासन अहवाल व लेखा विवरणपत्र सादर करणे आवश्यक असताना सदरचा अहवाल व विवरणपत्र अद्याप सादर केलेले नाही.

३. महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम १९७५ चे कलम ८ (३)(ख) अन्वये वृक्ष प्राधिकरणाने (महापालिका आयुक्त हे सदर प्राधिकरणाचे पदसिध्द् अध्यक्ष असतात) झाडे तोडण्यासाठी दिलेल्या परवानगीचा अहवाल ६ महिन्यातुन किमान एकदा सादर करणे आवश्यक असते तथापि सदरचा अहवाल महापालिकेसमोर श्री. कांबळे यांच्या कार्यकालात सादर करण्यात आलेला नाही.

## २. ठरावांची अंमलबजावणी न करणे

४ वृक्ष प्राधिकरणाने दिनांक २/११/०४ रोजीच्या ठराव क्रमांक १४ अन्वये सर्व जमिनींवर विद्यमान झाडांची गणना करण्याचा ठराव केला होता परंतु आजपर्यंत सदरच्या ठरावाची अंमलबजावणी करण्यात आलेली नाही.

५ दिनांक २०/९/२००६ रोजी महासभेत ठराव क्र. १५ ते १९ अन्वये एकमताने संमत करण्यात आलेल्या महत्वाच्या ठरावांची अद्याप अंमलबजावणी झालेली नाही.

६ दुनिचंद कालानी हे कॉलेज ज्याच्या अध्यक्षा स्वत: महापौर श्रीमती ज्योती कालानी हया आहेत हया कॉलेजचे भाडे अद्याप निश्चित केलेले नाही त्याचे भाडे निश्चित करण्यासाठी महासभा ठराव क्रमांक २९ दिनांक २०.१२.२००० अन्वये पारित करण्यात आला होता. परंतु अद्याप त्यासाठी भाडे निश्चिती केलेली नाही परिणामी महापालिकेचे लाखो रुपयांचे नुकसान झालेले आहे.

## ३. उत्पन्न वाढीसाठी आवश्यक ती उपाययोजना न करणे

७ महापालिकेने स्वत:च्या खर्चाने बनविलेल्या भाजी मंडयांचा वापर अनधिकृतपणे सुरु असुन महापालिकेस त्यापासुन भाडयापोटी एक रुपयाही प्राप्त होत नाही. वास्तविक सदरच्या गाळयांचा लिलाव करुन ते वितरीत करण्यात आले असते तर महापालिकेला लाखो रुपयांचा महसुल मिळाला असता परंतु असे करण्यात आलेले नाही. खाजगी लोकांकडुन महापालिकेस एक पैसाही न मिळता सदरच्या गाळयांचा वापर बिनदिक्कतपणे सुरु आहे.

८ उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात तीन मुख्य रेल्वे स्टेशन्स असुन सदर स्टेशनच्या बाहेर महापालिकेतर्फे पे ॲण्ड पार्क ही योजना राबविल्यास महापालिकेस लाखो रुपयांचा महसुल प्राप्त होवु शकतो, परंतु सदरची योजना राबविणेसाठी काहीही ठोस उपाययोजना करण्यात आलेली नाही. या ठिकाणीही खाजगी लोकांकडुन सदरचा व्यवसाय महापालिकेच्या जागेवर सुरु आहे.

९ उल्हासनगर शहरातील अनधिकृत विकासकामे नियमाधीन करण्याकरता आणि तत्संबंधी तद्नुषंगिक बाबींसाठी तरतुद करण्याकरता केलेल्या कायद्याच्या तरतुदीनुसार शहरातील लोकांकडुन अनधिकृत बांधकामे नियमीत करण्यासाठी दंड वसुल करण्यासाठी योग्य पावले उचलण्यात आलेली नाहीत. तसेच लोकांना सदर योजनेचा लाभ घेण्यासाठी पुरेशी माहिती दिलेली नाही. सदर दंडापोटी मिळणारी रक्कम महापालिकेच्या विकास कामांसाठी खर्च होणार असल्याने सदरच्या निधीमधुन महापालिकेची विकासकामे होवु शकली असती.

## ४. अर्थसंकल्पातील तरतुदीनुसार वसुली व खर्च न करणे.

१०. याचे उत्तम उदाहरण म्हणजे महापालिका शिक्षण मंडळास वेतनादी खर्चासाठी अनुदान देते, यासाठी अर्थसंकल्पात तरतुद देखिल केलेली आहे. परंतु श्री.कांबळे यांच्या कालावधीत पुरेशी रक्कम अनुदानापोटी न दिली गेल्याने उच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली आहे.

११ एमआयडीसीला पाणी बिलापोटी नियमीत पैसे न दिल्याने एमआयडीसीतर्फे वारंवार शहरात पाणी कपात करण्यात येते, यामुळे शहरातील नागरिकांना त्रास सहन करावा लागत असुन जनतेमध्ये याबद्दल प्रचंड नाराजी आहे.

१२ शहरात विकासकामे करणा—या ठेकेदारांना वेळेवर देयके देण्यात येत नाहीत. तसेच याबद्दल विचारणा केल्यास ठेकेदारांना गैरवागणुक देण्यात येते तसेच हरामखोर असे शब्द उच्चारुन त्यांचा अपमान करण्यात आला आहे.

१३ घरपट्टी व पाणीपट्टीपोटी थकित असलेल्या प्रचंड रक्कमेची वसुली करण्यासाठी प्रशासनातर्फे काहीही ठोस उपाययोजना करण्यात आलेली नाही. परिणामी आजमितीस थकित रक्कम रु १५० कोटी एवढया मोठया प्रमाणावर आहे.

## ५. प्रशासनातील अनियमीतता

१४ श्री.सदाशिव कांबळे यांनी त्यांच्या आयुक्त पदाच्या कालावधीत अधिकारी व कर्मचारी यांच्यावर योग्य नियंत्रण ठेवले नाही त्यामुळे प्रशासनात शैथिल्य आले आहे. याच कारणामुळे महापालिका केंद्र शासन पुरस्कृत जवाहरलाल नेहरु नागरी पुनरुथ्थान अभियान या योजनेंतर्गत निधी प्राप्त करुन घेण्यासाठी योग्य तो अहवाल शासनाला सादर करु शकली नाही.

१५ आयुक्तांकडुन महापालिका सदस्यांना व अधिका—यांना गैरवागणुक देण्यात येते, पदोपदी त्यांचा अवमान करण्यात येतो.

१६ मा.मुख्यमंत्री हे मुख्य असलेल्या नगरविकास विभागातर्फे श्री.सा.अ. पठाण यांची महापालिकेत सहायक आयुक्त या पदावर प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्यात आली होती. परंतु श्री.कांबळे यांनी श्री.पठाण यांना हजर करुन न घेता मा.मुख्यमंत्री यांच्या आदेशाची देखिल अवमान्यता केली होती. सरतेशेवटी नगर विकास विभागाने सक्त सूचना दिल्यानंतरच श्री.पठाण यांना कामावर हजर करुन घेण्यात आले.

## ६. स्थायी समिती/महापालिकेची मंजुरी वाचुन कर्तव्य पार पाडणे

१७ मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७२ चे उल्लंघन करुन सन २००६–०७ या वर्षात अर्थसंकल्पीय अनुदाना व्यतिरिक्त त्यांनी आपल्या अधिकारांचा वापर करुन खर्च केलेला आहे.

१८ मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६ अन्वये कोणत्याही कर्मचा–याला निलंबीत केल्यानंतर सहा महिन्यांच्या आत महासभेमध्ये मान्यता घेणे आवश्यक असताना अशी कारवाई केलेली नाही.

१९ श्री.एस.एस.साळवे यांची विधी सल्लागार या पदावर फेरनियुक्ती करताना महासभेची मान्यता घेणे आवश्यक होते परंतु अशी मान्यता घेतलेली नाही. अशाचप्रकारे इतरही काही अधिका–यांच्या विशेष कार्य अधिकारी या पदावर नियुक्त्या करण्यात आल्या होत्या.

२० वशीला पध्द्तीने केलेल्या नियुक्त्यांना महासभेची मान्यता घेणे आवश्यक असताना अशी मान्यता न घेताच नियुक्त्या केलेल्या आहेत.

२१ सन २००६–०७ मध्ये कर्मचा–यांना दिवाळीनिमीत्त सानुग्रह अनुदान देण्यात आले. नगर विकासविभागाच्या निर्णयाप्रमाणे यासाठी महासभेची पुर्वमंजुरी घेणे आवश्यक असताना कोणतीही मंजुरी न घेता सदरची रक्कम वितरीत करण्यात आलेली आहे.

## ७. शहरातील अनधिकृत बांधकामे

२२ मा.उच्च न्यायालयात यापूर्वीच शहरातील अनधिकृत बांधकामां बाबतचा मुद्दा प्रलंबित असतानाही दिनांक १/१/२००५ नंतर झालेल्या अनधिकृत बांधकामांवर काहीही ठोस कारवाई केलेली नाही. यामुळे शहरात दिवसेंदिवस अनधिकृत बांधकामांचे प्रमाण वाढत चालले आहे.

२३ सदर याचिकेतील याचिकाकर्ता श्री. हरी तनवानी यांनी नगररचना विभागाकडुन शहरात सुरु असलेल्या बांधकामांची माहिती विचारली असता नगररचना विभागाने १७ ठिकाणी बांधकाम परवानगीचे उल्लंघन करुन वाढीव बांधकाम केल्याची माहिती दिली आहे असे असतानाही सदरच्या बांधकामांवर काही एक कारवाई केलेली नाही.

२४ श्री.कांबळे यांनी आयुक्तपदाचा कार्यभार हाती घेतल्यापासुन केवळ तीन बांधकाम परवानगीचे प्रकरण मंजुर केलेले आहेत. वास्तविक एम.आर.टी.पी ॲक्टचे कलम ४५ अन्वये प्रकरण प्राप्त झाल्यापासुन ६० दिवसांच्या आत त्यावर निर्णय घेणे आवश्यक असते परंतु श्री.कांबळे यांनी काहीही निर्णय न घेतल्याने ते लोकांना नाईलाजास्तव अनधिकृत बांधकामास भाग पाडत आहेत.

२५ मा.मुंबई उच्च न्यायालयाने गार्डन क्र. ४४४ येथील फेरीवाल्यांना हटविण्यासाठी स्पष्ट आदेश दिल्यानंतरही सदर आदेशाची अवहेलना करुन काहीही कारवाई केलेली नाही. आजही सदर परिसरात फेरीवाले मोठया प्रमाणावर आहेत. याबद्दल सदरच्या परिसरातील नागरिकांनी मा.पालकमंत्री श्री गणेश नाईक यांच्या जनता दरबारात केलेल्या तक्रारीनंतर मा.पालकमंत्री यांनी सदरचे फेरीवाले हटविण्यासाठी आयुक्तांना आदेश दिल्यानंतरही आयुक्तांनी काहीही कारवाई न करता पालकमंत्री यांच्या आदेशाची देखिल अवमान्यता केलेली आहे.

२६ शहरातील अनधिकृत बांधकामे नियमानुकूल करणेसाठी शासनाने अध्यादेश काढल्यानंतर नागरिकांना बांधकाम नियीमत करण्यासाठी अर्ज करण्यास सुरुवात केली असता महापौर व आयुक्तांनी पत्रक काढुन नागरिकांना कळविले की, झोपडपट्टी व बॅरेकमध्ये राहणा–या नागरिकांना वास्तुविशारदाचा दाखला जोडुन देण्याची आवश्यकता नाही. परंतु याप्रमाणे त्यांनी कार्यवाही केली असता महापालिकेच्या नगररचना विभागातुनच असे अर्ज नाकारण्यात आले व वास्तुविशारदाचा दाखला जोडुन अर्ज करण्याबाबत कळविण्यात आले. असे करुन आयुक्तांनी जनतेची दिशाभुल केली आहे.

## ८. पक्षपातीपणा

२७ कुख्यात स्थानिक आमदारयांच्या निर्देशावरुन त्यांच्या राजकीय विरोधी सदस्यांवर व सदस्यांच्या नातेवाईकां विरुध्द् २० वर्षे जुन्या प्रकरणात पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला. तथापि आमदारांचे सहयोगी सदस्य श्री.देवेंद्रसिंग खेमाणी हयांनी त्यांच्या वडिलांच्या नावाने महापालिकेची जागा बळकावल्याबाबत तक्रार केल्यानंतरही ते फक्त श्री.कालानी यांचे समर्थक असल्याने त्यांच्या विरुध्द् गुन्हा दाखल करण्यात आला नाही.

२८ दिनांक २०/१०/२००६ रोजी होणा—या महासभेसाठी काही सदस्यांनी सचिवांकडे नियम १ (जे) अन्वये प्रस्ताव दाखल केले होते. परंतु महापौरांच्या दबावाखाली सदरच्या प्रस्तावांचा सभेत समावेश न करण्यासाठी महापालिका सचिवांना ज्ञापन देण्यात आला व सदरचे प्रस्ताव थांबवण्यात आले. अशाप्रकारे विरोधी पक्षातील सदस्यांची मुस्कटदाबी करण्याचा प्रकार असुन आयुक्तांनी महासभेच्या अधिकारांमध्ये हस्तक्षेप केलेला आहे.

२९. प्रभाग समिती क्र ३ व ४ च्या सभापतीपदाची निवडणूक दिनांक १/४/२००६ पर्यंत घेणे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २९ अ अन्वये आवश्यक असतानाही महापौरांनी दिनांक २२/५/२००६ व २३/५/२००६ रोजी सदरच्या निवडणूका अनिश्चित कालावधीसाठी स्थगित केल्या आहेत कारण त्यांच्याकडे आवश्यक ते बहुमत नाही. सदर निवडणूका घेणेसाठी आयुक्तांनी प्रभाग अधिकारी व महापौर यांना अद्याप काहीही निर्देश दिलेले नाहीत. अशाप्रकारे ते पक्षपातीपणा करीत आहेत.

३० आयुक्त हे प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे स्थानिक आमदारांना मदत करीत आहेत. यामुळे येवु घातलेल्या महापालिकेच्या सार्वत्रिक निवडणूक आयुक्तांच्या पर्यवेक्षणाखाली निरपेक्ष वातावरणात पार पडणार नाही व त्यामध्ये पक्षपातीपणा होवु शकतो.

## ९. आयुक्तांचे अपयश

३१ उल्हासनगर शहरात पाणी पुरवठयाचे असमान वितरण केले जाते त्यामुळे काही विभागातील लोकांना भरपुर पाणी मिळते तर काही विभागात अजिबात पाणी मिळत नाही यामुळे लोकांमध्ये असंतोष आहे.

३२ शहरात साफसफाई विषयक मोठी समस्या आहे. ज्या ठेकेदाराला कचरा उचलण्याचे काम दिले आहे तो ठेकेदार व्यवस्थित काम करीत नसल्याने शहरात जागोजागी कच—याचे ढिग पडलेले आहेत. यामुळे शहरात रोगराई पसरली असुन ४००० व्यक्तींना चिकुनगुन्याची बाधा झाली असुन डेंग्युमुळे २ व्यक्ती बळी पडलेल्या आहेत.

३३ वृक्ष प्राधिकरणाने वृक्ष तोडण्यासाठी मंजुरी दिल्यानंतर त्या ठिकाणी संबधित व्यक्तीने नवीन झाड लावणे आवश्यक असते. परंतु एकही नवीन झाड लावले जात नाही.

३४ अपंग व्यक्तींसाठी काहीही कल्याणकारी योजना राबविण्यात येत नाहीत अथवा महापालिकेकडे त्यासाठी काहीही ठोस कार्यक्रम नाही.

३५ आयुक्तांकडे कोणतीही फाईल गेल्यानंतर त्यावर निर्णय घेण्याऐवजी ''चर्चा करा'' असा शेरा मारुन फाईल प्रलंबित ठेवली जाते. यामुळे कामात शिथीलता आलेली आहे.

## १०. आयुक्तांचे असहकार्य

३६ मा.उपसभापती, महाराष्ट्र विधानपरिषद श्री.वसंत डावखरे यांनी त्यांच्या निधीतुन उल्हासनगर महानगरपालिकेला रुग्णवाहिका घेवुन देण्याचे जाहीर केल्यानंतरही महापालिकेने वेळेत त्यांच्याकडे मागणीपत्र दिले नाही त्यामुळे अद्याप रुग्णवाहिका मिळालेली नाही.

३७ शहरातील हातगाडया हटविणेकामी वाहतुक पोलीसांना आयुक्तांनी योग्य सहकार्य दिले नाही त्यामुळे शहरात वाहतुकीची समस्या मोठया प्रमाणावर आहे.

३८ आयुक्त जाणुनबुजून स्थायी समिती व महासभेच्या बैठकांना उशीराने येतात अथवा अनुपस्थित राहतात असे करुन त्यांनी सदस्यांचा अपमान केलेला आहे.

अशा परिस्थितीत श्री.सदाशिव कांबळे या महापालिकेत आयुक्त म्हणुन काम करण्यासाठी विश्वास हरवुन बसले आहेत. यास्तव मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३६(३) तरतुदीनुसार त्यांस महापालिका आयुक्त पदावरुन काढुन टाकणेविषयीच्या ठरावाच्या बाजुने मत देणे व शासनास त्यांना ताबडतोब उल्हासनगर महानगरपालिका आयुक्त पदावरुन काढुन टाकण्याची विनंती करण्यासाठी प्रस्तावित.

<u>महासभा ठराव क्र. २७</u>                                        <u>दिनांक : ७/१२/२००६</u>

ही महासभा आयुक्तांविरुध अविश्वास ठराव समत न करता त्यांच्या विरुध वरील प्रस्तावनेत नमुद केलेल्या मुद्दया बाबत चौकशी बसविणे कामी शासनाकडे जोरदार मागणी करीत आहे आणि चौकशीचा निकाल येईपर्यत आयुक्तांची बदली करण्याची विनंती करीत आहे.

वरील ठरावा अंतर्गत असलेला निर्णय इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

**सर्वानुमते**

पीठासीन अधिकारी
विशेष महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा. पीठासीन अधिकारी श्री. किशोर वनवारी:—</u> राष्ट्रगिता अगोदर बरोबर दोन तीन गोष्टी मी सांगु इच्छितो की, उदया दूपारी १.०० ते ३.०० च्या दरम्यान माझ्या वाढदिवसाचा कार्यक्रम आहे त्यामध्ये सहभोजनासाठी व आर्शिवाद देण्यासाठी आपण सर्वानी उपस्थित रहावे, तसेच आपण सर्वानी मला आज पीठासीन अधिकारी म्हणुन येथे बसविले त्याबद्दल मी संपुर्ण सभागृहाचे धन्यवाद मानतो. उदया साईबाबा मंदिरातील मुर्तीची पुजा आहे , शनिमंदिर येथील मुर्तीचा आर्शिवाद घेवु, शनिदेव महाराज उल्हासनगर मधील सर्व पक्षाच्या सदस्यांचे रक्षण करतील. व अधर्माचा नाश करतील

<u>मा. सदस्य श्री प्रमोद टाले :—</u> उदया सर्व अधिका—यांना भोजनासाठी बोलविले आहे की नाही ? .

<u>मा. पीठासीन अधिकारी श्री. किशोर वनवारी:—</u> ठरावासाठी मतदान घ्यायचे की सर्वसंमतीने पारीत करायचा ?कोणाला काही हरकत नाही? सर्व समंतीने पारीत.? ठीक आहे.

<u>मा. सदस्य श्री प्रमोद टाले :—</u>अधिका—यांचे काय करायचे ?

.

**<u>मा. पीठासीन अधिकारी श्री. किशोर वनवारी:—</u>**मी आपणास सांगितले आहेच की आपण त्यांच्याबाबतीत शासनास पत्र लिहिणार  आहोत. कृपया राष्ट्रगिताकडे लक्ष दयावे.

**<u>मा. महापालिका सचिव,श्री. प्रकाश कुकरेजा   :—</u>**कृपया राष्ट्रगिताकडे लक्ष दयावे.

जनगणमन या राष्ट्रगीताच्या सामुहिक गायनानंतर ६.१५  वाजता मा. पीठासीन अधिकारी श्री. किशोर वनवारी यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका